# विसावे शतक आणि समाजवाद

अनुवादक ——

प्रा. कृ. ना. वकसंगवकर

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, १

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

मं.प्र.
ee

83

भाषांतरमाला क्र. ३०

# विसावे शतक आणि समाजवाद

# TWENTIETH CENTURY SOCIALISM

*by*

The Socialist Union, London

अनुवादक

प्रा. कृ. ना. वळसंगकर

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ
मुंबई

प्रथमावृत्ती : १९७३ (शके १८९५)

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ;
सचिवालय, मुंबई ३२.

© महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ

मुद्रक :

विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.,
४०५ नारायण पेठ, पुणे ३०

किंमत : ७·००

# निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा; इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे, तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे; इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने, साहित्य आणि संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश–अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे, हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ॲरिस्टोफेनीस्, युरीपिडिस्, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टाय, दोस्तएव्स्की, स्तानिस्लाव्स्की, बर्ट्रान्ड रसेल, रूथ बेनेडिक्ट, रायशेनबाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनव्स्की, कॅसिरेर्, गॉर्डन व्ही. चाइल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीतरत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

भाषांतरमालेत मंडळाने आतापर्यंत तीस अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे "ऑन लिबर्टी", गुन्नर मिरदालचे "एकानॉमिक थीअरी ॲन्ड अंडरडेवलप्ड् रीजन्स", रसोचे "सोशल कॉन्टॅक्ट", स्तानिस्लाव्स्की यांचे "ॲन ॲक्टर प्रिपेअर्स", एम्. एन्. रॉय यांचे "रीझन, रोमॅन्टिसीझम् ॲन्ड रिव्हल्यूशन", कै. पां. वा. काणे यांचे "हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र" इत्यादी पुस्तकांची भाषांतरे वा सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

५. प्रस्तुत पुस्तक हे सोशॅलिस्ट युनियन, लंडन या संस्थेने संपादित व प्रकाशित केलेल्या "Twentieth Century Socialism" या ग्रंथाचा अनुवाद असून तो प्रा. कृ. ना. वळसंगकर, मुंबई यांनी सुबोध मराठीत केला आहे. सदर अनुवाद मंडळाच्या भाषांतरमालेत "विसावे शतक आणि समाजवाद" या शीर्षकाने प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ
सचिवालय, मुंबई ३२.

वाई :
कार्तिक १९ (शके १८९५)
दि. १० नोव्हेंबर, १९७३.

# अनुक्रमाणिका


आरंभीचे चार शब्द

## ओळख

१. पूर्व परिचय १
दोन विरोधी व्यवस्था – सिद्धांत कोलमडला – आजचा पेच २

## भाग पहिला

## दृष्टिपथातील ध्येये

२. मूल्यांबाबतचे मतभेद ८
३. समान संधी १२
समतेचा अर्थ – उपभोक्त्यांमधील समता – उत्पादकांमधील समता
४. स्वातंत्र्याकडे २५
निवडीची संधी – वैपुल्यातून स्वातंत्र्याकडे – कामधंद्याचे स्वातंत्र्य
५. सहभावत्वाच्या दिशेने ३७
समाजाची बांधणी – न ओळखलेल्या जबाबदाऱ्या – कारखानदारीचे हेतू

## भाग दुसरा

## साधनांची निवड

६. अनुभवातून शिक्षण ४७
७. आर्थिक सुरक्षितता ४९
सुरक्षिततेसाठी लढा – चलनवाढ टाळून बेकारीचे उच्चाटन – वेतनकिंमती यांची मळसूत्री वाढ
८. न्याय्य विभागणी ६२
उत्पन्नाची बांधणी – उत्पन्नांची पुनर्विभागणी – संपत्तीची पुनर्विभागणी
९. विस्तारी अर्थव्यवस्था ७२
भांडवल गुंतवणुकीचे कार्य – कार्यक्षमतेला प्रोत्साहन – कामाचे हेतू
१०. औद्योगिक लोकशाही ८५
राजकीय क्षेत्राशी तुलना – सामूहिक सौद्याचे फलित – कर्मशाळेतील लोकशाही – नेतृत्व – कायदा नव्हे

## भाग तिसरा

## समाजवादी अर्थव्यवस्था

११. सर्व प्रश्नांचे मूळ १०१

१२. मालकी आणि सत्ता १०२

सार्वजनिक मालकी–एक उपाय – मालकीसंबंधीचे बदलते हक्क – बाजार आणि व्यवस्थापकीय सत्ता

१३. सत्तेचे नियंत्रण १११

शह आणि समतोल यांच्या साहृयाने नियंत्रण – मोक्याच्या सहयोगाने नियंत्रण - सामाजिक जबाबदारीद्वारा नियंत्रण

## निष्कर्ष

१४. भविष्याकडे नजर १२२

समता आणि त्या पलिकडे – खाजगी उद्योगक्षेत्र – सार्वजनिक औद्योगिक क्षेत्र – कायद्याच्या मर्यादा – बदल घडवून आणण्याची इच्छा.

पारिभाषिक व कठीण शब्दांची सूची

# आरंभीचे चार शब्द

प्रिय वाचक,

या पुस्तकात तुम्हाला जे सापडण्याजोगे नाही ते शोधण्याचा कृपया प्रयत्न करू नका. समाजवादासंबंधी विविध प्रकारे लिहिता येईल. आम्ही त्यातील केवळ एकाच प्रकाराची निवड केली आहे. आपल्या कल्पनेतील समाजवादी समाजाच्या जीवनाचे कलात्मक चित्र कल्पक लेखकांनी रंगविले आहे. वास्तववादी इतिहासकारांनी समाजवादी विचार आणि आचारातील प्रगतीच्या मार्गातील निरनिराळ्या गटांचा मागोवा घेतला आहे. भविष्यातील समाजवादी समाजाची घटना राजकीय सैद्धांतिकांनी तयार केली आहे. अर्थशास्त्रज्ञांनी समाजवादी अर्थव्यवस्थेबाबत चर्चा केली आहे; एवढेच नव्हे तर सत्ता मिळाल्यास प्रत्यक्ष काय कृती केली जाईल, याची माहिती देणारे अनेक कार्यक्रम समाजवादी पक्षाने मांडले आहेत.

आमचे पुस्तक यापैकी कुठल्याच प्रकारात बसत नाही. हे कथन म्हणजे भाकित नव्हे अथवा इतिहासही नव्हे. राजकीय वा अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडणारा हा निबंध नाही. आणि हा निवडणूक जाहीरनामा असल्याचा तर आमचा मुळीचा दावा नाही. खरे तर व्यावहारिक नीतिशास्त्राचा हा एक अभ्यास आहे. समाजवादी नीतिशास्त्राच्या भूमिकेतून आर्थिक व्यवस्थेच्या क्षेत्राचा विचार या ठिकाणी अभिप्रेत आहे. "समाजवाद हा मूलतः नैतिक प्रश्न आहे आणि मानव व त्याचे बांधव यांच्यातील परस्पर संबंधाशी समाजवाद प्रामुख्याने निगडीत आहे." या केर हार्डीच्या विचाराशी आम्ही सहमत आहोत. चांगल्या समाजाच्या आमच्या कल्पनेत अंतर्भूत असलेला आदर्शवाद आणि असा समाज प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक असलेला वास्तववाद या दोहोंचा समन्वय साधणाऱ्या उद्याच्या समाजवादी अर्थव्यवस्थेबाबत व्यापक नि तर्कनिष्ठ भूमिका मांडणे हाच आमचा हेतू होय.

आम्ही केवळ स्वदेशातील आर्थिक व्यवस्थेचाच विचार केला आहे, हे सत्यच आहे. व्यापार आणि साहाय्य या संबंधातील सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक समस्यांचा विचार यात समाविष्ट नाही. याचा अर्थ या प्रश्नांना खास महत्त्व नाही असा नव्हे; विशेषतः ब्रिटनसारख्या छोट्या राष्ट्राच्या शिरावरील फार मोठ्या समुद्रपार जबाबदाऱ्या आणि आर्थिक कमकुवतपणा यांच्या संदर्भात तर नाहीच नाही. तसेच आमच्यापेक्षा अधिक संपन्न नसलेल्या जगातील अविकसित प्रदेशातील लोकांच्या बाबतीतील समाजवाद्यांच्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व कमी लेखण्याचाही आमचा उद्देश नाही. कोणत्याही एखाद्या राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेबाबत समाजवादाचा अर्थ काय होईल, हे शोधन काढणे एवढाच या ग्रंथलेखनामागील प्रमुख हेतू होता. आम्ही उदाहरणादाखल म्हणून ब्रिटनचा उल्लेख केला आहे. परंतु आम्ही

मांडलेली तत्वे अधिक व्यापक आहेत; आणि आमचा असा विश्वास आहे की जगातील कोठल्याही समाजवाद्यांना ती उपयुक्त ठरतील.

आमच्या समूहातील सभासदांमध्ये झालेल्या चर्चांच्या आधारावर या ग्रंथाच्या लेखनाचा प्रारंभ झाला. पण प्रत्येक मसुद्यावर सर्व सदस्यांनी जास्तीत जास्त सामंजस्य निर्माण करण्याच्या हेतूने चर्चा केली आहे. अनेक प्रथितयश तज्ञांनी अमोल सल्ला दिला. आम्ही त्यांचे आभारी आहोत, हे नमूद करू इच्छितो. त्या सर्व दृष्टिकोनांचे परिश्रमपूर्वक तपशीलवार नि सुसंगत विवेचन तयार करणे व प्रत्यक्ष मसुदा तयार करणे ही कामगिरी ऑक्सफोर्ड विद्यापीठातील औद्योगिक संबंध या विषयाचे ज्येष्ठ व्याख्याते ॲलन फ्लॅंडर्स आणि "सोशॅलिस्ट कॉमेन्ट्री" च्या संपादिका रिटा हिंडेन यांचेवर सोपविण्यात आली होती.

आम्हाला जे काही सांगायचे आहे ते या विषयावरील निर्णायक विवेचन नाही, यांची आम्हा सर्वांना जाणीव आहे. पण समाजवादी श्रद्धेच्या मूलभूत तत्त्वांचा नव्याने विचार करून आधुनिक जगाच्या संदर्भात या विचाराचा मतितार्थ समजून घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न, म्हणून हे विवेचन आम्ही आमच्या समाजवादी बंधूंना सादर करीत आहोत. भौतिक सुधारणा हेच केवळ आर्थिक प्रगतीचे गमक आहे, या आज वैपुल्याने आढळणाऱ्या विचारास त्याज्य मानणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषांना या विवेचनात रस वाटेल अशी आम्हाला आशा आहे.

सोशॅलिस्ट युनियन
४४७–स्टॅंड

फेब्रुवारी १९५६ लंडन डब्ल्यू. सी. २.

'एखादे महान तत्त्वही हटवादी स्पष्टीकरणामुळे इतके दडपले जाते की त्याची ओळखही पटेनाशी होते; इतकेच नव्हे तर कालांतराने मूळ तत्त्वाऐवजी कर्मठपणासच अधिक महत्त्व प्राप्त होते. म्हणूनच जी सूत्रे व शब्दसंहिता मूळ तत्त्वांशी अतूटपणे संबंधित आहेत, एवढेच नव्हे तर त्यामुळे केवळ मूळ तत्त्वांचा खरा बोध होतो असे सांगण्यात येते, त्या सर्वांची चिकित्सा करणे उचित होय.'

**—जे. केर हार्डी**
**'लेबर लिडर' मधून १९०४**

# प्रस्तावना

ब्रिटिश सोशॅलिस्ट युनियनने प्रसिद्ध केलेल्या ' ट्वेंटिएथ सेंचरी सोशॅलिझम ' या पुस्तकाचा हा अनुवाद. मूळ पुस्तक सुमारे अठरा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाले असले तरी त्यात चर्चिलेले विषय अजूनही ताजे आणि महत्त्वाचे आहेत. भारताच्या दृष्टीने तर ते प्रत्यही अधिकाधिक मोलाचे ठरत आहेत.

विषयप्रतिपादनाची भूमिका स्पष्ट करताना नित्याच्या परिचित वर्गवारीमध्ये हे पुस्तक बसू शकणार नाही असे पुस्तकाच्या आरंभीच म्हटले आहे. ही भविष्यवाणी नाही वा हा इतिहासही नाही; निवडणुकीचा जाहीरनामा असल्याचा दावाही येथे नाही. हा एक उपयोजित नीतिशास्त्रीय ( Applie Ethics ) अभ्यास आहे. अर्थरचनेच्या क्षेत्रात समाजवादी नीतिशास्त्राची उपयोजना करण्याचा हा उपक्रम आहे. समाजवाद हा मुळात नैतिक वा नीतिशास्त्रीय प्रश्न आहे. माणसामाणसांचे परस्परांशी संबंध कसे असावेत हा त्यातील मुख्य प्रश्न आहे. हे केर हार्डीचे मत आम्हाला मान्य आहे. समाजाचे हित या कल्पनेत ध्येयवादी भूमिका अभिप्रेत आहे; उलट ती प्रत्यक्षात आणता यावी यासाठी वास्तववादी दृष्टीची गरज आहे. या दोन कल्पना एकत्र आणणारा उद्याच्या अर्थव्यवस्थेविषयी व्यापक आणि सुसंबद्ध दृष्टिकोण शोधण्याचा यात हेतू आहे.

समाजवादाचा विचार या विशिष्ट स्वरूपात आमच्याकडे फारसा झालाच नाही. समाजवादाची कल्पना रशियन राज्यक्रांतीनंतर आमच्याकडे हळूहळू येऊ लागली असली तरी ती लोकांत अधिकाधिक प्रसारित होण्याचे श्रेय पं. जवाहरलाल नेहरू यांच्याकडेच जाते. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून १९३० नंतरच्या काळात त्यांनी ती विशेष उचलून धरली. जगातील अनेक राष्ट्रांतील बुद्धिमंतांमध्ये रशियन राज्यक्रांतीमुळे आणि त्यानंतर १९२८ साली सुरू झालेल्या सर्वंकष आर्थिक नियोजनामुळे या कल्पनेचे विलक्षण आकर्षण निर्माण झाले होते. भारतातही त्याचे पडसाद उमटले. त्या काळातील जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्रदेव, अशोक मेहता, युसुफ मेहरअली, मिनू मसानी, राममनोहर लोहिया, अच्युत पटवर्धन इ. अनेक तरुण नेते या कल्पनेने भारावले होते. कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना १९३४ मध्ये झाली. कॉंग्रेसमधील डावे-उजवे हा वाद सुरू होण्याचाही हाच काळ. म. गांधींच्या नेतृत्वाला तत्कालीन डाव्यांनी हळूहळू आव्हान देण्यासही आरंभ केला. इंग्रजी राजवटीत बेकायदा ठरविल्या गेलेल्या साम्यवादी ( कम्युनिस्ट ) पक्षाने संयुक्त आघाडीच्या राजकारणाचा आश्रय घेऊन कॉंग्रेस समाजवादी पक्षात प्रवेश केला व अंतर्गत वाद वाढविण्यास सहाय्य केले. तथापि तो विकोपास जाऊ शकला नाही. गांधींनी आपल्या नैतिक अधिकाराचा वापर केला. कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीपासून अलग होऊन कॉंग्रेसमधील आपले एकमेवाद्वितीय स्थान कायम राखले.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या विशेष तपशिलात जाण्याचे येथे कारण नाही. डाव्यांना पडते घ्यावे लागण्याचे कारण डाव्यांची भूमिका नैतिक दृष्ट्या सकृद्दर्शनी तोकडी पडली हे होय. गांधींच्या नेतृत्वाचे अधिष्ठान राष्ट्रसभेच्या संघटनेत रोवलेले होते असे नाही. संघटनेपासून बाजूस जाऊनही ते ती आपल्या इच्छेनुरूप वाकवू शकत असत हे प्रसिद्ध आहे त्यांचे नेतृत्व धर्माधिष्ठित नैतिक अधिष्ठानावर उभारलेले होते; ते केवळ वा शुद्ध राजकीय स्वरूपाचे नव्हते. धार्मिक श्रद्धेची मुळे खोलवर रुजलेली असल्यामुळे जनतेचा राजकीय उठाव करण्याचे सामर्थ्य गांधींना प्राप्त झाले होते. सर्वांना एकत्र राखण्याच्या सामर्थ्याचा भासही त्यात होत होता. यामुळे इंग्रजी राजवटीविरुद्ध प्रभावी आंदोलन उभारण्याची शक्यता त्यात दिसत होती. म्हणूनच १९२९–३९ या दहा वर्षांतील डाव्यांचा उठाव प्रभावी होऊ शकला नाही असे म्हणावे लागते.

गांधींच्या धर्माधिष्ठित नैतिकतेला मूलभूत स्वरूपाचे आव्हान फक्त एम्. एन्. रॉय यांच्या भूमिकेतच होते. वैचारिक क्रांतीवाचून नवे विचार या ठिकाणी रुजू शकणार नाहीत; राजकीय क्रांतीसाठी प्रथम वैचारिक प्रबोधन ( रेनेसन्स ) प्रभावी झाले पाहिजे, बुद्धिवादाचा स्वीकार केला पाहिजे, असे आग्रहाने सांगणारे नेते म्हणजे रॉय हे होत. प्रबोधनावाचून व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, साम्यवाद इ. सारेच विचार उजवी वा वरवरचे ठरतील त्यांचा प्रभाव पडणे अशक्य होईल. याबरोबरच भारतीय परिस्थितीच्या संदर्भात समाजवाद ही गैरलागू कल्पना आहे; आमच्यापुढील खरा प्रश्न समाजवादी क्रांतीचा नसून सर्व लोकशाही शक्तींना व्यापक स्वरूपाच्या जहाल कार्यक्रमाच्या आधाराने एकत्र आणून राष्ट्रीय क्रांती करण्याचा आहे, अशी भूमिका रॉय यांनी घेतल्याकारणाने ते समाजवादी आंदोलनापासून बाजूला पडले. उलट, राष्ट्रवादाशी जुळणारी त्यांची भूमिका नव्हतीच. दुसऱ्या महायुद्धाला फॅसिझमविरोधी युद्धाचे स्वरूप प्राप्त होताच जगातील लोकशाहीच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला आणि संयुक्त राष्ट्रांच्या युद्धप्रयत्नांशी सहकार्य करणे अपरिहार्य झाल्याने रॉय भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधून बाहेर पडले. रॉय यांचा विचार अशा प्रकारे एकाकी पडला, प्रभावी होऊ शकला नाही.

प्रस्थापित वैचारिक चौकटीतून घेतली जाणारी समाजवादाची भूमिका हीच काय ती राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रवाहात टिकून राहिली. या भूमिकेचे सर्वात महत्त्वाचे नेते पं. जवाहरलाल नेहरू हे होत. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या ते जवळ होते. मार्क्स व लेनिन यांच्याविषयी त्यांना आदर होता. गांधींच्या विचारांशी त्यांचे मतभेद होते. जहाल विचारांचे तत्कालीन एक प्रमुख नेते बाबू सुभाषचंद्र बोस यांच्याशी त्यांनी काही काळ सहकार्यही केले होते. तथापि गांधींच्या नेतृत्वाला निर्णायक स्वरूपाचे आव्हान देण्याचा बोस यांचा आग्रह मात्र त्यांनी मानला नाही. आपल्याला पाठिंबा न दिल्या-बद्दल जेव्हा बोस त्यांच्यावर रागावल्यासारखे दिसले तेव्हा गांधींशी सरळ सरळ सामना करण्याची कल्पना आत्मघातकीपणाची असल्याचा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय

आंदोलनाची उभारणी गांधींवाचून अशक्य आहे. डाव्या गटाने आततायीपणा केल्यास "देशात आधीच आढळणाऱ्या फुटीर प्रवृत्ती नियंत्रित करण्याऐवजी त्यात भर घातल्याचा आक्षेप आमच्यावर येऊ शकेल. या सर्वांचा परिणाम म्हणजे राष्ट्रीय आंदोलनाचे सामर्थ्य वाढविण्याची आज गरज असताना ते आंदोलन दुर्बल करण्यास आम्ही जबाबदार ठरू." असा इशारा नेहरूंनी बोसना दिला होता.

नेहरू हे डाव्या गटाचे सर्वात बडे नेते. समाजवादाची कल्पना भारतात लोकप्रिय करण्यात मोठा वाटा त्यांचाच. लाहोर येथील काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची ध्येय म्हणून घोषणा केली आणि सरंजामशाही व भांडवलशाहीवर जोरदार हल्ला चढविला. त्यानंतर सुमारे दहा वर्षे समाजवादाचा सतत प्रचार केला. सोविएट रशियाप्रमाणेच आर्थिक नियोजनाच्या मार्गाने आपला आर्थिक प्रश्न सुटेल या कल्पनेचा पुरस्कार करणारेही नेहरूच. याच संदर्भात राष्ट्रीय नियोजन समिती (नॅशनल प्लॅनिंग कमिटी) स्थापन करण्यात आली, ती याच काळात आणि नेहरूंच्या अध्यक्षतेखालीच. तथापि गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या मनावर सतत प्रभाव राहिला. गांधींच्या नेतृत्वावाचून ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनतेचा उठाव करता येणार नाही; जहाल कार्यक्रम किंवा डावा गट हा तदर्थ समर्थ नाही हा त्यांचा निष्कर्ष असल्याने हा उठाव करता यावा म्हणून समाजवादी क्रांतीची कल्पना ते तपासू लागले. तत्त्वाग्रह गेला; व्यवहारदृष्टी आली. आपण एका अर्थाने समाजवादी सिद्धांत मानतो, तो दृष्टिकोण स्वीकारतो. आपणास साम्यवाद मात्र मुळीच मान्य नाही, पवित्र सिद्धांत म्हणून आपण काहीही मानावयास तयार नाही, अमूक विचार करा वा तमूक कृती करा असे कोणीही सांगितलेले आपणास आवडत नाही. शिवाय साम्यवादी पद्धतीत पुष्कळच हिंसा आढळते. रशियाचा अलिकडचा अनुभव हेच सांगतो, साध्य हे साधनापासून वेगळे करणे इष्ट नाही; अशा तऱ्हेची भूमिका ते घेऊ लागले.

नेहरूंची ही निवड लोकशाही समाजवाद की साम्यवाद यातील निवड होती हे म्हणणे समर्थनीय ठरणार नाही. रशियन राज्यक्रांतीतून उद्‌भवलेल्या प्रयोगाच्या म्हणजे साम्यवादाच्या प्रत्यक्ष अनुभवातून भ्रमनिरास होऊन नव्याने विचारमंथन सुरू होण्याला अजून बराच अवकाश होता. हे विचारमंथन बव्हंशाने दुसरे महायुद्ध संपल्यानंतरच सुरू झाले. हे पुस्तक त्या विचारमंथनाचाच एक भाग आहे. उलट, नेहरूंची सोव्हिएट रशियावरील टीका ही गांधीवादाच्या दृष्टिकोणातून होती. नेहरूंच्या निवडीचा अर्थ राष्ट्रवाद की समाजवाद या द्वंद्वाच्या संदर्भातच लावता येतो. त्यांनी राष्ट्रवाद निवडला आणि आपण एका अर्थी समाजवाद मानतो असे ते म्हणू लागले.

येथे नेहरूंच्या वैयक्तिक थोरवीचा प्रश्न उद्‌भवत नाही. ते एक अत्यंत थोर नेते होते यात मुळीच संशय नाही. परंतु ते थोर होते, डाव्या गटात त्यांचे अद्वितीय स्थान होते यामुळेच त्यांनी केलेली निवड भावी इतिहासाला वळण देणारी ठरली. येथे वस्तुनिष्ठ दृष्टीने त्या निवडीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. आपली वैचारिक

भूमिका नेहरूंनी बदलली हे मान्य केले तरी तो टीकेचा मुद्दा होण्याचे कारण नाही. त्या काळात वैचारिक भूमिकेवरून इतिहासाला वळण देण्याचा प्रयत्न करणारे गांधी, रॉय यांसारखे नेते देखील आपल्या भूमिका बदलत होते, हे प्रसिद्ध आहे. नेहरूंच्या निवडीचा अर्थ लावण्याच्या व तिचे परिणाम तपासण्याच्या प्रयत्नांची त्यांच्या वैयक्तिक थोरवीशी गल्लत करण्याचे कारण नाही; किंबहुना त्या थोरवीमुळेच हा प्रयत्न अर्थपूर्ण ठरतो, असे म्हणता येईल.

नेहरूंनी केलेली निवड ही वास्तविक पहाता लोकशाही समाजवाद की साम्यवाद यातील निवड नसून राष्ट्रवाद की समाजवाद यातील निवड होती. नेहरूंनी राष्ट्रवाद निवडला. ही निवड, एक स्विकारले की दुसरे सोडायचे अशा, अपवर्जक ( एक्स्क्लुझिव्ह ) भूमिकेवरून करावयाची निवड नव्हती. यात कालक्रमानुसार प्राथम्याचा प्रश्नही नव्हता. हे प्राथम्य राष्ट्रीय स्वातंत्र्यालाच होते हे सर्वांना मान्य होते. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्तीचे साधन म्हणून काँग्रेसची उभारणी करताना काय करायचे हा खरा प्रश्न होता. निश्चित साध्य म्हणून विशिष्ट कार्यक्रम पुढे ठेवून सामान्य जनतेचा प्रभावी जहालपक्ष म्हणून काँग्रेसची उभारणी करायची, की काहीही झाले तरी ऐक्य कायम राहिले पाहिजे यासाठी वेगवेगळी ऐक्याच्या गरजेनुसार कार्यक्रमाची आखणी करावयाची यातील ती निवड होती. नेहरूंनी केलेल्या निवडीमुळे सामान्य दृष्टीने बोलायचे झाल्यास समाजवादासाठी राजकीय सत्ता हवी ही भूमिका बाजूस पडली आणि राजकीय सत्ताप्राप्तीचे साधन म्हणजे त्यासाठी लढावयास सामान्य जनतेला उद्युक्त करण्याचे साधन म्हणून समाजवाद पुढे मांडला जाऊ लागला. त्याला गरजेनुसार अर्थ देण्यात येऊ लागला. ती एक घोषणा बनली. घोषणा या केवळ प्रतीकात्मक असतात. त्यांचे आकर्षण कितीही असले तरी त्यांचा अर्थ तपासण्याची फारशी गरज राहत नाही. तात्पर्य, सगळेच आपण समाजवादी असल्याचे म्हणू लागले. माझा समाजवादाला विरोध नाही पण करणार काय, समाजवादाचे ८५ निरनिराळे अर्थ करण्यात येतात, असे सरदार पटेल एकदा म्हणाल्याचे प्रसिद्ध आहे.

राजकीय सत्तेचे साध्य म्हणून नव्हे तर राजकीय सत्ताप्राप्तीचे एक साधन हे स्वरूप समाजवादाला प्राप्त झाल्यामुळे सत्तेच्या आकर्षणाला प्राधान्य आले हे स्वाभाविक आहे. या आकर्षणाने प्रसंगी अहिंसेच्या मर्यादाही ओलांडल्या आणि साध्य-साधन विवेकही सोडला. धर्माधिष्ठित नैतिकता सर्वांना एकत्र आणू शकली नाही. सर्व धर्मतत्त्वे एकच नीतिसंदेश देतात ही कल्पना सत्तेच्या आकर्षणामुळे प्रभावी ठरू शकली नाही. सर्वांना एकत्र आणू पहाणारा राष्ट्रवाद सत्ताप्राप्तीच्या वेळीच एका अर्थी पराभूत झाला. ' धार्मिक ' राष्ट्रवादाच्या आधारे देशाची फाळणी झाली. गांधींचे नेतृत्व बाजूला गेले आणि काँग्रेसने सत्ताग्रहण केले.

राजकीय सत्तेचे साधन बनलेला समाजवाद सत्ताप्राप्तीनंतर प्रत्यक्षात आणताना त्याच्या अर्थातील विविध छटा प्रकट होऊ लागल्या. को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ,

सोशॅलिस्टिक पॅटर्न, स्ट्रॅटेजिक कंट्रोल्स, संमिश्र अर्थव्यवस्था इ. निरनिराळया कल्पना या संदर्भात येऊन गेल्या; अजूनही येत आहेत. आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आणि त्यायोगाने समाजवाद येणार, आपले आर्थिक प्रश्न सुटणार अशी भोळी आशा सामान्य नागरिकाला वाटू लागली. वयात आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना मतदानाचा हक्क आणि त्यावर आधारलेली बहुमताची सत्ता ही राजकीय पद्धती. यामुळे सत्ता टिकवून धरण्यासाठी म्हणजेच मते मिळविण्यासाठी समाजवाद हा एक परवलीचा शब्द बनला. रेनेदुमां या फ्रेंच लेखकाने भारतीय समाजवादाचा 'शाब्दिक समाजवाद' (व्हर्बल सोशॅलिझम) असा आपल्या 'सोशॅलिझम्स अँड डेव्हलमेंट' या ग्रंथात उल्लेख केला आहे. तो म्हणतो, भारतात समाजवाद हे सरकारचे अधिकृत तत्त्व आहे. बहुतेक सर्व राजकीय पक्षांनाही तेच तत्त्व अधिकृत रीत्या मान्य आहे. अनेक उद्योगपतीदेखील समाजवादी अर्थव्यवस्थेस आपण अनुकूल असल्याचे सांगतात, समाजवादी समाजरचना प्रस्थापित झाली पाहिजे हे आग्रहाने सांगताना सगळे एकमेकाशी स्पर्धा करतात; परंतु तिची व्याख्या करण्याच्या खटाटोपात कोणीही पडत नाही. कोणी सामाजिक न्याय म्हणजे समाजवाद म्हणतात, तर इतर कोणी आर्थिक नियोजन म्हणजे समाजवाद समजतात. काहींच्या मते तर आधुनिकीकरणाची विचारप्रणाली इतकाच त्याचा अर्थ आहे. त्याबरोबरच प्रत्यक्ष काम करण्याविषयी तुच्छतेचा दृष्टिकोण हेही भारतीय परिस्थितीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणून त्याने सांगितले आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार येथे नमूद करण्याचे कारण गेल्या पंचवीस वर्षांत समाजवादाचे तात्त्विक आकर्षण हळूहळू नाहीसे झाल्यासारखे दिसत आहे हे होय. समाजवादी म्हणवणारे पक्ष फारसे रूजू शकले नाहीत. त्यांतील मतभेद वाढत गेले. साम्यवादी शक्तीही दुभंगल्या. सत्तारूढ पक्षानेही समाजवादाऐवजी 'गरिबी हटाओ' ही घोषणा स्वीकारुन एकार्थाने या संपुष्टात आलेल्या आकर्षणाची कबुलीच दिली असे म्हणता येईल. युद्धोत्तर काळात हे घडले; आणि हा काळ म्हणजे समाजवादासंबंधी सुरू झालेल्या विचारमंथनाचा काळ आहे. या विचारमंथनाला अनेक कारणे आहेत. सोव्हिएत प्रयोगाविषयीचा भ्रमनिरास, समाजवादी (साम्यवादी) म्हणविणाऱ्या राष्ट्रांचे आपसातील मतभेद व कलह, समाजवादी राजवटीचा व राष्ट्रीयीकरणाच्या प्रयोगाचा इंग्लंडमधील अनुभव, यूरोपीय राष्ट्रातील डाव्या पक्षांची खुंटलेली वाढ, युद्धोत्तरकाळात तंत्रविद्येचा झपाट्याने झालेला विकास आणि त्यातून निर्माण झालेली दुसऱ्या औद्योगिक क्रांतीची शक्यता, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत झालेले महत्त्वाचे बदल इ. अनेक कारणे थोडक्यात नमूद करता येण्यासारखी आहेत. युद्धोत्तर काळात सुरू झालेल्या समाजवादाच्या चर्चेत प्रस्तुत पुस्तकाने अत्यंत मोलाची भर घातली आहे.

परंपरागत विचार अपुरे पडले असल्याने सामाजिक बदल घडवून आणण्याची इच्छा जागृत करावयाची असल्यास समाजवादाने नवी दृष्टी दाखविली पाहिजे. विशिष्ट प्रकारची आर्थिक व्यवस्था वा संस्था यांचा आग्रह सोडला पाहिजे. सर्वत्र सर्व परिस्थितीत

एकच आर्थिक तत्त्वप्रणाली लागू पडेल या भ्रामक समजुतीपासून मुक्त झाले पाहिजे. उलट, आपल्या उद्दिष्टांचाही विसर पडू देता कामा नये. साधनांना साध्यांचे स्वरूप देता कामा नये, साध्यांकडे दुर्लक्ष करताही उपयोगी नाही. आर्थिक सत्तेवर सामाजिक नियंत्रण बसवणे हा समाजवादाचा आर्थिक संघटनेबाबत खरा मूलभूत प्रश्न आहे. या प्रश्नाचा उकल सामाजिक नियंत्रण म्हणजे राजसत्तेद्वारा नियंत्रण असे मानल्याने होऊ शकत नाही. राज्यसत्ता संसदीय लोकशाहीवर आधारलेली हवी, या भूमिकेतूनही तो पुरता सुटू शकत नाही. संसदीय लोकशाहीच्या संस्थात्मक चौकटीतून सत्तेचे केंद्रीकरण होऊ शकते आणि लोकशाही मार्गाने हुकूमशाही देखील प्रस्थापित करता येते असा दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात अनुभव आला आहे. तसे होऊ नये यासाठी नागरिकांच्या मूलभूत हक्कांची हमी लागते; आणि दोन निवडणुकांच्या मध्यंतरीच्या काळात सरकारवर लोकमताचा सतत दबाव राहावा यासाठी आपल्या व्यक्तिस्वातंत्र्या-विषयी जागरूक असणारे सुबुद्ध नागरिक लागतात. तात्पर्य, आर्थिक संघटनेची उभारणी करताना राष्ट्रीयीकरण वा सरकारी मालकी अशा एखाद्या तत्त्वाच्या सर्रास आहारी न जाता संस्थात्मक जीवनाचा व्यापक दृष्टिकोणातून विचार केला पाहिजे; आणि सामाजिक नियंत्रणासाठी विविध स्वरूपाच्या परिस्थितीनुसार विविध तंत्रांचा अवलंब केला पाहिजे.

समाजवादाच्या संदर्भात मानवी मूल्यांचा प्रश्न या पुस्तकात उपस्थित केला आहे. हा प्रश्न समाजवादी विचारसरणीत प्रथमपासूनच होता. प्रारंभीच्या साम्यवाद्यांचा विचार केला तरी तो प्रश्न त्यांच्या चर्चेत मूलभूत मानला जाई असे म्हणता येते. कार्ल मार्क्सच्या लेखनाची प्रेरणादेखील त्यातच आहे प्रत्येकाचे स्वातंत्र्य ही सर्वांच्या स्वातंत्र्याची शर्त आहे ( Freedom of each is the condition of the freedom of all ). हे कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील वचन प्रसिद्ध आहे. फ्रेंच राज्यक्रांतीने मूलभूत म्हणून मानलेल्या मूल्यांवरच साम्यवादाची वैचारिक उभारणी झाली होती; आणि तीच मूल्ये अधिक अर्थपूर्ण व्हावीत यासाठी त्यांचा आर्थिक क्षेत्रात अंमल झाला पाहिजे या भूमिके-तून समाजवाद–साम्यवाद हे विचार पुढे आले. यामुळे सोविएट राज्यक्रांतीनंतर जगातील विचारवंतांच्या आशा उंचावल्या आणि कालांतराने त्यांचा भ्रमनिरास झाला. साम्यवादाची पावले हुकूमशाहीच्या दिशेने पडू लागली

तथापि भारतात मात्र फ्रेंच राज्यक्रांतीला प्रेरणा देणारी मूल्ये विशेष रुजलीच नाहीत. त्यावर आधारलेल्या राजकीय संस्था इंग्रजी राजवटीत आल्या हे खरे परंतु अनुकूल मनोभूमिकेच्या अभावामुळे त्या औपचारिक राहिल्या, जीव धरू शकल्या नाहीत. ही मनोभूमिका तयार करण्याचे कार्य हे भारतासारख्या बहुजिनसी, उच्चनीच-तेच्या उतरंडीवर आधारलेल्या समाजात आजही महत्त्वाचे क्रांतिकार्य म्हणता येईल. उदारमतवाद हा भारतीय सामाजिक परिस्थितीत पुरेसा नसला तरी क्रांतिकारक विचार आहे. राजकीय समतेला सार्वत्रिक मताधिकारामुळे औपचारिक प्रतिष्ठा प्राप्त झाली असली

तरी जातिभेद, धार्मिक भेद, इ. जुन्या कोंड्या अजून फोडावयाच्या आहेत; श्रीमंत–गरीब हा भेदही प्रत्यही अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करीत आहेच. या परिस्थितीत सामाजिक समता अभावाने तळपत असल्यास आश्चर्य नाही. केवळ आर्थिक समतेला आवाहन करणारा समाजवादाचा विचार हा विकृतरूप धारण करतो. या परिस्थितीत केवळ सत्तावाद ऑथॉरिटेरियनिझम बनतो. म्हणून तो समता प्रस्थापित करू शकणार नाही हे निराळे स्पष्ट करण्याची गरज नाही.

वैचारिक व सांस्कृतिक दृष्टीने मागासलेल्या भारतीय जीवनाचे प्रश्न आणि अगदी अद्ययावत अनुभवातून पुढारलेल्या जगात सुरू झालेले विचारमंथन यांचा सांधा कसा जुळतो असा प्रश्न यावर निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशा विचारमंथनातून आर्थिक प्रश्नाची मांडणी करण्यात आलेले हे पुस्तक आम्हाला उपयुक्त कसे ठरणार? याचे थोडक्यात उत्तर असे की, पुढारलेल्या जगाच्या आणि भारताच्या समस्यांचे आता एका अर्थाने सारखेच स्वरूप झाले आहे. येथे राजकीय व सामाजिक समतेची मूल्ये रुजलीच नाहीत, आणि आर्थिक विषमतेचा प्रश्न भेडसावू लागला आहे. तेथे आर्थिक समता साध्य व्हावी यासाठी राजकीय समतेचा व तिच्यावर आधारलेल्या लोकशाहीचा त्याग केला पाहिजे ही विचारसरणी पुढे येऊन केल्या गेलेल्या आर्थिक प्रयोगांचा कटु अनुभव आला आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांत समतोल निर्माण करून नवा लोकशाही जीवन-दृष्टीवर आधारलेला समाज निर्माण करण्याचे तेथील कार्य आमच्या मानाने सकृद्दर्शनी अधिक सोपे वाटण्याचा संभव आहे. परंतु विज्ञान व तंत्रविद्या यांच्या अत्यंत झपाट्याने होत असलेल्या विकासामुळे तेथील प्रश्नांचे स्वरूप आमच्यामानाने अधिकाधिक गुंतागुंतीचे होत आहे. विविध राष्ट्रांतील वा विविध प्रकारच्या राष्ट्रसमूहातील समस्यांचे स्वरूप स्थूलमानाने सारखेच असले तरी त्यात निरनिराळी वैशिष्ट्ये आहेत; भिन्नत्वाच्या छटा आहेत. आमचे प्रश्न बरेच निराळे असून ते सोडविण्याचे मार्ग आमचे आम्हांलाच शोधून काढले पाहिजेत, हे सर्व मान्य. परंतु आता दुसऱ्या आणि अधिक मूलभूत अर्थाने सर्व जगच एकत्र येऊ लागले आहे, एक झाले आहे. त्यामुळेच हे पुस्तक आर्थिक प्रश्नांबाबत विचार करताना उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. मराठी वाचकांना ते उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने अत्यंत मोलाचे काम केले आहे असे म्हटले पाहिजे.

मुंबई
२ ऑक्टोबर, ७४.

गोवर्धन पारीख

# आोळख

## १. पूर्व परिचय

एकोणिसाव्या शतकातील भांडवलशाही समाजरचनेने निर्माण केलेल्या परिस्थितीतून समाजवादी चळवळ उदयास आली. अजोड भौतिक प्रगती आणि त्याच बरोबर अपरंपार मानवी दुःख ज्या आर्थिक रचनेतून निर्माण झाले तिच्या विरुद्ध पुकारलेले हे बंड होते. त्या शतकाच्या शेवटी शेवटी इंग्लिश समाजात दिसणारे दृश्य रॉबर्ट ब्लॅचफोर्ड याने अविस्मरणीय शब्दांत रंगविले आहे.

" मित्रा, कुठल्याही मोठ्या इंग्लिश शहरांतील रस्त्यावर जा आणि स्वतःच्या डोळ्यांनी तेथील दृश्य पाहा. काय दिसते तुला ? काही श्रीमंत आणि आळशी मंडळी अनार्जित संपत्ती उधळताना आणि अशा प्रकारे स्वतःच्या व इतरांच्या शरमेस आणि अधःपातास कारणीभूत होताना दिसतात. कष्ट उपसणारे मजूर मात्र घाणेरड्या रस्त्याच्या कडेस झोपडपट्टीमध्ये राहताहेत असे दृश्य तुला दिसते. श्रीमंती थाटाने सजविलेल्या क्लबांच्या बाहेर, दुकानाबाहेर वा उपाहारगृह व थिएटराबाहेर भुकेली, अस्वच्छ व नागडी-उघडी मुलेसुद्धा तुला दिसतात. प्रमाणाबाहेर काम करूनही पुरेसे वेतन ज्यांना मिळत नाही असे स्त्री-पुरुष दिसतात. धर्म, संस्कृती आणि संपत्ती यांच्या बाजूलाच दुराचार, दारिद्र्य आणि रोगराई. . . . दिसतात.

हे अलंकारिक बोलणे नव्हे, ही वस्तुस्थिती आहे. अन्याय आणि दुःख यांच्या भाराखाली आपल्या आप्तजनांचे आयुष्य भरडून चालले आहे. सर्वांच्या बरोबर तू सुद्धा या परिस्थितीस कारणीभूत आहेस असा माझा दावा आहे. यावर उपाय शोधणे हे तुझे कर्तव्य आहे आणि तसा प्रयत्न केल्यास तुला उपाय अवश्य सापडेल, असे माझे म्हणणे आहे. "*

हे व या प्रकारची आवाहने फुकट गेली नाहीत. सभोवतालची वस्तुस्थिती ही अटळ वा अध्यादेशित म्हणून मानण्यास नकार देणाऱ्या व स्वतःला मोठ्या अभिमानाने समाजवादी म्हणवून घेणाऱ्या लोकांची संख्या वाढत होती. परिस्थितीवर उपाय शोधण्याची जबाबदारी त्यांनी पत्करली. भविष्यात नेमके बदल काय घडतील यावर जरी त्यांचे एकमत नव्हते तरी प्रस्थापित अर्थव्यवस्था अन्याय्य आहे, त्या जागी दुसरी संपूर्णपणे निराळी अशी व्यवस्था स्थापणे आवश्यक आहे, या समाजवादी विचारसरणीच्या मध्यवर्ती कल्पनेबाबत त्यांच्यात एकवाक्यता होती. भांडवलशाही पद्धतीला बळी पडलेल्या लोकांची दुःखे कमी करण्यासाठी काही सुधारणा करणे ठीक;

---

* राबर्ट ब्लॅचफोर्ड - मेरी इंग्लंड, १९०८ आवृत्ती; पृ. २५१

परंतु कोणासही अन्यायकारक होऊ नये अशा प्रकारची नवी अर्थव्यवस्था ही खरी गरज होती. या विशिष्ट ध्येयामुळे समाजवाद्यांनी इतर सर्व सुधारणावादी चळवळींपेक्षा आपले वेगळेपण सिद्ध केले.

## दोन विरोधी व्यवस्था :

प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थक व समाजवादी यांचे केवळ एका मुद्द्यावर एकमत होते. तो असा की, भांडवलशाही व समाजवाद या दोन भिन्न प्रकृतीच्या, परस्परविरोधी आणि एकमेकांशी कधीही जुळते घेणार नाहीत अशा आर्थिक रचना आहेत. आपण एक स्वीकारू शकतो किंवा तिच्याऐवजी दुसरी; पण त्या दोहोंचा एकत्र मेळ मात्र घालता येणार नाही. प्रत्येक पक्षाने आपल्या पसंतीच्या रचनेचा तात्त्विक पाठपुरावा केला आणि तत्कालीन पद्धतीनुसार 'शास्त्रीय' सिद्धांतही मांडण्यात आले. एका बाजूने भांडवलशाही विचाराचे गोडवे गाऊन त्यातील मूलभूत चांगल्या गोष्टी मांडल्या व भांडवलशाही रचना कशी अटळ आहे हे सांगितले. तर दुसऱ्या बाजूने असाच दावा समाजवादी रचनेच्या समर्थनार्थ केला.

भांडवलशाहीच्या समर्थकांनी आपल्या म्हणण्यास बळकटी आणण्यासाठी नव्या आणि महत्त्व पावत असलेल्या अर्थशास्त्राचा आधार घेतला. अर्थशास्त्रीय प्रक्रिया ही सर्वस्वी पुरवठा व मागणी यांच्या नियमांवर आधारीत आहे, असा त्यांचा दावा होता. म्हणूनच केवळ खुली स्पर्धा चालू ठेवून या पुरवठा व मागणीच्या नियमांना पूर्ण मोकळीक द्यावी, हे सरकारचे कार्य होय. मजुरी, किंमती, भाडे व नफा या सर्व गोष्टी हस्तक्षेपाने न ठरविता या व्यक्तिनिरपेक्ष आणि म्हणून निःपक्षपाती नियमांना ठरवू द्याव्यात. कायद्याच्या दृष्टीने सारे सारखेच हा नियम राजकीय जीवनातल्या-प्रमाणेच आर्थिक जीवनातही असणे यासारखी दुसरी बहारीची गोष्ट काय आहे ?

इतकेच नव्हे तर, ॲडॅम स्मिथने म्हटल्याप्रमाणे ही रचना अशी आहे की, यात प्रत्येक व्यक्तीने आपणास कल्पना नसताना सर्वसामान्यांचे हित साधावे यासाठी काही तरी अदृश्य शक्ती तिला प्रेरणा देत असते. स्वतःचा फायदा हा या रचनेचा गाभा असल्यामुळे माणूस साहसप्रवण होतो आणि भरपूर काम करतो. तथापि स्पर्धेमुळे किंमती आपोआपच प्रमाणात राहतात आणि प्रत्येकास वाढत्या उत्पादनाचा लाभही मिळतो. ही गोष्ट खरी की, यातील काही भाग्यवान तर काही फुटक्या नशिबाचे होते. कुठलेही कौशल्य अंगी नसताना काही श्रीमंतीत राहू शकले तर काही गरिबीने इतके पीडलेले होते की, त्यांना काम करण्याची साधी संधीसुद्धा उपलब्ध नव्हती, ही मोठी दुर्दैवी गोष्ट होती. पण त्यासाठी अर्थशास्त्राच्या चौकटीबाहेर समाधान शोधण्यात येई. त्यामुळे श्रीमंतांना दानधर्म करण्याची संधी लाभली तर गरिबांना विरक्तीची. घवघवीत यश वा अतिरेकी अपयश हा मानवी आयुष्याचा एक स्वाभाविक भाग बनला.

भांडवलशाहीबाबत जी तिरस्काराची भावना होती तशीच भावना या असल्या सिद्धांताबाबतही समाजवाद्यांच्या मनात होती. अनुभवाने वाईट ठरलेल्या गोष्टी चांगल्या आहेत, असे सिद्ध करण्याचा हा एक प्रकार आहे; असे त्यांचे मत होते. यात गृहीत धरलेल्या सर्व गोष्टींना त्यांनी सरळ सरळ आव्हान दिले. उत्पादनांच्या साधनांची मालकी खाजगी का असावी? भयानक विषमतेचा प्रसार करणारी खुली बाजारपेठ पद्धती चालू का ठेवावी? व्यक्तिगत फायदा या एकाच कारणास्तव मानवाने अधिक प्रयत्न करून भौतिक प्रगती साधली आहे काय? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांना समाजवादाच्या कल्पनेत सापडली. या समाजवादात खाजगी मालकी नष्ट होऊन सार्वजनिक मालकी येईल, खुल्या बाजारपेठेच्या जागी नियंत्रित अर्थव्यवस्था येईल आणि व्यक्तिगत फायद्याची भावना नष्ट होऊन समाजसेवेची भावना वाढीस लागेल. म्हणजेच आगामी समाजवादी रचना सध्याच्या तिरस्करणीय भांडवलशाही रचनेचे अगदी विरुद्ध टोक असेल.

भांडवलशाही विचाराप्रमाणेच समाजवादी विचारालाही सैद्धांतिक पाठिंबा आवश्यक होता आणि तो पुरातन अर्थशास्त्राइतकाच बळकट हवा होता. मागणी व पुरवठ्याच्या कडक नियमांना विरोध करण्यासाठी सामाजिक बदलाचा तितकाच कडक नियम सांगण्यात आला. आपल्या बाजारयंत्रणेमुळेच शेवटी आपला घात होणार आणि त्यातूनच समाजवादी रचनेचा उदय होणार आहे, हे मुळी भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या ध्यानातच आलेले नाही, असे समाजवाद्यांचे ठासून सांगणे होते. कारण वास्तवात खुली स्पर्धा ही खुली राहातच नाही. उलट भांडवलदारांना मक्तेदारी पद्धती सुरू करण्यास उत्तेजन मिळते. याउलट कामगारवर्ग मात्र स्वसंरक्षणार्थ आपोआपच संघटित केला जातो. मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे सुरू झाल्याने सार्वजनिक मालकीची पद्धत अंमलात आणण्यास एक प्रकारे उत्तेजनच मिळते. बाजारपेठेत जरी आपोआप मागणी-पुरवठ्यामुळे जुळणी होत असली तरी अर्थव्यवस्थेवर वरचेवर येणारी अरिष्टे टळत नाहीत आणि दिवसेंदिवस परिस्थिती अधिकच बिकट होऊन शेवटी खिळखिळीत झालेली ही व्यवस्था पार कोलमडून जाते. भांडवलशाही समाजाच्या प्रगतीच्या मुळाशी असलेल्या गतिशील नियमांमुळेच समाजवादाचा उदय अटळ आहे, हा सिद्धांत मार्क्स व एंजल्स यांच्या लिखाणात अतिशय पद्धतशीरपणे मांडला आहे; हे खरे असले तरी प्रत्येक प्रकारच्या समाजवादी विचारसरणीत या सिद्धांतास थोड्याफार प्रमाणात स्थान मिळालेले आढळते.

दोन परस्परविरोधी अर्थव्यवस्था या अर्थाने भांडवलशाही व समाजवाद यांचे जुळण्यासारखे नाही, हे मात्र या दोन्ही विचारसरणींच्या समर्थकांना चांगलेच पटले होते. समाजवादी प्रचाराचा परिणाम झाला नसल्यास भांडवलशहा वैयक्तिक साहस, खुला बाजार व खाजगी नफा या तत्त्वांचाच पुरस्कार करील. या प्रत्येक तत्त्वाला

समाजवाद्यांचा कडाडून विरोध होता. अशा प्रकारे वैचारिक भूमिकेतून पाहता या दोहोत तडजोडीस मुळीच वाव नव्हता. समाजवाद म्हणजे मुक्त भांडवलशाही व्यवस्थेचे विरुद्ध टोक होते. एकेकाळी समाजवादी विचारांवर प्रभुत्व गाजविणारा हा साधा विचार आता कालमानाने निःसंशयपणे निष्प्रभ झाला आहे आणि अलिकडील काही घटनांमुळे या विचारास तडा गेला आहे, तरी सुद्धा या विचाराचा पगडा सर्वस्वी संपला आहे असे म्हणता येणार नाही. या विचाराचे भूत अद्याप आपल्या मानगुटीवर बसले आहे. या विचाराचे योग्य ते दफन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

## सिद्धांत कोलमडला :

वस्तुस्थिती काय सांगते ? अगदी ऐन भरभराटीच्या काळात, सरकारी अधिक्षेपाचे नावही नव्हते तेव्हा सुद्धा, जुन्या अर्थशास्त्रीय आदर्श कल्पनेचा आणि भांडवलशाही अर्थरचनेचा मेळ बसला नाही. खऱ्या अर्थाने खुली स्पर्धा कधीच अस्तित्वात नव्हती आणि स्पर्धेमुळे सर्वांनाच सधन होण्याची संधी कधीच लाभली नाही. उलट भांडवलशाही अर्थव्यवस्था जसजशी प्रगत झाली तसतशी सिद्धांत आणि व्यवहार यातील तफावत वाढतच गेली. या रचनेतीलच अंतस्थ गतिशील स्वभावाने आणि लोकशाही दडपणांमुळे वैचारिक भूमिकेत ओळख न पटण्याइतपत बदल घडवून आणला आहे. निदान ब्रिटिश भांडवलशाही पद्धतीत तरी असा बदल निश्चितपणे झाला आहे. त्यातील प्रत्येक नियमात काहीना काही तरी परिवर्तन घडून आले आहे. याउप्परही केवळ बरेचसे भांडवल खाजगी मालकीचे आहे म्हणून प्रस्थापित व्यवस्थेस भांडवलशाही व्यवस्था असे संबोधायचे असेल तर मूळ व्यवस्थेतून बरेच गंमतीदार प्रकार निर्माण झाले आहेत, असेच म्हणावे लागेल.

परंपरागत समाजवादी सिद्धांताचीही तीच गत झाली आहे. भांडवलशाही व्यवस्था ही स्थिर व्यवस्था नव्हे, हा त्यांचा अंदाज खरा ठरला. पण भांडवलशाही पद्धतीच्या नाशाबाबतचे आणि समाजवाद अटळ असल्याचे त्यांचे विश्वासपूर्ण भविष्य, आजच्या परिस्थितीत चमत्कारिक आणि असत्य भासत आहे. ज्या ठिकाणी क्रांतीच्या साह्याने जुन्या व्यवस्थेचा बीमोड करून नवी व्यवस्था लादण्यात आली, तेथे एक प्रकारची दडपशाही जाऊन दुसरी प्रस्थापित होणे इतकाच परिणाम घडला आहे. खाजगी भांडवलदार आणि जमीनदारांच्या बरोबरच स्वतंत्र कामगार चळवळीचेही उच्चाटन झाले आहे. सार्वजनिक साहस, नियोजित अर्थव्यवस्था आणि समाजकल्याण योजना या समाजवादी विचारातील महत्त्वाच्या बाबी हे खरे, पण या सर्वांचा उपयोग व्यक्तीने राज्यावर अधिकाधिक अवलंबून आपले व्यक्तिमत्त्व गमवावे, यासाठीच मुद्दाम होत आहे. साम्यवादी व्यवस्था हे जर भांडवलशाही व्यवस्थेचे दुसरे टोक असेल तर समाजवाद्यांना पुनर्विचार करणे अगत्याचे आहे.

पण या दोन्ही व्यवस्था परस्पर-विरोधी आहेत, या श्रद्धेला खरा तडा गेला तो दरम्यानच्या काळात काही खंडश: झालेल्या सुधारणांना मिळालेल्या यशामुळेच. वैचारिक भूमिकेतून वाटेल ते म्हटलेले असले तरी भांडवलशाही अर्थरचनेत अंतर्गत बदल करता येणार नाही, ही भूमिका ब्रिटिश मजूर चळवळीस कधीच मान्य नव्हती. आपल्या सैद्धांतिक कल्पनेपासून दूर जाऊन काही गोष्टी करणे हे जसे भांडवलदारांना सोईस्कर वाटले आहे तसेच केवळ भविष्याच्या गप्पा करण्याऐवजी काही तरी प्रत्यक्षात करून दाखवावे असे समाजवाद्यांनाही वाटलेले आहे. म्हणूनच भांडवलशाही रचनेचे संपूर्ण उच्चाटन होऊन समाजवादी रचना अस्तित्वात येईल अशा दिवसाची वाट पाहत बसण्याऐवजी त्यांनी काही कृती केली आहे आणि हलके हलके भांडवलशाही रचनेतील अत्यंत घृणास्पद अशा काही गोष्टींचे उच्चाटन केले आहे. मजुरीचे सामुहिक नियमन, सामाजिक सुखसोयी, न्याय्य व विषमता कमी करणाऱ्या कर-योजनेचे क्षे वाढविणे, सरकारी आणि नागरी मालकीच्या व्यापारी संघटनांचा प्रसार आणि आत्यंतिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वांना रोजगार मिळवून देऊन लोकांच्या राहणी-मानातील सुधारणा, यामुळे कामगारांचे जीवन बदलून गेले आहे. ज्या समाजाच्या अर्थव्यवस्थेत अद्यापही खाजगी भांडवलाला अग्रस्थान आहे, अशा समाजात हे सर्व यश मिळाले आहे; ही विशेष गोष्ट आहे.

या खंडश: झालेल्या सुधारणा आपल्या समाजरचनेत आता चपखल बसल्या आहेत. नेमके भांडवलशाही नाही वा समाजवादी नाही असे कल्याणकारी राज्य निर्माण झाले आहे. या निर्मितीसाठी कोणीही सैद्धांतिक भूमिका घेऊन प्रयत्न केले नव्हते. भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांना या नव्याने निर्माण झालेल्या चालू स्थितीचा स्वीकार करणे आणि हा शोध आपणच लावला आहे असा दावा करणे कालप्राप्त वाटते. पण समाजवादी मात्र काहीसे गोंधळलेले दिसताहेत. याबाबत त्यांच्यात एकवाक्यतासुद्धा आढळत नाही. त्यांनीच मिळविलेल्या यशाने त्यांचे धाबे दणाणले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेखाली उत्तरोत्तर मजुरांच्या दु:खाचा भार वाढतच जाणार, या त्यांच्या मूलभूत श्रद्धेलाच सुरुंग लागला आहे. भौतिक सुखसोयींमुळे सुस्तावलेल्या समाजात समाजवादी चळवळीची गती मंदावेल आणि अंतिम ध्येयाची ओढच नष्ट होईल, अशी एक नवीनच चिंता निर्माण झाली आहे. अर्थातच ब्लॅचफोर्डचे आवाहन जसे लोकांच्या हृदयापर्यंत भिडू शकले तसे होणे आता शक्यच नाही. कारण त्याने दर्शविलेली दु:स्थिती आता आढळातच नाही.

**आजचा पेच :**

अशा अनपेक्षित आणि गोंधळात टाकणाऱ्या परिस्थितीत निरनिराळी मते ऐकावयास मिळतील हे उघडच होते. काहीजण अशा टोकाला गेलेत की, ते वस्तुस्थितीच

मान्य करण्यास तयार नाहीत. आजच्या सुधारणा म्हणजे भांडवलशाही रचनेला ठिगळे लावण्याचा प्रयत्न आहे. अर्थातच शेवटी ही रचना कोलमडणार ही काळया दगडावरची रेघ आहे, असे त्यांचे मत. हे अंतिम आर्थिक अरिष्ट अगदी नजीक येऊन ठेपले आहे, असे त्यांना वाटते. सध्याच्या समाजरचनेतही जे काही दोष राहिलेले आहेत ते सर्व परंपरागत श्रद्धेने जोपासलेली समाजवादी रचना प्रत्यक्षात आल्यानेच नष्ट होतील, असे त्यांचे ठाम मत आहे. म्हणून या काल्पनिक भांडवलशाहीशी ते सतत झगडत असतात. हे झाले पक्के सैद्धांतिक समाजवादी. या उलट दुसऱ्या काहींचे म्हणणे असे की, पाठ्यपुस्तकी पद्धतीचा अवलंब केल्यामुळे समाजवादी चळवळ चुकीच्या मार्गावर गेली आहे. त्यांच्या मताने अर्थरचनेबाबत आता अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाही. समाजवाद म्हणजे समाजरचनेविषयीच्या अभियांत्रिकीचा एक प्रकार होय, याहून अधिक काही नाही. जसजसे सामाजिक प्रश्न उपस्थित होतील तसतसे ते तात्काल सोडविण्याचा प्रयत्न व्हावा, एवढ्यावरच त्यांना समाधान आहे. पण याबाबतीत समाजवादी मंडळींना सामाजिक अभियांत्रिकीत प्राधान्य मिळावे इतकाच त्यांचा आग्रह. अंतिम ध्येयाबाबत चर्चा करून वेळ घालविण्यावर त्यांचा विश्वास नाही. हे झाले पक्के व्यवहारी समाजवादी.

डाव्या आणि उजव्या गटांच्या मजूर चळवळींतून हे अतिरेकी दृष्टिकोण ओळखणे आज सोपे झाले आहे. पण या दोन्ही गटांच्या भूमिकेने बहुतांशी समाजवाद्यांचे समाधान झाल्याचे दिसत नाही. डाव्यांच्या भूमिकेने समाधान होत नाही तर उजव्यांकडून स्फूर्ती मिळत नाही. प्रत्येकास दुसऱ्याच्या भूमिकेत दोष आढळतात. पण दोघांचाही तोल ढळला आहे. सैद्धांतिक समाजवादी कालाच्या प्रवाहात मागे पडलेल्या भूमिकेचा उपयोग करू पाहताहेत तर व्यवहारी समाजवाद्यांची अवस्था शीड नसलेल्या नावेसारखी झाली आहे. मध्यविसाव्या शतकाच्या संदर्भात हवी असलेली पर्यायी तात्त्विक भूमिका न सापडल्यामुळे दोन्हीही गट आपली जुनी साचेबंद परस्पर विरोधी भूमिका गडगडल्याचा अनुभव घेत आहेत.

आता नव्या क्रांत दृष्टीची गरज आहे. आपल्याला नेमके काय साधायचे आहे, याची पूर्ण कल्पना लोकांच्या पुढे मांडल्याखेरीज आता समाजवादी चळवळीला भवितव्य नाही. पण हा नवा दृष्टिकोण केवळ आदर्श समाजाचा आलेख काढून शोधता येणार नाही, हे लक्षात घ्यायला हवे. कोलमडलेल्या जुन्या सिद्धांतांनी हाच धडा शिकवला आहे की, सदासर्वकाळ उपयोगी पडेल असे आदर्श समाजाचे चित्र काढणे केवळ अशक्य आहे. आर्थिक सिद्धांताच्या आधाराने रंगविलेल्या एकाच साचेबंद रचनेस समाजवादाशी जखडणे शक्य नाही. त्यायोगे तो अर्थशून्य आणि भावी पिढीच्या दृष्टीने अप्रस्तुत बनेल.

समाजवादाच्या अंतिम ध्येयाचा विसर पडू लागल्यामुळेच आज समाजवाद्यांमध्ये गोंधळ आणि दुही निर्माण झाली आहे. ध्येयपूर्तीसाठी जी साधने इष्ट म्हणून वापरावयाचे ठरविले होते, त्यांनाच आज सैद्धांतिकांनी ध्येय म्हणून उचलून धरले आहे. त्यांच्या मते समाजवाद म्हणजे केवळ अधिक सार्वजनिक साहस, अधिक नियोजन आणि सार्वजनिक सेवेसाठी अधिक पैसा खर्च करणे एवढाच ठरला आहे, मग त्याचे वाटेल ते परिणाम होवोत. याउलट व्यवहारी समाजवाद्यांनी साधनांबाबत वास्तववादी दृष्टिकोण स्वीकारण्याच्या भरात आपली ध्येये तात्कालिक प्रश्न सोडविण्यापुरती मर्यादित केली आहेत. ज्या ध्येयांच्या वा आदर्शांच्या स्थिर आधारावर समाजवादी श्रद्धा निर्माण झाली ते आदर्श मात्र दोहोंपैकी कुठल्याच भूमिकेत आढळत नाहीत.

भाग पहिला

# दृष्टिपथातील ध्येये

## २. मूल्यांबाबतचे मतभेद

भांडवलशाही व समाजवाद यांच्यातील खरा झगडा हा नेहमीच मूल्यांबाबतचा आहे. सुधारणा खऱ्या अर्थाने भौतिक मूल्यांच्या आधारे जोखायची असते, असा भांडवलशहांचा दावा. तर अर्थरचना ही समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या सर्वमान्य मानवी ध्येयांना आत्मसात करणारी असावी, अशी समाजवाद्यांची इच्छा. ही ध्येये माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे मूलभूत मोल निरनिराळ्या दृष्टीने व्यक्त करतात. ती माणसाला चांगल्या समाजरचनेचा मानदंड बनवितात. त्याची समता, त्याचे स्वातंत्र्य नि त्याचा बंधुभाव हे समाजवादी चळवळीचे ध्येय झाले आहे. केवळ माणसाचा आर्थिक लाभ हे नव्हे.*

गेल्या शतकात वा त्याहूनही दीर्घ काळपर्यंत समाजवादी प्रचारात महत्त्व दिले गेले ते केवळ सधन व गरीब यांच्यातील अंतर कमी करण्याला. कारण ती तातडीची गरज आहे. पण ज्या भौतिक तत्त्वज्ञानाच्या आधारे भांडवलशाही समाजाने प्रगती केली त्या तत्त्वज्ञानात या गरजेची बीजें नाहीत. समाजवाद्यांनी सुरुवातीपासून सातत्याने समाज आणि जीवन यांच्या ओंगळपणाविरुद्ध कडाडून विरोध दर्शविला आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोच्या शब्दांतच सांगायचे झाल्यास हा ओंगळपणा म्हणजे उघड, उघड स्वार्थाव्यतिरिक्त माणसामाणसांना जोडणारा दुसरा दुवाच उरला नव्हता अन्य सारे काही अहंतेच्या हिशोबाच्या हिमवत पाण्यात बुडून गेले होते. भांडवलशाहीने पुरस्कारलेला, साऱ्या समाजजीवनाची पातळीच खाली आणणारा, ठोकळेबाज व हीन दर्जाचा जडवादी दृष्टिकोण; ब्रिटिश समाजवादी आंदोलनाने नेहमीच नैतिक भूमिकेवरून धिक्कारला आहे.

भांडवलशाहीचा परिणाम म्हणून मानवी मूल्ये नाकारली गेली, ही गोष्ट सुरुवातीच्या समाजवाद्यांचे विचार जो वाचतो त्याच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाहीत. यामुळेच त्यांच्या मनात आत्यंतिक चीड व चिंता निर्माण झाली. भांडवलशाही अर्थव्यवस्था भोंगळ आहे. यामुळे साधनसामुग्रीचा अपव्यय होऊन हलके हलके या अर्थव्यवस्थेचा ऱ्हास अपरिहार्य ठरतो, अशीही टीका करीत असतील. परंतु त्यांच्या चळवळीला खरी चालना मिळाली ती पैशासाठी माणुसकीचा बळी देण्याची आवश्यकता नसतानाही तसे घडले नि लोकांच्या हालअपेष्टात व दुःखात विनाकारण भर घालण्यात आली यामुळेच. आजही समाजवादी आणि भांडवलशाही मूल्यांतील कलह

---

* पाहा – 'सोशालिझम्–अ न्यु स्टेटमेन्ट ऑफ प्रिन्सिपल्स्.' सोशालिस्ट युनियन, १९५२.

नित्याप्रमाणेच न मिटण्याजोगा आहे. परंतु दोन अर्थव्यवस्थांमधील दुसऱ्या समकलहाशी त्याची गुंतागुंत झाल्याने त्याचे स्वरूप काहीसे अस्पष्ट झाले आहे. या दुसऱ्या कलहाभोवती गुंफलेले सैद्धांतिक विचारांचे जाळे तुटल्यामुळे समाजवादी मूल्यांतील अंतस्थ सत्यही हरविल्यासारखे वाटते आहे. भांडवलदार व मजूर यांच्यातील झगडा हा केवळ उत्पन्नाच्या वाटयाबाबतचा आहे, असा समज झाला आहे. वास्तविक मानवी स्वभाव आणि नियती या बाबतच्या दोन परस्पर विरोधी विचारांचा हा झगडा आहे. अर्थरचनेचे काय वाटेल ते होवो; सामाजिक तत्त्वज्ञान म्हणून समाजवाद आणि भांडवलशाही यांचे नाते अग्नी आणि जलाचेच राहणार आहे. दोहोंचा समेट अशक्य आहे.

आपल्या तत्त्वज्ञानातील या सुरुवातीच्या विचाराचा आजच्या समाजवाद्यांना विसर पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. अर्थरचना ही आर्थिक परिणामांच्या आधाराने जोखावी, या भांडवलशाही अलिखित गृहीत कृत्यास संमती देण्याकडे त्यांची प्रवृत्ती दिसते. बरे, आर्थिक परिणाम म्हणजे कोणते ? अर्थशास्त्रज्ञांना संख्याशास्त्राच्या आधाराने मोजता येतील असे संख्यात्मक परिणाम म्हणजेच उत्पादन, व्यापार, किमती, प्राप्ती आणि जे भौतिक अथवा पैशांच्या किमतीत मोजता येतील असे सर्व परिणाम होत. पण अर्थरचनेचे जे इतर अप्रत्यक्ष व वरवर न दिसणारे परिणाम असतात ते या संदर्भात असंबद्ध तरी ठरवले जातात अथवा त्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट अर्थरचनेमुळे माणसाच्या प्रतिष्ठेवर वा त्याच्या नैतिक जीवनावर काय परिणाम होतो, या गोष्टींचे मोजमाप करणे त्यांना शक्य नसल्यामुळे त्यांकडे दुर्लक्ष केले जाते.

अर्थरचनेबाबतच्या या अपूर्ण नि काही अंशी विकृत दृष्टिकोनाचा पुरस्कार करताना जी कारणे आज दिली जातात, ती एकोणिसाव्या शतकात दिल्या जाणाऱ्या कारणांच्या मानाने किती तरी दिशाभूल करणारी आहेत. खाजगी नफा आणि राष्ट्राचे कल्याण ही एकत्र असतात असे सांगण्याचा आता प्रयत्नसुद्धा केला जात नाही. या उलट उच्च प्रतीची उत्पादनक्षमता, राष्ट्राची पत, वाढते राहणीमान वगैरे सहजमान्य होणाऱ्या उद्दिष्टांनाच परिचित संदर्भसंज्ञा म्हणून मानण्यात येऊ लागले आहे. शुद्धीवर असलेला कुठलाही माणूस वरील उद्दिष्टांची तातडी व त्यांचे महत्त्व नाकारणार नाही, ही गोष्ट उघडच आहे. मग साऱ्या राष्ट्राने एकमताने या ध्येयावरच नजर का ठेवू नये ? एकमत नाही अशा प्रश्नांवर निरर्थक वाद घालून श्रम व्यर्थ का घालवावेत ? आपली अर्थव्यवस्था अधिक कार्यक्षम आणि वर्धनशील करण्यासाठी अजून खूप विचार करून संघटनेची नवी नवी तंत्रे व प्रकार शोधणे आवश्यक आहे. हे सारे सोडून अर्थशास्त्रात नैतिक विचार आणून गुंतागुंत वाढविण्यात काय हंशील आहे ?

या साऱ्या गोष्टींची निष्पत्ती काय ? मानवी मूल्यांची जागा एकदा का भौतिक

गोष्टींना दिली कीं, एक उच्च दर्जाची अर्थरचना म्हणून समाजवादी रचनेचे श्रेष्ठत्व संशयास्पद ठरते. केवळ वाढीव उत्पादन हेच गमक ठरले तर समाजवादी धोरणे ही आजच्या अमेरिकेतल्या भांडवलशाही धोरणांपेक्षा प्रभावी ठरतील हे सिद्ध करणे आपल्याला खरोखरीच शक्य आहे का ? आर्थिक यश संपादणाऱ्याला मलिदा देणाऱ्या आणि कामगाराने आपल्या हक्कासाठी भांडत असताना उत्पादनाला खीळ घालू नये म्हणून त्याच्यावर बडगा उगारणाऱ्या अर्थव्यवस्थेपेक्षा प्राप्तीच्या अधिक समतेवर किंवा औद्योगिक लोकशाहीच्या विकासावर आधारलेली अर्थव्यवस्था अधिक फलदायी ठरेल असे आपण खात्रीने प्रतिपादन करू शकू काय ? समाजवादी आपल्या विरोधकांशी या मुद्द्यावर स्पर्धा करू लागले की, त्यांची बाजू काहीही झाले तरी अनिर्णायकच राहते.

तेव्हा समाजवाद्यांनी आपले म्हणणे निराळ्या आधारांवर मांडणे आवश्यक आहे. बेकारी कमी करणे, मजुरी वाढविणे, कामाचे तास कमी करणे, निवृत्ती वेतनात वाढ करणे आणि अधिकाधिक पैसा समाजकल्याणासाठी खर्च करणे या व अशासारख्या आजवर झालेल्या परिणामात्मक सुधारणा आवश्यक आहेत. पण या साऱ्या सुरुवातीस करण्याच्या गोष्टी आहेत. परंतु प्रत्येक व्यक्तीचे संपन्न जीवन आणि अधिक उन्नत स्वरूपाच्या सहकाराने सर्वांचे एकत्र राहणे यांच्या मिलाफावर आधारलेल्या भिन्न आशयाच्या नव्या समाजाची निर्मिती करण्याच्या, गुणात्मक बदल घडवून आणण्याच्या लक्ष्यातील ही प्रारंभिक पावले होत. सध्या आपण या बाबतीत केवळ उंबरठ्यावरच घोटाळत आहोत. अथवा भांडवलशाही मूल्यांचे विष आपल्या शरीरात इतके भिनले आहे की, आपल्याला गुणात्मक मूल्यांचे महत्त्व समजेनासे झाले आहे आणि आपल्या समकालिनांच्या जीवनात अद्याप किती हीन आणि वैफल्यकारक गोष्टी आहेत, याची ओळख पटेनाशी झाली आहे ? सर्वांनाच उत्पादनाचा मोठा वाटा मिळावा इतकाच आता समाजवादाला अर्थ उरला आहे का ? हे खरे असते तर भांडवलशहांनी आणखी थोडा वाटा देऊन एक मोठाच विजय मिळविला असता.

अर्थरचनेबाबतचा एक गुणात्मक विचार म्हणून समाजवादी विचार तगलाच पाहिजे. कारण हा विचार एखाद्या अर्थव्यवस्थेखाली माणसाला कुठल्या प्रकारचे वा दर्जाचे आयुष्य जगणे शक्य होते ह्यावरून त्या व्यवस्थेचे यश मोजतो आणि यासाठी माणसाचे सर्वांगीण आयुष्य तो ध्यानात घेतो. आर्थिक घडामोडींचा मानवी जीवनावर दोन निरनिराळ्या प्रकारे परिणाम होतो, हे समाजवादी विचाराना मान्य आहे. एका अर्थी माणूस हा उपभोक्ता आहे. त्याला जगण्यासाठी अन्नग्रहण करण्याची आवश्यकता आहे. जसजशी त्याची सांस्कृतिक प्रगती होते तसतशी त्याला इतर गरजा भागविण्याची आवश्यकता वाटायला लागते. दुसऱ्या अर्थी तो उत्पादक असतो. जीवनावश्यक गोष्टी त्याला काम करूनच मिळवाव्या लागतात. ॲडामला जेव्हा एडनच्या बागेतून

हाकलून देण्यात आले तेव्हा देवाने त्याला सांगितले की, 'निढळाच्या घामानेच तुला तुझी भाकरी मिळेल'; हे बायबलमध्येच सांगितले आहे. कुठल्याही अर्थव्यवस्थेचा मानवावर होणारा परिणाम या शब्दांतून चांगलाच ध्वनित झाला आहे.

उपभोक्ता या भूमिकेतून लोक जे जीवन जगतात त्या जीवनावर, ज्या प्रकारच्या वस्तू आणि सोयी उपलब्ध असतात, त्यानुसार परिणाम होत असतो. ते ज्याप्रकारचे काम करतात आणि कामाच्या ठिकाणी त्यांना ज्या प्रकारे वागविले जाते, त्यांचा त्यांच्या उत्पादक म्हणून जीवनावर परिणाम होतो. मानवप्राणी एक संपूर्ण व्यक्ती आहे आणि आर्थिक जीवनाचे हे दोन्ही पैलू त्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. या दोहोंतही अद्याप समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या मूल्यांना स्थान मिळावयाचे आहे.

# ३. समान संधी

## समतेचा अर्थ :

'समाजवाद म्हणजे समतेच्या संबंधी विचार आहे' असे म्हणतात. ह्यावर कोणाचेच दुमत होणार नाही. आपणास हव्या असलेल्या समाजात सर्व लोक समान असतील, या एका मुद्द्यावर समाजवाद्यांमध्ये एकवाक्यता आहे. किंबहुना समता हे समाजवादी श्रद्धेचे खरे सार आहे. तरी सुद्धा सर्व लोक समान कसे होऊ शकतील हे समजणे तितकेसे सोपे नाही. बऱ्याचशा बाबतीत असे स्पष्ट दिसते की, ते समान नाहीत. त्यांच्या कर्तृत्वाच्या संदर्भात ते कमी-जास्त आहेत. काही इतरांपेक्षा अधिक हुशार आहेत. काही इतरांपेक्षा शरीराने, मनाने अथवा चारित्र्याने अधिक बळकट आहेत. ते ज्या परिस्थितीत वाढतात त्यात अंतर आहे. काही एकाकी आहेत तर, काहींना मोठमोठ्या कुटुंबाची देखभाल करावी लागते. काही रोगजर्जर आहेत. प्रत्येकाची रुची नि प्रकृती सुद्धा भिन्न आहे. काही दीर्घायुष्याची अपेक्षा करतात. काहींना विविध गोष्टींत रुची आहे, तर काही उत्साही असून त्यांना साहसाची गोडी आहे. किंबहुना जसजशी संस्कृती प्रगत होते आणि मानवाविषयीचे ज्ञान वाढते तसतशी अंगभूत विषमता अधिकाधिक दिसू लागते. तर मग, या संदर्भात एक समाजवादी ध्येय वा आदर्श म्हणून समतेचा अर्थ काय होतो ?

याबाबतचा एक वरचेवर होणारा गैरसमज तात्काल दूर करता येण्यासारखा आहे. समता म्हणजे एकरूपता नव्हे. दुसऱ्याशी समान असणे म्हणजे नेमके दुसऱ्यासारखेच असणे असे नव्हे. ज्या समाजात व्यक्ती–व्यक्तींमधील भिन्नतेकडे दुर्लक्ष करून सर्वांवर एकाच प्रकारचे जीवन जगण्याचा जुलूम केला जातो, त्या समाजात समता आहे असे म्हणता येणार नाही. कारण यामुळे मुळात भिन्न प्रकृती असलेल्या लोकांना विषमतेने वागविले जाईल. स्वतंत्र वृत्तीच्या आणि प्रज्ञावान लोकांची सौम्य प्रकृतीच्या लोकांपेक्षा अधिक गळचेपी होईल. सौम्य माणसे बदलत्या परिस्थितीशी चटकन जुळवून घेऊ शकतात. शारीरिक श्रमाचा सशक्त माणसापेक्षा अशक्त माणसाला अधिक त्रास होईल. यात आणखी एक अडचण आहे. ती अशी की, अशा प्रकारची समता अंमलात आणण्यासाठी राज्यकर्त्या वर्गाला स्वतःचे इतरांपेक्षा निराळे असे हक्क राखून ठेवावेच लागतील. कारण अशा व्यवस्थेत कोणाला तरी कोणावर जुलूम करावाच लागतो. तेव्हा समतेची मागणी करताना समाजवादी भिन्नता व वैचित्र्य यांचा समूळ नाश चाहत नाहीत. समाजाची समृद्धीच मुळी व्यक्ती-व्यक्तीतील भिन्नतेच्या विकासावर अवलंबून आहे. ही भिन्नता नष्ट न करता तिचे जतन करणे, तिला उत्तेजन देणेच योग्य ठरेल.

समाजवाद्यांचा झगडा आहे तो नैसर्गिक वा दैवी व्यक्ति भिन्नतेविरुद्ध नाही.

असा झगडा अर्थहीनच म्हणावा लागेल. समाज काही लोकांना खास सवलती देतो व काहींना त्या नाकारतो, या विरुद्ध त्यांचे बंड आहे. काहीजण केवळ एका विशिष्ट जाती, धर्म, लिंग वा वर्गाचे आहेत म्हणून त्यांना विशेष अनुकूल वागणूक का मिळावी, असा त्यांचा सवाल आहे. प्रत्येकास, मग तो जन्माने वा नैसर्गिक देणगीने कसाही असो, आपल्या आयुष्याचा आपल्या मतानुसार विकास करावासा वाटतो. आणि दुसऱ्यास उपसर्ग न पोचता जर तो हे करू इच्छित असेल तर त्याच्या हक्कांस इतर कोणाच्याही हक्काइतकाच मान द्यायला हवा. केवळ या अर्थाने सर्वजण समान आहेत आणि कोणीही ग्यानबा आपल्या धन्याइतकाच मोलाचा आहे. त्यांची मानवता हा समतेचा आधार आहे. सामाजिक विशेषाधिकारांचे सवंग अस्तित्व म्हणजे समाजाचे सर्वांच्या इच्छेला सारखा मान देण्यातील अपयश होय.

आजच्या जमान्यात स्वतःला समाजवादी न म्हणवणारे सुद्धा समतेचा वरीलप्रमाणे अर्थ लावल्यास त्यास मान्यता देतील. आपल्या आयुष्यास हवे तसे वळण लावणाऱ्या प्रत्येकाच्या हक्कास ते निदान तत्त्वतः तरी विरोध दर्शविणार नाहीत. पण तत्त्वे आचरणात आणताना घडून येणारे सामाजिक परिणाम मात्र सम्मत होणे कठीण. कारण प्रत्येक माणूस आपल्या आयुष्यास कसे वळण लावू शकतो, हे दोन गोष्टींवर अवलंबून राहील. त्या म्हणजे त्याचे गुण आणि त्याला मिळणारी संधी. समाजाला त्याचे गुण निश्चित करण्याची शक्यता नसते. पण त्याला कितपत संधी द्यायची हे ठरविणे मात्र समाजास शक्य असते आणि इथेच समतेचे तत्त्व अंमलात आणण्याचा प्रश्न निर्माण होतो. एखादा माणूस काम करू शकतो का ? तो काम करत असल्यास त्याला पुरेसे वेतन व आनंदात राहण्यासाठी मोकळा वेळ मिळतो का ? जीवनावश्यक स्वायत्त धन व सुखसोयी त्याला प्राप्त आहेत का ? शिक्षणाची संधी, ज्ञान आणि संस्कृती ह्यांचा सामान्य वारसा यांतील त्याचा वाटा तो प्राप्त करू शकतो का ? अवतीभोवती काय घडते याची योग्य माहिती त्याला मिळू शकते का ? हे सारे व्यक्तीच्या आवाक्याबाहेरचे काम आहे. यासारख्या व इतर जीवनाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या संधी मिळणे वा न मिळणे हे समाजरचनेवर अवलंबून असते. समाजव्यवस्था जो जो गुंतागुंतीची होत जाते तो तो त्याची पराधीनता वाढते आणि आपल्याच स्वतंत्र मार्गाने पुढे जाणाऱ्यांची संख्या घटत जाते. समाजाला आपले सर्व घटक सारखेच मानावयाचे झाल्यास तटस्थ दृष्टीने उपलब्ध संधींचे विभाजन करण्याच्या हेतूने त्याचे संघटन झाले पाहिजे.

समान संधी हे सर्वांना परिचित घोषवाक्य आहे. आपणांस अभिप्रेत असलेला सर्व अर्थ त्यात येतो काय ? समान संधी म्हणजे काय, यावर हे अवलंबून राहील. काही वेळा याचा अर्थ सर्वांना आयुष्यात समान आरंभ करता यावा इतकाच लावला जातो. समाजाने जन्मतःच कुणाला सवलतीही देऊ नयेत नि कुणाच्या वाटेत अडथळेही निर्माण

करू नयेत. समतेची ही उदारमतवादी कल्पना अमेरिकेसारख्या समाजात बव्हंशी प्रत्यक्षात आल्यासारखी दिसते. समाजवाद्यांना जे हवे आहे त्याचा भाग म्हणून तेही ती मान्य करतात पण केवळ भाग म्हणूनच. कारण आयुष्याच्या सुरुवातीस कितीही समान संधी मिळाली तरी लवकरच काही लोकांना आपल्या अंगच्या गुणांमुळे–सद्गुणांमुळेच असे नव्हे–दुसऱ्यांपेक्षा पुढे जाता येते आणि मग बलवान गलितगात्रांना मागे ढकलतात; तर काही दांडगट लोक सभ्यांना दडपून टाकतात. आणि बदमाष निष्पापांचा बळी देऊन स्वतःची पोळी पिकवितात. अशा शिडीच्या तत्त्वावर आधारलेल्या समाजात जरी सुरुवातीस सर्वांना समान संधी मिळाली तरी नंतर दुसऱ्यांना खाली ओढून स्वतःस उच्चपदी चढावयास मुभा मिळते आणि म्हणून अशा समाजास समाजवादी समाज म्हणता येणार नाही.

शर्यतीच्या सुरुवातीस सर्वांना समान संधी देऊन नंतर सर्वांत चपल इसमाच्या हाती सारी स्पर्धा सोडणे याहून समान संधीचा अर्थ व्यापक आहे. या शर्यतीत लंगड्यांनासुद्धा त्यांच्या परीने वाव मिळावयास हवा, असे समाजवाद्यांचे म्हणणे आहे आणि असे करताना त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा विचार व्हावयास हवा. सबंध आयुष्यात दिल्या जाणाऱ्या निरनिराळ्या संधींशी त्यांना कर्तव्य आहे. पण आपण एक गोष्ट नेहमी विसरतो. ती अशी की, प्रत्येकाच्या गरजा नि सामर्थ्य समान नसल्याने या संधी सर्वांना समान असूच शकणार नाहीत. प्रत्येक मुलास सर्वसामान्य शाळेत जाण्यास संधी देणे हे निरर्थक आहे. कारण बौद्धिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांसाठी त्यांच्या विशिष्ट अडचणी लक्षात घेऊन शिकवू शकतील असे वेगळे खास शिक्षण घेतलेले शिक्षक हवेत व तशीच खास शाळा हवी. ज्याला काही कष्टाची कामे करण्याची आवड आहे त्याला प्रशासक बनण्याची संधी देण्यात काय अर्थ आहे? त्याला आवश्यकता आहे ती आपल्या नैसर्गिक शक्तींना चालना देऊन काही तरी शिल्पकौशल्य दाखविण्याच्या संधीची. म्हणून इथे वर जाण्यासाठी निरनिराळ्या शिड्या हव्यात. आणि त्याचबरोबर शिडी चढण्याची ज्यांची इच्छा नाही अशानांही आशास्थान असायला हवे.

समान संधीचे दोन स्वतंत्र सामाजिक अर्थ अभिप्रेत आहेत. प्रथम असे की, समान सामर्थ्याच्या लोकांना समान संधी मिळाव्यात. जन्मजात वा परिस्थितीचा त्यांना अडथळा होता कामा नये. त्यांना हव्या असलेल्या शिक्षणाची संधी व त्यांच्या मनात असेल त्या प्रकारची नोकरी त्यांना केवळ त्यांच्या पात्रतेनुसार मिळावी. दुसरा अर्थ असा की, निरनिराळ्या पात्रतेच्या लोकांना निरनिराळ्या संधी उपलब्ध असाव्यात; पण या संधी त्यांच्या संपूर्ण जीवनातील वैयक्तिक परिपूर्तीच्या दृष्टीने समान असावयास हव्यात.

आजपर्यंत या दोन अर्थांपैकी समाजवादी विचारात पहिल्या अर्थास अधिक महत्त्व दिले गेले आहे. समाजाची दोन प्रमुख वर्गांत जी विभागणी झाली आहे त्याच्या

विरोधाणी हा अर्थ संबंधित आहे. वर्गविभाजनामुळे समान पात्रतेच्या लोकांना समान संधी मिळेनाशी होते. कारण त्यांना मिळणाऱ्या संधी ते ज्या सामाजिक वर्गाचे घटक आहेत यावर अवलंबून असतात आणि भिन्न पात्रतेच्या पण एकाच वर्गाच्या घटकांना मिळणाऱ्या संधीपेक्षा दुसऱ्या वर्गाच्या संधी निराळया प्रकारच्या असतात. भांडवलशाही समाज व्यवस्थेत भांडवलदारांना मजुरांपेक्षा शिक्षण, प्राप्ती, मोकळा वेळ, उद्योग वगैरे सर्व क्षेत्रांत नेहमीच चांगल्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत; इतकेच नव्हे तर त्या वर्गातील मागसलेल्या रुग्ण किंवा वयस्कर घटकांना देखील या संधी मिळालेल्या आहेत. या संधी त्यांना देताना त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणांचा विचार झालेला नाही. केवळ एका विशिष्ट सामाजिक वर्गात जन्मास येणे हे सारे विशेषाधिकार प्राप्त होण्यास पुरेसे होते. 'वर्गविरहित समाज' या आदर्शामुळे समाजवादी चळवळीस सतत स्फूर्ती मिळाली आहे.या आदर्श समाजात कुठल्याच वर्गास खास अशा सवलती मिळणार नाहीत. म्हणूनच वर्गभेदाचे उच्चाटन हे समतेचा आदर्श गाठल्याचे एक गमक होय.

पण त्यांमुळे ते ध्येय पूर्णपणे गाठले जात नाही. या प्रश्नाची दुसरीही महत्त्वाची बाजू आहे. कारण केवळ वर्गभेद नष्ट करण्याने सारी विषमता नष्ट होणार नाही. नैसर्गिक विषमता तशीच राहील. आणि वर्गभेद नष्ट झाले तरी प्रत्येकास आयुष्यात समान संधी देण्याच्या प्रश्नाचा समाजाला विचार करावा लागेल. समाजात सबल आणि दुर्बल, हुशार आणि मागासलेले, नशीबवान आणि दुर्दैवी हे शिल्लक राहाणारच. ही असली विषमता कधीच नष्ट करता येणार नाही. पण त्यामुळे व्यक्ती-व्यक्तीत भेदभाव करण्याची सामाजिक पद्धत निर्माण होते ती टाळणे शक्य आहे. समतेच्या आदर्शाबद्दल निसर्गाला काहीच आस्था नाही. म्हणूनच कमनशिबी लोकांना योग्य संधी मिळवून देण्यासाठी समाजालाच सरसावून पुढे येणे आवश्यक आहे.

## उपभोक्त्यांमधील समता :

उपभोक्ता या नात्याने माणसाच्या आयुष्यात समतेचा अर्थ काय होतो ? या संदर्भात प्रत्येकास स्वतःच्या उपभोगासाठी किती वस्तू व सेवा (गुडस् अँड सर्व्हिसेस्) याचा वाटा मिळतो, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या सुरुवातीच्या काळात याबाबतीत विषमता वाढतच गेली. काही थोडया लोकांनी अमाप संपत्तीचा उपभोग घेतला व बव्हंशी लोकांना आपल्या अनिश्चित चाकरीतील तोकडया रोजगारीसाठी मालकांच्या मर्जीवर अवलंबून राहण्याची पाळी आली. जिवंत राहून केवळ चाकरी करण्याइतपत शक्ती राहील इतकेच वेतन त्यांना मिळे. इतर निर्जीव वस्तूप्रमाणेच श्रमशक्ती मानली जाई, किमान किमतीत ती खरेदी केली जाई आणि व्यवहारात फायद्याची अपेक्षा नसल्यास ती मुळी खरेदीच होत नसे.

आपल्या श्रमशक्तीस केवळ क्रयवस्तूपेक्षा अधिक महत्त्व कामगार देत. म्हणून त्यांनी या विचारसरणीमुळे झालेल्या आपल्या आयुष्याच्या अधोगतीविरुद्ध बंड पुकारले आणि मानव म्हणून हक्कांची मागणी केली. त्यांनी ठामपणे सांगितले की, एकोणिसाव्या शतकातल्या ब्रिटनप्रमाणे संपत्ती निर्माण होत असलेल्या देशात प्रत्येक कामगारास पुरेशा सुखसोयींनी व प्रतिष्ठा सांभाळून राहाण्याचा तरी कमीत कमी हक्क असावा. प्रथम 'जीवनावश्यक मजुरी' व नंतर 'किमान राष्ट्रीय उत्पन्न' ही ठरवावीत, अशी त्यांनी मागणी केली. हेतू हा की, त्या योगाने दैवाचे चक्र कसेही फिरो त्याचा परिणाम भोगावा लागू नये. एखादा माणूस उतार वयाचा असेल अथवा आजारी वा बेकार असेल पण तरीसुद्धा त्याला जीवनधारणेसाठी कमीत कमी आवश्यक असेल ते मिळा-वयास हवे. सतत उद्याची चिंता करीत त्याला आयुष्य ढकलावे लागू नये. आज जी सामाजिक सुरक्षितता आपल्याला आढळते ती या राष्ट्रीय किमान वेतनासाठी– हे वेतन सर्वांना सर्वकाळ मिळावे– म्हणून केलेल्या लढ्याचा परिपाक होय.

पण सामाजिक सुरक्षितता हे सामाजिक समतेच्या दिशेने टाकायचे केवळ पहिले पाऊल आहे. दलितांचे जिणे थोडे सुसह्य झाले आहे इतकेच. पण तो अद्यापही दलित आहे, ही गोष्ट विसरता कामा नये. प्रत्येकास कमीत कमी आवश्यक गोष्टी तरी मिळतील पण जास्तीत जास्त ज्यांना मिळतात त्यांच्याशी याची काय तुलना होऊ शकते ? समता म्हणजे रास्त हक्क. म्हणूनच सामाजिक सुरक्षितता प्राप्त केल्या-नंतर समाजवाद्यांनी आपले अधिकाधिक लक्ष न्याय्य हक्कांकडे वळविले आहे.

न्याय्य हक्क म्हणजे काय ? समान प्राप्ती निश्चितच नव्हे. काही विचित्र अपवाद वगळले तर समाजवाद्यांचा यावर कधीच विश्वास नव्हता. समान प्राप्तीचा कायदा अंमलात आणण्यासाठी राजकीय जुलूमाची जरूर आहे. शिवाय हे सारे केल्याने आर्थिक प्रगतीला खीळ बसणार हे निराळेच. तेव्हा ही गोष्ट समाजवादी विचाराशी संपूर्णपणे विसंगत आहे. आपल्या आयुष्यास स्वतःच्या मनाजोगते वळण लावण्याची समान संधी प्रत्येकास मिळाल्यानंतर लोकांना आपल्या प्राप्तीत वाढ करायची का कमी करायची हे स्वेच्छेनुसार ठरविता आले पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्याला जादा प्राप्ती हवीय का जादा आराम हवा हे सुद्धा ठरविता आले पाहिजे. म्हणूनच काही प्रसंगी माणूस अधिक कष्ट करून प्राप्ती वाढवू इच्छितो आणि काही वेळा तो अधिक आराम व बेताची प्राप्ती पसंत करतो. समान प्राप्तीच्या कल्पनेत प्रत्येक कामाचे स्वरूप वेगळ्या प्रकारचे असते, हे अंतर्भूत नाही. उदा. जे लोक काही क्लेशकारक कामे करतात त्यांना त्याबद्दल जादा वेतन द्यावे, हा विचार या कल्पनेत दिसत नाही.

न्याय्य वाटा म्हणजे काय, हे ठरविताना काही वेळा 'न्याय्य वेतन' या अस्पष्ट कल्पनेवर भर दिला जातो. एकाच प्रकारचे काम करणाऱ्या सर्वांना सारखेच वेतन मिळावे, हे न्यायाला धरून आहे. याबाबत लिंग, जात वा असला इतर कुठल्याही

प्रकारचा भेद करता कामा नये. जादा कामाबद्दल जादा वेतन द्यावे ही गोष्ट सुद्धा बरेचसे लोक मान्य करतील. मग ते जादा काम शारीरिक श्रमाचे असो वा बौद्धिक श्रमाचे असो वा काही खास कौशल्याचे असो. तथापि कामा-कामातील ह्या भेदांचे मोजमाप कसे करणार ? आणि त्या भेदांची दखल घेऊन न्याय्य वेतन कसे ठरविणार ? कोळशाच्या खाणीतले काम, शाळेतल्या शिक्षकाचे काम, पाववाल्याचे काम आणि चांभाराचे काम यांची जेव्हा आपण तुलना करू, तेव्हा कुणाला अधिक वेतन द्यावे हे कसे ठरविणार ? न्याय्य वेतनाचा नेमका आकडा ठरविणे ही तर लांबचीच गोष्ट झाली. प्रत्येकास किती न्याय्य वेतन मिळावे, हे सूक्ष्मपणे मोजण्याचे गमक अद्याप अस्तित्वात आलेले नाही व तसे ते मोजता येणे शक्य होईल असे वाटत नाही.

न्याय्य भागीदारीची कल्पना पैशाच्या स्वरूपात नेमकी सांगणे ही गोष्ट जवळ-जवळ अशक्यच आहे. आणि तसे सांगता येणे विशेष महत्त्वाचेही नाही. प्रा. टॉनीने म्हटल्याप्रमाणे,

'एखाद्या व्यक्तींची मिळकत इतरांपेक्षा अधिक असावी, ही गोष्ट काही तिरस्करणीय नाही. कारण परिस्थितीतील, शिक्षणातील आणि चालीरीतीतील एकसारखेपणामुळे सामान्य परंपरा तयार होऊन त्याबद्दल आदरभाव निर्माण झालेला असेल तर मिळकत मोजणीच्या या तपशीलाचा विसर पडतो किंवा तिकडे दुर्लक्ष होते. पण काही विशिष्ट वर्गाच्या लोकांना या सांस्कृतिक वारशाचा वाटा मिळू नये, ही गोष्ट वाईट आहे. आर्थिक विषमतेमुळे मानवतेचा आणि बंधुत्वाच्या भावनेचा विसर पडावा, ही गोष्ट तिरस्करणीय आहे. वास्तविक मानवतेच्या संदर्भात आर्थिक विषमता ही अगदीच किरकोळ आणि उथळ बाब आहे.'*

अतिरेकी आर्थिक विषमतेमुळे वर्गनिर्मिती होते व निरनिराळ्या वर्गातील लोकांना समानतेच्या भूमिकेवरून एकत्र येणे वा मिळून-मिसळून वागणे अशक्य होते. हा खरा मुद्दा आहे. नेमके हेच समाजवाद्यांना टाळायचे आहे. प्राप्तीच्या योगाने सामान्य जीवनमान जगण्याच्या मार्गात अडथळा निर्माण होण्याचे जो जो कमी होऊ लागते तो तो संपत्तीचे न्याय्य वाटप करण्याच्या जवळजवळ समाज जाऊ लागला आहे, असे समजावे. न्याय्य वाटप साध्य झाल्याचे याहून दुसरे व्यवहार्य गमक नाही.

पण जी विषमता वर्गभेदावर आधारित नाही, पण प्रत्येकाच्या व्यक्तिगत परि-स्थितीतून निर्माण होते तिचे काय ? आयुष्यातील इतर अडचणींमुळे पुरेशी मिळकत होऊ शकली नाही म्हणून किंवा आजारीपणात वा म्हातारपणी आवश्यक वस्तू नि सोयींचा त्यांचा योग्य वाटा मिळणे काही लोकांना कसे शक्य आहे ? जन्मतः जे शारीरिक, मानसिक वा इतर प्रकारे अधू आहेत त्यांचे काय होणार ? विषमतेच्या

---

* आर्. एच्. टॉनी, 'इक्वालिटी', ( १९३८ ची आवृत्ती ), पृ. १२७.

या विशिष्ट प्रश्नांची सोडवणूक करणे हे समाजसेवा ( सोशल सर्व्हिस ) योजनेचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

समाजसेवा कार्याचे मुख्यत्वे करून दोन भाग पडतात. आयुष्यात प्रत्येकास आवश्यक असलेल्या शिक्षण व आरोग्यविषयक सेवा हा एक भाग. सुरुवाती सुरुवातीस या योजना केवळ मजुरांसाठी असत. कारण तेव्हा श्रीमंतांना समाजाच्या मदतीची आवश्यकता नव्हती. कमी मिळकतीच्या लोकांनाच केवळ या योजनेचा फायदा दिला जाई. कारण स्वतःच्या उत्पन्नातून या गोष्टी साधणे त्यांना शक्य नव्हते, अशी मुळातील भूमिका होती. मजुरांच्या मुलांना काही किरकोळ शिक्षण मिळणे व गंभीर आजारात त्यांना वैद्यकीय मदत मिळावी इतकीच केवळ कल्पना होती. आज या योजना विशिष्ट वर्गापुरत्याच मर्यादित ठेवू नयेत अशी भूमिका आहे. माता-पित्याची परिस्थिती कशीही असो, सर्व मुलांना एकाच प्रकारच्या शाळांतून शिक्षण मिळाले पाहिजे, आणि वैद्यकीय मदत आवश्यक असलेल्या प्रत्येक माणसाला औषधपाण्याच्या सवलती एकाच प्रकारच्या असल्या पाहिजेत. या सवलतींचा विचार करताना इतःपर आर्थिक परिस्थितीला महत्त्व असू नये. असे झाल्यास त्यांच्या साहाय्याने सामाजिक ऐक्य दृढतर होऊ शकेल.

अशा प्रकारच्या सामाजिक सेवांचा दुसरा भाग व्यक्तिगत परिस्थितीमुळे निर्माण झालेली विषमता वा नैसर्गिक विषमता कमी करण्याकरता असतो. यात कुटुंबभत्ता, निवृत्तिवेतन व दीर्घ सेवेतून निवृत्त झाल्यावर होणारे लाभ, अशा प्रकारच्या सामाजिक मिळकतीच्या योजनांचा अंतर्भाव होतो. कुटुंबाचा पोशिंदा जेव्हा पुरेशी कमाई करू शकत नाही किंवा जेव्हा त्याच्यावर अधिक जबाबदारी येऊन पडते, तेव्हा या सेवा किंवा सवलतींचा अडचणीच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी उपयोग होऊ शकतो. यात निसर्गाने निर्माण केलेल्या हालअपेष्टांचे निवारण करण्यासाठी, शरीराने अधू असणाऱ्यांना सर्वसामान्य माणसांपेक्षा दिल्या जाणाऱ्या खास जपणुकीचा व देखरेखेचाही अंतर्भाव होतो.

अनेक सधन लोक भविष्यातील सर्व संभाव्य अडचणी ध्यानात घेऊन आज जसे अशा अडचणींच्या निवारणार्थ स्वतःच तरतूद करून ठेवतात, तशी तरतूद करण्यासाठी सर्व लोकांना पुरेशी प्राप्ती होऊ लागली तर समाजाला अशा समाजसेवा वा सवलतींचा भार तितकासा उचलावयास लागणार नाही. प्रत्येकजण आपापल्या ऐपतीनुसार स्वतःसाठी तरतूद करणे पसंत करतो. पण या त्याच्या सामर्थ्याला मोठ्या व दीर्घकाळच्या प्रतिकूल परिस्थितीत लौकरच मर्यादा पडतात. अशा वेळी समाजाने मदतीचा हात देणे आवश्यक आहे. दुर्दैवाचा भरपूर वाटा ज्यांना मिळाला आहे असे लोक असणारच. मग त्यांना योग्य संधींचा हा रास्त वाटा मिळायला नको का? स्वतःचा काहीही दोष नसताना ज्याला तुलनेने इतरांच्यापेक्षा वाईट परिस्थितीशी झगडावे लागते

त्याचा इतरांवर नैतिक अधिकार आहे. अशा वेळी केवळ त्याची अकिंचन अवस्था दूर करून भागणार नाही. त्याला इतरांप्रमाणेच पुरेशी संधी देणे हे समाजाचे कर्तव्य आहे. समतेच्या आदर्शानुसार इतके तरी करणे अत्यावश्यक आहे.

उपभोक्ता या दृष्टीने मानवी समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने आपण कितपत प्रगती केली आहे ? ढोबळ मानाने राष्ट्रातील प्रत्येकाला जीवनावश्यक किमान प्राप्ती होण्याच्या दिशेने प्राथमिक तयारी झाली आहे. मजुरीचे मान जीवनावश्यक वस्तू घेण्यापुरते आहे. आणि ज्यांना कसलेही काम करणे शक्य नाही त्यांची समाजाने काही तरी सोय केली आहे. आवश्यक अशा समाजसेवा किमान प्रमाणात सर्वांसाठी पुरविण्यात येत आहेत. प्रत्येक मुलास काही विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत शिक्षण मिळेल, प्रत्येकास वैद्यकीय मदत मिळेल,अशी व्यवस्था झाली आहे. आणि प्रत्येकाला निवाराही मिळू लागला आहे.

तरी पण हे सारे अगदी कमीत कमी आवश्यक इतक्या मर्यादेपर्यंतच आहे.सर्वांना समान भागीदारी मिळण्याचे ध्येय अजून किती तरी दूर आहे. त्यासाठी अजून कितीतरी लढाया माराव्या लागतील. याचा अर्थ त्या दिशेने काहीच वाटचाल झालेली नाही असा नाही. प्राप्तीतील विषमता बरीचशी कमी झालेली आहे. आणि परिणामी जुनी वर्गविग्रह पद्धती काहीशी मागे पडली आहे. मजूर आणि पगारदार यांच्यात पूर्वीसारखी विषमता आता दिसत नाही. किंबहुना बरेचसे मजूर आज मध्यमवर्गीय पगारदारांपेक्षा चांगली मिळकत कमावत आहेत असे दिसते.काबाडकष्ट करणाऱ्यांच्यामध्ये विषमताही आज कमी झालेली दिसते. आता सर्वांना कामधंदा मिळू लागल्याने सर्वांहून खालच्या वर्गात असणाऱ्यांची परिस्थिती पुष्कळच बदललेली आहे.

मग आज कमतरता कशाची आहे ? आजही आपल्याला अतिशय श्रीमंत आणि अतिरेकी दारिद्र्याने पिडलेले लोक आढळतात आणि सारख्याच जीवनमानाकडे झुकणाऱ्या बहुसंख्य लोकांहून ते अजूनही अगदी दूर आहेत.वरच्या टोकाला अगदी निराळ्या प्रकारचे जीवन जगणारे श्रीमंत लोक आहेत. सर्वांहून अधिक पगार घेणारे, अन्यथा हवा तसा खर्च व्यवसायाच्या नावाने करण्याची मुभा असलेले अथवा नफ्याच्या रूपाने भरपूर उत्पन्न असलेले संपन्न लोक यांचा या गटात समावेश होतो. त्यांना राहण्यासाठी राजेशाही महाल आहेत, चैनीसाठी किमती गाड्या आहेत, आपल्या आप्तेष्ट मित्रांना ते बादशाही हॉटेलसमधून मेजवान्या देऊ शकतात की जिथे एका जेवणाचे मोल एखाद्या सामान्य कुटुंबाच्या आठवड्याच्या भोजनखर्चापेक्षाही अधिक असू शकेल. असे लोक संख्येने अगदीच अल्प आहेत आणि त्यांची कमाई सर्वांना समप्रमाणात वाटल्याने समाजाचे दारिद्र्य कमी होणार नाही, वगैरे प्रकारचे मुद्दे या संदर्भात गैरलागू आहेत. त्यांच्या अवाढव्य खर्चामुळे हे उच्चवर्गीय लोक समाजापासून वेगळे होतात आणि त्यांच्या श्रीमंतीच्या प्रदर्शनामुळे समतेच्या आदर्शाला धक्के बसतात.

उत्पन्नमानाच्या दुसऱ्या टोकास असे लोक आहेत की, ज्यांना आपल्या उदर-निर्वाहासाठी समाजाच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. उतारवयात निवृत्ति-वेतनावर जगण्याची ज्यांच्यावर पाळी आली आहे, त्यांचे हाल सर्वांना माहीत आहेत. ज्यांच्या शिरावर मोठे कुटुंब चालविण्याची जबाबदारी आहे त्यांना केवळ सरकार-करवी मिळणाऱ्या कुटुंबभत्त्यावर घर चालविणे अशक्य आहे. त्यासाठी त्यांच्या मिळकतीचेही प्रमाण मोठे असणे आवश्यक ठरते. महायुद्धानंतरच्या काळात साध्य झालेले राष्टीय पातळीवरील किमान उत्पन्नाचे प्रमाण वाढत्या महागाईमुळे धोक्यात आले आहे. हे लोक सरकारी मदतीवर अवलंबून आहेत, या केवळ एका कारणास्तवच त्यांच्यासाठी फक्त कमीत कमी उत्पन्न पुरेसे आहे असा विचार केला जातो. समान भागीदारी वा त्यांचा न्याय्य वाटा त्यांना देण्याच्या दृष्टीने समाजाला अद्याप विचार करायला सवड मिळालेली नाही.

सर्वसाधारणपणे असे आढळते की, या सामाजिक सोयींच्या संदर्भात समानतेच्या खऱ्या अर्थाची जाण समाजाला आलेली दिसत नाही. सर्वसामान्य सवलतीसुद्धा सर्वांना सारख्या मिळत नाहीत. आरोग्यविषयक सवलती या दिशेने पुष्कळच पुढे गेल्या आहेत. पण आजही आपली शिक्षणपद्धती निर्दोष आहे असे म्हणता येणार नाही. त्यात आद-र्शाच्या दिशेने सुधारणा झाल्या आहेत ही गोष्ट खरी असली तरी समाजातील वर्ग-भेदास या पद्धतीत मान दिला जातो. सधन लोकांना आजही गरिबांच्या मानाने अधिक शिक्षण घेण्याची संधी मिळते. राज्याने चालविलेल्या शिक्षण-पद्धतीतही भेदभाव केला जातो. सामान्य लोकांच्या नव्या शाळांना तितका चांगला शिक्षकवर्गही मिळत नाही. तसेच या शाळा तितक्या सुसज्ज असल्याचेही दिसत नाही. मागासलेल्या व अधू असलेल्यांच्या शा ांत कमीत कमी आवश्यक तेवढ्याच गोष्टी पुरेशा समजल्या जातात. वेड्यांच्या इस्पितळात भरपूर गर्दी आढळते. पण पुरेसे डॉक्टर्स दिसत नाहीत. अगदी माफक सवलतीही पुरेशा समजल्या जातात.समाजातील मनोविकल मुलांसाठी सवलती पुरविण्यास पुरेसा खर्च केला जात नाही. अपचारी बालकांच्या पुनर्वसनाच्या योजनां-कडे अंशतः देखील लक्ष दिले जात नाही. समाजात सर्वांहून दुर्बल स्थानावर असणा-ऱ्यांच्या दृष्टीने समतेचा आदर्श अद्याप दृष्टिपथात सुद्धा नाही असे म्हणावे लागते.*

## उत्पादकांमधील समता :

आपल्या कामामध्ये आपल्याला कितपत संधी मिळते याचा उत्पादकांमधील समतेशी घनिष्ट संबंध आहे. याबाबतीतही असे दिसते की, औद्योगिक युगाच्या

---

* सामाजिक सोयींच्या बाबतचे हे ढोबळ विवेचन आहे, व्यापक मूल्यनिर्धारण नव्हे. केवळ आर्थिक दृष्टिकोनातून या सोयींचा विचार केला असून किती पैसा खर्च केला जातो यावरच हे विवेचन आधारित आहे.

सुरुवातीपासूनच बहुसंख्य मजुरांच्या हक्कांची हेळसांड झाली. मालकांच्या मर्जी-नुसार त्यांचा उपयोग केला जाई व त्यांना कामावरून काढून टाकण्यात येई. अगदी भयंकर परिस्थितीत सुटीशिवायच त्यांनी सदासर्वकाळ कामे करावी अशी अपेक्षा होती. मालकांची आज्ञा त्यांना निमूटपणे पाळावी लागे. एखाद्याला दिलेले काम त्याला आवडते वा नाही हा प्रश्न विचारावा असे स्वप्नातही कुणाला वाटले नाही.

झगड्याची सुरवात झाली ती कामगारांचे कमीत कमी हक्क तरी प्रस्थापित करावेत या उद्देशाने. त्यांत प्राधान्य मिळाले ते मजुरीच्या हक्काला. मजुरीचा हक्क म्हणजे केवळ मिळकतीचाच हक्क नव्हे. तो तर मोलाचा आहेच. परंतु सामाजिक जीवनात प्रतिष्ठेने भाग घेता यावा या हक्काचा सुद्धा त्यात समावेश आहे. सरकारने कितीही मदत दिली तरी लादलेल्या बेकारीमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई होऊ शकत नाही. समाजात आपल्याला स्थान नाही, समाजाला आपली गरज नाही, या समजुतीमुळे त्याला जो मनस्ताप होतो त्याची भरपाई होणे कठीण. कामगारांनी झगडा आरंभला तो सरकारी मदत वा बेकारी भत्ता मिळावा म्हणून नव्हे तर, आपल्याला आपला काम करण्याचा न्याय्य हक्क मिळावा म्हणून. कमीत कमी हा हक्क तरी उत्पादक म्हणून मिळालाच पाहिजे असे कामगाराला वाटू लागले.

त्याचबरोबर काम करण्यास कुठल्या विशिष्ट वातावरणाची वा परिस्थितीची आवश्यकता आहे या बाबतीतही मजुरांच्या काही मागण्या आहेत. भरपूर वेतन हे अर्थात त्यात आले. परंतु त्या शिवाय धोक्यापासून संरक्षण आणि कामाचे स्वरूप ध्यानात घेऊन, शक्यतो निरोगी व उत्तम वातावरण याही गोष्टींची जरूरी आहे. या नतर मजुरांची मागणी आली ती कामाच्या वेळाबाबत. कामाचे वाजवी तास आणि पुरेशा सुट्या त्यांनी मागितल्या. आज त्याला याहून अधिक हवे आहे. नोकरीत सुरक्षितता हवी. वाटेल तेव्हा त्याला नोकरीवरून दूर केल्यास त्याचे आणि त्याच्या कुटुंबियांचे जीवन उध्वस्त होईल. त्याला जरी दुसरी नोकरी मिळण्याची शक्यता असली तरी नुकसान हे होणारच. उत्पादन व्यवस्थेत बदल होत जाणारच. म्हणून नोकरीत १०० टक्के सुरक्षितता कोणालाच देता येणार नाही, ही गोष्ट जरी खरी असली तरी हा प्रश्न मालकांनी प्रत्यक्ष परिस्थिती ध्यानात न घेता आपल्या लहरीनुसार निकालात काढावा याला काहीच अर्थ नाही. यासाठीच उत्पादक म्हणून माणसाच्या सोयीसाठीच सामाजिक सुरक्षिततेची तरतूद करणे आवश्यक आहे. उपभोक्ता म्हणून त्याला द्याव-याच्या सवलतींची ही दुसरी बाजू आहे.

अजूनही असे म्हणता येईल की समाजवाद्यांना जी समानता हवी आहे ती ही नव्हे. अद्यापही याबाबतीत विषमता ठळकपणे दिसते. स्वतःच्या अंगी कुठलेही विशेष गुण नसताना केवळ योग्य कुटुंबात जन्म झाल्यामुळे काहींना चांगली नोकरी मिळण्याची उत्तम संधी प्राप्त होते आणि आयुष्यभर सुरक्षित व समाधानकारक काम मिळते.

असे का ? काहींना वाटेल तो व्यवसाय करण्याची संधी उपलब्ध असावी तर, काहींना केवळ मजुरीशिवाय दुसरा पर्याय असू नये, असे का ? प्रत्येकास आपल्या पात्रतेनुसार योग्य व समाधानकारक काम मिळण्याची संधी का असू नये ? असे यापुढे जाऊन विचारता येईल.

ही जीवनातील काम करण्याच्या काळातील सारी विषमता मिळकतीमधील स्वच्छंद विषमतेप्रमाणेच असमर्थनीय आहे. माणसाचे बरेचसे आयुष्य कार्य व काम करण्यात जाते. आणि ते काम त्याच्या आवडीचे नसेल अथवा त्याला रात्रंदिवस छुप्या तिरस्काराने वागवले जात असेल तर अर्थातच त्याचे आणि त्याच्या सभोवतालच्या सर्वांचे सारे आयुष्यच बिघडून जाईल. वयात आल्यानंतर त्याला ज्या प्रकारची नोकरी मिळते आणि वागणूक मिळते त्यावर त्याच्या व्यक्तित्वाचा विकास अवलंबून असतो. केवळ कामाचे तास कमी करून वा रहाणीचा दर्जा सुधारून आयुष्यातील ही निराशा नाहीशी करता येणार नाही.

उत्पादकांमध्ये समता असावी असे म्हणणे म्हणजे प्रत्येकास आपल्या इच्छेस येईल तसे काम करण्याचा हक्क असावा असे नव्हे. कुठल्याच अर्थव्यवस्थेखाली अशी सोय होऊ शकणार नाही. अनेकांना प्रधानमंत्री होण्याची इच्छा असली तरी प्रधान-मंत्र्याची जागा एकालाच मिळणार. या समतेचा अर्थ इतकाच की प्रत्येकास केवळ कामच नव्हे तर आपल्या पात्रतेनुसार काम मिळविण्याची संधी हवी.

अशी परिस्थिती प्रत्यक्षात निर्माण करण्यासाठी तीन गोष्टी करण्याची आवश्य-कता आहे. पहिली गोष्ट म्हणजे कोणी कोणते काम करावे याचे संचालन नसावे. संचा-लनामुळे काही लोकांना आपल्या मनाविरुद्ध काही प्रकारची कामे करावी लागतात. याचा अर्थ सगळ्यांना समान वागणूक देण्याच्या हक्काचा संपूर्ण भंग होतो. काही आणीबाणीच्या प्रसंगी अशी सक्ती योग्य ठरेल, पण एरव्ही नव्हे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येकास आपापल्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार प्रशिक्षण मिळण्याची संधी असावी. आणि ही संधी केवळ बालवयापुरती मर्यादित न ठेवता प्रौढावस्थेतसुद्धा उपलब्ध व्हावी. तिसरी गोष्ट अशी की कुठलेही काम व व्यवसायातील बढती ही प्रत्येकास त्याच्या पात्रतेनुसार व त्याचा दीर्घानुभव लक्षात घेऊन मिळावीत. कारण प्रशिक्षण देऊन नंतर मग वशिलेबाजीच्या जोरावर नोकरीतील प्रगती अवलंबून असल्यास त्या शिक्षणाचा काहीच उपयोग नाही.

पण यांतील कुठल्याच गोष्टीमुळे नोकरीत त्याला कशाप्रकारची वागणूक मिळेल या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. बहुतांशी लोक कोणत्या तरी संघटनेत नोकरी करूनच आजकाल आपला उदरनिर्वाह करतात. आणि म्हणूनच त्या संघटनेतील त्यांचे स्थान हे त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते. या बाबतीत समाजवादी ध्येय अगदी संक्षिप्त स्वरूपात ‘ समान दर्जा ’ असे सांगितले जाते. पण त्याचा नेमका अर्थ काय ? प्रत्येक

कार्यात वा व्यवसायात काही तरी शिस्त असावी. काहींनी आज्ञा सोडणे व दुसऱ्यांनी तिचे पालन करणे या गोष्टी कुठल्याही व्यवस्थेत अटळ आहेत. त्याबाचून संघटना संभवत नाही. अशा प्रकारचे भेद कधीही दूर करता येणार नाहीत व ते दूर करण्याची आवश्यकताही नाही.

तेव्हा ' समान दर्जा ' या प्रश्नाकडे निराळ्या प्रकारे पहावयास हवे. प्रत्येकास सारखाच अधिकार असावयास हवा असा त्याचा अर्थ नाही. संघटनेतील दर्जा कोणताही असो, प्रत्येकास माणुसकीची वागणूक मिळावयास हवी. इतरांच्या बरोबरीने त्याला काही सवलती व स्थिती उपभोगता याव्यात, इतरांबरोबरच संघटनेच्या कार्यात त्यालाही सहभागी होता यावे आणि त्याच्याही हिताची दखल घेतली जावी. समाजातल्या प्रत्येक व्यक्तीच्या अंगी समाजाला काहीतरी देण्याची कुवत ही असतेच. त्याच्या कार्याच्या रूपाने तो समाजाचे हित साधण्याचा प्रयत्न करतच असतो. त्याच्या कार्याविषयीच्या त्याच्या मताचा समाजाने आदर केला पाहिजे. अशा प्रकारे जर प्रत्येकजण आपापल्या शक्तिनुसार समाजहिताकडे लक्ष पुरवित असेल तर आपल्या मतांबद्दल वा आपल्या आवडीनिवडी किंवा सोयी-गैरसोयींबद्दल समाज बेफिकीर आहे, असे कुणाला वाटू देता कामा नये. एखादी गोष्ट दुसऱ्या एखाद्याच्या दृष्टीने योग्य नसली तरी त्याच्या दृष्टीने योग्य असते, असे त्याला भासविण्याचे कारण नाही.

उपभोक्त्यांमधील समता अद्याप प्रस्थापित करता येत नाही. पण व्यवसायातील समता तर अद्याप दृष्टीच्या टप्प्यात सुद्धा नाही. ही गोष्ट मान्य करावयास हवी की आता सर्वांना रोजगारी मिळत असल्यामुळे सध्या आवश्यक असलेले किमान हक्क प्रस्थापित झालेले आहेत. आणि सर्वांना रोजगारी मिळत जाईल तोवर त्यांना बाध येण्याचे कारण नाही. पण यानंतरच्या अवस्थेकडे म्हणजे जीवनातील कार्याच्या समतेच्या दिशेने अद्याप काही हालचाल झालेली नाही. या बाबतच्या उत्पादक म्हणून लोकांच्या हक्काची अद्याप पद्धतशीर मांडणीही झालेली नाही, मग त्यांचा ठामपणे उच्चार करणे तर दूरच राहिले.

उत्पादक म्हणून माणसामाणसातील विषमता सर्वांना क्षणोक्षणी जाणवते. मजुरांच्या आणि पांढरपेशांच्या व्यावसायिक परिस्थितीत फरक का असावा ? केवळ पांढरपेशांच्या नोकरीत अधिक सुरक्षितता, चांगले निवृत्तीवेतन, कामाचे कमी तास आणि अधिक सुट्ट्या या सवलती का असाव्यात ? काम करणाऱ्यांत ' मजूर ' व 'पांढरपेशे ' हा फरकच का म्हणून करावा ? आणि प्रत्यक्ष कार्याच्या व्यवस्थेत काही लोकांना इतरांपेक्षा चांगल्या सुखसोयी—उदा० उत्तम उपहार गृहे, उत्तम स्नानगृहे—का दिल्या जाव्यात ? असा फरक केवळ पांढरपेशे व मजूर यांच्यातच केला जातो असे नाही. उद्योगधंद्यातील सर्वच श्रेणीत अशा प्रकारची प्रतिष्ठेची अधिकारश्रेणी अस्तित्वात आहे. आणि विविध प्रकारच्या बाह्यव्यवस्थेमुळे ती कायम राखली जात आहे.

प्रत्यक्ष मजुरांमध्येसुद्धा वर्गभेद दिसतो. काहींना इतरांपेक्षा अधिक शैक्षणिक व कामाच्या सवलती मिळविण्याची संधी असते. हा भेदभाव केवळ प्राप्तीतील फरकांमुळे आहे असे नव्हे. या विषमतेला आपली विशिष्ट शिक्षण पद्धती तितकीच जबाबदार आहे. आमच्या शिक्षणव्यवस्थेत निरनिराळ्या संधीबाबतची विषमता पुष्कळच आढळते. आपण घेत असलेले शिक्षण आणि शिक्षणामुळे निश्चित होणारा आपला व्यवसाय यांत साचेबंद संबंध आहे. म्हणजे शालेय शिक्षणावर माणसाचे सारे भवितव्य अवलंबित असते. आयुष्यात आपल्याला काय स्थान लाभणार ते तिथेच जवळजवळ पक्के ठरते. प्रा० टी. एच्. मार्शल यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे–'. . . .शिक्षण आणि व्यवसाय यांच्या साचेबंद संबंधात सैलपणा येण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलटपक्षी हा संबंध अधिकच भक्कम होत चालला आहे. . . . . .चाळीस वर्षांच्या माणसाच्या पात्रतेची परीक्षा त्याने पंधराव्या वर्षी दिलेल्या परीक्षेत मिळविलेल्या यशाच्या आधारावर केली जाते. शाळा वा कॉलेज सोडताना घेतलेल्या तिकिटावर साऱ्या आयुष्याचा प्रवास करावा लागतो.*

अशा प्रकारे या देशात जो माणूस आपल्या जीवनाची सुरुवात मजूर म्हणून करतो त्याला पांढरपेशांची वरची जागा मिळविणे हे आयुष्यभर जवळजवळ अशक्यच असते. असा बदल झाल्याची उदाहरणे इतरत्र दिसली तरी या देशात विरळाच. व्यवसायात बढतीसाठी दीर्घ मुदतीच्या आणि खास शिक्षणाची आवश्यकता असते हे क्षणभर बाजूस ठेवले तरी देखील हे तितकेच खरे की औद्योगिक क्षेत्रातील वरच्या जागांची मक्तेदारी विशिष्ट वर्गाच्या हातांतच आहे. 'राष्ट्रीय कोळसा समिती'ने जेव्हा बढतीच्या शिडीची योजना सुरू केली तेव्हा तरुण खाण कामगारांना शैक्षणिक सवलती देण्यापलीकडे काही अधिक साधले नाही. तरी देखील त्या नव्या नाट्यमय साहसाचे अनुकरण करण्याची घाई दुसऱ्या उद्योगधंद्याच्या चालकांनी केली नाही. शैक्षणिक संधी ही कितीही झाले तरी या प्रश्नाची केवळ एक बाजू होय. खरा प्रश्न उद्योगधंद्यात उपलब्ध होणाऱ्या बढतीच्या संधीचा आहे.

उत्पादक या नात्याने माणसामाणसांत आढळणाऱ्या या नेटाच्या विषमता म्हणजे आजच्या समाजवाद्यांना एक गंभीर आव्हानच आहे. या देशात निस्संकोचपणे वर्गभेद करण्यात येतो असे वर्कशॉपसारखे दुसरे ठिकाण नाही. सर्वांना रोजगार मिळाल्याने होणारे बदल जमेस धरूनही शिल्लक राहिलेले भेद डोळ्यांत भरण्यासारखे आहेत. हे भेदभाव करारपत्रातील अटींतून, सवलतीमधून, बढतीसाठी दिलेल्या संधीतून आणि कामगारांना जी हलक्या प्रतीची वागणूक दिली जाते त्यामधून स्पष्ट दिसतात. व्यवसायाच्या ठिकाणी सहस्रावधी स्त्री-पुरुष कामगारांना क्षणोक्षणी जीवनाच्या इतर कोणत्याही क्षेत्रात असह्य वाटेल अशी वागणूक दिली जाते, या क्षेत्रात समतेचा लढा नुसता जिंकायचाच राहिलाय असे नाही तर, तो अद्याप सुरू व्हावयाचा आहे.

*(टी. एच्. मार्शलकृत -सिटिझनशिप ॲण्ड सोशल क्लास-, १९५० पृ. ६४)

# ४. स्वातंत्र्याकडे

## निवडीची संधी

समाजवादाचा संबंध केवळ समतेशीच आहे असे नव्हे तर अधिक मूलभूत दृष्टीने त्याचा स्वातंत्र्याशीही संबंध आहे. स्वातंत्र्याच्या साहाय्यानेच आपणास हव्या असलेल्या समतेची कल्पना स्पष्ट करता येते. ' समान संधी' चा अर्थच मुळी स्वातंत्र्याचा न्याय्य वाटा असा होतो. कारण प्रत्येक संधी म्हणजे स्वातंत्र्य, निवड करण्याचा आणि आपल्या निवडीनुसार वागण्याचा अवसर. माणसाचे सर्वोत्तम लेणे म्हणजे स्वातंत्र्य. आणि म्हणूनच सर्वांना समान स्वातंत्र्याचा समान वाटा मिळावा–स्वातंत्र्य ही काही थोडया लोकांची मक्तेदारी होऊ नये–अशी समाजवाद्यांची मागणी आहे.

अगदी उन्मत्त हुकूमशहासुद्धा स्वातंत्र्याचे महत्त्व जाणतो. निदान स्वतःच्या स्वातंत्र्याचे तरी. त्याचा विरोध असतो इतरांच्या स्वातंत्र्याला–इतरांच्या स्वातंत्र्याला आळा घालून तो स्वतःच्या स्वातंत्र्यात वाढ करत असतो. म्हणूनच प्रत्येक प्रकारची हुकूमशाही वा पिळवणूक म्हणजे एका अर्थी स्वातंत्र्याची चोरीच असते. एखादा लुटारू ज्याप्रमाणे बंदूक दाखवून लोकांना नागवून स्वतः श्रीमंत होण्याच्या प्रयत्नात असतो तितक्या ठळकपणे नसले तरी तद्वतच हुकूमशाही अथवा वरिष्ठ वर्ग किंवा गट आपल्या बलाचा वापर करून लोकांचे स्वातंत्र्य लुबाडून आपले स्वातंत्र्य वाढवीत असतो. यासाठीच समतेसाठी लढा म्हणजे कोणी कोणाचे स्वातंत्र्य लुबाडू नये म्हणून लढायचा लढा असतो.

प्रत्येकाचे स्वातंत्र्य सापेक्ष असते; ते कमी किंवा जास्त होऊ शकते. आपल्या स्वातंत्र्यात भर घालण्यासाठी दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर धाड घालणे हा एक मार्ग आहे. पण स्वातंत्र्याच्या मर्यादा विस्तारून सगळयांनाच पुरेशी संधी मिळेल अशी व्यवस्था करणे हा दुसरा मार्ग आहे. माणसाचा स्वतःचे स्वातंत्र्य वाढविण्याच्या हेतूने स्वतःच्या स्वभावाशी व निसर्गाशी सतत झगडा चालू असतो. अज्ञान आणि आळस त्यामुळे यात अपयश येण्याची भीती असते तर ज्ञान आणि जिद्द यामुळे यशाची शक्यता निर्माण होते. स्वातंत्र्यासाठी चाललेला झगडा समतेच्या झगडयाहून वरच्या दर्जाचा आहे. समाजवादी या झगडयात भाग घेण्यास बांधलेले आहेत. प्रत्येकाला परिपूर्ण जीवन जगण्याची संधी मिळावी यासाठी स्वातंत्र्याचे समान वाटप व्हावे ही भूमिका जशी समाजवादी घेतात तशीच प्रत्येकाला अधिकाधिक स्वातंत्र्य किंवा संधी मिळत राहावी याविषयीची चिंताही त्यांना सतत असते.

अधिकाधिक स्वातंत्र्यासाठी चालविण्याच्या झगडयाला अंत नाही. लोकशाहीत आपण स्वतंत्र समाजात राहात असल्याची भाषा वापरतो आणि त्यायोगाने आपणास

जणू अबाधित स्वातंत्र्य प्राप्त झाले असून आता फक्त त्याचे रक्षण करावयाचे आहे असे सूचित करीत असतो. ' स्वातंत्र्या 'च्या संकुचित व नकारात्मक समजुतीमधून हा भ्रम निर्माण होतो आणि राजकीय जुलूमाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य अशी आपली समजूत होते. पण जेथे काही मूलभूत राजकीय हक्क बरेच सुरक्षित आहेत अशा आपल्यासारख्या देशातसुद्धा भावरूप स्वातंत्र्य किंवा प्राप्त होणाऱ्या संधी सर्वांना ठराविक प्रमाणात प्राप्त होत नाहीत, किंवा प्रत्येकाचा वाटाही सारखा असत नाही.

आर्थिक स्वातंत्र्याबाबतही असाच संकुचित व नकारात्मक दृष्टिकोण घेतलेला आढळतो. स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ भांडवलशाही अर्थरचनेस संरक्षण दिले पाहिजे, हा विचार पहा. भांडवलशाहीत मानवाचे उपभोक्ता व उत्पादक या दोन्ही भूमिका संभाळण्याचे स्वातंत्र्य जपले जाते, असे म्हटले जाते. कारण उपभोक्ता म्हणून आपल्या आवडीच्या वस्तू निवडण्याचे स्वातंत्र्य त्याला मिळते व कोणतीही नोकरी करण्याचे त्याचे स्वातंत्र्य अबाधित राहते. कुठल्याही दुकानात शिरून आवडेल ती वस्तू तो खरेदी करू शकतो व आपणास आवडेल अशी नोकरीही तो शोधू शकतो. कुठल्याही कायद्याचे त्याच्यावर बंधन असत नाही. स्वातंत्र्य म्हणजे निवड करण्याची मुभा असे मानले तर आणखी काय मागणार ?

पण मग मजूर स्वतःलाच सवाल करतो की आपला खिसा रिकामा असताना वाटेल त्यावर खर्च करण्याचे स्वातंत्र्य असले तर ते काय कामाचे आहे ? जेथे एखादी नोकरी मिळाली तर भाग्यच म्हणायचे तेथे एक नोकरी सोडून दुसरी धरण्याच्या स्वातंत्र्याला काय अर्थ आहे ? किंवा आपल्याला हवे तसे शिक्षण वा अन्य साधनांच्या साहाय्याने आवडीच्या क्षेत्रात नोकरी मिळविणे शक्य नसेल तर ? म्हणूनच भांडवल-शाहीच्या योगाने होणारे स्वातंत्र्याचे रक्षण कामगार चळवळीवर काहीच परिणाम करू शकले नाही, यात आश्चर्य ते काय ? याचा अर्थ स्वातंत्र्य अर्थशून्य आहे असा नव्हे. प्रत्येकास त्याची महती पटलेली आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की भांडवलशाही समाजरचनेत त्याचा अर्थ फक्त श्रीमंताचे खास अधिकार असाच होतो.

इतर सर्व स्वातंत्र्याप्रमाणे आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ कायदेशीर बंधनांचा अभाव असे नव्हे. आर्थिक जीवनात लोकांना ज्या निश्चित संधी मिळतात त्यांची बेरीज म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य. मागासलेल्या समाजात या संधी इतक्या थोड्या असतात की आर्थिक स्वातंत्र्य किमान प्रमाणातच आढळते, मग तेथे लोकांवर जुलूम करणारा हुकूमशहा नसेना का. अशा समाजात माणूस उपभोक्ता म्हणून दारिद्र्याच्या गुलामगिरीत पिचत असतो आणि उत्पादक म्हणून काबाडकष्ट त्याच्या वाट्याला सतत येत असतात. समाजाच्या प्रगतीबरोबरच आर्थिक स्वातंत्र्याचा विकास होतो. आणि उपभोक्ता या भूमिकेतील माणूस दारिद्र्याच्या शृंखला झुगारून देतो व आप-णास हव्या त्या वस्तूंची व सेवांची निवड करायची म्हणजे काय हे त्याला समजू लागते.

उत्पादक काबाडकष्ट करून आपली सुटका करून घेऊ शकतात व आपल्या आवडीच्या कार्यात त्यांच्या व्यक्तित्वाचे प्रतिबिंब उमटायला लागते. अशाप्रकारच्या संधी जसजशा अधिक प्रमाणात उपलब्ध होतात तसतसे स्वातंत्र्याचे क्षितिज विस्तारत जाते.

आपल्या राजकीय श्रद्धा कुठल्याही प्रकारच्या असोत, प्रत्येकजण स्वातंत्र्याचे गोडवे गातोच. कारण, या उच्चतम मूल्यासाठी माणूस सतत झगडत आला आहे. स्वातंत्र्याचे मूल्य न समजल्यामुळे स्वातंत्र्याच्या विकासात कधी अडथळे निर्माण झाले नाहीत वा कधी होणारही नाहीत. खरा अडथळा निर्माण होतो तो स्वातंत्र्याच्या अर्धवट, भ्रष्ट आणि विकृत कल्पनेमुळे. दारिद्र्यापासून मुक्ती देण्याच्या नावाखाली साम्यवादी आपल्या जुलूमशाहीचे समर्थन करतात. कायद्याच्या प्रतिबंधापासून मुक्ती देण्याच्या नावाखाली भांडवलशाहीचे पुरस्कर्ते वैपुल्याच्या सान्निध्यातील दारिद्र्याचे समर्थन करतात. चांगल्या राहणीमानाच्या बदल्यात बरेचसे काबाडकष्टाचे आयुष्य स्वेच्छेने काहीजण पत्करतात. यापैकी स्वातंत्र्याच्या कुठल्याच व्याख्येत माणसाच्या संपूर्ण व्यक्तित्त्वाचा विचार होत नाही. स्वतंत्र होण्यासाठी त्याला कोणाच्या हातचे खेळणे बनून वा निर्धन होऊन चालणार नाही. अथवा केवळ कष्टाचे आयुष्य पत्करूनही चालणार नाही. त्यासाठी त्याने बंधनाच्या सर्व शृंखलाच झुगारून द्यायला हव्यात.

## वैपुल्यातून स्वातंत्र्याकडे

उपभोक्ता म्हणून माणसाचे जे स्वातंत्र्य असते ते त्याला खरेदीसाठी बाजारात उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांवर अवलंबून असते. या गोष्टी जितक्या विपुल व त्या मिळण्याबाबत जितकी सुविधा अधिक तितके त्याचे स्वातंत्र्य अधिक. विपुलतेमधून स्वातंत्र्य वर्धापित करण्यात भांडवलशाही अर्थव्यवस्थेने मिळवलेले यश ही तिची मोठी कामगिरी समजली जाते. तुलनेने पाहता जुन्या पद्धतीच्या वा मागासलेल्या समाजात वस्तुवैपुल्यावर अधिक भर दिला जात नाही. त्या समाजातील चालीरिती, परंपरा अथवा केवळ निष्क्रियता यामुळे तेथील लोक निराळ्याच प्रकारे विचार करतात. म्हणून अशा समाजातले जीवन दारिद्र्यामुळे मर्यादित असते. सांस्कृतिक प्रगतीसाठी ज्या गोष्टी मिळावयास हव्यात त्यांच्या प्राप्तीची माणसाला आशाच नसते. या उलट भांडवलशाही समाजात अधिक उत्पादनावर विशेष भर दिला जातो. आणि याबाबत तसे यशही मिळविले जाते. एका शतकात भांडवलशाही समाजाचे उत्पादन इतके कमालीचे वाढले की त्या योगाने लोकांच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाला आहे, हे पाहण्यासाठी आकडेमोड करण्याची आवश्यकता नाही. किंबहुना भांडवलशाही समाजाचे यश उत्पादनाच्या वाढीच्या आधारावर मोजले जाते, असे म्हटल्यास चूक होणार नाही.

ही सर्व कामगिरी समोर असल्यामुळे भांडवलशाही समाजात उत्पादनाचा प्रश्न सुटला आहे, यावर सहज विश्वास ठेवण्यास समाजवादी तयार झाले. काही काळतरी तो प्रश्नच त्यांच्यापुढे नव्हता. यंत्राच्या साहाय्याने वाढलेल्या उत्पादनामुळे जी संपत्ती निर्माण होते तिचे वाटप नीट व्हायला हवे, हेच त्यांचे कार्य झाले. अलिकडे काही वर्षात ह्या दृष्टिकोणात बदल झाला आहे. ढोबळ स्वरूपाची वाटपातील विषमता नाहीशी होऊ लागताच, सर्वांनाच अधिक संपत्ती हवी असल्यास अधिक उत्पादन केले पाहिजे, हे स्पष्ट होऊ लागले आहे. शिवाय मागासलेल्या राष्ट्रांच्या गरजांमुळे या उत्पादन वाढीवर विशेष भर देण्यात येऊ लागला आहे. त्यांना मदत करावयाची झाल्यास त्यांनी व आपणही संपत्तीचे उत्पादन वाढविण्याखेरीज दुसरा मार्ग नाही. उत्पादनाची समस्या आपणापुढे नाहीच असे वीस वर्षापूर्वी समाजवादी म्हणत, आज तसा दावा कोणीही समाजवादी फारसा करणार नाही. उत्पादन वाढीवाचून उपभोग स्वातंत्र्य फारसे वाढू शकणार नाही. खरे म्हणजे, काही देशात तर उत्पादन वाढीवाचून आर्थिक स्वातंत्र्यच अस्तित्वात येऊ शकणार नाही.

'उत्पादन वाढवा, उत्पादन वाढवा' या युद्धोत्तर काळांतील लोकप्रिय घोषणेप्रतच आपण सारे पुन्हा येऊन ठेपलो असा का याचा अर्थ ? समाजवादी व भांडवलवादी यांची मूल्ये एकत्र येऊन उत्पादन वाढीचे हे ध्येय राजकीय संघर्षाबाहेरील सर्वसामान्य ध्येय होऊ लागले आहे काय ? कुठली अर्थव्यवस्था उत्पादनक्षम आहे एवढाच त्या दोहोंत मतभेद आहे का ? दुर्दैवाची गोष्ट ही की मजूर चळवळीमध्ये असा निष्कर्ष चटकन मान्य व्हायला लागला आहे. गुणाऐवजी संख्या हेच यशाचे गमक होऊ लागले आहे. अधिकाचा हव्यास जडला आहे. 'अधिक' म्हणजे काय ? याची क्षिती राहिलेली नाही.

गरीबांच्या देशात राशीला वा परिमाणाला अधिक महत्त्व असावे, हे समजण्यासारखे आहे. अशा देशांत अस्तित्वात असलेल्याच वस्तू अधिक प्रमाणात म्हणजे अधिक धान्य, अधिक कपडालत्ता, अधिक भांडीकुंडी व राहण्यासाठी साधी घरे ही प्राप्त होणे तातडीची गरज ठरते. लोकाजवळ जेव्हा काहीच असत नाही तेव्हा त्यांना अन्न, वस्त्र, निवारा देणे ही प्राथमिक गरज असे. पण या प्राथमिक गरजा भागवल्याबरोबर मूल्यांना वा दर्जेदार गोष्टींना अधिकाधिक महत्त्व प्राप्त होऊ लागते. स्वस्त व निकृष्ठ वस्तूंचे प्रचंड उत्पादन करणे, हे काही मानवाचे सर्वोत्तम ध्येय ठरू शकत नाही. आज आपल्या पदरी जे काही चांगले म्हणून आहे त्याचे कारण मानवाने राशींच्या आहारी जाऊन दर्जा गमावला नाही हे होय. उत्कृष्ठ दर्जाच्या वस्तूची मागणी करणे, कलाकुसरीचे महत्त्व जाणून जोपासना करणे, कला आणि विज्ञान यांना पाठिंबा देणे, यासाठी आवश्यक संपत्ती काहींच्याजवळ तरी होती. त्यामुळे एक सांस्कृतिक परंपरा निर्माण झाली. आता त्या परंपरेचा उपभोग फारच थोड्यांना घेता आला ही गोष्ट निराळी.

पण आता परिस्थितीत बदल झाला आहे. जसजशी आपली समान प्राप्तीच्या दिशेने प्रगती होईल तसतसे खाजगी मालमत्तादारांना ही परंपरा सांभाळणे अशक्य होईल. 'दर्जा' हवा असेल तर तो समाजालाच सांभाळावा लागेल. खाजगी पैशाच्या जोरावर किंवा खाजगी स्वरूपाच्या ग्राहकांच्या मागण्यांमुळे पुरविता न येण्याजोग्या उपभोक्त्यांच्या गरजांचा विचार समाजालाच करावा लागेल. अन्यथा सार्वजनिक बागा, खेळांची मैदाने, ग्रंथालये, रंगमंदिरे, विश्वविद्यालये व इतर संस्था, नगर-रचना आणि सामूहिक केंद्रे ( कम्युनिटी सेंटर्स ) यांची सोय कशी होईल ? ज्ञान, सौंदर्य आणि संस्कृती या गोष्टी जनतेपर्यंत कशा पोहोचतील ?

प्रत्येकालाच या गोष्टीत गोडी असेल असे नाही. काहींना आपला मोकळा वेळ जुगार खेळण्यात घालवावासा वाटत असेल तर त्यांच्यावर संगीत श्रवण करण्याची सक्ती करण्याचा कोणालाही हक्क नाही. याउलट ज्यांना संगीतच हवे असेल त्यांना तो आनंद नाकारता येणार नाही. कुत्र्यांच्या शर्यतीचे वा फुटबॉलच्या मॅचचे मैदान खाजगी उत्पादक पुरवू शकतील पण वाद्यवृंदांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. कारण वाद्यवृंदाच्या तरतुदीत काय नफा होणार ? बाजारात काही प्रकारच्या घर-बांधणी योजना मिळतील पण ज्या घरांत राहण्यात आनंद वाटेल अशा शहराच्या आखणीच्या योजना मिळणार नाहीत. कारण अशा गोष्टीत फायदा कमी. मागणी असलेल्या वस्तू बाजारात तयार होतील पण तेथे नव्यानव्या दर्जेदार वस्तूंचा विचार होणार नाही. मूठभर लोकांच्या अभिरुचीचा विचार होणार नाही, एवढेच नव्हे तर तयार केलेल्या वस्तूंचा दर्जा अभिमानास्पद आहे, असेही खात्रीने म्हणता येणार नाही.

खाजगी आणि सामाजिक बाबींच्या खर्चाचा मेळ कसा घालावा, या गोष्टीवर नेहमीच वाद होऊ शकेल. सार्वजनिक बाबींवरील खर्च कमी करून करांचा बोजा हलका करणे व सवंग लोकप्रियता मिळवणे सोपे असते. कारण बहुतेकांना असेच वाटते की स्वतःच्या खर्चास अधिक पैसे मिळावेत ; पण त्यामुळे सामाजिक जीवन संपन्न करणाऱ्या टिकाऊ गोष्टींवरील खर्चात कपात होते, याची त्यांना पर्वा नसते. तेव्हा उपभोक्त्याच्या अंतिम स्वातंत्र्याचे महत्त्व खाजगी थैलीच्या आकारापेक्षा अधिक व्यापक आहे, हे ठासून सांगण्याची जबाबदारी समाजवाद्यांच्या शिरावर पडते. भांडवलशाही समाजरचनेने जो भयंकर वारसा आपल्याला दिला आहे त्यांच्या संदर्भात व्यक्तीने आपल्या मर्जीनुसार खर्च केल्यास समाजाचे भले होते, असे आपणास कसे म्हणता येईल ? शहरातल्या गलिच्छ वस्त्या, अस्वच्छ खेडी, आपल्या शिक्षणाचा दर्जा आणि आपल्या अगदी सामान्य स्वरूपाच्या आवडी निवडी हे सगळे काय दर्शविते ? आपल्या पिढीत जी थोडी प्रगती दिसते ती केवळ या ना त्या प्रकारे सामाजिक बाबींवरील खर्च वाढविल्यामुळे. आणि यामुळे प्रत्येक खेपेस आपले सांस्कृतिक जीवन अधिकाधिक समृद्ध झाले आहे. आणि आपल्या आनंदात भरच पडली आहे. मग हा

खर्च नृत्यकलेच्या उत्तेजनार्थ असेल वा रेडियोच्या कार्यक्रमांवर असेल किंवा सार्वजनिक बागेत लोकांना संगीताचा आस्वाद घेता यावा म्हणून ' बॅन्ड ' साठी केला असेल.

अलिकडच्या काळातील या कामगिरीच्या उलट बाजूस असे दिसते की खाजगी वा व्यक्तिगत स्वार्थापायी उपभोक्त्यांच्या स्वातंत्र्यावर अधिकाधिक दडपण आणले गेले आहे. अनेकविध मार्गांनी लोकांच्या मनावर असे ठसविण्याचा प्रयत्न केला जातो की अमुक अमुक गोष्टी सुखदायी आणि परिपूर्ण जीवनासाठी आवश्यक आहेत. शिक्षणापेक्षा जाहिरातबाजीवर अधिक पैसा खर्च केला जातो. अशाप्रकारे पैशाचा व्यय व्हावा हा निर्णय उपभोक्त्यांनी स्वखुषीने आणि जाणीवपूर्वक घेतला आहे, असे कुणाला म्हणता येईल का ? यामुळे राष्ट्रीय संपत्तीचा मोठा वाटा जाहिरातीवर खर्च होतो. परिणामी किंमती वाढतात आणि शिवाय ग्राहकास शहाणपणाने वस्तूंची निवड करणे अशक्य होते. कारण बऱ्याचवेळा स्पर्धेने आपला माल खपवावा इतका मर्यादित असाच जाहिरातीचा उद्देश असतो. केवळ उच्च प्रकारचे विक्रीतंत्र निर्माण करण्याने कुणीही संपन्न होत नाही. निरनिराळ्या धुण्याच्या वस्तू ग्राहकासमोर टाकणे वा दुसऱ्या कुठल्याही प्रकारच्या ' बीर ' ऐवजी विशिष्ठ प्रकारची बीर लोकांना प्यायला लावणे, एवढेच उत्तम विक्रेते साधू शकतात. विशिष्ठ वस्तू विकत घेण्यासाठी लोकांना जाहिराती वा प्रचाराच्या साहाय्याने प्रवृत्त करणे, हे कदाचित सरकारी हुकूमाने तसे करावयास लावण्यापेक्षा बरे असेलही. परंतु दोहोंतही सामुदायिक चलाखी आहेच. फरक काय तो कमीजास्त प्रमाणाचाच.

जाहिरातदारांचा विकृत स्वरूपाचा प्रभाव क्षणभर बाजूस ठेवला तरी जाहिरातीमुळे दर्जेदार माल कुठला हे नक्की ओळखणे उपभोक्त्यांना कठीण होऊन बसते. वस्तूंच्या किंमती याबाबत काहीच मार्गदर्शन करू शकत नाहीत. तेव्हा अनेकातील कोणती वस्तू उत्तम प्रकारे बनविलेली आहे किंवा विश्वासार्ह आहे, हे हुडकून काढण्याचा दुसरा मार्ग नाही. किंबहुना काही वस्तू हानीकारक असू शकतील पण तसे कुणी लक्षात आणून देत नाही. सगळा व्यापारच मुळी कायदेशीर स्वरूपाच्या कोणत्याही मार्गाने पैसे मिळविण्याच्या उद्देशाने केला जात असल्याने, प्रत्येक ग्राहकास जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न होतोच. प्रत्यक्ष फसवला गेला नसला तरी फसण्याच्या बेतात असतो. त्याला योग्य मार्गदर्शन करणे, त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेणे, समाजाचे कर्तव्य होय. इतर स्वातंत्र्याप्रमाणेच उपभोक्त्याचे वस्तू पसंत करण्याचे स्वातंत्र्यसुद्धा महत्त्वाचे आहे. आणि हे स्वातंत्र्य त्याला जाणकारीने उपभोगता आले पाहिजे.

## कामधंद्याचे स्वातंत्र्य

जर उपभोक्त्याच्या स्वातंत्र्याची कल्पना लोकांना पुरेशी समजली नसेल तर उत्पादकाच्या स्वातंत्र्याची कल्पना मुळीच समजली नाही, असे म्हणता येईल. उपलब्ध असलेल्या निरनिराळ्या कामांतून एखाद्याची निवड करण्याचे स्वातंत्र्य असणे, हे

याबाबतीत पुरेसे स्वातंत्र्य आहे; असा मर्यादित अर्थ भांडवलशाही विचाराने मांडला. ही खुली निवड बहुधा काल्पनिकच असे. निवड करण्याचे तर दूरच राहो पण एखादे काम मिळाले तर कामगार स्वतःला धन्य समजत असे. मग ते काम त्याच्या आवडीचे असो वा नसो. आवडीच्या उद्योगाचे शिक्षण मिळण्याची शक्यता कामगाराच्या बाबतीत जवळजवळ नसे. तेव्हा समाजवाद्यांनी यापुढे जाऊन आग्रह धरला तो असा की कामधंदा निवडण्याच्या बाबतीत कामगारांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य द्यायचे म्हणजे बेकारीची भीती त्यांच्या मनात असता कामा नये, किंवा शिक्षणाच्या संधीचा अभाव असताही कामा नये. एकदा नोकरी मिळाल्यानंतर मनुष्याला त्या बाबतीत कितपत स्वातंत्र्य अनुभवावयास मिळते, हे तपासून पाहण्याचा फारच थोड्या लोकांनी प्रयत्न केला आहे ज्या वातावरणात त्याला काम करावे लागते त्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ऱ्हास होतो का विकास होतो, याची चौकशीही कोणी करत नाही. जणूकाही त्याच्या स्वातंत्र्याच्या या अंगाशी समाजाला काहीच कर्तव्य नाही. करीत असलेल्या कामाचा कामगाराच्या व्यक्तित्वावर काय परिणाम होतो या गोष्टीचा काहीही विचार केला जात नाही.

कामधंद्याचे स्वातंत्र्य म्हणजे काय? ज्या कामामुळे कामगारास आपल्या व्यक्तित्वाचा विकास साधता येतो असे काम करण्याची संधी मिळणे, हाच त्याचा अर्थ. एखाद्या कामासाठी जर कौशल्य, तारतम्य आणि जबाबदारीची जाणीव यांची आवश्यकता अंगी असेल आणि असे काम कोणत्या का अर्थाने होईना आवडत असेल तर त्यातून त्याच्या व्यक्तित्वाच्या विकासाला वाव मिळतो, या विधानाची सत्यता आपल्या सर्वांना परिचित आहे. योग्य निदान करणारा, आपल्या कामात कमालीचे कौशल्य दाखविणारा, आणि ज्याच्या हातात अनेकांच्या जीविताचे सूत्र असते, असा सर्जन आपल्या कामात आपल्या व्यक्तित्त्वाचा ठसा सतत उमटवीत असतो. अनेक मुलांच्या व्यक्तित्त्वाच्या विकासास कारणीभूत होणाऱ्या आणि त्यांचे चरित्र घडविण्यास जबाबदार ठरणाऱ्या शिक्षकाबाबतही असेच म्हणता येईल. तो जर उत्तम शिक्षक असेल तर त्याला त्याच्या उद्योगात स्वातंत्र्य तर अनुभवावयास मिळेलच. परंतु त्याचबरोबर नेमून दिलेला उद्योग पार पाडण्यात त्याला अपार आनंद लाभेल. आपल्या उद्योगाचे स्वरूप कोणतेही असो, बऱ्याचशा गोष्टी आपल्यावर अवलंबित आहेत असे प्रत्येकास वाटत असते आणि आपण त्या उद्योगात भर घालीत आहोत ही सुद्धा भावना त्याच्या मनात असते. जबाबदारी टाळणाऱ्या लोकांनासुद्धा कौशल्य वापरण्यात एक खास आनंद वाटतो. मग ते कौशल्य अगदी सामान्य प्रकारातले का असेना. असे झाले म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाचा पुरेपूर आविष्कार होऊ लागतो.

उद्योगक्षेत्रात आत्मप्रगटनास ( Self expression ) विशेष संधी मिळण्यासारखी नसली तरी अशाप्रकारची संधी समाजात काम करताना मिळण्याची शक्यता आहे. यामुळेसुद्धा आपल्या उद्योगाची कोठेतरी किंमत आहे ही जाणीव होते,

ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आपल्या लोकांनी आपल्याला आदराने वागवावे आणि त्यांच्याबरोबरचे आपले संबंध उत्तम प्रकारचे असावेत, ही गोष्ट व्यक्तित्वाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. स्थान, मान आणि उत्तम सार्वजनिक संबंध या गोष्टीसुद्धा कामगाराच्या आयुष्यात अनेकवेळा मजूरी आणि इतर भौतिक सुखाइत-क्याच मोलाच्या असतात. त्यामुळे त्याला स्वातंत्र्य व महत्त्व मिळाल्यासारखे वाटते.

अफाट तांत्रिक प्रगतीच्या या युगात उद्योगधंद्याचे स्वरूपच बदलून गेले आहे. आणि वर निर्देशिलेल्या गोष्टींचा त्यामुळे विचारच केला जात नाही. औद्योगिक भरभराटीसाठी मानवी आणि सामाजिक किंमत किती द्यावी लागते ह्याचा हिशेबच नाही. प्रचंड जनसमुदायाला दररोज एकत्र आणले जाते. मग त्यासाठी प्रवासात किती वेळ वाया जातो व शक्तीचा किती व्यय होतो किंवा पुढे जाऊन असेही म्हणता येईल की समाजाला त्याची किती जबर किंमत द्यावी लागते याचा विचार कोणीच करत नाही. माणसांचे प्रचंडच्या प्रचंड घोळके उद्योगाच्या ठिकाणी कळपा-सारखे ढकलले जातात. हे घोळके इतके मोठे असतात की त्यात व्यक्तीला स्वतंत्र असे स्थानच उरत नाही. सहस्रावधी कामगारांच्या घोळक्यातील प्रत्येक कामगार हा एक महत्त्वशून्य घटक बनतो.

अशा प्रचंड स्थळी कामाची इतकी सूक्ष्म विभागणी केली जाते, इतके छोटे छोटे भाग केले जातात की प्रत्येक काम मिनिटामिनिटासाठी आखून दिलेल्या वेळापत्रकावर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक कामगारास प्रचंड वेगाने फिरणाऱ्या चाकाचा आपण एक सूक्ष्म भाग आहोत असे वाटू लागते. तो ज्या यंत्रावर काम करतो त्या यंत्राइतकेच, किंबहुना त्याहूनही कमी असे त्याचे व्यक्तिमत्त्व असते. कार्याच्या या विभागणीमुळे पर्यवेक्षक आणि व्यवस्थापक नेमावेच लागतात. कारण प्रत्येकजण आपले काम बरोबर करतो आहे की नाही हे पाहून उद्योगाचे चक्र सतत फिरते ठेवणे अगत्याचे असते. या सर्व अधिकार श्रेणीच्या बुडाशी असतो कामगार. त्याला क्रमरचनेत बसवणे, पद्धत लावणे आणि अशाप्रकारे त्याची जबाबदारीची भावना नाहीशी करणे जरूरीचे असते. तो जे जे काही करतो ते सर्व वरिष्ठांच्या आज्ञेनुसार. या सर्व गुंतागुंतीच्या रच-नेचा त्याला बोध होत नाही; पण तो तिचे भक्ष्य बनतो. आपण करीत असलेल्या कामाचा आणि एकंदर कार्यप्रक्रियेचा परस्पर संबंध काय आहे, हे जाणून घेणे त्याच्या कल्पनेबाहेरचे असते. प्रत्येक महत्त्वाच्या बाबतीत वरिष्ठांच्या आदेशाला तो जुंपला गेलेला असतो. प्रत्येक काम काही अशा प्रकारचे नसते; व्यावसायिक क्षेत्राबाहेर देखील तारतम्य वापरून करण्यासारखी अनेक कामे असतात. परंतु सर्वसाधारणपणे आढळणारी आणि मान्यता पावलेली प्रवृत्ती ही मात्र कामधंद्याचे स्वातंत्र्य नष्ट करायचीच असते. यांत्रिक पद्धतीने लहान लहान कामांची एकापुढे एक जुळणी करणाऱ्या उत्पादनतंत्रात या प्रवृत्तीचे उत्तम प्रकटीकरण होते.

आपण फक्त आजूबाजूस शारीरिक श्रमाचे काम करणाऱ्यांकडे वा तसेच म्हणायचे झाल्यास बौद्धिक काम करणाऱ्यांकडे पाहिले की त्याचे परिणाम सहज दृष्टोत्पत्तीस पडतील. या परिणामाचा अगदी स्पष्ट विशेष म्हणजे आत्यंतिक कंटाळवाणेपणा हा होय. मोठ्या प्रमाणात नि सतत वाढत जाणारा कामातील नीरस तोच तोचपणा त्यात आहे. यामुळे कामगाराच्या जीवनात कंटाळवाणेपणाखेरीज दुसरी कसलीच भर पडत नाही. आपले काम कोणत्या पद्धतीने करावे हे ठरविण्याचा त्याला अधिकार नसतो. एवढेच नव्हे तर आपण काम अशाचप्रकारे का करतो याचीही त्याला माहिती नसते. अशा परिस्थितीत आठवड्याच्या अखेरीस हाती येणाऱ्या पगाराच्या पाकिटासाठी ही अटळ आपत्ती सहन करावयास हवी, अशा बुद्धीने कामाकडे लक्ष पुरविण्यावाचून तो दुसरे काय करू शकणार ? केवळ पैसे मिळविणे एवढीच त्याची त्या कामाविषयी आस्था असते. कामाच्या ठिकाणी काही व्यक्तिगत संबंध निर्माण होणे वा अधिक पैसे मिळविणे यामुळे कामाची थोडीफार गोडी लागण्याची शक्यता आहे. पण आपण करीत असलेल्या कामामुळे कामगारास समाधान मिळेल अशी कोणाची अपेक्षाही असत नाही, मग त्याच्या व्यक्तित्त्वाच्या विकासाची बातच सोडा.

औद्योगिक क्षेत्रातील या परिस्थितीचे समर्थन करण्यासाठी अनेक सबबी सांगितल्या जातात. उदा. असे म्हटले जाते की कामगारांकडून मोठ्या अपेक्षा न बाळगता त्यांना सोपे व सहजगत्या करण्यासारखे चांगले काम दिले व त्यासाठी चांगले वेतन दिले म्हणजे बहुतेक कामगार खूष असतात. बाळबोध वळणाचे नित्याचे काम त्यांना अधिक पसंत असते. कारण त्यामुळे त्यांना गप्पा छाटायला नि दिवास्वप्ने रंगवायला फुरसत मिळते. अधिक स्वातंत्र्याबरोबर निगडीत असलेली जबाबदारी त्यांना रुचत नाही. या सोयिस्कर गृहीत गोष्टी खरोखरच सत्य आहेत का ? या गृहीतगोष्टींचे खंडन करण्याजोगा पुरावा उपलब्ध आहे. कारखान्याच्या चार भिंतीआतील वातावरणाचा ज्यांना परिचय आहे त्यांना हे माहित आहे की कित्येक वेळा कामगार कामामध्ये अधिक रस घेता यावा म्हणून धडपड करतात आणि ठराविक परिपाठाच्या चाकोरीतून बाहेर पडण्याच्या संधी साधण्यासाठी तयार असतात. स्वतःचे कौशल्य दाखविण्याची संधी मिळताच पूर्वी निरसतेने काम करणारे स्त्री पुरुष अनपेक्षितपणे कर्तबगारी आणि उत्साह दाखवायला लागतात.

आहे त्या परिस्थितीतच लोक 'सुखी' आहेत, हे समाज-सुधारणा विरोधकांचे आवडते वाक्य आहे. एकेकाळी तर असे म्हटले जाई की शिक्षणाशिवाय कामगार सुखी आहेत, मग त्यांना शिक्षण तरी कशासाठी द्यायचे ? पुढे असे म्हटले गेले की झोपडपट्टीतून राहणेच त्यांना 'सुखाचे' आहे. नव्या घरांची ते बरबादी करतील. आंघोळीच्या टबामध्ये ते कोळसे ठेवतील. आता असे म्हटले जाते की कंटाळवाण्या एकसूरी कामात गढलेले हे लोक 'सुखी' आहेत. नेमके काय करायचे हे सांगितलेले

त्यांना आवडते. कामधंद्यात अधिक स्वातंत्र्य दिल्यास त्यांना त्याचे ओझे वाटेल.

या युक्तिवादातही काही सत्य असण्याची शक्यता आहे. जबाबदारी उचलण्यास प्रत्येकजण उत्सुक असतो असे नाही; आणि तेच तेच काम करण्यास प्रत्येकाचा विरोध असतोच असेही नाही. बऱ्याच लोकांचा तेच तेच काम करण्यास विरोध असतोही, पण नशिबी येईल तेच घेण्यापलीकडे त्यांना काहीही करता येत नाही. आपले काम करण्यापासून नवे समाधान मिळण्यासारखे आहे, याची इतर अनेकांना जाणीव करून देता येणे शक्य आहे. कारण काय अपेक्षा बाळगाव्यात याबाबतच्या लोकांच्या दृष्टिकोनाला मिळालेले शिक्षण आणि ज्ञान असलेल्या गोष्टी यामुळे मर्यादा पडतात. अटळ वाटणाऱ्या आपल्या नशिबाशी जमवून घेण्याचे ठरविल्यास त्यातूनही 'सुख' मिळण्याची शक्यता आहे.

कामधंद्यात ज्या गोष्टी लाभत नाहीत त्या लोकांना मोकळ्या वेळात मिळविता येतात, अशी एक नेहमीची सबब आहे. पुरेसा मोकळा वेळ दिल्यास वाटेल तेवढे कंटाळवाणे काम करण्याची तयारी असणारे अनेक कामगार आहेत, असेही म्हटले जाते. कामाचे तास कमी केल्यासच हे शक्य आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की दिवसाचा अधिकांश वेळ लोकांना काम करावे लागते आणि परिणामी त्यांची अधिकांश शक्तीसुद्धा कामासाठीच खर्च होणे अटळ ठरते. मग या अर्थशून्य कामकाजासाठी एवढा मोठा वेळ आणि प्रयत्न का खर्ची घालायचा? सर्जनशील कार्याच्या महत्त्वपूर्ण अनुभवापासून का म्हणून त्यांना परावृत्त करावे? या गोष्टीचा-सुद्धा विचार करावयास हवा. कार्यक्षेत्रात लोकांना निर्माण दृष्टीवाचून वागायची सवय झाली आहे की ते मोकळा वेळही त्याच पद्धतीने घालविण्याची शक्यता आहे. आपल्या आधुनिक संस्कृतीमध्ये मनोरंजन व करमणुकीच्यावेळीसुद्धा लोक बघ्या-सारखे वागत असतात. वास्तविक हेच लोक पूर्वी जेव्हा आयत्या करमणुकीचे आनंद उपलब्ध नव्हते तेव्हा अशा कार्यक्रमात सक्रिय भाग घेत असत. स्वातंत्र्य हे अविभाज्य आहे, ते व त्याची गोडी एका क्षेत्रात नष्ट केली तर इतरत्र ती सहजगत्या नष्ट होते.

आणि मग निर्वाणीचा नि निर्णायक समजला जाणारा युक्तिवाद मांडला जातो की– आम्हाला कार्यक्षमता व उच्च उत्पादनक्षमता हवी असल्यामुळे काम-धंद्यातील स्वातंत्र्याची चैन आम्हाला परवडण्याजोगी नाही. पण हे निर्णायक का समजायचे? उत्पादन वाढविण्यासाठी सर्वोत्तम मार्ग म्हणजे कामगारास यांत्रिक मानव बनविणे हे गृहीत कशासाठी धरायचे? तंत्रज्ञामध्ये ही गोष्ट गृहीत धरली जात असेल, पण म्हणून ही गोष्ट सिद्ध झाली असे समजता येणार नाही. कार्यक्षमतेच्या-दृष्टीने कार्य विभाजनाचे फायदे असतील पण तसे त्याचे तोटेही आहेत. त्यामुळे कामगारांची कामातील गोडी इतपत नष्ट होते की तो भावनाशून्य बनतो, आवश्यकते-पेक्षा अधिक कष्ट करत नाही, परिवर्तनास विरोध करतो आणि प्रत्येक सुधारणेस

प्रतिरोध करतो. मानवप्राणी म्हणजे यंत्रे नव्हेत. तो उत्तम प्रकारे काम तेव्हाच करील की जेव्हा त्याला स्वातंत्र्य दिले जाईल. हिताहिताचा तराजू कोणत्या बाजूस झुकत आहे हे कोणास ठाऊक आहे ?

पण तो कोणत्याही बाजूस झुकत असला तरी एक गोष्ट स्पष्ट आहे. औद्योगिकरणाच्या झपाट्यामुळे जेव्हा लोकांना उद्योगाचे स्वातंत्र्य होते तो कारागिरांचा काळ सरला आहे. आता आपल्याजवळ यंत्र आहे आणि त्याचे उच्चाटन करणे शक्य नाही. इतिहासाची प्रक्रिया मागे ढकलणे शक्य असते तरी ते कोणालाच करावेसे वाटत नाही. कारण यंत्राचे परिणाम विरोधाभासात्मक आहेत. एका बाजूस यंत्र माणसाची शारीरिक कष्टाच्या त्रासदायक कामातून मुक्तता करते व त्याच्या कामाची भरपूर फलप्राप्ती करून देते. दुसऱ्या बाजूने ते कामाची पोटविभागणी सुरू करून अतियश गुंतागुंतीच्या संघटनेमध्ये बांधीव परिपाठाच्या बंधनात त्याला जखडते. तेव्हा तांत्रिक प्रगतीचे फायदे संभाळून त्यासाठी द्यावी लागणारी सामाजिक किंमत कमी करणे हा मुख्य प्रश्न आहे.

या समस्येकडे एक समस्या म्हणून पाहिल्यास व तिचा योग्य तो समाचार घेतल्यास तोडगा काढण्याचे कामी निराश होण्याचे कारण नाही. सोडविण्याची इच्छा असल्यास इतर समस्यांप्रमाणे ही समस्यासुद्धा सोडवता येईल. यंत्राचा उपयोग न करण्याचे ठरविणे हे खुळेपणाचे होईल, हे खरे असले तरी यंत्राच्या साहाय्याने करावयाच्या कामाचे संघटन वेगळ्या पद्धतीने करता येईल. त्याचप्रमाणे कामाच्या संघटन पद्धतीच्या संदर्भात चपखल बसतील अशी यंत्रे बनविता येणे शक्य आहे. उदा० वरचेवर असे सांगितले जाते की विद्युत शक्तीचा वाढता उपयोग केल्यास एकाच प्रचंड छत्राखाली औद्योगिक प्रक्रियेचे केंद्रीकरण करण्याची आवश्यकता कमी भासेल. या प्रक्रियेच्या काही भागांचे विकेंद्रीकरण सहज करता येईल. तयार भाग महिन्यातून एकवार जुळणीसाठी केन्द्रस्थानी आणण्यासाठी द्यावी लागणारी सामाजिक किंमत लोकांनाच रोजच्या रोज इकडून तिकडे ये जा करावयासाठी द्याव्या लागणाऱ्या किंमतीहून अधिक असणार नाही.

तांत्रिक प्रगती आंधळेपणाने होत नाही तर ती सामाजिक गरजेनुसार होते. या प्रगतीमुळे कामगारांवर होणाऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष करून केवळ वाढत्या उत्पादनाची अपेक्षा बाळगल्याने तिचे परिणाम धोकादायक होतात. हेच सध्या घडते आहे. यंत्रास उपभोक्त्यांच्या भूमिकेतील मानवाचा गुलाम बनविण्याच्या नादात उत्पादकाच्या भूमिकेतील माणसावर यंत्रास वर्चस्व प्रस्थापित करण्यास संमती दिली गेली आहे. पण असे करण्याची आवश्यकता नाही. समाजास उत्पादनाची काळजी घेण्याची गरज भासली तर यंत्र आणि त्याच्या बरोबरील संघटन यांना उत्पादकाचेही चाकर बनविता येईल. स्वयंप्रेरक तंत्राच्या (Automation)

क्षेत्रातील अलीकडील प्रगतीमुळे या क्रांतिकारी नव्या दृष्टिकोनास महान संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यंत्राकडे पाठ फिरविणे जसे आता शक्य नाही तसेच कितीही विकेंद्रीकरण केले तरी मोठया प्रमाणावरील संघटनाकडेही पाठ फिरवता येणार नाही. पण यंत्राप्रमाणेच मोठी संघटनासुद्धा विरोधाभासात्मक आहे. एका बाजूने प्रत्येक कामगारास महत्त्वहीन बनविले जाते आणि दुसऱ्या बाजूस त्या कामगारासाठी नव्या संधी निर्माण केल्या जातात. व्यक्तित्व आणि व्यक्तिगत तारतम्य या स्वरूपात तो जे गमावतो ते सामाजिक प्रयत्नांची नवी जाणीव आणि कामाच्या संदर्भात निर्माण झालेले स्नेहसंबंधांचे विश्व यांच्या रूपाने मिळवितो. कामाच्या दीर्घ वेळात तो सामाजिक संबंधापासून बाजूला गेलेला असेल पण तो एकाकी कामगार नसतो तर एका समुहाचा सदस्य असतो. आणि या समुहामुळे त्याला अभिव्यक्तीच्या नव्या संधी प्राप्त होतात. ज्याप्रमाणे कामगारांच्या गरजांच्या संदर्भात इच्छा असल्यास यंत्र प्रकियांना वळण देणे शक्य आहे; त्याप्रमाणेच औद्योगिक संबंधात देखील कामगारांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळविण्याच्या दृष्टीने नवे वळण शक्य आहे. समाजास काय हवे आहे यावर हे अवलंबून आहे.

तरीसुद्धा शेवटी काही वेळा वाढीव उत्पादन आणि उत्पादनक्षेत्रातील वाढीव स्वातंत्र्य यापैकी एकाची निवड करावी लागेल आणि या स्वातंत्र्यासाठी कदाचित काही तरी किंमत द्यावी लागेल. पण मुद्दा असा आहे की निवड करणे बरोबर आहे आणि त्यासाठी किंमत देणे वाजवी होय ! वाढीव उत्पादनामुळे एक प्रकारची मानवी गरज भागते. उत्पादन क्षेत्रातील स्वातंत्र्यामुळे एक निराळीच गरज भागते. पहिली गरजच अधिक महत्त्वाची आहे असे नेहमी का गृहीत धरले जावे ? दोहोंत संघर्ष झाल्यास काही वेळा दुसरी गरज का महत्त्वाची समजली जात नाही ? उत्पादनाच्या आकडेवारीत व्यक्त होणाऱ्या मूल्यदृष्टीपेक्षा अधिक उच्चप्रतीची दृष्टी उत्पादन क्षेत्रातील स्वातंत्र्याच्या मागणीत व्यक्त होणे शक्य आहे.

# ५. सहभावत्वाच्या दिशेने

## समाजाची बांधणी

समाजवाद्यांनी आपल्या चळवळीस प्रारंभ केला तेव्हा त्यांच्या मनात एक विचार प्रमुख होता. अस्तित्वात असलेल्या कठोर आर्थिक व्यवस्थेत कामगारांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केले असल्यामुळे समता व स्वातंत्र्य यांच्या नावाखाली त्यांची जोरदार मागणी करणे व ते प्रस्थापित करणे आवश्यक होते. शतकभराच्या जोरदार प्रयत्नांना निश्चित यश आले आहे हे खरे असले तरी कामगारांना अद्याप पूर्ण हक्क प्राप्त झालेले नाहीत.. औद्योगिक क्षेत्रात समता तर नाहीच पण त्या दिशेने खूपच प्रगती करायची आहे. अद्यापही या क्षेत्रात हक्कांच्याबाबत अस्पष्ट जाणीव आढळते. पण हा काही थोडा लाभ नव्हे की कामगारांची आता केवळ शृंखलापासून सुटका होणार आहे असे नाही. समाजात त्यांचे काही खोल हितसंबंध निर्माण झाले आहेत. सांभाळण्याजोगे व वाढविण्याजोगे काही निर्माण झाले आहे. शिवाय आतापर्यंतचे यश ज्या संघटनांनी मिळवून दिले आहे त्यांचे पुढील लढ्यासाठी साहाय्य आहेच. चळवळ चालू राहील. पण केवळ एवढ्याच गोष्टीची आवश्यकता आहे का ? पूर्वी ज्या पद्धतीचा स्वीकार केला त्याच पद्धतीचा वापर करणे फायद्याचे होईल का ?

होणार नाही. आता अशी परिस्थिती निर्माण होत आहे की अगदी सामर्थ्याच्या आधाराने जरी हक्कांची जोरदार मागणी केली तरी थोडेसेच अधिक यश मिळणार आहे. कुठलाही समाज मग तो समाजवादी असो वा अन्य कुठलाही, केवळ हक्कांच्या आधारावर तग धरू शकणार नाही. प्रत्येकजण जर केवळ आपल्याला काय मिळावयास हवे याचा विचार करू लागला वा स्वतःचे समाधान करण्याच्यामागे लागला व स्वतःची कायदेशीर वाटणी हेकटपणे मागू लागला तर समाजाची सारी वीणच विसकटून जाईल. प्रत्येक हक्काशी निगडीत असे काही कर्तव्य असतेच. त्याचाही कुणीतरी आदर करावयास हवा. मग हे कुणी तरी कोण होणार ?

जोपर्यंत कामगारांस त्यांच्या केवळ उदरनिर्वाहाखेरीज इतर सर्व गोष्टी नाकारल्या जात असत तोपर्यंत समाजवाद हा कर्तव्याची जाणीव देणारा नव्हे तर हक्कांचा पुरस्कार करणारा विचार होता. त्या वेळी कामगार जे काही देत होता त्याहून अधिक त्याचेकडून अपेक्षा नव्हती. कामगारांनी आपल्या श्रमाने निर्माण झालेल्या उत्पन्नाचा आणखी मोठा वाटा हक्काने मागितला, गरीबांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाची मागणी केली, आजारी वा रोगजर्जरांनी वैद्यकीय मदत मागितली, सेवानिवृत्तीच्या काळातील जीवन व्यतित करण्यासाठी वृद्धांनी निवृत्ती-वेतनाची मागणी केली या सर्व मागण्या पुऱ्या करणे राज्यसंस्थेचे कर्तव्य होते आणि त्या पुऱ्या केल्या जात आहेत याची खबरदारी घेणे, हे समाजवाद्यांचे कर्तव्य होते. पैसे देणे व

मदत करणे या जबाबदाऱ्या केवळ खास हक्क असलेल्या वर्गाच्या शिरावर होत्या. समाजाने केलेल्या कृपेची विभागणीच इतकी विषम होती की गरिबांनी मागणी करावी व श्रीमंतांनी ती पुरवावी यातच न्याय होता.

समाजातील अंतर्गत व्यवस्थेचा समतोल सुधारल्यानंतर जबाबदाऱ्यांची जाणीवसुद्धा अधिक सम झाली. सद्य:परिस्थितीत सधन लोकसुद्धा इतके बेताल श्रीमंत नाहीत की प्रत्येक गोष्टीची किंमत तेच देऊ शकतील. तसेच गरीब लोकही इतके गरीब नाहीत की ते कोठल्याच गोष्टीची किंमत देऊ शकणार नाहीत. असो, ज्याची प्रत्यक्ष किंमत द्यावयासच हवी अशा सोडून आज अनेक गोष्टी आहेत. आज समाजाने आपल्या सर्वांसाठी अशा सार्वजनिक सोयी केल्या असल्यामुळे हा खर्च भरून काढण्यासाठी काही तरी हातभार लावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जीवनधारणेसाठी आवश्यक असलेल्या मजुरीत अधिक वाढ झाली असल्यामुळे व प्रत्येकास उद्योग मिळाल्यामुळे मजुरी मिळविणाऱ्यानेही प्राप्तीवरील कराचा आपला वाटा दिला पाहिजे. ज्या लोकांना अधिक बरचे राहणीमान हवे असेल त्यांनी ते साध्य करून घेण्यासाठी अधिक कष्ट करावयास हवेत, दुसऱ्या कुणाकडून ते हिरावून घेता येणार नाही. केवळ हक्कांची मागणी करून समाजवादी चळवळीस आता नवे विजय संपादन करता येणार नाहीत. तिने आता प्रत्येकास आपल्या जबाबदारीचा वाटा उचलण्याचे आवाहन करावयास हवे. सर्व समाजाने, त्यातील प्रत्येक विभागाने, आपली जबाबदारी स्वीकारल्याखेरीज प्रत्येकजण ज्याला स्वत:चा न्याय वाटा समजतो, तो त्याला मिळू शकणार नाही.

लोकांनी आपल्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात यासाठी काय करावयास हवे ? करभरणी, नोकरीच्या कराराचे पालन करणे, ग्राहकाचे पूर्ण माप त्याच्या पदरात टाकणे, अशा काही जबाबदाऱ्यांची कायदेशीर अंमलबजावणी करता येईल. पण अशा प्रकारची कायद्याने बजावून घेण्याजोगी कर्तव्ये नेहमीच किमान स्वरूपाची असू शकतील. सर्व सद्प्रवृत्ती, विचार, इतरांच्या हिताची जाण, रोजच्या जीवनातील न्याय्य वागणूक वगैरे गोष्टी, प्रत्येकास त्याचा न्याय्य वाटा मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत. पण या संबंधात कायदे करणे व त्यांची पोलीसांच्या साक्षीने अंमलबजावणी करून घेणे हे संभवत नाही. या साऱ्या गोष्टी प्रत्येकाच्या ऐच्छिक वर्तनावर अवलंबून असतात व त्या नेहमीच तशा असाव्यात. पण समता आणि स्वातंत्र्य तर राहोच, सामाजिक जीवन थोडेबहुत सुखासमाधानाचे व्हावे अशी इच्छा असेल तर त्यासाठी सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्यांची जाणीव हवी. अगदी माळरानातही घाण करू नये वा उच्च स्वरात रेडिओ लावून शेजाऱ्याची झोपमोड करू नये, यासारख्या साध्या गोष्टींचीसुद्धा समज असणे आवश्यक आहे.

समाजाशी एकरूप झाल्यानंतरच लोकांना जबाबदाऱ्या मान्य होतात.

समाजाविरुद्ध कांगावा करताना नव्हे. समाजाच्या कल्याणाची ओढ लागल्यानंतरच आणि स्वतः केलेल्या समाजसेवेस महत्त्व आहे हे समजल्यानंतरच जबाबदाऱ्यांचे महत्त्व पटते. केवळ राज्यसंस्थेत बदल घडवून आणण्याने सामाजिक भावना निर्माण करता येणार नाही. त्यासाठी समाजही बदलणे आवश्यक आहे. स्वतःच्या फायद्या-पलीकडील गोष्टींबाबतही आपल्यावर काही जबाबदाऱ्या आहेत ही भावना निर्माण करणाऱ्या लोकांच्या परस्पर विषयींच्या काही निष्ठा आहेत. समाज म्हणजे अशा निष्ठांनी विणलेले एक जाळे होय. समाजवादी समाजाची बांधणी करावयाची असेल तर या निष्ठा अधिक बळकट करावयास हव्यात.

वास्तविक पाहता जबाबदाऱ्यांना मान्यता देणे—तीही कदाचित कुरकुरतच—यापेक्षा अधिकाची गरज आहे. सामाजिक संबंधाबाबतचा समाजवाद्यांनी सदैव उराशी बाळगलेला आदर्श याहून उच्चतम आहे. तो आदर्श म्हणजे भावत्वाचा. सहभाव म्हणजे प्रत्येकास त्याचा न्याय वाटा देणे असे नव्हे तर वेळ पडल्यास विशेष दक्षता घेऊन दुसऱ्याच्या मदतीस जाणे. आदरभाव आणि शेजारधर्म येथपासून याची सुरुवात होते. रोजच्या जीवनात याचे आचरण केल्याने त्यातूनच निःस्वार्थी सामाजिक सेवेचा मार्ग विकसित होतो. एक प्रकारे कुटुंबाच्या भिंती ओलांडून दूरवर पोचणारा तो एक बंधुभाव आहे.

" बंधुभाव म्हणजे जीवन, बंधुभावाचा अभाव म्हणजे मरण. " या सुपरिचित शब्दांनी विल्यम मॉरिस यांनी स्पष्ट केलेला विचार समाजवादी विचारसरणीच्या इतिहासात पुन्हा पुन्हा सांगितलेला आहे. भांडवलशाहीचा धिक्कार केला जातो तो त्यातील अन्यायामुळे नव्हे तर त्यामुळे समाजाची वेगवेगळ्या वर्गात विभागणी झाली आणि त्यामुळे माणसांचे त्यांच्या शेजाऱ्यांशी भांडण जुंपले गेले म्हणून. या पद्धतीमुळे भरडून निघणाऱ्यांना बंड पुकारणे भाग पडले व त्यामुळे त्यांची कोणा-बद्दल निष्ठा उरली नाही. ज्या समाजात जगण्यासाठी माणसाला चुरशीचा लढा देणे भाग पडणार नाही, अन्यायाला बळी पडावे लागणार नाही, एवढेच नव्हे तर आपल्या समाजाची सेवा करण्याची संधी मिळाल्यास त्याला परमानंद होईल, अशा समाजाची निर्मिती करता येईल, या विश्वासातून समाजवाद्याचा मुळी जन्मच झाला आहे. हीच समाजवाद्यांची श्रद्धा आहे. परंतु अधिकाधिक मागणी करण्याच्या दैनंदिन झगड्यात कधीमधी याचा विसर पडतो. आज पुन्हा एकदा या गोष्टीचे नव्याने स्मरण करून घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

## न ओळखलेल्या जबाबदाऱ्या

केवळ हक्कांचीच भाषा करण्याचा कामगाराचा दिवस सरलेला आहे, हे आजचे बहुतेक समाजवादी मान्य करतील. जबाबदाऱ्या सुद्धा मान्य करावयास हव्या, हे त्यांना

माहीत आहे. उच्चतम उत्पादनक्षमतेसाठी आणलेला दबाव आणि वाढते राहणीमान वाढीव उत्पादनावर आधारित आहे. यासाठी केलेल्या प्रचारामुळे वरील विचार स्पष्ट झाला आहे. ' बंधुभाव हा आदर्श उत्तम आहे ', यावरही कुणाचे दुमत नाही. पण या साऱ्या गोष्टींचा खरोखरीचा अर्थ काय आहे ? लोकांनी आपल्या आर्थिक जीवनात नेमके काय करावे अशी अपेक्षा आहे ?

कायद्यानेच प्रत्यक्ष काही मागण्या लादल्या आहेत. उपभोक्त्याने आपले कर भरावेत व अशा प्रकारे आपल्या उत्पादनाचा काही भाग समाजास द्यावा असे कायदा सांगतो. अन्यथा उत्पन्नाचा हा भागही त्याने स्वतःच्या मर्जीनुसार वापरला असता. उत्पादक म्हणून माणसाकडून कायद्याने केलेली मागणी रोजगारीच्या करारात सांगितलेली असते. काही कर्तव्ये मालक व नोकर या दोघांवरही लादलेली आहेत— अमुक तास काम केल्यास अमुक पौंड वेतन, अमुक सुट्टीचे दिवस आणि सुरक्षा नि शरीर-स्वास्थ्यासाठी अमुक गोष्टींचे पालन, वगैरे. कायद्याने उघड उघड अन्यायास आळा बसतो आणि प्रत्येकाकडून कमीत कमी सेवेची अपेक्षा केली जाते; पण या पलीकडे कायद्याने काही होऊ शकत नाही.

या पलीकडे काही अपेक्षा असल्यास त्याची पूर्ती स्वतःकडून करावयास हवी. वस्तूंची नासाडी करू नये वा समाजाने उपलब्ध केलेल्या सोयींचा दुरुपयोग करू नये, अशी सक्ती उपभोक्त्यांवर करता येणे कुणालाच शक्य नाही. आपण करत आहोत ते चुकीचे आहे हे त्याचे त्यालाच समजायला हवे. कारण यामुळे तो सरकार वा श्रीमंतांना लुबाडत नसून ( हे सुद्धा समर्थनीय नाही ) आपल्या स्वतःच्या शेजाऱ्यांना लुबाडतो. राष्ट्रीय संपत्तीचा नाश झाल्यास त्याचा सर्वसामान्य राहणीमानावर आज ना उद्या विपरीत परिणाम होणारच. सार्वजनिक सोयींचा दुरुपयोग केल्यास त्यांची पुढील वाढ व प्रगती रोखली जाते; या साध्या नीतीचा भंग करणारा प्रत्येकजण मग तो 'टॉप हॅट' वापरणारा आणि सिगार ओढणारा नसला तरी पिळवणूक करणाराच होय.

पण स्वेच्छेने पाळण्याजोगी प्रमुख कर्तव्ये उत्पादक म्हणून जगणाऱ्या मानवाने स्वीकारायची असतात. अशा कर्तव्यात सर्व प्रथम आणि अगदी उघड कर्तव्य हे की प्रत्येकाने आपले नेमस्त काम उत्तम प्रकारे पार पाडणे. आपल्या कामाचा सर्व समाजाच्या उत्कर्षावर काय परिणाम होतो ही गोष्ट वरवर पाहिल्यास तितकीशी महत्त्वाची वाटत नाही. करावयाचे काम आपण मनःपूर्वक केले किंवा नाही यावर फारसे काही अवलंबून आहे असा विश्वास ठेवणे कठीण वाटेल. परंतु वस्तुतः आपल्या कार्याद्वारेच आपण समाजजीवनात भाग घेत असतो. समाजकार्यास हातभार लावण्याचा हाच उघड नि व्यवहार्य मार्ग आहे. आणि याच कामात जर आपण सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवली नाही तर सामाजिक सेवेच्या पुढारलेल्या कार्यात जबाबदारीची जाणीव येणे मुष्किलच आहे.

कार्यामुळे माणसाला स्वाभिमानच प्राप्त होतो असे नव्हे, तर त्या मुळे इतरांच्या हिताचा आदर करण्याची संधी सुद्धा त्याला प्राप्त होते. जेथे कामगार नि ग्राहक समोर समोर येतात व बेफिकिरीने केलेल्या कामामुळे जेव्हा गैरसोय नि तणातणीचे संबंध निर्माण होतात, अशा सामाजिक सोयींच्या व्यवसायात ही गोष्ट स्पष्ट होते. कारखान्याच्या संदर्भातही हेच आढळते. येथे केलेल्या दुय्यम दर्जाच्या कामामुळे शेवटी कोणातरी ग्राहकास त्रास सोसावा लागतो. नागरिकांच्या मनात नसल्यास या उघड उघड जबाबदाऱ्या त्याना स्वीकारावयास लावण्याचा एकच मार्ग उरतो आणि तो म्हणजे त्याच्यावर सतत पिस्तूल रोखणे. उलट त्यानी ही जबाबदारी न स्वीकारल्यास अर्थव्यवस्थेची स्थिती वाळूवरच्या किल्ल्यासारखीच होणार हे अगदी स्पष्ट आहे.

आजच्या जमान्यात लोक मोठ्या संख्येने एकत्र येऊन काम करतात. या वस्तुस्थितीमुळे वेगळ्या प्रकारच्या जबाबदाऱ्या निर्माण होतात. सर्वसाधारणतः गुंतागुंतीचे संबंध प्रस्थापित करणाऱ्या खूपच मोठ्या अशा संघटना वा कारखान्यात लोकांना नोकरी करावी लागते. आणि हे सारे संबंध कायद्याने बांधून घेता येणे शक्य नसते. पण अशा औद्योगिक संघटनाकडून उत्तम प्रकारे काम करावयाचे असेल तर या क्षेत्रात काम करणाऱ्यांचे परस्पर संबंध चांगले असणे अगत्याचे आहे. आपण ज्यांच्याबरोबर काम करतो अशा प्रत्येकाच्या हिताची काळजीपूर्वक जाणीव आपल्या मनात असावयास हवी. यासाठी केवळ प्रत्येकजण आपले काम कसे करतो ही गोष्ट महत्त्वाची नसून हे काम करत असताना त्याचे इतरांशी वागणे कशा प्रकारचे असते–संस्थापक कामगारांना कशी वागणूक देतात किंवा कामगार संस्थापकांशी कसे वागतात अथवा कामगारांचे परस्परांशी कशा प्रकारचे संबंध असतात–याही गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

बंधुभाव प्रगटच व्हायचा असेल तर आर्थिक जीवनाच्या क्षेत्रातील या बंधुभावाच्या प्रगटनासाठी हीच संधी होय. व्यवहारातील याचा अर्थ असा होईल की औद्योगिक संघटनातील प्रत्येक घटकाने त्या यंत्रणेच्या कामकाजात उत्साहाने भाग घेणे, तिच्या यशाची स्वतःवर पडणारी जबाबदारी उचलणे आणि आपली संघटना म्हणजे उत्तम परस्पर संबंध व न्याय्य वागणूक याचा आदर्श असावी असा प्रयत्न करणे. प्रत्येकास कोणत्या तरी समितीचे सदस्य असावे असे वाटत नसते. पण त्याच्या अंगी जर जबाबदारीची जाणीव असेल तर समितीच्या बैठकीत काय ठरले वा कारखान्याचे दैनंदिन व्यवहाराची माहिती करून घेण्याची खटपट तो करील आणि सामुहिक भावना उत्पन्न होण्यासाठी व परस्पर सहकार्याच्या वाढीसाठी स्वतः करण्याजोगे आहे असे सर्व करील.

अशा प्रकारची मनोवृत्ती आजच्या औद्योगिक क्षेत्रात इतक्या अल्प प्रमाणात का आढळते ? या क्षेत्रात काम करणारे बहुतांशी लोक–मग ते प्रशासक असोत वा कामगार–करार नि कायदा यानी नेमून दिलेल्या कर्तव्याखेरीज इतर जबाबदाऱ्या

मान्य करावयास उत्सुक दिसत नाहीत. जे केलेच पाहिजे ते करायचे, अधिक जबाबदारीच्या बाबतीत हात झटकून मोकळे व्हायचे, हा त्यांच्या वर्तनाचा नेहमीचा प्रकार आहे. इतरवेळी उत्तम नागरिक, पालक आणि दयाशील शेजारी या जबाबदाऱ्या समाधानकारकपणे पार पाडणारे हे लोक कारखान्यात पाय टाकताक्षणीच नागरिकत्वाच्या या प्राथमिक जबाबदाऱ्यांकडे पाठ का फिरवितात, ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

औद्योगिक क्षेत्रातील लोक अशा प्रकारे वागतात हा केवळ एक दुःखद योगायोग नव्हे. पूर्वी केलेल्या पेरणीची ही पिके आहेत. कामगाराचा आजचा हा दृष्टिकोण हा भूतकाळात त्याच्या हक्कांना मान्यता दिली नव्हती याचा परिणाम आहे. त्याने आपल्या जबाबदाऱ्या सहजतेने व मोठेपणाने स्वीकाराव्यात अशी अपेक्षा करणे अवघड आहे. कारण इतरांनी त्याच्या बाबतच्या जबाबदाऱ्या उचललेल्या नव्हत्या. कामगारांनी कनिष्ठ असावे असे मालकाने कितीही वेळा आवाहन केले तरी जोपर्यंत मालकमंडळी कामगारांच्या हिताकडे पुरेसे लक्ष पुरवित नाहीत तोपर्यंत कामगार अशा आवाहनामुळे चिडणारच. कामगारांना कुठल्याच प्रकारची जबाबदारीची कामे न देता वा सल्लामसलत करण्यास अयोग्य ठरवून त्यांनाच जबाबदारीने उत्पादन वाढविण्याचा उपदेश करणे निरर्थक आहे. कामामध्ये गोडी लागेल अशी परिस्थिती निर्माण न करता कामगारांनाच कामात रस घेण्याचा उपदेश करणे तितकेच निरर्थक आहे. कामगाराला वर्षानुवर्षे वाईट वागणूक दिली गेली आहे, त्याच्या प्रतिष्ठेची बूज क्वचितच् राखली गेली आहे, वर्ग विभाजन पद्धती समाजात इतकी वर्षे खोलवर रुजलेली आहे की आज नोकरी-उद्योग मिळत असल्यामुळे नि त्यांची मजबूत संघटना असल्यामुळे कामगारांमध्ये आपण अधिक बलशाली असल्याची भावना निर्माण झाली असल्यास व तो मनाप्रमाणे वागू लागल्यास नवल नाही. चाकरी म्हणजे गुलामगिरी हे समीकरण अद्याप त्यांच्या मनात घर करून बसलेले आढळते. त्याच्या जबाबदाऱ्यांची त्याला जाणीव करून देण्याचा कुठलाही प्रयत्न केला तर उगीचच उपदेशामृत पाजण्याचा प्रयत्न असा त्याचा अर्थ केला जाण्याची किंवा कामगारांतील लढाऊवृत्ती जागृत करण्याचा समाजवादी चळवळीचा हेतू निष्फळ करण्याचा प्रयत्न असा होणे शक्य आहे.

तर मग काय करावे ? कामगारांनी आपल्या कामात जबाबदारीने सहभागी होऊन बंधुभावाच्या आदर्शाची गंभीर दखल घेण्यापूर्वी वर्ग मिरासदारीचे शेवटचे अवशेष नष्ट होईतोपर्यंत वाट पहावी का ? असे करणे म्हणजे चमत्कारावर विश्वास ठेवण्याजोगेच आहे. आपल्या लोकशाही पद्धतीमध्ये, एक दिवस एकाएक असा उगवेल की जेव्हा प्रत्येकास नव्या युगाचा आरंभ असल्यासारखा वाटेल आणि ज्यांनी पूर्वी उघड उघड स्वार्थ साधला असेल ते पटकन् बदलतील व बंधुभावाने समाजातील इतर

घटकांचे सेवक बनतील, असा विश्वास कुणाच्याच ठिकाणी नाही. आर्थिक जीवनाची घडण सुधारण्यासाठी, बंधुभावाचा आदर्श गाठण्यासाठी नव्या पद्धती व नवी मूल्ये यांचा आरंभ आजच केला पाहिजे. म्हणजे कालांतराने बंधुभाव हे प्रत्यक्षात येण्यासारखे ध्येय वाटू लागेल.

## कारखानदारीचे हेतू

या समस्येच्या मुळाशी हात घालणे हा एकच जुन्या कडवट आठवणी पुसून टाकण्याचा मार्ग आहे. आपल्या आर्थिक चळवळीच्या मागे जे हेतू आहेत त्याला या आठवणी चिकटलेल्या आहेत. म्हणूनच आता हाती जे काही संघटनबल आहे त्याच्या साह्याने हे जुने हेतूच बदलणे हेच ध्येय व्हायला हवे. औद्योगिक क्षेत्रात काम करण्याचा एकमेव हेतू म्हणजे पैसे मिळविणे हा गहणीय विचार विसाव्या शतकात वारसा म्हणून चालत आला आहे. औद्योगिक क्रांतीपासून आपल्याला मिळालेला हा एक मोठा शाप आहे आणि या शापातून आपण आपली कधीच सुटका करून घेऊ शकलो नाही. हॅमन्डस्नी म्हटल्याप्रमाणे : " औद्योगिक युगातील शहर...... हेच प्रकर्षाने दर्शविते की धर्म, सौंदर्य, फुरसत, अध्यात्मिक जीवन वा सौंदर्यदृष्टी हे सारे स्वार्थी कार्याच्या काटेकोर जीवनाशी विसंगत मानले जाते. मानवी जीवनाचे ध्येय लढणे वा प्रार्थना करणे, चिंतन करणे वा निर्माण करणे, उपभोग घेणे वा काही स्थान प्राप्त करणे, हे नसून नफा मिळविणे; मालक असेल तर स्वत:साठी नफा व नोकर असेल तर दुसऱ्यासाठी नफा हे बनते. हे माणसाचे कर्तव्य बनते आणि त्याच्या मार्गात कसलेही अडथळे निर्माण न करणे हे समाजाचे कर्तव्य ठरते. "*

या परंपरेने चालत आलेल्या विचारानुसार लोकांनी सधन होण्यासाठी काम केले आणि औद्योगिक क्षेत्राने प्रत्येकास संधी दिली. आपण करीत असलेल्या मूलभूत कामाद्वारेच प्रत्येकाने समाजजीवन उन्नत करण्यासाठी आपल्यापरीने घालता येईल तेवढी भर घालायची असते व समाजातले आपले स्थान मिळवायचे असते—या भूमिकेतून कामाकडे वास्तविक पहायला हवे ते कोणीच केले नाही. केवळ शारिरीक शक्तीचा वापर करण्यापासून नवनिर्मितीच्या आनंदापर्यंत किंवा संघात ( टीम ) काम केल्याने मिळणाऱ्या समाधानापर्यंत कोणतेही काम हे व्यक्तित्वाच्या परिपूर्तीचे साधन होय, ही जाणीव कोठेच आढळत नाही. माणूस हा मूलत: एक सामाजिक प्राणी आहे. आपण सामाजिक ध्येय गाठण्याच्या दिशेने काही करीत आहोत अशी प्रत्येक कामगाराची मनोधारणा असावयास हवी. हे सामाजिक कार्य करीत असताना त्याने अशी जबाबदारी स्वीकारलेली असते की त्या जबाबदारीची जाणीव नसल्यास त्याचे व्यक्तित्वही उन्नत होणार नाही. पण हे कोणी मान्यच केले नसते. पैशाखेरीज कशालाच

---

* जे. एल्. आणि बी हॅमण्ड–दि राइज ऑफ मॉडर्न इंडस्ट्री–(१९५४ आवृत्ती; पृष्ठ २२६)

महत्त्व नसते आणि यश वा अपयश जोखण्याचा संपत्ती हा एकच निकष होता. या पैशाच्या शर्यतीत भाग घेणाऱ्या भाग्यवान स्पर्धकांना प्रचंड बक्षिसे मिळण्याची शक्यता होती आणि म्हणूनच शर्यत जिकण्यासाठी आणि बाजूस फेकले जाऊ नये म्हणून प्रत्येकास अधिकच वेगाने धावावे लागे.

आज खूप गोष्टी बदललेल्या आहेत. तरी सुद्धा जुन्या भांडवलवादी मूल्यांची धार कायम आहे. कामाबाबतचा अपमानकारक दृष्टिकोन अद्यापही अस्तित्वात आहे. हे खरे की पैशासाठी बेभान झटापट झाल्यास ती आपण आज सहन करीत नाही. कारण अशा झटापटीत बहुतेक वेळा दुष्टांचाच संपूर्ण लाभ होतो. समान संधीच्या धोरणामुळे स्पर्धेच्या सुरवातीस जे काही अडथळे असावयाचे ते दूर झाले आहेत. तसेच या स्पर्धेत दुखावलेल्यांना उचलण्यासाठी समाजाचे शुश्रूषापथक आहे. तरीसुद्धा हळूहळू का होईना पण स्पर्धा चालूच आहे.

अधिक उत्पादनाच्या गोंडस बुरख्याखाली आजही पैशाची आसक्ती दडविलेली आढळते. उत्पादनक्षमता म्हणजे आज एक परवलीचा शब्द झाला आहे. यामुळेच साऱ्या चांगल्या गोष्टी निर्माण होणार आहेत. आणि म्हणूनच यासाठी कोणताही त्याग करावा लागला तरी तो करावयास हवा. पण ही केवळ वेगळ्या नावाची पाटी आहे. व्यक्तिगत लाभाचे आमिष आता तितकेसे स्पष्ट नि प्रभावी नाही. पण औद्योगिक चक्रात सापडलेल्यांवर होणारा परिणाम जवळ जवळ पूर्वी होत असे तसाच आहे. आजसुद्धा औद्योगिक क्षेत्रात वर्तनाचा जो आदर्श मानला जातो तो राजकारण, व्यवसाय, कला वा इतरत्र कोणत्याही क्षेत्रात मान्य होणार नाही. यामुळे कामगारांचे लक्ष वेधता येत नाही व त्यांना आपल्या नेतृत्वाने खेचता येत नाही. अशावेळी ते उदासीन, बेपर्वा व बेजबाबदार होण्याकडे आकर्षिले किंवा हाकलले जातात, याचे आश्चर्य आपणास का वाटावे ? त्यांच्या पगाराचा योग्य बंदोबस्त झाल्यावर त्यांनी अधिक काळजी का करावी ? त्यासाठी तर ते काम करतात.

आधुनिक औद्योगिक संघटनांच्यामुळे ही उदासीनता आणि बेपर्वाई अधिकच झाली आहे. आणि याचे परिणाम आपल्याला स्पष्ट दिसत आहेत. आपण काम करीत असलेल्या ठिकाणी छाप पाडण्याची आपली शक्ती अधिकच क्षीण झाल्याची कामगारांना भावना होते आहे व आपल्या कामकाजाशी व त्यामागील हेतूशी समरस होणे त्यांना अधिकच बिकट वाटू लागले आहे. किंबहुना आपण करीत असलेल्या कामाचे परिणाम काय होतात, याचेही आकलन त्यांना होईनासे झाले आहे. 'ते आणि 'आम्ही' ( 'त्यांचे' आणि 'आमचे' ) असा दुर्दैवी फरक केला जातोय, महत्त्व दिले जात नाही याचा रोष आढळतो. "आपल्याला काय करायचे आहे", असा तुच्छतेचा दृष्टिकोन आढळतोय. आजच्या आर्थिक जीवनात असे अनेक विभाग आहेत की जिथे आपल्या कामाचा आपल्या इतर सहकाऱ्यांच्या कामकाजाशी अस-

लेला संबंध इतरांच्या सहाय्यावाचून स्वतःहून पडताळून पाहणे किती तरी जिकिरीचे झाले आहे. तेव्हा या उदासीन प्रवृत्तीच्या परिणामांविरुद्ध काहीतरी उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा संघटनातील लोकांचे परस्पर संबंध संघटित न राहता प्रत्येकजण केवळ मिळकती पुरतेच लक्ष देऊ लागण्याचा संभव आहे. या मर्यादेपलीकडील सर्व धडपड अर्थशून्य आहे, असा त्यांचा समज होतो. त्या मर्यादेपलीकडे काही करावयास दूरस्थ अधिकारी व्यक्तीने भाग पाडलेच तर आपला स्वाभिमान टिकविण्यासाठी संधी मिळताच त्याच्यावर कुरघोडी करायची अशीच त्यांची वृत्ती होते.

या वृत्तींमध्ये बदल घडवून आणावयाचा असेल तर उद्योगधंद्यांचे हेतूच बदलावयास हवेत. समाजाशी संबंधित नसलेली एक व्यक्तिनिरपेक्ष यंत्रणा असावी, अशा पद्धतीने उद्योगधंद्यांची आपण आजवर वाढ होऊ दिली आहे. केवळ उत्पादन आणि उत्पन्न यांचा वाढता ओघ वाहता ठेवणे एवढे त्यांचे कार्य झाले; उद्योगधंद्यांचा लोकांवर काय परिणाम होतो याला महत्त्व राहिले नाही. उद्योगक्षेत्रातील कोणीही स्वतःच्या आरोग्यासाठी धंद्यात पडत नाही. इतरांच्या आरोग्यासाठी तर नाहीच नाही. उद्योगयंत्रणेच्या कार्यक्षमतेवर नजर ठेवावी, आणि या क्षेत्रातील काही दुर्दैवी परिणाम सुधारावेत अशी आज सरकारकडून अपेक्षा आहे. पैशाचा निकष वापरून सल्ला देणारे लायक अभियंत्याच्या भूमिकेतील अर्थशास्त्रज्ञ उपलब्ध आहेत. शिवाय संघर्ष कमी करण्यासाठी 'मानवी संबंध' विषयक गोष्टींवर सल्ला देणारे औद्योगिक सल्लागार व तज्ज्ञ आहेतच. पण औद्योगिक हेतू हा सामाजिक नियमनाबाहेरील विषय आहे, या भ्रामक समजुतीस अद्याप विरोध होताना दिसत नाही. आर्थिक प्रगतीने आवश्यक ठरविलेल्या वाढत्या मानवी त्यागास निष्क्रियतेने मान्यता देणे एवढेच कार्य समाजापुढे आता उरले आहे.

आपल्या आर्थिक समस्येपुढील शृंगापत्तीचे सार खरे हेच आहे. पूर्वीच्या जमान्यात नोकरीत असलेल्या कामगारांच्या वृत्तींना न जुमानता उद्योगाची चक्रे वेगाने फिरत असत. दारिद्र्य आणि बेकारी यांच्या भीतीमुळे प्रत्येक कारखान्यास कारागृहाचे स्वरूप आले होते आणि कारागृहांची व्यवस्था कैद्यांच्या मनस्थितीची पर्वा न करता ठेवता येते. फक्त बंडाळी माजणार नाही एवढी खबरदारी घेतली की पुरे. समाज आणि उद्योग या दोहोनांही हृदयशून्य मूल्ये मान्य होती आणि त्यांनी एकमेकास पूरक अशी भूमिका घेतली. पण आता उद्योगक्षेत्रातील या पद्धतीपासून समाज बाजूस सरकावयास लागला आहे आणि ज्या दडपणावर उद्योग विश्वासला होता तेच तो नष्ट करतो आहे.

याचे दोन परिणाम झाले आहेत. उद्योगधंदे कामगारांच्या स्वयंस्फूर्त निष्ठेवरच अधिक विसंबून राहू लागले. आणि ज्या साहसाशी, (उद्योगाशी) आपल्याला समरस

व्हावेसे वाटत नाही, अशा साहसास कोणीच आपली मनस्वी निष्ठा देत नाही. आणि त्याचबरोबर जसजसे कामगारास अनुभवानिशी समजते की लोकशाही समाजाचा नागरिक म्हणून असलेले त्याचे हक्क आणि जेथील आकडेमोडीत त्याला शून्याहून अधिक किंमत दिली जात नाही अशा कारखान्यातील त्याचे स्थान, यातील तफावत वाढतच जाते आहे, तेव्हा त्याच्यातील संतापाची भावना वाढतच जाते. सारांश शतक-भराच्या समाजवादी चळवळीने जरी सर्वसाधारपणे समाजात बराच बदल घडवून आणला असला तरी उद्योगक्षेत्रात रुजलेल्या मूल्यांवर या चळवळीचा काहीही परिणाम झालेला नाही. समाज आणि उद्योग यांच्यातील हा बेबनाव अधिक काळपर्यंत टिकविणे अशक्य आहे. फार तर यास अस्थिर समतोल म्हणता येईल. समाजास जरी माघार घ्यावी लागेल—पण शक्तिशाली कामगार चळवळ या गोष्टीस प्रखर विरोध केल्याशिवाय राहणार नाही—अथवा उद्योगधंद्यास तरी पुढे सरकावे लागेल.

भाग दुसरा

# साधनांची निवड

## ६. अनुभवातून शिक्षण

समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या आदर्शांत समाजवादी अर्थरचनेची ध्येये समाविष्ट आहेत. पण ही ध्येये कोणत्या साधनाद्वारे गाठायची ? समाजवादी मूल्ये जर आर्थिक जीवनात सर्रास पाळली जायची असतील तर त्यासाठी हृदयपरिवर्तनाहून अधिक काहीतरी आवश्यक आहे हे समाजवाद्यांनी नेहमीच मान्य केले आहे. ज्या पद्धतीने अर्थरचनेची बांधणी केली होती त्यात बदल करणे अगत्याचे होते, पण मतैक्याची मर्यादा येथेच संपली. तातडीने हाती घेण्यासाठी अमाप कार्यक्रम सुचविले गेले आहेत. समाजवादी अर्थपद्धतीचे हरप्रकारचे नमुने तयार करण्यात आले आहेत. किंबहुना समाजवादी स्वप्न साकार करण्यासाठी स्वीकारायच्या साधनांबाबत समाजवाद्यांमध्ये असलेल्या वादाचे स्वरूप समाजवादाचे पुरस्कर्ते आणि विरोधक यांच्यातील वादाइतकेच तीव्र नि प्रखर आहे.

याहून निराळे घडण्याची शक्यताच नव्हती. अर्थरचनेत सुचविलेल्या कुठल्याही परिवर्तनाचे निश्चित परिणाम काय होतील हे कोणासही सांगता येणार नाही. आणि इतर सर्वांप्रमाणेच याबाबतच्या मूल्यमापनात समाजवाद्यांमध्येही मतभेद आहेत. शेवटी साधनांच्या निवडीबाबत निश्चित मार्गदर्शन होते ते अनुभूतीतूनच; पण अर्धशतकापूर्वी समाजवादाचे स्वरूप केवळ प्रचार नि भाकिताच्या स्वरूपातच होते. त्याला अनुभवाचे पाठबळच नव्हते. अशा परिस्थितीत प्रत्येक समाजवादी स्वतःचे असे कल्पितादर्श रंगवू शके. स्वतःभोवतीच्या दारुण वास्तवतेखेरीज त्याला कुठल्याच वस्तुस्थितीशी सामना करण्याची आवश्यकता वाटत नव्हती. आणि ती वस्तुस्थिती बदलण्याचा तर त्याचा स्वतःचा निर्धार होता.

ते दिवस आता सरत आले आहेत. सत्तेबरोबर आता कृतीची शक्यता निर्माण झाली आहे. ज्या उपायांवर पूर्वी केवळ चर्चा होत असे, ते आता आचरणात आले आहेत आणि त्यांच्या कामकाजाबाबतचा अनुभव हळुहळू साठतो आहे. अनपेक्षितपणेच या अनुभवाने नवे धडे दिले आहेत. मालकीहक्काच्या क्रांतिकारी बदलांमुळे त्या बदलाभोवती गुंफलेल्या साऱ्याच आशा सफल झालेल्या नाहीत. या उलट ज्या-गोष्टींना समाजवादी विचारांत विशेष महत्त्वाचे स्थान दिलेले नव्हते अशा गोष्टींमुळे मोठ्या सुधारणा घडून आल्या आहेत.

जेव्हा एखादी चळवळ आपल्या विकासक्रमात पुर्नर्निधारण (Reassenment) अवस्थेप्रत पोहोचते तेव्हा अशा साधनांचा पुनर्विचार करण्याची उत्सुकता वा तयारी दाखविल्यासच अपकर्षापासून तिचे रक्षण होणे शक्य असते. आपण निवडलेल्या साधनांचे वरचेवर पुर्नर्निधारण करण्याच्या पद्धतीनेच जोमदार चळवळीची प्रगती

होत असते हे निश्चित अनुभवाने शिकण्यास राजी नसणारे प्रस्थापित धर्माच्या आग्रही मताला ( डॉग्मा ) चिकटून बसणारे व अशा विचारात सुधारणा करण्याचा प्रत्येक प्रयत्न पाखंडी म्हणून हाणून पाडणारे काही लोक नेहमीच आढळतील. हे सारे विनाशाचे शिल्पकार आहेत. कारण वस्तुस्थिती म्हणजेच प्रभावी युक्तिवाद होय. भ्रमनिरास टाळायचा नसेल तर त्याकडे अधिक काळपर्यंत दुर्लक्षच करता येणार नाही.

वैद्यकीय व्यवसायातील एका दाखल्याचा विचार करा. रोगप्रतिबंध व निवारण ही त्यांची ध्येये बदलत नाहीत, पण गेल्या काही काळात त्यांच्या पद्धतीत बदल झाल्याचे दिसून येते. वाढत्या ज्ञानाबरोबर जुन्या उपाययोजनांना तिलांजली देण्यात येते आणि त्या जागी नवीन उपाययोजना आणल्या जातात. डॉक्टर लोकांनी आपले विचार बदलले, असा त्यांच्यावर दोषारोप करावा असे कोणास स्वप्नातही वाटणार नाही. उलटपक्षी जुने रामबाण उपाय अयशस्वी ठरले आहेत, त्यांनाच चिकटून राहण्याचा त्यांनी प्रयत्न केला तर तेच नकली डॉक्टर म्हणून ओळखले जाण्याची शक्यता आहे. राजकारणातही हेच खरे आहे. समाजवाद्यांकडून साधनांची नव्याने निवड करावी आणि ही निवड जे ज्ञान त्यांच्या पूर्वजांना उपलब्ध नव्हते, त्या ज्ञानाच्या संदर्भात करावी, हीच अपेक्षा आहे.

# ७. आर्थिक सुरक्षितता

## सुरक्षिततेसाठी लढा

शतकभराच्या वाढत्या कामगार चळवळीने दिलेल्या लढ्याच्या अनुभवापासूनच आपण सुरुवात करू. त्याचे मुख्य फलित अगदी साधेपणाने सांगता येईल. आपल्या समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात काही प्रमाणात आर्थिक सुरक्षितता आलेली आहे. कल्याणकारी राज्यांच्या कल्पनेत समाविष्ट असलेली ही मोठी फलश्रुती आहे.

कामगार संघटनांच्या ध्येयामध्ये आर्थिक सुरक्षिततेस अग्रक्रम का देण्यात आला हे ओळखणे अगदी सोपे आहे. आर्थिक सुरक्षितता इतर सर्व ध्येयांचा मूलभूत आधार आहे. आर्थिक सुरक्षिततेचा ध्यास व साहसी नि रोमांचकारी जीवनापेक्षा निर्धास्त नि सुखासीन जीवनाची निवड यांचा काहीही संबंध नाही. कारण अशी निवड केवळ ज्या लोकांची उदरनिर्वाहाची साधने सुरक्षित आहेत त्यांनाच करता येईल. निरनिराळ्या लोकांनी कुठल्याही प्रकारचा जीवनक्रम पसंत केला तरी इतरांच्या दानधर्मावर अवलंबून न राहता वा आपण निराधार होऊ या भीतीने सतत पिडले न जाता जगता येईल इतपत स्थैर्य त्यांना लाभणे आवश्यक आहे. आर्थिक स्वातंत्र्यामधील सर्वात महत्त्वाचे स्वातंत्र्य म्हणजे अभावाच्या वा वाण पडण्याच्या भीतीपासून स्वातंत्र्य.

तरी बहुतांश कामगार वर्गाला रोजच्या भाकरीची भ्रांत होती ही वस्तुस्थिती होती. सधन व सुशिक्षित वर्गातील लोकांना अभावाची चिंता नव्हती. समाजात त्यांना लाभलेल्या खास अधिकारामुळे त्यांना आर्थिक सुरक्षितता गृहीत धरता येई; पण बाकीच्यांना नोकरीची संधी मिळविण्यासाठी परस्परांशी स्पर्धा करावी लागे आणि उपलब्ध नोकऱ्यांपेक्षा कामगारांची संख्या अधिक असल्यामुळे स्पर्धा अटळ असे. स्पर्धेमुळे त्यांची रोजगारी जेमतेम उदरनिर्वाह जमेल इतपत खाली येई व मालकांच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागे. नोकरी करत असताना बेकारीची कुऱ्हाड टांगती असायचीच आणि शिवाय भविष्याची–जेव्हा त्यांची कार्यक्षमता नष्ट झाल्यामुळे ते नोकरीलायक असणार नाहीत.

कामगारांना कसलेच संरक्षण नसल्यामुळे त्यांचे आर्थिक जीवन सुरक्षित नव्हते. राज्यसंस्थेने केवळ मालमत्ता नि व्यावसायिक संपत्ती यांना संरक्षण दिले होते. सुरुवातीस तर त्यांना स्वतः स्वतःचे संरक्षण करणे सुद्धा शक्य नव्हते. कारण त्यांना संघटना करण्याचा अधिकारही नाकारण्यात आला होता. अशा परिस्थितीत सुरक्षितता हेच त्यांचे सर्वप्रथम व आत्यंतिक महत्त्वाचे ध्येय व्हावे, यात अनैसर्गिक काय होते ? त्यांना विपत्तीपासून संरक्षण हवे होते. आणि त्याहून पुढे म्हणजे नोकरीत सुरक्षितता हवी

होती. अत्यंत अव्यवस्थित अस्तित्वातून निर्माण होणाऱ्या भय नि संकटापासून काही-तरी संरक्षण मिळविण्यासाठी केलेल्या झगड्यांतून कामगार चळवळीचा जन्म झाला.

सुरक्षिततेसाठी लढविलेला हा लढा तीन अवस्था ओलांडून गेला आहे. १९ व्या शतकात केलेली प्रगती ही पहिली अवस्था. या अवस्थेने केलेली प्रगती मुख्यत्वे करून स्वयंस्फूर्त संघटनांनी केलेल्या कार्याचे फळ होते. फॅक्टरी कायद्यातील संरक्षणात्मक असा तो कमीत कमी भाग होता. त्यामुळे कामगारांना अमानुष परिस्थितीत काम करावयास भाग पाडता येत नसे. त्या पेक्षा कामगारांनी स्वतःच केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत. परस्पर साहाय्यासाठी त्यांनी मित्रमंडळांची स्थापना केली. भांडवलदारी यंत्रणेवर अवलंबून राहावे लागू नये म्हणून त्यांनी स्वतःच्याच सहकारी व्यापारसंस्था स्थापन केल्या. कामगार संघटना प्रस्थापित करण्याच्या कामात कुशल कारागिरांनी प्रथम पाऊल उचलले. स्वतःच आखलेल्या व्यावसायिक नियमांनुसार कामगार पुरवठा व नोकरीच्या अटी यावर नियंत्रण ठेवण्यासाठी या संघटनेचा त्यांनी उपयोग केला. इतर क्षेत्रातल्या कामगारांनीही वाढत्या संख्येने वेतनाबाबत सामुदायिक वेतन नियमनाच्या हक्कासाठी ( कलेक्टिव बार्गेनिंग ) लढा दिला व तो हक्क मिळविला आणि आपल्या संघटनांद्वारा कामाच्या अटी व वेतन सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला. आपसातील एकजुटीमुळे आपण सारे एका समाजाचे महत्त्वाचे घटक आहोत की जिथे सर्वांना परस्परांविषयी आस्था आहे, आणि ही आस्था कामगार म्हणून नव्हे तर एक माणूस म्हणून – अशी एक सुरक्षिततेची भावना त्यांच्यामध्ये खोलवर रुजली, हेही काही कमी नव्हे.

तरी सुद्धा अशा सर्व प्रकारच्या उत्स्फूर्त संघटनांमुळे जास्तीत जास्त म्हणजे मर्यादित कामगार वर्गास मर्यादित असेच संरक्षण मिळणे शक्य होते. समाजवादाचे सगळ्यात मोठे आकर्षण हे होते की त्यात अनिश्चिततेची समस्या पूर्णत्वाने सोडविण्याचे वचन होते. कदाचित याचमुळे समाजवादास कामगार वर्गाचा पाठिंबा मिळाला. मजूरपक्षाचा या शतकात जसा उत्कर्ष होत गेला तशी ही चळवळ दुसऱ्या अवस्थेतप्रत पोहोचली. मजूर पक्षाच्या वाढत्या राजकीय सामर्थ्याबरोबरच ही समस्या उत्स्फूर्त प्रयत्नांच्या मर्यादित क्षेत्रातून उचलली गेली आणि स्वतः शासनाला कायद्यांद्वारे सर्वांसाठी किमान राहणीमानाचा दर्जा प्रस्थापित करण्याच्या कामी काही जबाबदारी उचलणे भाग पडले. प्रत्येक नागरिकाच्या चरितार्थाची काही तरी काळजी घेतली पाहिजे आणि श्रीमंतांवर कर लादल्यास गरीबांना तेवढीच मदत करता येईल, हे सरकारमान्य कर्तव्य झाले. पहिल्या समाजसेवाविधीची निर्मिती करण्यात आली. याच स्वरूपाचे सामुदायिक वेतन नियमनाचे तत्त्व औद्योगिक क्षेत्रातही मान्य करून घेण्यात आले. याचा अर्थ इतकाच की मजुरी आणि कामकाजाच्या अटी या खुल्या बाजाराच्या मर्जीनुसार न ठरता परस्पर संमत करारनाम्यानुसार ठरायच्या होत्या.

तेव्हा मजबुत संघटनेच्या अभावी कामगारांना आपले हक्क ठामपणे प्रस्थापित करणे अशक्य असे, तेव्हा कायदेशीर यंत्रणेच्याद्वारे हे काम करण्यास सरकारला आवाहन करण्यात येत असे. अशा प्रकारे खुल्या बाजारपेठांचे एक अंग आता कलम करण्यात आले होते. कायदा आणि सरकारी कृती या साधनांना आपत्तीवर मात करणारी व नोकरीच्या अटींचे नियंत्रण करणारी साधने म्हणून मान्यता मिळाली होती.

तरीसुद्धा कामगारांना अद्याप सुरक्षितता प्राप्त झालेली नव्हती. नव्याने अंमलात आणलेल्या कायद्याने त्यांना अंशत: संरक्षण मिळत होते. बेकारी या त्यांच्या भयंकर शत्रूवर त्यांना अद्याप विजय मिळवायचा होता. पहिल्या जागतिक युद्धाचा परिणाम म्हणून बेकारीचे प्रमाण अमाप वाढले होते आणि अनिश्चिततेच्या समस्येच्या नव्या कक्षा उजेडात आल्या होत्या. त्यात आणखीनच भर पडली. ती १९२९ च्या भयंकर मंदीमुळे. त्या काळात सत्तेवर असलेल्या मजूरपक्षाच्या सरकारला वाढत्या बेकारीला आळा घालणे आवाक्याबाहेरचे वाटू लागले. या आणि इतर देशात समाजवादी लोकशाहीबद्दल औदासिन्य निर्माण होऊ लागले. कामगार संघटनांची कृती वा सामाजिक कायदे या पैकी कोणाचाच चिंताजनक आर्थिक संकटावर उपाय चालेना. एवढेच नव्हे तर त्यामुळे आजपर्यंत मिळविलेल्या यशाला सुद्धा तडा जाण्याची भीती निर्माण झाली.

आर्थिक तणातणीमुळे ( अस्थिरतेमुळे ) केवळ कामगारांचेच जीवन असुरक्षित झाले असे नव्हे; समाजातील प्रत्येक विभागाला काही ना काही प्रमाणात या परिस्थितीचे चटके बसले. निराधार अवस्थेची धास्ती एवढाच या अनिश्चिततेचा अर्थ न राहता तो अधिक व्यापक झाला.

तमाम जनतेला अनिश्चिततेचे आघात सहन करावे लागत. त्यांच्या उत्पन्नाच्या स्थैर्यावर परिणाम झाला, इतकेच नव्हे तर काही देशात तिच्या योगाने लोकशाही राज्यसंस्थेलाच धोका निर्माण झाला आणि इतर काही ठिकाणी ती नष्टही झाली. आर्थिक अस्थिरतेला आळा घातल्याखेरीज कुणालाच वा कशालाच सुरक्षितता लाभणार नव्हती.

या परिस्थितीत नव्या मागण्यांचा उदय झाला. आर्थिक योजनांची आणि त्याचबरोबर सुरक्षिततेसाठी आरंभलेली ही चळवळ तिसऱ्या अवस्थेप्रत पोहोचली. पूर्वी ज्या आर्थिक कर्मठपणामुळे आर्थिक नियोजनाच्या मार्गात अडथळे निर्माण झाले होते व ज्यामुळे सद्प्रवृत्त मजूर पक्ष सरकारसुद्धा गलितगात्र झाले होते; त्या कर्मठपणाच्या भ्रमाचा भोपळा फोडून कीन्सने आर्थिक विचारात क्रांती घडवून आणली होती. लोकशाही नियोजनाच्या यंत्रणेला दुसऱ्या महायुद्धाने व्यावहारिक चालना दिली आणि या यंत्रणेच्या सुप्त शक्तींचे दर्शन घडवून दिले. १९४५ मध्ये पुन्हा एकदा मजूर पक्षास सत्ता मिळाल्याने शांततेच्या काळातही ही यंत्रणा

चालू ठेवण्यासाठी व तीमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय निर्धाराचेही या कामी पाठबळ मिळाले. शेवटी सर्वांना रोजगारी पुरविण्याची कल्पना साकार झाली. आणि अशा प्रकारे या मजबूत आधारावर आता कल्याण-कारी राज्याची वास्तू उभारणे शक्य झाले. सर्व जनतेस जन्मापासून मृत्यूपर्यंत संरक्षण देणारी सर्वव्यापी सामाजिक सुरक्षा ( सोशल इन्शुरन्स ) योजना याच सुमारास पहिल्यांदा सुरू करण्यात आली आणि मजूरी व नोकरीच्या अटी या बाबत उपलब्ध असलेल्या ऐच्छिक व कायदेशीर पद्धतीमधल्या उणीवा भरून काढण्यात आल्या.

नियोजनाने आता मूळ धरले आहे. नियोजनाविरुद्ध हवे तेवढे सैद्धान्तिक मुद्दे मांडता येत असले तरी अनुभवाने काय सिद्ध झाले आहे त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. नियोजन करावे वा न करावे हा आता व्यवहारात वादाचा विषय उरलेला नाही. प्रश्न उरला आहे तो इतकाच की कशाचे नियोजन करावे व ते कसे करावे ?

## चलनवाढ टाळून बेकारीचे उच्चाटन

आर्थिक सुरक्षिततेसाठी नियोजन करणे म्हणजे पहिली आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की सर्वांना कामकाज* मिळवून देण्यासाठी नियोजन करणे. या ध्येयाच्या संबंधात समाजवादी कुठलीच तडजोड मान्य करणार नाहीत. याबाबत कामकाज मिळण्याची उच्च व स्थिर पातळी राखावयाची आहे, ही भाषा चालणार नाही. 'उत्पादनाच्या दृष्टीने अल्प प्रमाणातील बेकारी सोयीची होईल' असल्या कल्पनांचे खेळ उपयोगी नाहीत. ज्याप्रमाणे नोकरी मिळण्याची खात्री ही चांगल्या राहणीमानाची सर्वप्रथम आवश्यक बाब आहे, त्याचप्रमाणे सर्वांना कामकाज मिळणे ही समाजवादी अर्थरचनेची एक आवश्यक बाब आहे. बेकारीची धास्ती पुन्हा वाटू लागल्यास उत्पादनक्षमता वाढेल असे जरी निर्णायकपणे सिद्ध करता आले, तरी हा सौदा अगदीच कुचकामी आणि मानहानिकारक ठरेल. तथापि या बाबतचा सारा पुरावा विरुद्ध दिशेचाच आहे.

पण सर्वांना कामकाज मिळवून देण्यात यश मिळविताक्षणीच आर्थिक सुर-क्षिततेच्या एका नवीनच समस्येने तोंड वर काढले आहे. ही समस्या म्हणजे हळूच शिरकाव करणारी चलनवाढीची समस्या होय. राहणीमानाचा खर्च सारखा वाढतो आहे आणि चलनवाढीचे परिणाम अद्याप जरी बेकारीच्या परिणामाइतके भीषण

---

* सर्वांना कामकाज याचा अर्थ बेकारीचे प्रमाण शून्यावर आणणे असा होऊ शकत नाही. कुठल्याही विशिष्ट वेळी नोकरीत बदल करताना काही कामगार बेकार अवस्थेत राहणारच. सर्वांना कामकाज याचा अर्थ इतकाच की जेवढे लोक बेकार आहेत तेवढ्या जागा रिकाम्या असतील.

झालेले नसले तरी ते गंभीर स्वरूपाचे निश्चितच आहेत. सट्टेबाज, स्थावर मालमत्ता असलेले किंवा ज्यांच्या दृष्टीने चढत्या किंमती म्हणजे वाढता नफा असे व्यापारी यांच्या दृष्टीने ते एक वरदान असेल. पण ज्यांची कमाई मर्यादित आणि ठरलेली असते, त्यांच्या दृष्टीने मात्र वाढत्या किंमती म्हणजे चिंता आणि आपत्ती. सामाजिक मिळकत आणि छोट्या व्यक्तिगत शिल्लकी यांची किंमतही त्यामुळे ढासळते. अशा परिस्थितीत कामगार संघटनांना कामगारांचे मूळ वेतनमूल्य टिकविण्यासाठी वरचेवर वेतनवाढ मागण्याच्या कामात आपली सारी शक्ती सारखी खर्ची घालावी लागते. जेथे वाढत्या किंमतीना प्रखर विरोध असतो अशा उद्योगधंद्यांत संप होतात आणि त्यामुळे अधिकच असुरक्षितता निर्माण होते.

तेव्हा चलनवाढ टाळून सर्वांना कामकाज मिळवून देणे ही आर्थिक सुरक्षिततेची सर्वसाधारण गरज आहे. यासाठी नियोजन कसे करायचे हे आता परिचित काम आहे. प्रामुख्याने ही बाब मागणीवर नियंत्रण घालण्याची आहे. दोन महायुद्धांच्या मध्यंतराच्या काळात नेहमीच्या भाषेत ज्याला आपापल्या दृष्टीने "मालाचा अपुरा वापर" (under consumption) अथवा "अत्याधिक उत्पादन" ( over production ) असे म्हणत, अशा सर्वसाधारणत: अपुऱ्या मागणीमुळेच बेकारी निर्माण होते. सर्वसाधारण मागणीमध्ये प्रमाणाबाहेर वाढ झाली की चलनवाढ होते; अथवा आजच्या सर्वसाधारण शब्दात सांगावयाचे झाल्यास भरपूर पैसा मर्यादित क्रयविक्रयासाठी वापरला जाण्याची अवस्था असली म्हणजे चलनवाढ होते. तेव्हा उपलब्ध पुरवठ्याच्या संदर्भात अत्याधिक वा अपुरी मागणी न होईल अशा प्रकारे मागणीवर नियंत्रण घालणे ही शासन संस्थेची जबाबदारी आहे.

मागणीच्या प्रमाणावर प्रमुख बंधन असते ते बँकांचे व सरकारी अंदाजपत्रकांचे. बँक देत असलेल्या कर्जावरील व्याजाच्या दरात बदल करून, सरकार बँकांच्याद्वारा पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवू शकते. अशा प्रकारे कर्जपुरवठा स्वस्त किंवा महाग करून सर्वसाधारण मागणीचे प्रमाण कमी वा जास्त करता येते. पण व्याजाच्या दरात वरचेवर बदल करण्याने देखील अर्थव्यवस्थेत नवी असुरक्षितता निर्माण होते. काही झाले तरी यामुळे अपुरे व तारतम्य नसलेले नियंत्रणाचे साधन प्राप्त होते. नियंत्रण अपुरे असते याचे कारण जेव्हा मागणी वाढत असते तेव्हा केवळ पैसा महाग आहे म्हणून कर्ज घेणाराचे धैर्य खचणार नाही. आणि जेव्हा मागणी मंदावते तेव्हा केवळ पैसा स्वस्त आहे, यासाठी तो खर्च करण्यासही प्रवृत्त होणार नाही. हे साधन तारतम्यरहित आहे याचे कारण जोपर्यंत हे साधन यशस्वीरित्या वापरले जाते तोपर्यंत यामुळे सर्वत्र कर्जाच्या पुरवठ्यात वाढ वा घट होते; मग त्याचे सामाजिक परिणाम काय वाटेल ते होवोत. हप्त्याहप्त्याने करावयाची खरेदी जशी

लांबणीवर टाकली जाते, तशीच घराची खरेदीसुद्धा पुढे ढकलली जाते. आवश्यक बाबींवरील आणि तसेच चैनीच्या गोष्टींवरील गुंतवणुकसुद्धा लांबणीवर पडते. आणि या नियंत्रणाचा परिणाम केवळ कर्जापुरताच मर्यादित असल्यामुळे त्याच्या योगाने उपभोगाचे वा वापराचे (consumption) प्रमाण कमी न होता भांडवली विनिमय कमी होण्यात होतो. बँकांचे कर्ज देण्याचे धोरण (credit policy) निर्देशित करून सरकारला व्याजाच्या दरात बदल करण्याच्या धोरणास पाठिंबा देता येईल. अशा प्रकारे बँकांच्या शिरावरच तारतम्य दाखविण्याची जबाबदारी लादली जाईल. पण राष्ट्रीय आर्थिक धोरणानुसार कुठल्या गोष्टींना कसा अग्रक्रम देण्यात आला पाहिजे, याची त्यांना माहितीही नसते व याबाबत त्यांना अनुभवही नसतो.

यापेक्षा सर्वसाधारण मागणीवर नियंत्रण आणण्याच्या कामी अंदाजपत्रक हेच अस्त्र प्रत्यक्ष स्वरूपाचे व अधिक प्रभावी आहे. खर्चापेक्षा अधिक वा कमी कर लादून म्हणजेच शिलकी वा तुटीचे अंदाजपत्रक बनवून मागणीच्या प्रमाणात बदल घडवून आणणे सरकारला शक्य असते. सरकारला याहून अधिक करण्याजोगे आहे. करविषयक धोरणात तारतम्य दाखवून निरनिराळ्या प्रकारच्या खर्चावरही प्रभाव पाडता येणे शक्य आहे. प्रत्यक्ष कर पद्धतीनेसुद्धा श्रीमंत व गरीबांवर किंवा व्यक्तिगत व्यय आणि गुंतवणूकीवरील खर्च याबाबतही वेगवेगळे परिणाम होतील. विशिष्ट वस्तूंवरील खर्चात फरक करावयाचा असेल तर अप्रत्यक्ष कर पद्धतीच्या साहाय्याने तसे करता येईल.

युद्धपूर्वकाळात बेकारीस कारण होणारी बुडती मागणी कशी तगवायची ही समस्या होती. तर युद्धानंतरच्या काळात चलनवाढीला चालना देणारी उसळती मागणी कशी रोखायची ही समस्या उभी आहे. ही दुसरी समस्या अद्याप सुटलेली नाही. याचा अर्थ अंदाजपत्रक हे अस्त्र या समस्येसमोर प्रभावी ठरू शकले नाही असा नव्हे, तर शासनसंस्थांना या अस्त्राचा निर्धाराने उपयोग करण्यात यश आले नाही. करबोजात वाढ करणे हा बेताल खर्चावर आळा घालण्याचा सर्वांत उघड मार्ग आहे. पण नव्या कराभुळे जो प्रखर राजकीय प्रतिकार होईल त्याला तोंड देण्याची शासन संस्थांची तयारी नाही; एवढेच नव्हे तर करबोजा कमी करावा यासाठी वरचेवर जे दडपण आणले जाते आहे, त्याचा प्रतिकार करण्याचीही त्यांची तयारी नाही. कर्जाचा बोजा आणखी वाढविणे कसे शक्य आहे, याबाबतची स्पष्ट भूमिका जनतेसमोर विशद करून लोकप्रियता गमविण्याची तयारी कोणत्याही शासनसंस्थेने दाखविलेली नाही. याला दुसरा पर्याय म्हणजे सरकारने आपल्या खर्चात कपात करावयाची. पण सरकार जो खर्च संरक्षणावर वा सामाजिक सोयी-साठी करते त्याचा विचार निराळ्या भूमिकेतून व्हायला हवा.

ज्या अर्थव्यवस्थेत सर्वांना कामकाज मिळवून देण्याची सोय करण्यात आली

आहे, अशा ठिकाणी मुत्सद्देगिरीची ही एक महत्त्वाची परीक्षाच आहे. तात्कालिक लाभासाठी कितीही दबाव आला तरी सर्वसाधारण सुरक्षिततेच्या धोरणाचा पुरस्कार करण्यासाठी म्हणून अशा दबावाला विरोध करण्याची सरकारची तयारी आहे का? अशी तयारी हुजूरसरकारपेक्षा मजूर पक्षाच्या सरकारने निश्चितच जास्त दाखविलेली आहे. वाढत्या दराचे कर आणि काटकसरीच्या योजना आज अंमलात आणण्याच्या कामी त्यांची अधिक तयारी होती. उलटपक्षी कर कमी करण्याच्या, व्याजाचे दर वाढविण्याच्या व महाग कर्जपुरवठ्याच्या धोरणाचा– त्यातील दौर्बल्य आणि तारतम्याचा अभाव ध्यानात घेऊनही– पाठपुरावा हुजूर पक्षाने केलेला आढळतो.

पण हा प्रश्न इथेच सरत नाही. चलनवाढ टाळून सर्वांना कामकाज मिळवून देण्याचे धोरण यशस्वी करावयाचे असेल तर केवळ 'मागणी'च्या बाजूचा विचार करून भागणार नाही. यासाठी काही वेळा पुरवठ्यावरसुद्धा नियंत्रण ठेवावे लागते. मागणीचे चढउतार जेव्हा क्रमशः होतात तेव्हा पुरवठ्यामध्ये विशेष घोटाळा न होता हा बदल पार पडतो. पण मागणीमध्ये जेव्हा झटपट नि मोठे बदल होतात तेव्हा मात्र काही विशिष्ट वस्तूंच्या पुरवठ्यामध्ये कमतरता वा अधिकता भासू लागते. यामुळे सर्वसाधारणपणे तुलनात्मक दृष्टीने आर्थिक मंदीच्या काळाप्रमाणे असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण होईलच असे नाही; परंतु अशा बदलांचा ज्यांच्यावर परिणाम होतो त्यांच्या बाबतीत तरी असुरक्षितता निर्माण होतेच. पुरवठा अधिक यामुळे काही लोकांच्या नोकऱ्या जातील आणि कमतरतेमुळे किंमती वाढतील.

अशा परिस्थितीत करावयाची उपाययोजना सर्वपरिचित आहे. उदा. वस्तू नियंत्रणाच्या मार्गाने कमतरतेच्या समस्येशी सामना देता येईल. सरकारने स्वतः माल खरेदी करून साठा केल्यास, काही काळपर्यंत आवश्यकतेपेक्षा अधिक पुरवठा होतो त्याचा बंदोबस्त करता येईल. अशा प्रकारचे नियंत्रण हा जरी कायम स्वरूपाचा इलाज नसला तरी अस्थिरता वाढू देण्याऐवजी नियंत्रणाच्या मार्गाचा अवलंब करणेच योग्य ठरेल. असली नियंत्रणे म्हणजे नियोजनाचा गाभा आहे असे जे बरेच वेळा गृहीत धरले जाते ते योग्य नाही. याउलट नियोजनाकडे दुर्लक्ष झाल्यास व नियोजनात दोष असल्यास परिणामी या धोरणाचा वापर करावा लागतो.

अत्याधिक अथवा अपुरा पुरवठा यामुळे विशिष्ट प्रकारची बेकारी व चलन-वाढ निर्माण होते. अशा प्रकारच्या समस्येशी सामना देण्याचा उत्तम मार्ग यालाच योग्य शब्दात नियोजन म्हणता येईल. सरकारने स्वतःच मागणीच्या पद्धतीत संभाव्य असलेल्या बदलांचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करून त्यानुसार पुरवठ्यात बदल करण्याची आगाऊ दक्षता घेणे. आगामी बदलांचा अंदाज घेण्यासाठी आज आपल्याला माहीत असलेल्या सांख्यिकी पूर्वानुमानाच्या वा भाकिताच्या पद्धतीपेक्षा

अधिक चांगल्या पद्धती आवश्यक आहेत. आणि या अंदाजानुसार कार्यवाही करणे म्हणजे वेगळ्या क्षेत्रात सुरवात करणे होय. याचा अर्थ उत्पादनाचे नियोजन करणे. उत्पादनाच्या क्षेत्रात नियोजन करणे म्हणजे उद्योगाच्या प्रत्येक क्षेत्रात उत्पादनाबाबत स्वतंत्र आणि बारीक सारीक बाबतीतही नियोजन करणे असा नव्हे, तर ज्या उद्योगक्षेत्रात कमतरता भासते आहे व त्या प्रकारच्या उत्पादनाची मागणी वाढती राहण्याचा संभव आहे, अशा उद्योगधंद्यात प्रयत्नपूर्वक उत्पादन वाढविण्याचा व जेथे मागणी कमी होण्याचा संभव आहे अशा उद्योगधंद्यातील उत्पादनात पद्धतशीर काटछाट करण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.*

भांडवल गुंतवणुकीचे नियोजन करणे हीच उत्पादनाच्या नियोजनाची गुरुकिल्ली होय. या क्षेत्रात आता कुठे आपल्या अनुभवांची सुरुवात झाली आहे. वित्तीय नियंत्रणाच्या साहाय्याने थोडेफार करता येणे शक्य आहे. उदा० कोणास कर्ज द्यावे याबाबत बँकांना आदेश देऊन भांडवल गुंतवणुकीवर नियंत्रण ठेवता येईल. पण या पद्धती फार तर अंशतः परिणामकारक ठरतील. यामुळे काही उद्योगक्षेत्रात गुंतवणुक करण्यास प्रोत्साहन मिळेल तर काही क्षेत्रात गुंतवणुक करण्यापासून परावृत्त केले जाईल. पैशाचा पुरवठा सवंग करून वा अवघड करून असे नियंत्रण करता येईल. पण यामुळे ज्या उद्योगांसाठी पैसा उपलब्ध आहे त्यात प्रत्यक्षात अपेक्षेइतकी मोठी गुंतवणुक केली जाईल वा ज्या उद्योगधंद्यांनी आपले क्षेत्र व्यापक करण्याचा निर्धारच केला आहे त्यांना पैशाचा पुरवठा होणारच नाही, अशी खात्री देता येणार नाही. त्यांच्या स्वतःच्या न वाटलेल्या नफ्याच्या बाबतीत तर नाहीच नाही.

याच कारणासाठी वित्तीय नियंत्रणास गुंतवणुकीवरील सरकारी नियंत्रणाचा खंबीर पाठिंबा असणे आवश्यक आहे. गुंतवणुकीवर अतिशय परिणामकारक प्रत्यक्ष निर्बंध घालणे म्हणजे नव्या इमारतीसाठी परवाना- पद्धत अवलंबिणे होय. कारण ज्या गोष्टीस परवान्याची आवश्यकता आहे, ती स्पष्ट नि एकजातीय असली म्हणजे देखरेखीस सुलभ ठरते. पण ज्यामुळे साधनसामुग्रीची विविध उत्पादन कार्यासाठी प्रत्यक्ष विभागणी केली जाते अशा कुठल्याही नियंत्रणामुळे केवळ लोकांना सरकारी

* युद्ध व शस्त्रास्त्रे ही मागणीच्या बदलाची कारणे सोडल्यास, मागणीत मोठे फरक घडून येण्याची मुख्य कारणे म्हणजे परदेशी व्यापारातील हंगामी बदल व या व्यापाराच्या स्वरूपातील दूरगामी बदल ही होत. या बदलांचे अंदाज बांधणे कठीण असते. कारण हे सारे परदेशी सरकारच्या धोरणांवर अवलंबून असते. यावर समाधानकारक असा एकच तोडगा आहे आणि तो म्हणजे आंतरराष्ट्रीय आर्थिक नियोजन. पण वर्तमान जगात तर अशा प्रकारच्या नियोजनाची चाहूलही नाही; तेव्हा आपल्याला जे साधावयाचे आहे ते आपण राष्ट्रीय चौकटीतच साधावयास हवे. एवढ्यासाठीच परदेशी व्यापार आणि चलनांच्या हालचाली यावरचे नियंत्रण तसेच चालू ठेवले पाहिजे. नाही तर अर्थव्यवस्था सर्वस्वी राष्ट्राबाहेरील शक्तींच्या तडाख्यात सापडल्याशिवाय राहणार नाही.

नियोजनाशी विसंगत अशा प्रकारे गुंतवणुक करण्यापासून परावृत्त करणे एवढेच उद्दिष्ट साध्य होते. नियोजन यशस्वी करण्याचा सरळ मार्ग हाच की सरकारने स्वतःच गुंतवणुकीचे काम करावयास हवे. तेलशुद्धीकरण आणि विमान बांधण्याच्या उद्योगासाठी पूर्वी निरनिराळ्या प्रकारचे साहाय्य करण्यात आले आहे. पण अणुशक्ती सोडल्यास दुसऱ्या कुठल्याच नागरी उद्योगात सरकारने प्रत्यक्ष गुंतवणुक केल्याचे उदाहरण विरळाच. सरकारच्या या भूमिकेचे समर्थन करण्यास काहीच कारण दिसत नाही. उलटपक्षी भांडवलाची गुंतवणुक हे नियोजनाचे अतिशय महत्त्वाचे नि मौलिक असे साधन आहे.

लोकशाही व्यवस्थेत उत्पादन नियोजनातील कदाचित सर्वात कठीण समस्या म्हणजे जे उद्योगधंदे आपले उत्पादन पूर्वीप्रमाणेच टिकवू शकत नाहीत त्यांची पद्धतशीर काटछाट करणे ही होय. या देशातलेच* ठोबळ उदाहरण द्यावयाचे झाल्यास कापड धंद्याचे देता येईल. संबंधीत लोकांच्याकडून काटछाटीस राजकीय विरोध होणारच आणि यात कामगार नि मालक सारखेच सहभागी असतील. पण हे सारे खरे असले तरी एखाद्या उद्योगधंद्याला सारी नवी गुंतवणुक नाकारता येत नाही व त्या उद्योगधंद्यास सतत वाढणाऱ्या अकार्यक्षमतेत रेंगाळत ठेवता येत नाही. तेव्हा त्या उद्योगातील ज्या कारखान्यांची कार्यक्षमता उत्तम आहे तेथे उत्पादनावर सारे लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. याचाच अर्थ निवडपूर्वक गुंतवणुक करणे; सर्वसाधारणपणे उत्पादन वाढविणे नव्हे तर जे उत्पादन होते ते काटकसरीने व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होते आहे याची खातरजमा करून घेणे. गुंतवणुकीवर सरकारी कडक नियंत्रणाची आवश्यकता आहे आणि विशिष्ट कारखान्यांवर लक्ष केंद्रित करावे यासाठी त्या औद्योगिक क्षेत्रातील लोकांनीच तयार केलेल्या योजनेशी सुसंगत असे हे नियंत्रण असावे. आपल्याच भविष्यातील वस्तुस्थितीशी सामना देण्यास औद्योगिक क्षेत्रातील लोकांस भाग पाडण्यासाठी सरकारने आपल्या सामर्थ्याचा उपयोग करावयास हवा.

## वेतन-किंमती यांची मळसूत्री वाढ

पुरवठा व मागणी यांच्यात होणाऱ्या चढउतारावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक असलेले बहुतेक सर्व निर्बंध या देशात आढळतात; तेव्हा सरकारच्या अधिकारात आणखीन काही जालीम वाढ करण्याची आवश्यकता नाही. काढून टाकलेले काही निर्बंध पुन्हा सुरू करण्याव्यतिरिक्त बदलते कल जाणून घेण्याची दूरदृष्टी व हाती असलेले सर्व उपाय पूर्णपणे वापरण्याचा राजकीय निर्धार यांची आता आवश्यकता आहे. पण आता या सर्वांना कामकाज देण्याच्या अर्थरचनेत

---

* ब्रिटनमधले—अनु

असुरक्षिततेचे एक नवे मूळ निर्माण झाले आहे आणि प्रस्थापित उपायांच्या साहाय्याने हे मूळ नष्ट करता येण्यासारखे नाही.

प्राप्तीचे मान वाढावे यासाठी चोहोंबाजूंनी सतत दबाव आणण्याच्या प्रवृत्तीतून हे मूळ उद्भवले आहे. व्यापार पेठेत ज्यांचे भरपूर वर्चस्व आहे अथवा जे आपल्या सौदाशक्तीचा ( Bargaining Power ) कठोरपणे पुरेपूर फायदा उठवण्यात मागेपुढे पहात नाहीत, असे लोक आपला दावा खंबीरपणे पुढे मांडून समाजाला खंडणी द्यायला भाग पाडतात. दुसऱ्याच्या वाढीव उत्पन्नाकडे बोट दाखवून समाजातील प्रत्येक गट आपल्या मागण्यांचे समर्थन करतो. अशा पद्धतीने केलेली प्रगती ही अंतिम नाशास कारणीभूत होणाऱ्या विजयाप्रमाणे असते. कारण त्यामुळे सभोवतालच्या सगळ्याच गोष्टींना वेग मिळतो. उत्पन्नाच्या वाढीबरोबरच किंमतीसुद्धा वाढायला लागतात व शेवटी बजाबाकी शून्यच होते. यालाच पारंपारिक भाषेत ' वेतन-किंमतीचे मळसूत्र ( Wage-price spiral ) असे म्हणतात. ॲलिसला लाल राणी सांगते त्याप्रमाणे आहोत तिथेच राहायचे झाल्यास तुला शक्य तितके धावावे लागेल."

केवळ वेतन-किंमतीच्या मळसूत्रामुळे, परिणामी होणाऱ्या चलनवाढीमुळे, असुरक्षितता निर्माण होते असे नाही. आपापल्या गटाच्या फायद्यासाठी चालणाऱ्या या चक्राकार स्पर्धेमुळे पैशासाठी सर्वच धडपडू लागतात. विविध गटांच्या उत्पन्नांच्या संबंधासाठी जो स्थिर पाया असावा लागतो तोच यामुळे नष्ट होतो आणि समाजाची परस्पर विरोधी गटात विभागणी होते. परिणामी आरोप-प्रत्यारोप व औद्योगिक संघर्ष वाढतात आणि अर्थरचनेची सुरक्षितता धोक्यात येते.

या परिस्थितीवर मात करता येईल अशा धोरणाचा पाठपुरावा करणे तर दूरच, पण बरेचसे समाजवादी या समस्येचा मोकळपणाने विचार करण्यासही तयारी दाखवीत नाहीत. या समस्येकडे डोळे वर करून पाहण्याचेसुद्धा धैर्य त्यांनी दाखविलेले नाही. या चाचरणाऱ्या वृत्तीची कारणे उघडच आहेत. मजूरीवर सक्तीचे नियंत्रण आणले जात आहे असा नुसता वास आला तरी कामगार संघटनाकडून सक्त विरोध व्हायला लागतो आणि इथूनच पुढे अडचणी उद्भवतात. आपल्या मर्जीनुसार वाटाघाटी करण्याचे स्वातंत्र्य त्यांना हवे असते. ब्रिटिश औद्योगिक संबंधाच्या ऐच्छिक परंपरेचे ते निष्ठावंत अनुयायी आहेत आणि याच्या आधारेच त्यानी आपले सांप्रतचे कार्य व संघटना यांची उभारणी केली आहे. खरोखरीच त्यांच्या या भूमिकेच्या समर्थनार्थ खूपच सांगण्यासारखे आहे. लोकांना स्वतःच्या मिळकतीचे मान ठर-विण्यात निश्चित भूमिका घेण्याचा आणि आपल्या परिस्थितीत सुधारणा करण्याचे कामी एकजूट करण्याचा हक्क असावा हे रास्तच आहे. सरकारवर नेहमी सर्वस्वी भिस्त ठेवणे योग्य नव्हे. तसेच वेतनवाढीसाठी केलेल्या प्रत्येक मागणीमुळे मजूर संघटना व सरकार यांच्यात लढाई सुरू होणे हे सुद्धा योग्य नव्हे.

मजूर संघटनेच्या प्रातिनिधिक सभेसच ( ट्रेड युनियन कॉंग्रेस ) निरनिराळ्या मजूर संघटनांच्या मागण्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार असावा, अशा प्रकारच्या प्रस्तावासही कुणाचा पाठिंबा मिळत नाही आणि या मागची भूमिकाही आपण समजू शकतो. यामुळे प्रत्येक वेतन मागणीचे कामगार संघटनांच्या झगड्यात रुपांतर होईल, दुही निर्माण होईल व कामगार वर्गातच निरंतर स्वरूपाच्या चकमकी सुरू होतील. हे टाळण्याचा एकच संभाव्य मार्ग उरेल. तो असा की काही उच्च पदस्थ मजूर नेत्यांच्या हाती सत्तेचे भयानक केंद्रीकरण होऊ देणे. परिणामी त्यांची स्वतःचीच परिस्थिती बिकट होईल आणि एवढे करूनही एका बाबतीत या साऱ्याचा परिणाम सरकारी हस्तक्षेपाहून वेगळा नसणार– मजूर संघटनांना सर्वाहून प्रिय असलेली त्यांची स्वायत्तता यामुळे नष्ट होणार आहे.

मजुरीवरील मध्यवर्ती नियंत्रणास विरोध केवळ मजूर संघटनेकडूनच आहे असे नव्हे. औद्योगिक क्षेत्रातील दुसऱ्या पक्षानेही याच मुद्द्यांचा पुनरुच्चार केला आहे. मालक संघटनानीसुद्धा (Employers' Federation) त्यांच्यापरीने स्वायत्ततेवर होणाऱ्या हस्तक्षेपास विरोध केला आहे. आपल्या क्षेत्रातील गोष्टी आपणच ठरविण्याच्या हक्कास ते तितकेच प्रखरपणे चिकटून आहेत. मजूर संघटनेच्या प्रतिनिधिक सभेप्रमाणे अधिकारवाणीने बोलता येईल अशा प्रकारची त्यांची एकही मध्यवर्ती संघटना त्यांना स्थापन करता आली नाही; तथापि त्यांचासुद्धा सरकारी हस्तक्षेपास जबर विरोध आहे. त्यातील बऱ्याचजणाना जास्तीतजास्त वेतनाचे आमिष दाखवून कामगार मिळविण्याच्या कामात परस्परांशी स्पर्धा करण्यासाठी अधिकाधिक स्वातंत्र्य हवे आहे.

वेतन नियंत्रणाच्या संदर्भात ज्या दोन समस्या उपस्थित होतात त्यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. निरनिराळ्या उद्योग व व्यवसाय क्षेत्रातील लोकांना मिळणाऱ्या मजूरी ( वेजेस ) नि वेतनातील ( सॅलरी ) फरकामुळे निर्माण झालेली समस्या आणि व्यवसायातील सर्वसाधारण उत्पन्न आणि इतर व्यक्तिगत उत्पन्न यांच्यातील तौलनिक फरकामुळे निर्माण झालेली दुसरी समस्या. पहिल्या समस्येचा समाचार कसा घ्यावा याबाबत आपल्याला थोडाफार अनुभव आहे. प्रत्येक उद्योग-धंद्याची आपल्या मर्यादेत वेतन प्रमाणांची एक बांधणी आहे. सामुहिक सौदापद्ध-तीच्या (Collective Bargaining) वाढीचा एक परिणाम म्हणून संयुक्त औद्योगिक कौन्सिल व तत्सम इतर यंत्रणा स्थापण्यात आल्या आहेत. यातील काहींनी विशिष्ट उद्योगधंद्यातील निरनिराळ्या कामाचे यशस्वीरित्या वर्गीकरण केले आहे. यामुळे निरनिराळ्या कामासाठी द्यावयाच्या वेतनाचे नियंत्रण ठेवणे सोयीचे होते. हे खरे की अनावश्यक नि अन्याय्य भेदभाव यांचे उच्चाटन करण्यासाठी या यंत्रणेस वर्षानुवर्षे धीराने व संयमाने वाटाघाटी कराव्या लागल्या; पण हे उद्दिष्ट आता साध्य

झाले आहे. याबाबतीतले उत्तम उदाहरण म्हणजे बांधकाम धंदा. अलिकडच्या काळात तर कोळसा-खाणी कामगारांच्या गुंतागुंतीच्या उद्योगाबाबतही वेतनश्रेणींची मांडणी करण्यास सुरुवात झाली आहे.

प्रत्येक उद्योगक्षेत्रात सुनियमित वेतनयंत्रणा निर्माण करण्याच्या धोरणाचा पाठपुरावा करणे, ही स्पर्धात्मक व्यवहारास आळा घालण्याच्या दृष्टीने जी गोष्ट चांगली आहे ती सर्वसाधारण अर्थरचनेच्या दृष्टीने प्रतिकूल असण्याचा संभव नाही. निष्फळ स्पर्धेचे उच्चाटन करण्यासाठी विशिष्ट औद्योगिक पातळीवर मालक व मजूर संघटना यांनी एकदिलाने काम करण्यात यश मिळविले आहे. मग राष्ट्रीय पातळीवर असेच धोरण स्वीकारणे का शक्य होऊ नये ? मालक नि मजूर संघटनांच्या मध्यवर्ती प्रतिनिधींना एकत्र आणण्याच्या कामी शासनानेच पुढाकार घेणे आवश्यक आहे. या बाबतीत कुठल्याच प्रकारची सक्ती करण्याची गरज नाही आणि ताठरपणाही नसावा. मोकळ्या वातावरणात ही सौद्याची बोलणी व्हावीत. काही चांगले बुद्धिगम्य आणि मान्य होणारे वेतन–दर प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट असावे. केवळ आपापल्या गटांच्या फायद्यासाठी अशी बोलणी करू नयेत. याबाबत घेतलेले निर्णय कायमचे असणार नाहीत. या निर्णयाचा प्रतिवर्षी पुनर्विचार होऊन योग्य ते बदल करता येतील. मात्र हे बाह्यतः सोपे नि सरळ भासणारे धोरण प्रत्यक्षात उतरण्यास काहीच अवधी लागणार नाही वा या कामी कसल्याच अडचणी येणार नाहीत, अशी भ्रामक समजूत बाळगून आपण आपलीच फसवणूक करून घेण्यात काहीच अर्थ नाही.* पण सुरुवात ही करावयासच हवी. आणि यशस्वी होऊ शकेल असा दुसरा पर्याय तरी कोणता आहे ?

राष्ट्रीय मजूरी नि वेतनरचनेत सुलभता नि स्थैर्य असावे या विचारास सर्वसामान्यपणे मान्यता मिळाल्याखेरीज कुठलेही सरकार कृती करील हे संभवत नाही. परंतु ही कल्पना अजून मान्य झालेली नाही. उलटपक्षी, बरेचजण अद्यापही ठासून सांगतात की, सुधारित मजुरी देऊ करून मजूर मिळविण्यासाठी मालकवर्गास आपसात अधिक खुलेपणाने स्पर्धा करून द्यायची असेल तर, अधिक लवचिकतेचीच आवश्यकता आहे. असे झाल्यास ज्या क्षेत्रात मजुरांची अत्यंतिक आवश्यकता आहे अशाच ठिकाणी

---

* खरी मिळकत ( Actual Earning ) आणि वेतन-दर यांच्यातील तफावतीमुळेच फार मोठी गुंतवणुकीची परिस्थिती निर्माण होते. सामूहिक सौदा करून मिळकतीवर परिणामकारक नियंत्रण ठेवता येते. पण या नियंत्रणाच्या मर्यादा प्रत्येक उद्योगक्षेत्रात वेगवेगळ्या असतील. तथापि करारांचासुद्धा ज्यावर ताबा नाही अशा प्रकारची वेतनवाढ झालेली आहे हे निश्चितच. वेतन मांडणीच्या संदर्भातील सर्व घटकांचे नियंत्रण करण्याच्या दृष्टीने सामुदायिक करार, नाम्यांची व्याप्ती कितपत परिपूर्ण आहे व त्यांचे प्रत्यक्षात काटेकोरपणे नियंत्रण होते वा नाही यावरच सुनियंत्रित वेतनरचना साध्य करून घेणे अवलंबित आहे.

ते जातील. पण असे म्हणणे म्हणजे अंतिम अर्थाने आर्थिक गोंधळाच्या बोलण्यासारखे आहे. उदा. इंजिनिअरिंग क्षेत्रात परिणामी गोंधळ माजला आहे. या क्षेत्रात नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या कुठल्याही प्रकारच्या संयुक्त राष्ट्रीय कौन्सिलच्या अभावामुळे वेडीवाकडी वेतनरचना निर्माण झाली आहे. कुठलेही कारण नसताना औद्योगिक क्षेत्रातील निरनिराळ्या विभागात आणि देशाच्या निरनिराळ्या भागात होणाऱ्या मिळकतीमध्ये गंभीर स्वरूपाचा फरक पडतो आणि हे सारे विनाकारण. हा गोंधळ मग सुनियंत्रित वेतनरचना असलेल्या अन्य क्षेत्रातही पसरतो आणि काही विशिष्ट इंजिनिअरिंग क्षेत्रातील मालकवर्ग उच्च वेतनश्रेणी देत असल्यामुळे काही क्षेत्रात मजूरांचा तुटवडा भासू लागतो.

रोजच्या रोज बदलणाऱ्या वेतनदरामुळे मजुरांची समाधानकारक पुनर्वाटणी होते अशी समजूत करून घेण्यास वास्तविक काहीच पुरावा नाही. नोकऱ्या, घरे आणि नव्याने नोकरीत प्रवेश करणाऱ्यांना शिक्षण व मार्गदर्शन मिळण्यासाठी उपाययोजना यामुळे मजूरांची पुनर्वाटणी होण्याची अधिक शक्यता आहे. वेतनस्पर्धेवर नियंत्रण ठेवले तरीसुद्धा कामकाजाच्या स्थितीत सुधारणा करून कामगारांना चांगला दर्जा नि चांगली वागणूक देऊन दुसऱ्या ठिकाणचे कामगार आकर्षित करून घेण्याच्या मालक लोकांच्या उपक्रमांना प्रतिबंध घालता येणार नाही. कामगारांची चलनशीलता ( Mobility ) सांभाळण्यासाठी वेतनस्पर्धेपेक्षा हीच पद्धत अधिक चांगली आहे.

राष्ट्रीय वेतन रचनेत एकदा काही अंशी का होईना सुव्यवस्था आणली म्हणजे दुसऱ्या समस्येचा समाचार घेणे शक्य होते. आणि सरकार, कामगार संघटना आणि मालकवर्ग यांच्यात इतर प्रकारच्या प्राप्तीच्या संदर्भात वेतनदरात करावयाच्या सर्वसाधारण बदलांबाबत समझोता होण्याची शक्यता निर्माण होते. पण ही गोष्ट निश्चितच की केवळ वेतनाचा असा अलग विचार करता येणार नाही. वेतन स्थिर करावयाचे झाल्यास नफ्याचा हिस्सा, व्याजाचा दर आणि खंडाचे प्रमाण हे सारेच स्थिर करावयास हवे. इतर श्रीमंत सामाजिक गट उपलब्ध संधींचा पुरेपूर फायदा घेत असताना, कामगारांनी मात्र आपल्या मागण्याना मर्यादा घातल्या पाहिजेत, अशी अपेक्षा बाळगता येणार नाही. वेतनविषयक राष्ट्रीय धोरणाची आखणी करण्यापूर्वी वैयक्तिक उत्पन्नाच्या विभागणीबाबत राष्ट्रीय धोरण असले पाहिजे. असे धोरण आजची आर्थिक उत्पन्नातील विषमता कायम ठेवण्याच्या गृहीत कृत्यावर आधारता येणार नाही. आर्थिक स्थैर्याच्या दिशेने पुढे जाताना आर्थिक समतेच्या दिशेनेही प्रगती हवी. आर्थिक सुरक्षिततेसाठी खरे मर्यादित ध्येय देखील अलगपणे गाठता येणार नाही. समान विभागणीच्या लढ्याशी ते अवश्य निगडीत झालेले आहे.

# ८. न्याय्य विभागणी

## उत्पन्नाची बांधणी

पणनाधिष्ठित किंवा बाजारी अर्थव्यवस्थेत (Market Economy) लोकां-जवळ विकण्याजोगे काय आहे व त्यास दुसरे कितपत किंमत देण्यास तयार आहेत, यावर त्याचे उत्पन्न अवलंबून असते. मग त्यांना त्यांची मजुरी विकणे असो अथवा त्यांच्या इतर इस्टेटीचा उपयोग करून देणे असो; लोकांजवळ विकण्याजोगे असेल त्यात खूप भिन्न प्रकार असतील. काहींच्याजवळ खास क्षमता असेल, वा खास नैसर्गिक देणगी असेल, काहींच्याजवळ इतरांपेक्षा खूप अधिक संपत्ती असेल (Property), काहीजण जन्मत:च भाग्यवान असतील- त्यांच्या ठायी जुगाऱ्याचे कसब असेल. तसेच लोक जी किंमत मोजावयास तयार असतील तिचा नि विकणाऱ्याच्या गरजा आणि त्याने घेतलेले परिश्रम यांचा अन्योन्य संबंध असेलच असे नाही. नेमलेल्या प्रशिक्षित अभियंत्यापेक्षा किती तरी पटीने अधिक पैसा धंद्यामधील निष्क्रिय भागीदार (Sleeping Partner) कमवीत असेल. एखादा कर्मठ ब्रह्मचारी, एखाद्या मोठ्या कुटुंबाच्या पोषणाच्या जबाबदारीखाली पिचलेल्या संसारी गृहस्थापेक्षा किती तरी पटीने अधिक पैसे मिळवीत असेल. सारांश उत्पन्नाची विभागणी करताना 'बाजारी' अर्थव्यवस्थेने न्याय हिस्सा देण्याच्या मागणीकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केलेले असते.

लोकांचे उत्पन्न आज मात्र सर्वस्वी बाजारी मागणी पुरवठ्याच्या मुक्ततेवर अवलंबित नाही. संघटनेच्या साह्याने काही अंशी या आर्थिक शक्तीचे नियंत्रण केले आहे. कामगार संघटनाद्वारे मजुरांचे संघटन झाले आहे आणि या संघटना सुधारित मजुरीसाठी खटपट करतात. व्यावसायिक लोकांच्या हितसंरक्षणार्थ झटणाऱ्या त्यांच्या संघटना आहेत, मालक मंडळींनी एकत्र येऊन वेतनाबाबत बोलणी करण्या-साठी व किंमतीचे नियंत्रण करण्यासाठी व अप्रत्यक्षरित्या आपल्या नफ्याचे रक्षण करण्यासाठी फळी उभारली आहे. शासनसुद्धा मध्यस्थी करताना आढळते. ज्या मजुरांचे संघटन बलवान नाही अशांचे हित सांभाळण्यासाठी आणि निरनिराळ्या प्रकारे स्वयंप्रेरित नियमनाला सरकार संरक्षण देते. सरकारी नोकरांची मजुरी व वेतन ठरविण्याच्या कामी प्रयत्न करते, व्याजाचे दर ठरविते, आणि प्रसंगी किंमतीचे नियंत्रण करून नफ्यामध्ये कपात घडवून आणते. पण नियंत्रणाचे हे सारे प्रयत्न करताना बाजारातील मागणी व पुरवठा परिस्थिती ध्यानात घेणे आवश्यक आहे. कारण यांची परिणती नेहमीच समतेची व्याप्ती वाढविण्यात होईल असे नाही. कदाचित त्यात केवळ ( चांगल्या ) सुसंघटित दलांचे बल अथवा मक्तेदारी पद्धतीची पिळवणूकसुद्धा प्रतिबिंबित होईल.

बाजारातील अन्यायाचे उच्चाटन करण्यासाठी सर्वप्रकारच्या उत्पन्नांचे नियमन करण्याचे काम सरकारच आपल्या शिरावर का घेत नाही, असे विचारले जाते. न्याय्य विभागणी ठरविण्यासाठी संख्यात्मक प्रमाण ठरविणे, आणि त्यानुसार सर्वांचे उत्पन्न निश्चित करणे किती अवघड आहे, हे आम्ही अगोदरच स्पष्ट केले आहे. व्यक्तिजीवनातील गुंतागुंतीच्या परिस्थितीचा जो जो विचार करावा तो तो प्रत्येकाचा न्याय्य वाटा कसा ठरवावा, हा प्रश्न अधिकच बिकट होत जातो. सर्व प्रकारच्या मिळकतीवर सरकारी नियंत्रण असणे योग्य नव्हे. कारण त्यामुळे व्यक्तिगत स्वातंत्र्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता असते आणि मग मजुरी वा वेतनवाढीच्या प्रत्येक मागणीस देशव्यापी राजकीय लढ्यांचे स्वरूप प्राप्त होते, असाही युक्तिवाद आपण केला आहे.

## उत्पन्नांची पुर्नविभागणी

उत्पन्नांच्या विभागणीत काही अंशी न्याय आणण्यासाठी ज्या पद्धतीची निवड करण्यात आली आहे ती सर्वस्वी वेगळी आहे. ही पद्धत म्हणजे कर पद्धती होय. बाजारातील मागणी-पुरवठा ध्यानात घेऊन काही निर्णय घेतले जातात. म्हणजेच काहींना इतरांपेक्षा अधिक उत्पन्न मिळते. मग सरकारी हस्तक्षेप होतो आणि उत्पन्नातील तफावतीचा बराचसा भाग कररूपाने नाहीसा केला जातो. सर्व ब्रिटिश शासनांची आणि इतर बऱ्याच जणांची सुद्धा ही आत्ता मान्यवर पद्धत झाली आहे. युद्धानंतरच्या काळातील मजूर पक्षाच्या सरकारने १९४८ मध्ये खाजगी उत्पन्न, खर्च (Cost) आणि किंमती याबाबतचे निवेदन प्रसिद्ध करून, जेव्हा परंपरागत पद्धतीहून सर्वस्वी वेगळा नि क्रांतिकारक मार्ग स्वीकारला तेव्हासुद्धा "कर आकारणी-खेरीज अन्य मार्गाने लोकांच्या व्यक्तिगत उत्पन्नामध्ये प्रत्यक्ष ढवळाढवळ करणे" योग्य नव्हे, याची जाणीव बाळगूनच त्यांनी आरंभ केला होता.

मिळकतीमधील विषमता कमी करण्यासाठीच्या कामी आजपर्यंत प्राप्तीकराचा साधन म्हणून चांगला उपयोग झाला आहे. हा कर उत्तम प्रकारे लवचिक आहे. तो हळू हळू वाढविता येतो. खास गरजा भागविण्यासाठी या करात सवलत देता येते. पिढ्यान्‌पिढ्या ताठर प्राप्तीकर योजना अंमलात आणल्यामुळे या देशातील आर्थिक विषमता कमी झाली आहे. अधिकात अधिक नक्त उत्पन्न म्हणजेच कर वजा जाता उरणारे उत्पन्न, राष्ट्रीय पातळीवर प्रस्थापित झाले आहे. याहून अधिक उत्पन्न हवे असल्यास आणखीन खूपच प्रमाणात प्राप्ती वाढवावी लागते. कारण अधिक प्राप्तीतील बराचसा भाग कररूपाने जाईल. आणि हे फारच थोड्यांना जमण्यासारखे आहे. कररूपाने मिळालेल्या उत्पन्नातून, दुसऱ्या टोकास असलेल्यांच्या साठी किमान उत्पन्नाची राष्ट्रीय पातळीवर बांधणी करणे सरकारांस शक्य झाले आहे. ' निवृत्ती वेतन, कुटुंब भत्ता, राष्ट्रीय साहाय्य, आजारीपणासाठी साहाय्य वगैरे

मार्गाने सामाजिक मिळकतींचा विनियोग केला असल्यामुळे प्रत्येकास उदरनिर्वाहासाठी कमीत कमी काही तरी मिळण्याची निश्चिती झाली आहे.

ही करपद्धती अधिक सुलभ करून त्यात सुधारणा करणे शक्य असले आणि याबाबत तशा अनेक तपशीलवार सूचना केल्या गेल्या आहेत; तरी केवळ करपद्धतीच्या साहाय्यानेच उत्पन्नाच्या पुनर्विभागणीमध्ये आणखी क्रांतिकारक बदल करता येईल, असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. का नाही ? कारण लोकांना असमर्थनीय पातळीपर्यंत आपले उत्पन्न वाढवू द्यायचे आणि मग कराच्या साहाय्याने त्यात काटछाट करायची या पद्धतीत अनेक गंभीर अडचणी आहेत.

त्यातील एक अडचण अशी नेहमीच ठासून सांगितली जाते की प्रत्यक्ष कराची आकारणी फार वाढली म्हणजे पैशाचे प्रोत्साहन कमी होते. पण हा युक्तिवाद नेहमीच फार ताणला जातो. कारण इथे असे गृहीत धरले जाते की माणूस नेहमीच केवळ नगद पैशाच्या ओढीनेच काम करतो. कराचे प्रमाण वाढवा की कामाच्या मोबदल्यात कपात होईल आणि मग जणू गृहीत धरल्याप्रमाणेच लोक कमी काम करतील, कमी उत्साही व पर्यायाने कमी साहसी बनतील. प्रत्यक्षात असाच परिणाम होतो असे सिद्ध झालेले नाहीं. वास्तविक इतर अनेक प्रोत्साहने अशी आहेत की ज्यामुळे माणूस मिळकतीचा विचारसुद्धा न करता काम करण्यास प्रवृत्त होत असतो. तरीसुद्धा जोपर्यंत आपल्या अर्थव्यवस्थेत पैशाच्या प्रलोभनास महत्त्व आहे तोपर्यंत कर आकारणीचे प्रमाण वाढल्यानंतर वरील अडचण निर्माण होण्याची जी शक्यता आहे ती पूर्णपणे नजरेआड करता येत नाही.

याबाबत प्रमुख गैरसोय म्हणजे करचुकवेपणा. करचुकव्यांच्या प्रमाणात युद्धानंतरच्या काळात भयानक वाढ झाली आहे हे खरे. बेकायदेशीरपणे कर चुकविणे ही काही या देशात विशेषत: युरोपातील इतर शेजाऱ्यांच्या तुलनेने पहाता सर्वसाधारण प्रवृत्ती म्हणून मोठ्या प्रमाणात आढळत नाही. येथे कायद्याबद्दल आदरभाव असल्यामुळे उत्पन्नाची पुनर्विभागणी करण्याचे प्राप्तीकर हे फार परिणामकारक साधन ठरले आहे. पण कायदेशीरपणे कर चुकविणे हा प्रकार भरपूर आहे. कायदा आणि अनुशासन यांची पकड वरचेवर बळकट करूनही चुकविलेल्या कराचे प्रमाण प्रतिवर्षी लक्षावधी पौंडाच्या घरात असते. कर चुकविण्याची एकीकडची वाट बंद करताच कर भरणारे श्रीमंत लोक कर चुकविण्याच्या नव्या वाटा वा पद्धती शोधून काढण्यासाठी कर-गणनिकांची नेमणूक करतात. कारण त्यांच्या दृष्टीने हा फार मोठ्या रकमेचा प्रश्न असतो.

'व्यावसायिक भत्ता' (Expense amount) या साधनाचा मुबलक उपयोग करणे ही कायदेशीरपणे कर चुकविण्याची उपयोगात आणली जाणारी सर्वसामान्य पद्धत होय. अशा प्रकारे केलेल्या खर्चाचे महत्त्व पदाधिकाऱ्यांच्या दृष्टीने तर फारच

असते. कारण त्यामुळे त्यांना मिळणारा फायदा हा त्यांच्या पगारापेक्षाही अधिक असतो. कुटुंबासाठी मोटार, मोटारीचा रोजचा खर्च, आल्या गेल्याचे यथोचित स्वागत व आतिथ्य करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची मिळवणी करण्यासाटी मिळणारा भरपूर भत्ता, परदेशी भरणाऱ्या सभा संमेलनासाठी जाण्याची मिळणारी सुट्टयांना जोडून येणारी संधी हे सारे खर्च करतपासनिसांच्या जाळ्यातून निसटू शकतात.

ही आणखी एक मोठी पळवाट आहे. बोनस भाग वाटणे, कंपन्यांच्या मालकीचे हस्तांतर करणे, कंपन्यांची भांडवलाच्या दृष्टीने पुनर्रचना करणे, सूत्रधारी आणि दुय्यम कंपन्या काढणे या व अशाच इतर अनेक गुंतागुंतीच्या क्लृप्त्या श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होण्यासाठी लढवीत असतात. आणि त्यात सरकारला त्यांच्याशी नेहमीच बुद्धिचातुर्याने झगडावे लागते. यात नेहमी सरकारचाच विजय होतो असे नव्हे. आणि कराचा दर जसा जास्त त्यानुसार कर चुकविण्याच्या नव्या युक्त्या वा पद्धती शोधण्यास जास्तच प्रोत्साहन मिळते.

करासंबंधीचे प्रचलित कायदे खरोखरीच जास्त कडक वा कणखर करावयाचे झाल्यास तसे उपाय स्पष्ट आहेत. आगत-स्वागतासाठी भरपूर पैसा खर्च करून आपसात स्पर्धा करून पेढ्यांनी (Firms) आपला व्यापार वाढविण्याची त्यांना परवानगी द्यायची असेल तर मग आज जो अपहार सर्वत्र आढळतो तो टाळण्यासाठी अशा खर्चाची कसून तपासणी करणे नक्कीच अगत्याचे आहे. करनिरीक्षकांची संख्या वाढवून व त्यांचे अधिकार वाढवून हे करता येणे शक्य आहे. कारण त्यामुळे त्यांना अधिक खोलात जाऊन प्रश्न विचारता येतील व तसे ते विचारतातही. नफ्याचे भांडवलमूल्यवृद्धिमध्ये रूपांतर करून जर कर चुकविला जात असेल तर कराच्या जोडीस भांडवलमूल्यवृद्धीकर लादण्यास चांगलीच अनुकूल पार्श्वभूमी तयार होईल. अमेरिकेमध्ये अशी करपद्धती अस्तित्वात आहे. कांही बाबतीत भांडवलवृद्धीवर कर आकारणे हे अयोग्य आहे, हे आपल्याला माहितच आहे. उदा. एखाद्या घरमालकाने वीस वर्षांपूर्वी ज्या किंमतीला घर घेतले होते त्याच्या तिप्पट पैसे घेऊन घर विकले तर नवे घर घेण्यासाठी त्याला आज तेवढ्या रकमेची आवश्यकता आहेच. पण हा विचार केवळ योग्य ते अपवाद करावेत एवढ्यासाठीच आहे.

प्राप्तीकर कायद्यातील पळवाटा बंद करणे अगत्याचे आहे. पण फार मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष कर लादला तरी काही पळवाटा अपरिहार्यपणे राहतीलच. अप्रत्यक्ष करांबाबत म्हणजे विकत घ्यावयाच्या वस्तूवर ( उदा. खरेदीवर अथवा तंबाखूवरील ड्यूटी ) जादा किंमतीच्या रूपाने भरलेला कर अशी हरकत घेता येणार नाही. वास्तविक या करपद्धतीचे काही फायदे आहेत. त्यामुळे प्रोत्साहन कमी होत नाही. असे कर चुकविणे अवघड असते व त्याची अंमलबजावणी करणे सोपे असते. याहून अधिक म्हणजे नियोजनाचे ते एक प्रमुख साधन आहे. कारण एखाद्या वस्तूच्या

मागणीवर त्या वस्तूवर लादावयाच्या कराच्या दराने दबाव आणता येतो. पण याही करपद्धतीत काही तोटे आहेत. या करामुळे वस्तूंच्या किंमती वाढतात व चलनवृद्धीस ( चलन स्फीती ) उत्तेजन मिळते. अप्रत्यक्ष करांस समाजवाद्यांनी घेतलेला प्रमुख आक्षेप असा की या करात प्राप्तीनुसार बदल होत नाहीत. म्हणजे प्राप्तीचे विभाजन विषम असल्यास या कराचा बोजा श्रीमंतांपेक्षा गरिबांवर अधिक पडतो. हा कर केवळ श्रीमंतांच्या चैनीवरच लावला तर ठीक. पण तसे केले तर आपल्याला आवश्यक महसूल मिळणार नाही. उलट या पद्धतीत असा दोष आहे की यामुळे अन्याय अधिकच अन्यायकारक होतो.

प्राप्तीवरील कराच्या योगाने न्याय्य वाटणी करण्याच्या प्रयत्नात मुळात आढळणाऱ्या गंभीर विषमतेमुळे वरील अडचण निर्माण होते. संपत्तीची वाटणी अत्यंत विषम झाली असल्यामुळे आपोआपच लोकांच्या उत्पन्नात विषमता येणे स्वाभाविक ठरते. मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष कर लादून ही विषमता दूर करण्याचा आपण प्रयत्न केला तर मग इकडे थोडे तुकडे गोळा करणे आणि इतरत्र कोठे तरी ते पोहोचविणे अशा प्रकारच्या प्रयत्नांत आपण नवीनच समस्या निर्माण करतो. परिणामी विसंगतीने भरलेली, शासकीय व मानसशास्त्रीय समस्या निर्माण करणारी अशी अतिशय गुंतागुंतीची प्राप्तीकर पद्धत निर्माण होते. आपण जर प्रत्यक्ष कराचा मार्ग पत्करला तर ज्यांच्यावर अगोदर अन्याय झाला आहे, अशा लोकांवरच पुन्हा भुर्दंड लादला जातो. या सर्व संपत्तीवर हमखास उपाय एकच की विषमता मुळातच नाहीशी करणे.

## संपत्तीची पुर्नविभागणी

प्राप्तीची वाटणी मूळातच इतक्या मोठ्या प्रमाणात विषम असण्याची दोन प्रमुख कारणे आहेत. पहिले असे की संपत्तीच्या मालकीमध्ये फार मोठी तफावत आहे. राष्ट्रीय संपत्तीवरील एवढा मोठा वाटा अगदी अल्पसंख्य लोकांच्या मालकीचा आहे की केवळ आपल्या मालकीची वाटणी मोठी असल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात अनार्जित प्राप्ती (Unearned income) होते. दुसरे असे की काही विशिष्ट प्रकारची मालमत्ता प्रामुख्याने उद्योगधंद्याची मालकी वाटलेला नफा आणि भांडवलमूल्यवृद्धीच्या रूपाने मिळणारे लाभ यामुळे अधिक फलदायी असते. अशा खाजगी धंद्यातील सर्वसाधारण भागीदारांनाच केवळ चांगली प्राप्ती होते असे नव्हे तर नफा इतका होतो की प्रमुख शासकीय अधिकाऱ्यांना चांगले पगार व खर्चासाठी भरपूर व्यावसायिक भत्ते देता येतात. 'ज्यांच्याकडे भरपूर आहे त्यालाच आणखी द्यावे' या न्यायाने विषम प्राप्ती विभागणीस कारणीभूत असलेली ही दोन कारणे परस्पर साहाय्यकारी होत असतात. पूर्वापार साचत आलेल्या मिळकतीपासून

अनार्जित उत्पन्न भरपूर नफ्यामुळे अधिकच वाढते आणि अशा प्रकारे नव्या संचयाचा आधार निर्माण होतो.

वर वर पाहिल्यास या समस्येस अगदीच साधे उत्तर आहे असे वाटेल. राज्य-सरकार प्राप्तीची पुर्नविभागणी करण्यासाठी हस्तक्षेप करते त्याप्रमाणे प्रत्येकास जवळ जवळ समान हिस्सा मिळावा या उद्देशाने सरकारने संपत्तीची पुर्नविभागणी करण्यासाठी हस्तक्षेप का करू नये ? पण हे धोरण व्यवहार्य नाही. संपत्तीची विभागणी जास्त जास्त लोकांच्यामध्ये व्हावी यात तत्वत: काहीच वावगे नाही. आपली कशावर तरी मालकी असावी, आपण बचत करावी आणि पोराबाळांसाठी काही मागे ठेवावे असे वाटणे हे स्वाभाविक आहे. आणि काही मर्यादेपर्यंत हे मानवी हिताच्या संदर्भात समर्थनीय आहे. पण लोकांचे संपत्तीविषयक विचार इतक्या झपाट्याने बदलतात की एका विशिष्ट क्षणी संपत्तीची योग्य वाटणी केली तरी ती फार काळपर्यंत टिकून राहणार नाही. काहीजण लगेच आपल्या मालमत्तेचे नगद रुपयात रूपांतर करून ते खर्च करून टाकतात. आणि बाकीचे अधिक साठा करण्यासाठी त्याचा उपयोग करतील. काही आपल्या मालकीच्या संपत्तीबद्दल बेफिकीर राहतील तर इतर त्याकडे नीट लक्ष पुरवून तिचे जतन करतील. ज्यांना स्वत:चे असे काही मिळवावे असे वाटते– मालकीचे घर किंवा छोट्या व्यापाराला वा शेतकऱ्याला साहाय्य ही उघड उदाहरणे होत– अशांना सरकारने साहाय्य करावे हे योग्यच आहे. पण मोठमोठ्या खाजगी संपत्तीचे लहान लहान भाग करून संपत्ती विहीतांना वाटून द्यावेत असे कोणीच गंभीरपणाने सुचविलेले नाही.

याउलट मोठमोठ्या खाजगी मालमत्तेचे सार्वजनिक मालमत्तेत रूपांतर करून समाजवाद्यांनी या प्रश्नाला उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. एकदा सार्वजनिक मालकी झाली की सर्व प्राप्ती–मग ती खंड व्याज वा नफा, कोणत्या का रूपात असेना– सर्वांच्या उपयोगासाठी वापरली जाईल. केवळ भाग्यवान अल्पसंख्यांकांच्या सोयीसाठीच त्या प्राप्तीचा वापर केला जाणार नाही, असा युक्तिवाद केला जातो. भांडवली स्वरूपाचे लाभही सार्वजनिक तिजोरीत जातील आणि त्यामुळे खाजगी संपत्तीसाठे होणे जास्तच अवघड जाईल.

अशा प्रकारे मालकी हक्काचे रूपांतर करण्याची सर्वात जास्त उपयोगात आणलेली आणि समाजवादी प्रचारात ज्या पद्धतीस सर्वाधिक प्राधान्य दिले गेले आहे अशी पद्धती म्हणजे उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण हे होय. न्याय्य विभागणीच्या दिशेने प्रगती करण्याच्या कामी राष्ट्रीयीकरणाची फारच अल्प मदत होते, असे गेल्या दहा वर्षांचा अनुभव दर्शवितो. लोकशाही समाजामध्ये प्रचलित मालकांना-नुकसान भरपाई दिल्याशिवाय राष्ट्रीयीकरण करणे अशक्य आहे; कारण तसे केल्यास परिणामी इतका अन्याय होईल की त्यासाठी मतदारांची अनुमती मिळणे

असंभवनीय वाटते. काही मालदारांची सर्व संपत्ती काढून घेणे हे सर्वस्वी अन्यायाचे ठरेल. त्यात काही छोटे मालदार असतील. असे लोक आपली बचत, ज्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करण्यास योग्य आहे अशा धंद्यात गुंतवली असल्यामुळे गमावून बसतील. या उलट काही इतर–कुठल्याही प्रकारची खास वागणूक देण्याच्या योग्यतेचे नसतानाही –केवळ आपली बचत सुदैवाने इतर गुंतवली असल्यामुळे सहीसलामत सुटतील.

नुकसान भरपाई देण्याचे एकदा ठरले म्हणजे सरकारने जबरदस्तीने मालमत्ता विकत घेणे याहून वेगळा राष्ट्रीयकरणास अर्थ उरत नाही. त्याचा तात्कालिक परिणाम म्हणून संपत्तीची पुर्नविभागणी होणार नाही, तर एकप्रकारच्या संपत्ती-ऐवजी दुसऱ्या प्रकारची संपत्ती अस्तित्वात येणे इतकाच होईल. पूर्वीच्या खाजगी कंपन्याच्या शेअर्सऐवजी आता ठराविक व्याज देणारे सरकारी कर्जरोख्यांचा स्वीकार केला जाईल. या बदलाचे दूरगामी परिणाम संभवतात. उद्योगधंद्याच्या विकासाच्या नि उत्कर्षाच्या संदर्भात कर्जरोखे धारकांना वाढणारा नफा व भांडवलवृद्धी लाभ यात भागीदारी नसते व त्याला नवे साठे करता येत नाहीत. त्याला फक्त ठराविक दराने व्याज मिळते. पण कर्जरोखे धारक आपले कर्जरोखे विकू शकतात आणि विकून मिळालेली रक्कम खासगी क्षेत्रातील नफ्याची भागीदारी मिळेल अशा धंद्यात गुंतवू शकतात. अगदी दूरच्या भविष्यातच, जसजसा उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाचा वेग वाढेल आणि जास्तजास्तच उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण होईल तसतसा संपत्तीच्या साठेबाजीस आळा बसेल आणि परिणामी खऱ्या अर्थाने संपत्तीची पुर्नविभागणी होईल.

लोकशाहीस संमत होईल अशा मार्गाने संपत्तीची पुर्नविभागणी चटकन करण्याचा एकच मार्ग म्हणजे संपत्तीवर प्रमाणबद्ध कर बसविणे. मोठ्या साधनांच्या-कडून तुलनेने लहानांच्यापेक्षा अधिक प्रमाणात वसुली करणे. वास्तविक या कल्पनेत क्रांतिकारक असे काही नाही. या प्रकारे मृत्युशुल्काच्या ( डेथ ड्यूटी ) रूपाने सध्या केले जातेच. पण त्यात एक महत्त्वाचा फरक आहे. सध्या मृत्युशुल्काचे स्वरूप जमविलेल्या आणि मागे ठेवलेल्या संपत्तीवर केलेली आकारणी असे आहे. त्यापद्धती-मुळे परिणामी पैशाचे हस्तांतर होते, संपत्तीचे नव्हे. हे शुल्क नगदी रकमेत दिले जाते व सरकारसुद्धा ही रक्कम चालू महसूलात मिळालेली अधिकांश रक्कम समजते. शुल्क भरण्यासाठी कदाचित संपत्ती ( मालमत्ता ) विकावी सुद्धा लागेल. पण ही दुसऱ्या मालदारास विकली जाते व शेवटी यातून संपत्तीची पुर्नविभागणी न होता सार्वजनिक आणि खासगी मालकी यांच्या संदर्भात पूर्वीच्या विभागणी पद्धतीत काहीच फरक होत नाही.

सार्वजनिक मालकीचे प्रमाण वाढवायचे म्हणजे मृत्युशुल्क वस्तूरूपाने अथवा सरकारी कर्जरोख्यांच्या ( सेक्युरिटीज ) रूपाने भरावयास लावणे आवश्यक

आहे. अन्यथा नगदी नाण्याच्या स्वरूपात केलेली वसुली सरकारने खर्च न करता त्या रकमेच्या मोबदल्यात नवी मालमत्ता खरेदी करावयास हवी, ही मूलभूत महत्त्वाची सुधारणा आहे. सध्या ज्या रूपाने मृत्युशुल्क ( डेथ ड्यूटी ) लावले जाते त्यात गंभीर दोष आहेत. त्यातील अगदी स्पष्ट दिसणारी पळवाट म्हणजे दानधर्म करून मृत्युपूर्वीच मालमत्तेची वाट लावणे. संपत्तीची पुर्नविभागणी अधिक परिणामकारकपणे करावयाची असेल तर 'मृत्युशुल्क' वसुलीची ही पद्धत बंद करावयास हवी. आणि त्याचा दर वाढवावयास हवा. वारसासाठी मागे ठेवलेल्या संपत्तीवर जास्तीत-जास्त कर का ठरवू नयेत याला काहीच कारण नाही. आणि आकारणीनंतर उरलेल्या सगळ्यावर शंभर टक्के कर लावावा.

तरीसुद्धा मृत्युशुल्क वसुलीची कार्यवाही संथ होईल. कारण प्रतिवर्षी खासगी मालमत्तेच्या थोड्या भागावरच हे शुल्क आकारले जाईल. भांडवलदारांनी केलेल्या त्या संपत्तीसाठ्याचा 'वारसा' सुधारण्याचा मृत्युशुल्क हा केवळ संथ मार्ग आहे. त्यापेक्षा भांडवल कर ( Capital Levy ) आकारणे हा जलद मार्ग आहे. या मार्गाने गेल्यास सरकारला निश्चित केलेल्या कमाल मर्यादेपलीकडील खासगी मालमत्ता एकदम आपल्या ताब्यात घेता येईल. मालकाच्या मरणाची वाट पाहत बसावे लागणार नाही. कमाल मर्यादा अगदी १०,००० पौंड एवढी उच्च ठेवली आणि त्यावरील सर्व मालमत्ता सरकारजमा केली तरी एकदम अर्ध्याहून अधिक खाजगी मालमत्ता सरकारच्या ताब्यात येईल.

मग या प्रमाणात भांडवली कर लादण्यास समाजवादी का बिचकतात? याबाबत नैतिक भूमिकेतून काही हरकत घेता येणार नाही. आणि शासकीय अडचणी काही अनुल्लंघनीय नाहीत. खरी अडचण राजकीय आहे. असा काही क्रांतिकारक कायदा करण्यापूर्वी जनमताचा कौल घ्यावा लागेल. वास्तविक सुधारित मृत्युशुल्क आणि भांडवली कर यातील एकाची निवड अथवा दोहोंचे मिश्रण, हे नेहमीच राजकीयदृष्ट्या काय शक्य आहे यावरच अवलंबून राहणार. दुसऱ्या कुठल्याही समाजवादी ध्येयाप्रमाणेच लोकशाहीच्या चौकटीत न्याय्य वाटपाच्या दृष्टीने करावयाच्या वाटचालीचा वेग शेवटी मतदारांच्या संमतीवर अवलंबून राहतो.

या मार्गांनी केलेल्या प्रगतीचा, प्रचलित संपत्तीच्या विभागणीत बदल करण्यासाठी उपयोग होतो. आपण ज्या परिस्थितीशी मुकाबला करीत आहोत ती स्थिर नाही. नव्या बचतीमधून नवी संपत्ती सारखी हाती येते. आणि म्हणूनच सध्याच्या परिस्थितीत क्रांतिकारक बदल घडवून आणला तरीही मालकीबाबतच नवे भेद लौकरच पुन्हा निर्माण होतील. सार्वजनिक मालकी आणि खाजगी मालकी यांच्यातले वेगळे प्रमाण टिकवायचे असेल तर सार्वजनिक आणि खाजगी बचत यामध्येही वेगळे प्रमाण असावयास हवे. भविष्यात सार्वजनिक उपयोगांचे क्षेत्र व्यापक असावयास

हवे असेल तर आजची सार्वजनिक बचत खाजगी बचतीपेक्षा अधिक असावयास हवी. मजूर सरकारच्या शासनकालात या दिशेने निश्चित कल दिसत होता. पण हुजूर पक्षियांनी उलटी वाटचाल केलेली आहे.

सार्वजनिक बचत दोन प्रकारे होण्याची शक्यता असते. सार्वजनिक उद्योगांच्या क्षेत्रात खर्चापेक्षा मिळकत अधिक होणे अथवा सार्वजनिक क्षेत्रात होणाऱ्या खर्चापेक्षा कर रूपाने मिळणारी रक्कम जास्त असणे. सार्वजनिक बचत वाढविण्याची आवश्यकता आहे, असे गृहीत धरल्यास राष्ट्रीयीकरण झालेल्या उद्योगधंद्यांच्या बाबतचे सध्याचे आर्थिक धोरण अर्थहीन वाटते. चांगल्या व वाईट काळांची सरमिसळ करून या उद्योगधंद्यांनी आपले हिशेब संतुलित ठेवावेत आणि भांडवली विकासखर्चासाठी खाजगी बचतीतूनच कर्ज द्यावे अशी त्यांचेकडून अपेक्षा आहे. सार्वजनिक उद्योगधंद्यांनी स्वतःच्या प्रगतीची स्वतःच व्यवस्था का करू नये ? खाजगी उद्योगाप्रमाणे त्यांनीही फायदा मिळवावा आणि खासगी बचतीचे प्रमाण वाढविण्याऐवजी सार्वजनिक बचतीचे प्रमाण वाढवावे. सरकार व स्थानिक राज्यसंस्थांच्या बाबतही हेच म्हणता येईल. त्यांनी सुद्धा भांडवलवृद्धीची किंमत शक्यतोवर त्यांच्या कर-विषयक मिळकतीमधून द्यावी व खाजगी ठेवीदारांना सतत व्याज देत राहण्याचे टाळावे.

पण सरकारने या क्षेत्रात एकदा महान स्वामित्व प्रस्थापित केले की दुसरा एक प्रश्न निर्माण होतो. सरकारने कोणत्या प्रकारच्या संपत्तीचा संचय करावा ? मृत्युशुल्काच्या वा भांडवली कराच्या रूपाने होणारी प्राप्ती ही अनेक विविध प्रकारची असू शकेल – जमीन, इमारती, कर्जरोखे वगैरे.– यातले ठेवायचे कुठले आणि विकायचे कुठले. देण्या-घेण्याच्या व्यवहारात काय काय खरेदी करणे शक्य होईल ? सार्वजनिक बचतीच्या संदर्भातही हेच प्रश्न उपस्थित होतात. सर्वसाधारणपणे अशा बचतींचा उपयोग, सार्वजनिक उद्योगांच्या क्षेत्रातील प्रगतीसाठी, किंवा सरकारच्या भांडवली विनिमयासाठी होत असला तरी नवीन संपत्ती संचय करण्यासाठीसुद्धा त्यांचा उपयोग करता येणे शक्य आहे. आम्ही प्रथम सुरुवातीसच म्हटलेले आहे की संपत्तीच्या काही प्रकारातून अधिकतर नफा होतो आणि परिणामी हे प्रकार सतत विषम मिळकतीचे मूळ ठरतात. अधिकतर नफा खासगी व्यक्तींना न जाता सरकारी तिजोरीत जमा व्हावा म्हणून अशा प्रकारच्या संपत्तीचा संचय करावयास हवा.

सरकारने भरभराटीस आलेल्या उद्योगसंस्थांचे भाग ( Shares ) काही प्रमाणात विकत घ्यावेत व अशा उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण (संपूर्ण) करण्याच्या फंदात पडू नये. अशा प्रकारच्या सूचनाही मांडण्यात आल्या आहेत. असे करण्याने शासकीय जबाबदारीचे ओझे न उचलता सरकार भरपूर नफा तसेच भांडवली मूल्यवाढ या दोहोंतही सहभागी होऊ शकेल. पण बाह्यतः आकर्षक भासणाऱ्या या योजनेत अनेक धोके आहेत. सर्वप्रकारची विषमता निर्माण झाली तरी नफ्याची

पातळी उच्च ठेवण्यात सरकारचे हितसंबंध निर्माण होतील आणि अधिक नफ्यांच्या या धोरणास इतर उद्योगधंद्यातही सरकारी साहाय्य लाभेल.

राज्यसंस्था जेव्हा उद्योगधंद्याच्या क्षेत्रात भाग घेण्याचे ठरविते तेव्हा तिने केवळ वाढीव नफ्याचा विचार न करता संपूर्ण आर्थिक धोरणाचा विचार करावयास हवा. न्याय्य वाटणीच्या दृष्टीने विनासायास मिळणारा नफा कमी करण्याचे ध्येय नजरेसमोर ठेवावयास हवे. एखाद्या क्षेत्रात सच्चे प्रवर्तक उद्योग सुरू करण्याचे कामी पत्करलेल्या धोक्याची नुकसानभरपाई म्हणून क्वचित वेळी अधिकतर नफ्याचे समर्थन करता येईल. पण बहुतांशी अधिकतर नफा उद्योग क्षेत्रातील अशा धाडसी प्रयोगामुळे झालेला नसतो. उलटपक्षी असा नफा ज्या व्यापारी संस्था बऱ्याचशा मक्तेदारी स्वरूपाच्या आहेत व सुरक्षित व सुव्यवस्थापित आहेत अशांच्या व्यवहारातूनच मिळतो. समाजातील या कडेकोट बंदोबस्तातील विशेषाधिकाराच्या जागा आहेत. याविरुद्ध सार्वजनिक हल्ला चढवायचा म्हणजे सरकारकडे संपूर्ण मालकी असणे अगत्याचे आहे. अशा मालकी हक्काद्वारा सरकारला निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या धोरणावर ताबा प्रस्थापित करता येईल.

असा हल्ला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. एखाद्या विशिष्ट धंद्याचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करणे हा त्यापैकी एक प्रकार आहे. एक वा अनेक व्यवसाय संस्थांचे व्यवस्थापन हाती घेऊन सरकारास एखाद्या उद्योगधंद्याचे अंशतः राष्ट्रीयीकरण करता येईल. अशा प्रकारे सार्वजनिक उद्योगांना बाजारभावाचे कोंडाळे मोडून खाजगी व्यापारी संस्थांशी प्रत्यक्ष स्पर्धा करण्याची क्षमता प्राप्त करून देता येईल. किंवा सार्वजनिक संस्थांना मोठ्या प्रमाणात खरेदी करावयास सांगून किमतीवर दडपण आणून नफा कमी करण्याच्या मार्गाचा अवलंब करता येईल. उच्चतर नफा देणारे भाग ( शेअर्स ) खरेदी करण्यापेक्षा वा आणखीनच कमी परिणामकारक म्हणजे नादारीत निघालेल्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यापेक्षा वरीलपैकी कुठल्याही एका मार्गाने सार्वजनिक हस्तक्षेप करण्यानेच न्याय्य वाटणीच्या दिशेने अधिक प्रगती होणार आहे.

पण सार्वजनिक मालकीचे कार्य केवळ न्याय्य वाटणीच्या ध्येयाच्या संदर्भातच ठरविता येणार नाही. सार्वजनिक मालकीचे प्रमाण वा वाढ ठरविणारी दुसरी काही कारणे आहेत. विकसनशील अर्थव्यवस्थेच्या गरजा ही एक त्यांपैकी आवश्यक बाब आहे.

# ९. विस्तारी अर्थव्यवस्था

न्याय्य वाटप या समाजवादी मागणीवर उघडउघड हल्ला चढविणे हे भांडवलवाद्यांना सहसा शक्य होत नाही. त्यांचा विरोध हा तत्त्वावर आधारलेला नसून व्यवहारामधून निर्माण झाला आहे. आर्थिक क्षेत्रातील प्रगतीला पूर्ण विराम दिला तरच केवळ न्याय्य वाटप करता येईल, असे त्यांचे म्हणणे. 'तुमच्या समतेच्या धोरणाने आर्थिक प्रगतीची पाळेमुळेच खुडली जाणार आहेत.' असे ते ठासून सांगतात. विकसन हे प्रथमत: पुरेशा भांडवल गुंतवणुकीवर अवलंबून असते. उत्पन्नाची समान वाटणी करून म्हणजे श्रीमंतांची बचत कमी करून तुम्ही भांडवलाचा संचय कमी करणे एवढेच साधाल. राष्ट्र व्यय अधिक करील व बचत कमी करील, म्हणजेच नव्या गुंतवणुकीसाठी कमी भांडवल उपलब्ध होईल. दुसरे असे की विकास हा स्पर्धेच्या दडपणावर अवलंबून असतो. प्रत्येक उद्योगपती इतर विरोधकांच्या स्पर्धेमुळे अगदी सावध असतो. पण समतेच्या हितार्थ तुम्ही सरकारला आर्थिक देवघेवीत हस्तक्षेप करावयास सांगून देशव्यापी सार्वजनिक मक्तेदारी सुरू करीत आहात. अशा प्रकारे स्पर्धेचा जोर कमी होईल व त्याजागी दुसरी कुठली शक्ती निर्माण होणार नाही. तिसरे असे की विकास हा आर्थिक प्रोत्साहनावर अवलंबून असतो. पण समतेच्या नावावर तुम्हाला साहस आणि श्रम करून मिळविलेल्या फळावर असा घाला घालायचाय की त्यामुळे आर्थिक प्रोत्साहनाचा जोरच निघून जाईल. मग पर्यायी मार्ग म्हणून तुम्ही काय सुचवाल ? या आव्हानांचा स्वीकार करावयास हवा. या प्रश्नाला समाजवाद्यांचे काय उत्तर आहे ?

## भांडवल गुंतवणुकीचे कार्य

१९ व्या शतकातल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत बचतीचा प्रश्न आपोआपच सुटत असे किंबहुना तो प्रश्न इतक्या उत्तम रीतीने सुटत असे की गुंतवणुकीसाठी लोकांच्या अपेक्षेबाहेर भांडवल जमा होई. भांडवलाची गुंतवणुक कुठे करावी याचा शोध घ्यावा लागे. स्वदेशी पुरेशी गुंतवणुकीची संधी नसल्याने भांडवलदारांना साम्राज्यशाही साहसाचे आकर्षण भासे. भांडवलाचे साठे इतके भराभर तयार होत याचे कारण संपत्तीची वाटणी अतिशय विषम असे. श्रीमंतांकडचा संपत्तीचा साठा भराभर वाढून गुंतवणुकीसाठी तयार असे. स्वत:वर वा स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी हवा तेवढा पैसा खर्च केला तरी खूपसा पैसा गुंतवणुकीसाठी शिल्लक राहत असे. म्हणून ते अधिकच पैसा गुंतवीत असत व आणखीच सधन होत असत.

आज या परिस्थितीत फरक पडला आहे. श्रीमंत कमी श्रीमंत झालेत व गरीब कमी गरीब झाले आहेत. आणि कोणाकडेच आपल्या मिळकतीमधून बचत करण्यास

पुरेसा पैसा नाही. गुंतवणुकीसाठी मार्ग शोधण्याचा प्रश्न नसून योग्य मार्गाने गुंतवणूक करण्यासाठी भांडवल मिळविण्याचा आहे. सर्वत्र मागणी वाढत आहे. समुद्रपार प्रदेश भांडवलासाठी ओरड करताहेत पण पुरेसे भांडवल कुठे मिळेनासे झाले आहे. तात्कालिक व्यक्तिगत गरजांचे दडपण वाढते आहे. हे वाढते दडपण रोखणे सरकारला कष्टाचे होत आहे. गुंतवणुकीस उर्वरित महत्त्व दिले जाते आहे. गरज वाढताच गुंतवणुकीस कात्री लावली जाते.

ही नवी शृंगापत्ती आहे. पण समाजवाद्यांचे उत्तर, आतापर्यंत मोठ्या कष्टाने समतेच्या दिशेने केलेल्या प्रगतीचा त्याग करावा असे मात्र नाही. जेव्हा श्रीमंतांना संपत्तीचा बेसुमार साठा करण्याचा व मग ती संपत्ती गुंतवून स्वतःसाठी सारखा नफा मिळविण्याची परवानगी होती, अशा जुन्या जमान्याकडे पुन्हा वळण्याची त्यांची इच्छा नाही. उलटपक्षी त्यांच्या दृष्टीने अशा परिस्थितीत सरकारने निर्धारपूर्वक कृती करावयास हवी. सर्व समाजाच्या हिताचे प्रतिनिधित्व व संरक्षण करण्याची क्षमता फक्त सरकारचे ठायीच आहे. एवढेच नव्हे तर विविध गटांच्या हितांच्या तात्कालिक आणि अदूरदर्शी मागण्यांच्या तडाख्यातून भावी पिढ्यांचे हितरक्षण करणे हे सुद्धा केवळ सरकारलाच शक्य आहे.

बचतीचे तीन प्रकार आहेत. व्यक्तिगत, धंद्यातील आणि सरकारी. लोकांची व्यक्तिगत बचत काय असावी हे सरकार लोकांना सांगू शकणार नाही. आणि जरी सांगू शकले तरी अशा प्रकारे होणारी बचत पुरेशी होणार नाही. व्यक्तिगत बचतीची जागा आता धंद्यातील बचतीने घेतली आहे. ही बचत न वाटलेल्या नफ्यातून होत असते. बचतीचे प्रमाण आणखीन वाढवायचे असेल तर असा युक्तिवाद केला जातो की व्यापार धंद्यांना आणखी वाढते नफ्याचे प्रमाण ठेवण्यास परवानगी द्यावी. पण खाजगी नफ्याचे प्रमाण वाढले की विषमता वाढते. नफ्याची जरी वाटणी केली नाही तरी त्यामुळे सामान्य शेअरची किंमत वाढते. आणि या संपत्तीचे मोठे साठे वाढतात. आणि नेमक्या या गोष्टीचे समाजवाद्यांना उच्चाटन करावयाचे आहे. हे निश्चित की सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांत मात्र मोठ्या नफ्याला हे आक्षेप घेता येणार नाहीत. राष्ट्रीयीकरण केलेल्या उद्योगधंद्यांनी आपापल्या राखीव संपत्तीचे साठे केले तर त्यांना बचतीची नवी साधने निर्माण करता येतील. सध्या सरकारी उद्योगधंदे हे करीत नाहीत. कारण हिशेबांची तोंडमिळवणी करणे एवढीच आपणापासून अपेक्षा असल्याची त्यांची समजूत आहे. आणि नवे भांडवल मिळविण्यासाठी ते बाजाराकडे वळतात किंवा प्रत्यक्ष सरकारी साहाय्याचीच अपेक्षा करतात. पण हे सध्याचे तर्कशून्य धोरण टाकून दिले तरी केवळ या उद्योगसंस्थांना राष्ट्राच्या गरजा भागविता येणार नाहीत हे उघड आहे.

तेव्हा आवश्यक त्या सर्व बचतींची उभारणी करण्यासाठी आपल्याला सारा

भर तिसऱ्या प्रकारावर–सरकारी बचत–दिला पाहिजे. हे कसे करायचे ? लोकांच्या खाजगी मिळकतीवर पुरेसा कर आकारून सरकारला अंदाजपत्रकातून शिलकी जमा करता येईल. म्हणजेच सरकारला खर्चासाठी आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा अधिक उत्पन्न उभारण्याइतपत कर लादावे लागतील. बचत करण्याचा हा एक न्याय्य मार्ग आहे. चढत्या क्रमाने आकारलेल्या कर-पद्धतीमुळे विषमता अधिक न होता समतेच्या दिशेनेच अधिक प्रगती होते. औद्योगिक क्षेत्रातील शांततेसाठीही हेच धोरण अधिक उपयुक्त आहे. कारण यात संपत्तीचे मालक स्वतःसाठी मालमत्ताच उभारीत असताना कामगारांना मात्र धीर धरण्याचा सल्ला दिला जात नाही. पण राजकीयदृष्टया हे धोरण स्वीकारणे मुष्कीलीचे आहे. यासाठी मतदारांची संमती मिळविणे आवश्यक आहे. बचतीच्या आवश्यकतेचे महत्त्व लोकांनी जाणले पाहिजे आणि ज्या धोरणामुळे भविष्यकाळ सुधारण्यासाठी काही तात्कालिक गरजेच्या वस्तूंचा त्याग करावा लागेल. अशा धोरणास हातभार लावण्याची तयारी दर्शविली पाहिजे.

हुकूमशाही देशात आवश्यक त्या बचतीची उभारणी सरकारी कृतीच्या आधारे विनासायास करता येते. कारण अशा देशात लोकांची संमती घेण्याचा प्रश्नच नसतो. लोकशाहीमध्ये मात्र जनतेच्या स्वयंस्फूर्त सहकार्याची गरज असते. गुंतवणुक करण्यासाठी बचतीची आवश्यकता आहे हे लोकशाही सरकारास लोकांना समजावून द्यावे लागते. लोकांना आपल्या त्यागाची भूमिका स्पष्ट व्हावी म्हणून गुंतवणुकीची दृश्ययोजना त्यांच्यासमोर ठेवणे अगत्याचे असते. गुंतवणुकीसाठी उभारलेल्या निधीचा कोणत्या प्रकारे उपयोग केला जाणार आहे हे सरकारने स्पष्ट केले पाहिजे. आणि योजनापूर्वक गुंतवणूक करण्याची आवश्यकता दाखवली पाहिजे. केवळ तात्कालिक फायद्याच्या प्रकल्पासाठी नव्हे तर इतर अनेक सुधारणा की ज्यांच्यासाठी पैसा उभा करणे कष्टाचे आहे अशा प्रकल्पाबद्दलही राष्ट्राला आस्था असावयास हवी. तात्कालिक फायद्यांच्या प्रकल्पाला आवश्यक तो पैसा कसा उभारला जातो, गुंतवणुकीची जबाबदारी खासगी व्यक्ती व व्यापारी संस्थांवर जर सोडली तर त्यांनाच अधिकाधिक फायदा होईल, अशा प्रकारे ती पार पाडली जाईल. देशाच्या एकूण गरजांचा कदाचित विचारसुद्धा केला जाणार नाही.

ज्या गुंतवणुकीसाठी सार्वजनिक प्रयत्नांची आवश्यकता आहे ती ढोबळ मानाने चार प्रकारची असते. एक, जे समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत पण काही कारणास्तव त्यात खाजगी गुंतवणूक होत नाही असे उद्योगधंदे. अशा प्रकारातील उदाहरण म्हणजे रेल्वे. खाजगी गुंतवणूक करणारा, हमखास नफा मिळेल अशा मोटार गाड्यांच्या धंद्यात पैसा गुंतविणे अधिक पसंत करतो. परिणामी आपल्याला असे आढळते की, रस्त्यावर मोटार गाड्यांची गर्दी होते आहे पण आपल्याला आत्यंतिक आवश्यक असलेली रेल्वेव्यवस्था मात्र अपुरी, ओंगळ

आणि कालबाद झालेली असली तरी ती सहन करावी लागते. दोन, ज्या नव्या उद्योगधंद्यांना मोठेमोठे धोके आहेत व फार मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणुकीची आवश्यकता आहे, पण ज्यांची वाढ झाली पाहिजे, अशा उद्योगधंद्यांसाठी सुद्धा सार्वजनिक भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता आहे. अशा प्रकारात मोडणारे उदाहरण म्हणजे अणुशक्ती. या क्षेत्रातील प्रगती ही आतापर्यंत सरकारी उपक्रम आणि गुंतवणूक यावरच अवलंबित आहे.

सार्वजनिक गुंतवणुकीचा तिसरा आणि वेगळ्या प्रकारचा उपयोग हा औद्योगिक क्षेत्रातील संशोधन आणि प्रशिक्षण यासाठी, म्हणजेच राष्ट्राचे तांत्रिक ज्ञान आणि क्षमता वाढविणे आणि पर्यायाने उत्पादन क्षमतेत वाढ करणे यासाठी असतो. यशस्वी आणि भरपूर नफा मिळविणारे काही उद्योग सोडले तर दूरगामी उद्देशासाठी मोठमोठ्या रकमा बाजूला काढून ठेवणे व वरील उपयोगाकरिता खर्च करणे, खाजगी उद्योग संस्थांना जमण्यासारखे नाही. ज्या उद्योग संस्थांच्या आशा केवळ तांत्रिक ज्ञानावर अवलंबून असतात अशांना या नव्या ज्ञानासाठी खर्च वा गुंतवणूक करणे बहुधा परवडण्यासारखे असत नाही.

शेवटची आणि आत्यंतिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या जीवनाची पातळी उंचावण्यासाठी ज्या काही सोई व सेवासंस्थांची आवश्यकता आहे अशांसाठी सार्वजनिक गुंतवणूक आवश्यक आहे. शिक्षण, स्वास्थ्य, गृहरचना रस्ते, समाजसेवेची कार्ये ही सर्व या सदरात मोडतात. शासनाने यात गुंतवणूक केली नाही तर या कामासाठी पैशाची नेहमीच कमतरता भासत राहील. विक्रीसाठी वस्तू तयार करण्यासाठी भांडवलाचा ओघ वाहता राहील, पण सामाजिक जीवनाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी मात्र पुरेसा भांडवली पुरवठा होणार नाही. निरनिराळ्या चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनासाठी आणि त्यानंतर त्या विकत घेण्यासाठी लोकांना प्रवृत्त करावे म्हणून जाहिरातीसाठी भरपूर भांडवल ओतले जात असताना; सर्व लोक राहतात आणि त्यांची मुलेबाळे मोठी होतात अशा त्यांच्या गरजेच्या पूर्ण वातावरणाबद्दल मात्र काटकसर करीत बसण्यात काय शहाणपणा आहे ?

गुंतवणुकीची योजना सरकारने आखली तर व्यक्तीच्या वस्तू निवडीच्या हक्कावर गदा येते, असा युक्तिवाद करणे योग्य नव्हे. आज आपले याप्रकारचे स्वातंत्र्य एखादा उत्पादक ज्या वस्तूंचे उत्पादन केवळ नफ्यासाठी करतो तेवढ्यापुरतेच मर्यादित आहे. जर लोकांच्या निवड स्वातंत्र्यांच्या कक्षा वाढवायच्या असतील तर गुंतवणुकी-साठी केवळ फायद्यांचा निकस लावून चालणार नाही. सामाजिक हिताच्या संदर्भात आवश्यक असणाऱ्या अनेक गुंतवणुकीतून कधीच फायदा होणार नाही. समाजाने आग्रह धरल्याखेरीज अशा गुंतवणुकी केल्याच जाणार नाहीत.

## कार्यक्षमतेला प्रोत्साहन

समाजाच्या साधन सामुग्रीची निरनिराळ्या कार्यासाठी वाटणी करून गुंतवणुकीसाठी पुरेसा वाटा दिला जाईल व निरनिराळ्या आवश्यक प्रकल्पांच्या सिद्धीसाठी ही गुंतवणुकीची रक्कम विभागली जाईल, अशा प्रकारे तरतूद व संविभाजन करणे; ही विकसनशील अर्थरचनेची पहिली गरज आहे. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन हा आर्थिक विकासाचा पाया खरा पण ह्या क्षेत्रात उत्पादनक्षमता वरच्या पातळीवर ठेवण्यासाठी काय करावयास हवे? भांडवलवादी अर्थरचनेत हे काम मुक्त स्पर्धेचे समजले जाई. पण समाजवादी अर्थरचनेत असे म्हणतात की 'सारा कारभार सरकारच्या हाती' घेतला जातो आणि मग लहान कंपन्यांचे एकत्रीकरण देशव्यापी मक्तेदारीमध्ये केले जाते. किंमती बाजारात ठरत नाहीत. तर संचालने अथवा उच्च समित्या त्या ठरवतात. उत्पादन खर्च वा किंमती वाढू न देणे, वस्तु-निर्मितीचा दर्जा सुधारणे, विक्रीसाठी खटपट करणे वगैरेंची काही आवश्यकता वाटत नाही. बाजारातील ज्या दबावामुळे भांडवलदार कार्यक्षम,धीट आणि साहसी बनत असे ते दबावच नाहीसे झालेले असतात.

पण वस्तुस्थितीकडे पहा. खुल्या बाजारातील खाजगी उद्योगसंस्थेत सुद्धा काही तरी घोटाळा दिसतो. कारण येथेसुद्धा स्पर्धेद्वारा आर्थिक विकास होतो असे दिसत नाही. आपणासर्वांना हे माहीत आहे की कार्यक्षमता आणि साहस या दोन्ही बाबतीत कमी असलेल्या व्यापारी संस्था सुद्धा तग धरून आहेत. एकाच उद्योग-क्षेत्रातील चांगल्या नि वाईट कंपनीमध्ये केवढे मोठे अंतर असते याबाबत आपल्याला नेहमी सांगितले जाते. तरी सुद्धा वाईट कंपनी तग धरून असते. ब्रिटिश खासगी उद्योगधंद्यातील सर्व विभागांच्या सुस्तपणाबद्दल वरचेवर भर दिला जातो. खासगी व्यवस्थेखालील कोळशाचा उद्योग एक पिढीपर्यंत कोंडलेल्या स्थितीचा निदर्शक होता. आजच्या कापडाच्या गिरण्या जरी स्पर्धा करत असल्या तरी त्यातील काही विभाग मंदावल्यासारखे झाले आहेत.

वस्तुस्थिती अशी आहे की ज्या मुक्त स्पर्धेची स्वप्ने अर्थशास्त्रज्ञ पाहत, तिचे स्वरूप नेहमीच काल्पनिक राहिले आहे. वास्तवात अशी स्पर्धा कधीच अस्तित्वात नव्हती वा येऊही शकली नसती. कामगार, भांडवल आणि मागणी यातील काहीही पुरेसे फिरते असत नाही. त्यामुळे लोकांना आपोआपच वाईट बाजूस सारून चांगल्या उत्पादक संस्थेची निवड करता येत नाही. ज्या प्रकारची स्पर्धा अस्तित्वात होते तीमुळे अकार्यक्षम उद्योगांचे उच्चाटन कधीच होऊ शकले नाही. उलट ही स्पर्धा नेहमीच विध्वंसक आणि त्याच त्या वस्तूंचे उत्पादन करणारी व प्रतिस्पर्ध्यांचा गळा घोटण्या-साठी अधिक पैसा खर्च करणारी होती. बऱ्याच संस्था एकाच वेळी एकमेकांशी स्पर्धा करत असल्या म्हणजे साऱ्यांनाच केवळ तग धरण्यासाठी एवढी खटपट करावी

लागते की त्यातील कोणास आपल्या संस्थेचे नूतनीकरण करणे वा त्यात काही नव-जीवन निर्माण करणे अजमायचे अवघडच.

तरीसुद्धा या सर्व अपूर्णतेच्या संदर्भातही स्पर्धेमुळे साहसाला गती मिळते हे निस्संशय. पण आज वाढत्या तांत्रिकीकरणाच्या वा मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या दडपणाखाली स्पर्धा इतकी दबली आहे की तिचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. कसलाही अडथळा नसलेल्या भांडवलदारी अर्थरचनेत देखील प्रत्येक बाब मक्तेदारीस अनुकूल असते. आणि राष्ट्रीय नसल्या तरी स्थानिक वा प्रादेशिक मक्तेदाऱ्या बाजारात नेहमीच आपल्या वर्चस्वाची झळक दाखवितात. कदाचित अशी मक्तेदारी एखाद्या प्रादेशिक शहरातील बस कंपनीच्या अथवा ग्रामीण भागातील धुलाई व्यवसायाच्या स्वरूपात आपल्याला आढळेल. पण या दोन्ही प्रकारात साधन-सामग्रीची जबरदस्त किंमत, मोठी मागणी सामावून घेण्यासाठी करावी लागणारी आर्थिक काटकसर इत्यादि पाहता दुसरा कोणी प्रतिस्पर्धी त्या क्षेत्रात उतरणे देखील अवघड. आधुनिक तंत्र आणि आधुनिक गरजांच्या संदर्भात अनेक औद्योगिक क्षेत्रात पुनश्च स्पर्धात्मक परिस्थिती निर्माण करणे अशक्य झाले आहे. सगळा ओघ विरुद्ध दिशेने चालला आहे.

मग काय करावयास हवे? काही काही वेळा प्रश्न वा समस्याच आपली उत्तरे शोधून काढतात. मक्तेदाऱ्या प्रतिमक्तेदाऱ्या निर्माण करतात. स्पर्धा चिरडून टाकता येईल पण बलशाली उत्पादक संघास आज तितक्याच बलशाली वितरक संघास तोंड द्यावे लागत आहे. अलीकडील आधुनिक सिद्धांतानुसार स्पर्धेच्या जागी आता प्रतिदबाव शक्ती (Countervailing Power) आली आहे. व्यक्तिश: एखादा ग्राहक आपले वळण बदलून स्वत:चे हितसंरक्षण करू शकणार नाही. पण मोठ्या प्रमाणावर ठोक विक्री करणारे व मोठे दुकानदार व सहकारी ग्राहकसंस्था हे सर्व आता आपला व्यापार वाढविण्यासाठी त्याच्या वतीने झटतील. वाढीव मजुरीसाठी वरचेवर दबाव आणून कामगार संघटनासुद्धा मोठ्या व्यापारी संस्थांना अधिक कार्यक्षम होण्यास भाग पाडतात.

हे सर्व खरे असले तरी हे काही संपूर्ण उत्तर नव्हे. प्रतिदबाव शक्तींच्या उप-युक्ततेची निश्चिती नसते. मोठा वितरक हा मोठ्या उत्पादकाचा कधी कधी सहकारीही असू शकतो. वाढीव किंमतीमुळे होणाऱ्या नफ्यात ते दोघेही भागीदार असू शकतात. कामगार संघटना व मालक यांच्यात समझोता होण्याची शक्यता आहे, आणि असा समझोता ग्राहकाला अडचणीत टाकणारा असू शकेल. स्पर्धेप्रमाणे प्रतिदबावशक्ती आपोआपच कार्यक्षमता वाढविण्याची यंत्रणा पुरवू शकत नाही.

या समस्येस परंपरागत समाजवादी उत्तर हे की स्पर्धेच्या दबावाची जागा संघटित लोकमताचा दबाव घेईल. उद्योगाची सामाजिक मालकी झाली की मग

त्या उद्योग संस्थेस लोकांना जबाबदार रहावे अशी कायदेशीर तरतूद करता येईल. पार्लमेंट हिशेब तपासू शकेल; ग्राहकांच्या समित्या किंमती आणि कार्यतत्परतेवर लक्ष ठेवतील. कामगारांना सल्लागार समितीवर प्रतिनिधित्व दिले जाईल व अशा समित्या कारखान्यात काय व्यवस्था असावी यावर सल्ला देतील. मोठा उद्योग-धंदा समाजाच्या मालकीचा असणे हे एवढे कारण त्या उद्योगाच्या हालचालीवर समाजाची नजर राहण्यास पुरेसे आहे.

व्यवहारात याची कार्यवाही कशी होते? राष्ट्रीयीकरण केलेल्या उद्योगाच्या अनुभवावरून अशा उद्योगधंद्यांची जबाबदारी प्रत्यक्षात परिणामकारक करणे आणि त्यासाठी जागरूक व सूज्ञ जनमताची निर्मिती करणे हे किती कठीण आहे हे आपणास माहीतच आहे. जनमत हे परिणामकारक असले तरी त्याचे स्वरूप दुधारी तलवारीसारखे आहे. ते अपव्यय थांबविण्यास मदत करील. कामगारांना न्याय्य वाटा मिळावा म्हणून आग्रह धरील, आणि उच्च प्रतीच्या पदार्थांच्या उत्पादनाची मागणी करील. पण जनमानसाला साहसाची भीती वाटेल, सार्वजनिक पैशाच्या सहाय्याने करावयाच्या प्रयोगांबद्दल ते आठघा घालतील. आणि प्रत्यक्ष उडी घेण्याला संमती देण्यापूर्वी जनमत खूप आढेवेढे घेईल. सार्वजनिक उद्योगधंद्यांना समाजाला जबाबदार राहावयास लावल्यास प्रामाणिकपणास उत्तेजन मिळते. पण त्यामुळे प्रयोगशीलता आणि लवचिकपणा या दोहोंनाही अंतर्निरोध होईल.

वस्तुस्थिती अशी आहे की स्पर्धा, प्रतिदबावशक्ती किंवा सार्वजनिक जबाबदारी ( पब्लिक अकौंटॅबिलिटी ) या तिन्ही बाह्य दबावशक्तींचे दडपण कुठल्याही उद्योगावर आणले तरी ते प्रत्येक प्रकारच्या परिस्थितीत परिणामकारक होईलच असे नाही. प्रत्येकात काही गुण आहेत व काही दोष . या सर्व दबावशक्तींची आवश्यकता आहे. जिथे एक परिणामकारक ठरत नाही तिथे दुसऱ्याचे पूरक सहाय्य घेता येते. उत्पादनाचे प्रमाण, त्याचे स्वरूप आणि औद्योगिक संघटनेचे स्वरूप ठरविणाऱ्या इतर घटकांनुसार या समस्येचे स्वरूप प्रत्येक उद्योगक्षेत्रात वेगवेगळे असते. एखाद्या उद्योगक्षेत्रात अती स्पर्धा असेल तर दुसऱ्यात अगदीच कमी असेल. या सर्वांवर एकच असा रामबाण उपाय नाही. एक गोष्ट मात्र निश्चित की या प्रत्येक प्रकारची दबावशक्ती कार्यवाहित करण्यासाठी निरनिराळ्या प्रकारच्या सरकारी कृतींची आवश्यकता आहे.

या संबंधात अनेक सूचना आजपर्यंत पुढे आलेल्या आहेत. पण फारच थोड्या अंमलात आणल्या गेल्या आहेत. काही वेळा पुन्हा स्पर्धा पूर्वस्थितीवर आणावी लागते. कारण काही ठिकाणी खास अधिकारांचे रक्षणाकरता आणि नवे बदल घडून येऊ नयेत म्हणून स्पर्धेवर मर्यादा आणलेल्या असतात. स्पर्धा पूर्ववत सुरू व्हावी म्हणून सरकार विविध प्रकारे हस्तक्षेप करू शकेल. स्पर्धा मर्यादित

करण्याचे व्यवहार बेकायदा ठरविण्यापासून स्पर्धा करणारे सामाजिक मालकीचे उद्योगधंदे सुरू करण्यापर्यंत हा हस्तक्षेप असू शकतो. कधी कधी सरकारी उत्तेजनाने सरकारी संस्था किंवा नगरपालिका किंवा प्रतिस्पर्धी कंपन्यासुद्धा निघतात आणि त्यांना चाकोरीतून बाहेर पडण्यास प्रोत्साहन म्हणून आवश्यक ते भांडवली साहाय्य दिले जाते. या उलट काहीवेळा स्पर्धेचा अतिरेक झाल्यामुळे परिणामी गैर-व्यवस्था नि अपव्यय यात वाढ झालेली दिसते. अशा वेळी औद्योगिक क्षेत्रात एकसूत्रीपणा आणण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. विकास समित्या ( Development Councils ) मागील मूळ भूमिका हीच होती. या समित्यांनी औद्योगिक संस्थांना सर्वसाधारणपणे लागणारी आवश्यक ती मदत करावी अशी कल्पना होती. उदा. भांडवल, किंवा कित्येकदा खाजगी उद्योगाच्या आवाक्याबाहेर असलेली संशोधन व विक्रीची व्यवस्था. त्यांना व्यापारी संघटनांच्या विरोधामुळे नि या विरोधास तोंड देण्यास सरकार तयार नसल्यामुळे जरी अपयश आले असले तरी अशा प्रकारच्या संघटनांची आवश्यकता आजतागायत आहे.

प्रतिदबाव आणण्याची शक्ती म्हणून सार्वजनिक उद्योगधंद्यांची उपयुक्तता बऱ्याचशा प्रमाणात अद्याप अजमावून पाहावयाची आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या सरकारी उद्योगधंद्यांकडे भरपूर खरेदी करण्याची ताकद आहे. मालाचा पुरवठा करणाऱ्यांनी किमती खाली ठेवाव्यात व मालाचा दर्जा सुधारावा म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी जाणूनबुजून या शक्तीचा उपयोग करता येईल. ठोक व्यापाराच्या क्षेत्रात सरकारी संस्था सुरू करून बरेच साधता येईल. ठोक व्यापार हे एक असे महत्त्वाचे केंद्र आहे की तेथून जे उत्पादक स्पर्धेच्या प्रबळ दबावाखाली नाहीत अशांवर प्रतिदबावाचे दडपण आणता येते. अशा प्रकारे भरपूर खरेदी करून सरकार व्यक्तिगत ग्राहकाच्या संरक्षणार्थ येऊ शकते.

पण सरकारी उद्योगधंद्यांवर कशा प्रकारचे दडपण येऊ शकते ? हे उद्योग केवळ स्पर्धा आणि प्रतिदबाव शक्तीच्या दडपणाखाली येत असतील तर काही खास प्रश्न नाही. पण जेथे काही तांत्रिक कारणासाठी एखादा उद्योगधंदा संपूर्णपणे सार्वजनिक मालकीचा केला जातो तेव्हा मात्र जबाबदारीच्या (Accountibility) तत्त्वाचाच उपयोग करून अशा उद्योगाचे नियमन करावे. अशा प्रकारे राष्ट्रीयीकरण झालेल्या उद्योगधंद्यांच्या जबाबदारीचा काही अनुभव आपल्या गाठीस आहे. पण या बाबतीत परिणामकारक उपाययोजना शोधून काढण्याच्या कामी पार्लमेंट यशस्वी झाले आहे असे म्हणता येणार नाही.

अडचणी परिचित आहेत. सरकारने अतिरेक करण्याचा वा पुरेसे न करण्याचा असा दुहेरी धोका आहे. वर्षातून एकदा वार्षिक अहवालावर पार्लमेंटने चर्चा करणे एवढ्यावर भागण्यासारखे नाही. उलट सरकारी उद्योगावर क्षुद्र व विरोधी भावनेने

होणारी टीका, अधिकाऱ्यांवर दडपण आणणे, रोजच्या व्यवहारात अडचणी निर्माण करणे, जे धोके पत्करल्यामुळे फायदा झाला नाही अशाचा कटाक्षाने उल्लेख करणे वा तिकडे लक्ष वेधणे व या उलट जिथे धोका पत्करल्याने फायदा झाला तिकडे मुद्दाम दुर्लक्ष करणे ही टाळावयास हवी. अशा उद्योगांच्या कार्याचे दीर्घ कालांतराने तज्ज्ञ वस्तुनिष्ठ परिक्षण व्हावे. नियमन करणारांची उपक्रमशीलता आणि जबाबदारीची जाणीव यावर आघात न होईल अशा रीतीने न्याय्य वा योग्य टीका करता येईल अशी व्यवस्था झाली पाहिजे.

जनतेच्या प्रातिनिधिक सभागृहास जबाबदार असल्याचे दडपण केवळ सरकारी उद्योगापुरतेच लागू करावे असे नाही. खासगी उद्योगांना असे संपूर्णपणे जबाबदार रहावयास भाग पाडणे शक्य नाही हे खरे पण मर्यादित स्वरूपात अशी जबाबदारी तेथेही शक्य आहे. उदाहरणार्थ ग्राहकांच्या सल्लागार समित्यांची सोय सरकारला करता येईल. ग्राहकांस सूज्ञ निवड करण्याच्या कामी साहाय्य करणे एवढीच केवळ त्या समित्यांची उपयुक्तता असेल असे नव्हे. जाहिरातबाजीच्या साहाय्याने महागडा अथवा हलक्या दर्जाचा माल लोकांच्या माथी मारणाऱ्या उद्योगांवर लोकमतांचे दडपण आणण्याच्या कामीही त्यांची मदत होईल. कुठल्याही आकाराचे उद्योगधंदे आपल्या सामाजिक किर्तीबाबत बेफिकीर असतात, तथापि खोट्या देखाव्यामुळे लौकिक प्राप्त होत नाही अशी व्यवस्था करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

स्पर्धा, प्रतिदबाव शक्ती आणि जबाबदारी या तिन्ही दडपणांचा उपयोग एकाच संघटनेने कसा करून घ्यावा याचे उत्तम उदाहरण सरकारी कृती बरोबरच सहकारी चळवळीने दिले आहे. ग्राहकांची सेवा करण्याचे कामी खासगी व्यापारी संस्था आणि सहकारी संस्था यांच्यामध्ये नेहमीच जोरदार स्पर्धा असते. सहकारी संस्थांच्या हाती पैसा असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याची त्यांच्या अंगी ताकद असते. या शक्तीचा वापर करून त्यांना उत्पादक, अन्न व इतर कच्चा मालाचे उत्पादन करणारे यांच्या सामर्थ्याची उलट भरपाई करणे शक्य असते. त्यांच्या संघटनेच्या चौकटीत संस्थेने सदस्यांना जबाबदार रहावे अशी अंतर्गत व्यवस्था त्यांनी सुरू केली आहे. अशी व्यवस्था इतर औद्योगिक संघटनांत कोठेही आढळत नाही. मग ती खासगी असो वा सरकारी. सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या प्रचंड असल्यामुळे आणि त्यांचे वजन मोठे असल्यामुळे अर्थ व्यवस्थेवर आपली छाप पाडण्याची त्यांच्या ठायी क्षमता असते.

पण या क्षमतेचा प्रत्यक्षात अविष्कार झालेला दिसत नाही. हे सुद्धा सर्वांना परिचित आहेच. कोणास तरी जाब देणे वा जबाबदार असण्याची ही व्यवस्था तितकीशी कार्यक्षम असत नाही; कारण प्रत्यक्षात या व्यवहारात फारच थोड्या सदस्यांना रस असतो. लहान गावांतून जर सहकारी संस्थांना जवळ जवळ व्यापारी

क्षेत्रात मक्तेदारीच प्राप्त होते. आणि मग त्याचबरोबर त्यांची कार्यक्षमताही कमी होऊ लागते. किंमती खाली आणण्यासाठी उत्पादकांवर दबाव आणण्याऐवजी त्यांच्याशीच हातमिळवणी करून सहकारी संस्था किंमती वाढविण्याचासुद्धा प्रयत्न करू शकतात. जबाबदारीच्या जोडीस स्पर्धा हवी आणि या दोहोंच्या जोडीस ग्राहकांची स्थिती सुधारावी म्हणून सहकारी चळवळीने आपली सारी व्यावहारिक-शक्ती पणास लावली पाहिजे. अशी तिन्ही नियंत्रणे एकाचवेळी कृतीत उतरतील तेव्हाच सहकारी संस्था अधिकत्तम कार्यक्षम होतील.

विकासशील अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असलेले जे ताण निरनिराळ्या प्रकारे टिकविता येतील त्यांचा निर्देश करण्यापलीकडे आम्ही अधिक काही केले नाही. यापुढे जावयाचे म्हणजे प्रत्येक उद्योगधंद्याची रचना आणि संघटन यांचे पृथक्करण करावयास हवे. पण एक निष्कर्ष मात्र स्पष्ट आहे की अनेक विनशर्त (Unqualified) आवडी-निवडी अथवा भांडवलशाही विचार देखील फारच गोंधळात टाकणारा वाटतो. मक्तेदारी वा स्पर्धा या दोहोंवरही हल्ला चढविला गेला आहे; पण या दोहोंपैकी एकही संपूर्ण वाईट वा संपूर्ण चांगली नाही. तसेच खासगी व सार्वजनिक उद्योगधंद्यांमधील विरोधाभास– की ज्यामुळे एक मुक्तीचा आणि दुसरा धिक्कारार्ह मार्ग आहे, असे भासविले जाते–इतका ओबडधोबड आहे की तो उपयोगाचा वाटत नाही. स्पष्ट एवढेच आहे की औद्योगिक संस्थांची कार्य-क्षमता टिकविण्यासाठी केवळ बाजारातील ताण पुरेसे नाहीत तर त्यासाठी सरकारी कृतीची आवश्यकता आहे.

## कामाचे हेतू

विकसनशील अर्थव्यवस्थेच्या निश्चितीसाठी मांडलेल्या भांडवलवादी समी-करणातील, स्पर्धा हा केवळ अर्धा भाग होता, दुसरा भाग पैशाची ओढ हा होता. स्पर्धेमुळे बाह्य दडपण व पैशामुळे अंतर्गत चालना मिळेल अशी कल्पना होती. पैशामध्ये चालना देण्याची शक्ती आहे, या विचारास १९ व्या शतकातील परिस्थिती पूरक होती. जो माणूस उद्योगधंदा चालवे तोच बहुधा त्या धंद्याचा मालक असे. ज्या प्रमाणात उद्योगधंद्याची भरभराट होई त्या प्रमाणात त्याची स्वतःची भरभराट होई. आपल्या आयुष्यात संपत्ती संपादन करण्याची शक्यता ही सामर्थ्य, साहस आणि उत्साह निर्माण करण्याच्या कामी फारच प्रभावी प्रलोभन ठरे. विशेषतः गरीबीचा कटु अनुभव घेतलेल्या व स्वकर्तृत्वाने पुढे आलेल्या माणसाबाबत तर हे प्रलोभन फारच प्रभावी असे. त्याचप्रमाणे कसल्याही प्रकारचे रोजगारीचे काम घेण्यास कामगार खूप असत व मिळालेली नोकरी टिकविण्यासाठी भरपूर कष्ट करण्याची त्यांची तयारी असे. नेहमी मिळणाऱ्या किमानवेतनापेक्षा थोडेसे अधिक

कमावण्याची शक्यता असल्यास, आणखी अधिक कष्ट करण्यास ते राजी असत. उलटपक्षी, नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी देऊनही सुटणार नाहीत अशा प्रकारचे मजुरांचे प्रश्न फारच थोडे होते.

या परिस्थितीमध्ये आता बदल झाला आहे. औद्योगिक साहस करून लवकर श्रीमंत होण्याची शक्यता जबरदस्त करआकारणीच्या धोरणामुळे कमी झाली आहे. धंद्याच्या प्रगतीबरोबर त्याच गतीने स्वतःची भरभराट साधणारा मालक जाऊन आता त्याच्या जागी पगारी व्यवस्थापक आला आहे. कामगारांना आता सालस राहण्याची आवश्यकता नाही. अंग मोडून कष्ट करायचे की नाही हे आता कामगाराला ठरविता येते. पूर्वीची प्रलोभने आता चालत नाहीत. 'धी' अथवा 'बडगा' एकाचीही मात्रा पूर्वीसारखी चालत नाही.

तर मग व्यवस्थापकांनी अथवा कामगारांनी मनःपूर्वक कामे का करावीत ? पैशाचे प्रभावी प्रलोभन आता कमकुवत झाले आहे, असे मान्य केले तरी त्याची जागा घेणारी दुसरी कुठली शक्ती आहे ? परंपरागत समाजवादी उत्तर एकच असे आहे की समाजसेवेची ओढ. त्यावेळी लोकांना असे वाटे की उद्योगधंदे एकदा का समाजाच्या मालकीचे झाले की सर्वांचे हित ध्यानात घेऊन लोक काम करतील. पण हे खरे आहे का ? सार्वजनिक उद्योगधंद्याचा बराच अनुभव आपल्या गाठीस आहे. त्यावरून केवळ मालकी बदलल्यामुळे चमत्कार घडत नाहीत, हे आपल्याला समजले आहे. लोकांचे नाममात्र प्रयत्न आणि त्यांच्या बांधवांचे सर्वसाधारण हित या दोहोंचा संबंध दाखविणे शक्य झाले तरी सुद्धा 'समाजाचे हित' या सारख्या मोघम व्यक्तिनिरपेक्ष ध्येयासाठी सतत श्रम करणारे विरळच ! कामामध्ये सुद्धा इतर क्षेत्रातल्याप्रमाणेच, सर्वसाधारणपणे प्रेरकशक्ती व्यक्तिनिष्ठच असते. करीत असलेल्या कामापासून कामगारांना स्वतःला कोणत्या तरी स्वरूपाचे व्यक्तिगत समाधान मिळणे आवश्यक असते.

कामासाठी मिळणाऱ्या मोबदल्यामुळे काही अंशी समाधान लाभत असते. पण माणूस हा केवळ पैशासाठीच काम करतो, हा भांडवलवादी सिद्धांत खोटा व दिशाभूल करणार आहे. पण या सिद्धांताचा शतकभराहून अधिक काळपर्यंत जोरदार प्रचार झाल्यामुळे इतका गोंधळ माजला आहे की समाजशास्त्रज्ञांनी खोलवर संशोधन करून 'लोकांना इतर काही गोष्टीमुळे प्रेरणा मिळते' हे स्पष्ट सत्य शोधून काढावे, अशी आवश्यकता निर्माण झाली आहे. याचा अर्थ पैशासाठी कुठलेच चांगले काम केले जात नाही असा नव्हे, तर अशी कामे दुसऱ्या काही कारणासाठी केली जातात हेही खरे आहे. पैशाचे प्रलोभन काढून टाकल्यास सगळेजण एकदम सार्वजनिक हितासाठी झटावयास लागतील, अशी श्रद्धा बाळगून प्रेरक शक्ती म्हणून पैशाचे उच्चाटन करणे ही समस्या नाही. उलट सद्यःपरिस्थितीत केवळ पैसाच नव्हे

तर इतर ज्या प्रेरक शक्तींमुळे माणसाची काम करण्याची इच्छा प्रगट होईल, अशा सर्व प्रेरक शक्तींना मुक्त करण्याची आवश्यकता आहे; हे ओळखले पाहिजे.

आपण कार्यक्षम नि साहसी असावे अशी ओढ व्यवस्थापकांमध्ये निर्माण करणारी आज कोणती शक्ती आहे ? प्रथमतः त्याला स्वतःच्या लौकिकाची काळजी असते. आपल्या यशामुळे आपला आदर व्हावा, आपल्या कर्तृत्वाची आणि प्रयत्नांची छाप पाडावी, आणि जास्तीतजास्त वरच्या पदावर बढती मिळून आपला सन्मान व्हावा, असे त्याला वाटत असते. पण तो काम करीत असलेल्या पेढीच्या सामाजिक लौकिकाशी त्याचा व्यक्तिगत लौकिक बांधलेला असतो. आणि सामाजिक लौकिक समाजाने घडविलेला असतो. केवळ कठोर बुद्धीच्या उद्योगपतींचे नेतृत्व लाभलेल्या औद्योगिक साम्राज्याबद्दलच समाजाला आदर वाटत असेल तर व्यवस्थापक परिणामांची क्षिती न बाळगता आपली शक्ती आणि कार्यक्षेत्र वाढविण्याची खटपट करतील. या उलट जनतेची आदबशीर सेवा, दर्जेदार मालाचे उत्पादन, उत्कृष्ट औद्योगिक किंवा कार्यकारी संबंध या गोष्टींचा जर समाजाने आग्रह धरला तर वरील गोष्टी साध्य करून कोणतीही पेढी सामाजिक लौकिक प्राप्त करेल. तसेच व्यवस्थापकांच्या प्रयत्नांचे उद्दिष्टही तेच राहील.

इतर कुठल्याही व्यवसायाप्रमाणे व्यवस्थापन हा सुद्धा आता प्रामुख्याने एक व्यवसाय बनला आहे. व्यवस्थापनात अद्यापही जरी औपचारिक व्यावसायिक नीती निर्माण झालेली नसली तरी या मागील प्रेरकशक्ती इतर व्यवसायांप्रमाणेच आहे. एखाद्या डॉक्टरास जर पुरेशा प्राप्तीची तरतूद करून दिली तर तो आपले काम निष्ठेने करतो ते अधिक प्राप्तीसाठी नव्हे तर लौकिकासाठी. समाजाची सेवा करण्यात त्याला समाधान लाभते. कारण समाज त्याच्या सेवेचा गुणगौरव करतो. ह्या साऱ्या जबरदस्त प्रेरकशक्ती आहेत. आणि पगारी व्यवस्थापक त्यात सहभागी आहेच. प्रेरक शक्ती म्हणून पैशाचे महत्त्व कमी आहे, याबद्दल खेद करीत न बसता व्यावसायिक लोकांच्या जीवनातील भौतिक विचारांचे वर्चस्व कमी कमी होते आहे, ही उलट आनंदाची बाब आहे. त्याऐवजी उच्चतर समाधान लाभावे म्हणून त्यांना निष्ठापूर्वक काम करता येईल.

कामगारांबाबतची परिस्थिती विशेष वेगळ्या प्रकारची नाही. आज त्यांनी केवळ पगारावरच लक्ष केंद्रित करून कसलेही अपमानास्पद, पराकोटीचे कंटाळवाणे व कष्टप्रद काम नाइलाजास्तव स्वीकारावे अशी परिस्थिती नाही. आणि म्हणूनच लोकांना कार्योद्युक्त करणाऱ्या ज्या इतर अनेक प्रेरक शक्ती आहेत त्यांना आवाहन करणे शक्य आहे. प्रामाणिक ध्येयसिद्धीच्या अभिमानास्तव, कौशल्याच्या वापरातून मिळणाऱ्या आनंदास्तव, सहकाऱ्यांच्या बरोबर संघ म्हणून नेहमीच कामे करण्याची तयारी दर्शविली आहे. एकदा का पुरेशी प्राप्ती झाली की करीत असलेल्या

कामात आनंद मानण्यास, प्राप्तीत वाढ व्हावी ही प्रेरक शक्ती जितकी उपयुक्त ठरेल तितक्याच प्रमाणात वर नमूद केलेल्या इतर प्रेरक शक्तीही उपयोगी पडतील. पण ही नैसर्गिक प्रवृत्ती विफल करण्यात वा दडपण्यात आली आहे, हा आपल्या समाजातील विकृतीचा एक भाग आहे.

व्यवस्थापकाप्रमाणे कामगारांना सामाजिक नावलौकिक कमवावयाचा नसतो, हे जरी खरे मानले; तरी कारखान्यातील आपले इतर सहकारी आपला कसा आदर करतात, ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असते. पण कारखान्यात तरी कोणत्या गोष्टी आदरास पात्र ठरतात? संचालन आणि मजूर संघटना यांची ध्येये आणि मार्ग यावरच ते अवलंबून असते. एखादी औद्योगिक संस्था–' त्या संस्थेत काम करणाऱ्या कामगारावर होणाऱ्या परिणामांची क्षिती न बाळगता ' चालविली असेल, आणि त्यास कामगारांचे अनुमोदन असेल तर अशा औद्योगिक संस्थेत बंडखोर व कामचुकार म्हणजेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे प्रतिरोध करणाऱ्यांवर करडी नजर ठेवली जाते. पण एखाद्या औद्योगिक संस्थेचे संघटन जर अशा प्रकारे केले असेल की त्यामुळे स्वतःच्या कर्तृत्वाचा योग्य उपयोग करणारा, सल्लामसलतीचा फायदा घेण्यास व जबाबदारी स्वीकारण्यास उत्सुक असलेला कामगार महत्त्वाचा मानला जाईल; तर अशा ठिकाणी वरील प्रकारचे गुण अंगी बाळगणारा कामगारच आदरास पात्र होईल. परिणामतः हे गुण आपल्या अंगी बाळगविण्याची ओढ प्रत्येक कामगाराच्या मनामध्ये निर्माण होईल.

हे सर्व गुण अंगी बाणविलेल्या कामगारांचा जर एखाद्या कारखान्यात भरणा असेल तर असा कारखाना म्हणजेच व्यवस्थापकाच्या दृष्टीने नंदनवनच ठरेल. औद्योगिक क्षेत्रात चांगल्या मानवी संबंधाबाबत सध्या जे बरेचसे विचार प्रगट केले जातात त्यातून नेमके हेच ध्वनित केले जाते. कारण त्यामुळे उत्पादनक्षमता वाढेल, अशी आशा केली जाते. पण एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे साफ दुर्लक्ष होत आहे. जबाबदारी आणि सहकार यांची जाणीव आपोआप वृद्धिंगत होणार नाही; एवढेच नव्हे तर केवळ नैतिक आवाहने करून ती निर्माण करता येणार नाही. औद्योगिक पेढीचा आपल्या कामगाराकडे बघण्याचा दृष्टिकोनच अखेर कामगारांचा आपल्या पेढीकडे बघण्याचा दृष्टिकोन ठरवील. याचा औद्योगिक लोकशाहीच्या प्रश्नाशी सरळ संबंध आहे.

# १०. औद्योगिक लोकशाही

ग्राहक म्हणून माणसाचे जीवन जितके महत्त्वाचे आहे तितकेच उत्पादक म्हणून सुद्धा त्याचे जीवन महत्त्वाचे आहे. सिद्धांतामध्ये लोकांची संमती गृहीत असेल, पण प्रत्यक्षात या गोष्टीकडे संपूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे. माणसावर होणाऱ्या या दुहेरी परिणामांचा समतोल साधण्यासाठी औद्योगिक संस्थांनी कसल्याही प्रकारचा प्रयत्न केलेला आढळत नाही. उत्पादनासाठी उत्पादकाचा नेहमीच बळी दिला जातो. अरिस्टॉटलने 'सजीव साधन' (Living tool) अशी गुलामाची व्याख्या केली होती. सर्व दिशेने इतकी प्रगती साधल्यावर सुद्धा बहुतांशी औद्योगिक कामगारांच्या कार्यकारी जीवनाचे वर्णन ॲरिस्टॉटलच्या व्याख्येनुसारच करावे लागते, ही खेदाची गोष्ट होय.

## राजकीय क्षेत्राशी तुलना

या समस्येला कामगार चळवळीजवळ उत्तर होते, ते म्हणजे औद्योगिक लोकशाही. लोकशाहीमुळे राजकीय क्षेत्रात नागरिकांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या दिशेने जशी प्रगती साधता आली, तशीच प्रगती औद्योगिक क्षेत्रात कामगाराच्या कामाच्या संदर्भात साधता येईल, असा विश्वास बाळगला जात असे. परंतु प्रत्येकजण जरी औद्योगिक लोकशाहीला अनुकूल असला आणि या संबंधात अनेक चांगल्या गोष्टी बोलल्या गेल्या असल्या, तरी प्रत्यक्षात औद्योगिक लोकशाहीच्या अर्थाबाबत एकवाक्यता आढळत नाही. ही कल्पना फार तर एका उत्कट आकांक्षेचे प्रतिनिधित्व करते. त्यातून प्रत्यक्ष कृतीबाबत काही मार्गदर्शन होत नाही. या कल्पनेस अनुकूल असे प्रस्ताव संमत केले जातात, पण त्यांची प्रत्यक्ष कार्यवाही कशी करायची या संबंधात कोणालाच नेमके काय ते माहीत नसते.

पण असे नेहमीच घडत नसे. औद्योगिक लोकशाही म्हणजे राजकीय लोकशाहीच्या यशस्वी पद्धती औद्योगिक क्षेत्रातही आणणे; म्हणजे या भूमिकेचा आधार घेऊन तयार केलेल्या योजनांचा नि प्रस्तावांचा एकेकाळी तुटवडा नव्हता. राजकीय क्षेत्रात आपल्या हक्कांचे ठामपणे प्रतिपादन करण्यास प्रत्येकास साह्यभूत होणारे लोकसत्तात्मक (Democratic) साधन म्हणजे मतदानाचा अधिकार होय. या अधिकाराच्या साहाय्याने कामगारांनी समाजातले आपले स्थान उंचावले होते. आपल्या हितसंबंधाकडे लक्ष पुरविण्यासाठी ते संसदेतील आपले प्रतिनिधी स्वतःच निवडीत होते. हळू हळू सामर्थ्य वाढत असलेला आणि प्रसंगवशात देशातील सरकारी सत्ता आपल्या हाती घेऊ शकेल असा मजूर पक्ष, हा त्यांचा स्वतःचा राजकीय पक्ष होता.

मग औद्योगिक क्षेत्रात त्याच मार्गाचा अवलंब करून तसेच यश का मिळू नये ? या क्षेत्रातही त्याच्या कामगार संघटनेत कामगाराला मतदानाचा अधिकार होता. जसजसे सर्व कामगारांना सदस्य करून घेण्यात कामगार संघटनांना वाढते यश लाभेल आणि त्यांचे सामर्थ्य वृद्धिगत होईल तसतसे लोकशाही मार्गाने निवडून दिलेल्या आपल्या प्रतिनिधींच्या द्वारा त्यांना औद्योगिक क्षेत्रावर नियंत्रण ठेवता येईल व तेथील व्यवस्थापनही करता येईल. केवळ तेव्हाच कामगारास आपले हक्क पूर्णत्वाने प्राप्त होतील व आपल्या जबाबदाऱ्यांचे आकलन होईल. औद्योगिक लोकशाही आणि कामगारांचे नियंत्रण हे दोन्ही शब्द समानार्थी मानले जात असत

समाजातील सर्व गटांना न्याय्य होईल अशा प्रकारे हे कसे साधता येईल, या बाबत मतभेद होते हे खरेच. औद्योगिक क्षेत्रात जर कामगार संघटनांचे व्यवस्थापन सुरू झाले तर ग्राहकांचे हितरक्षण कोण करणार ? कट्टर सिंडिकॅलिस्ट विचार-सरणीच्या लोकांना वाटे की हा दुसरीकडे लक्ष वेधण्याचा एक डाव आहे. त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की उत्पादकाच्या भूमिकेतून ग्राहकाच्या भूमिकेतील स्वतःची पिळवणूक कामगार कशी करेल ? "गिल्ड" समाजवाद्यांनी मात्र अशी गुळमुळीत भूमिका घेतली नव्हती. त्यांनी खरी समस्या ओळखली होती आणि औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत शासनव्यवस्थेत ढवळाढवळ न करता किंमती वगैरे बाबींत ग्राहकाच्या हिताचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी सरकारवरच पडते, अशी आग्रही भूमिका घेतली होती. या शतकातील पहिल्या वीस वर्षांच्या काळात कामगार चळवळींनी सर्वसामान्यतः औद्योगिक क्षेत्राच्या संयुक्त नियंत्रणास अनुकूल असलेल्या योजनांना पाठिंबा दिला. या योजनांनुसार कामगार संघटना आणि सरकार यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींद्वारा औद्योगिक क्षेत्रातील व्यवस्थापन व्हावे अशी कल्पना होती.

या कल्पनांचे आकर्षण आता राहिलेले नाही; याचे प्रमुख कारण असे की औद्योगिक क्षेत्रातील व्यवस्थापनाची जबाबदारी आपण घ्यावी, असे मुळी आता काही अपवाद वगळल्यास कामगार संघटनांना वाटतच नाही. तसे करण्याने आपले स्वातंत्र्य धोक्यात येईल अशी त्यांना भीती वाटते. आपल्या सभासदांचे प्रतिनिधित्व करणे व त्यांचे हितरक्षण करणे, त्यांची बाजू मांडणे हेच त्यांचे प्रथम कर्तव्य आहे; अशी त्यांची समजूत आहे. उद्योगक्षेत्रातील व्यवस्थापनात जर भाग घेतला तर उत्पादनासंबंधीचे तात्त्विक प्रश्न, ग्राहकांचे हित आणि व्यापक अर्थाने देशाचे हित वगैरे इतर अनेक गोष्टींचा त्यांना विचार करावा लागेल. केवळ व्यापक दृष्टिकोणा-तूनच त्यांना विचार करावा लागेल असे नव्हे तर काही प्रमाणात आजही तसा विचार ते करीत आहेत. तेव्हा अशा पद्धतीने विचार केल्यामुळे ज्या निर्णयावर ते पोहोचतील, तो निर्णय त्यांना बंधनकारक मानावा लागेल. आपल्या सभासदांनी घेतलेल्या

आक्षेपांचा डांगोरा पिटण्याचे स्वातंत्र्य त्यांना राहणार नाही. अशा प्रकारे परस्पर विरोधी निष्ठांच्या ओढाताणीमध्ये कामगार संघटनांचे नेते आपल्या पक्ष सदस्यांचा विश्वासच गमावून बसतील.

या धोक्यांची वाढती जाणीव झाल्यामुळे कामगारांच्या नियंत्रणाच्या इतर प्रस्तावांची जाहिरात केली जाते आहे. असे म्हटले जाते की कामगार संघटनांनी आपल्या संरक्षणात्मक कार्यावर लक्ष केंद्रित करणे चालू ठेवावे. पण एखाद्या उद्योग संस्थेतील कामगारांनी कामगार संघटनेच्या कार्याच्या संदर्भात नव्हे तर स्वतंत्रपणे अधिकारांवर असलेल्या काही जणांची वा सर्वांचीच निवड करावी. असेही सुचविले जाते की या दिशेने टाकावयाचे पहिले पाऊल म्हणून त्यांनी प्रथम आपल्या प्रमुखाची ( फोरमनची ) निवड करावी. त्याचबरोबर असेही सुचविले जाते की वर पासून सुरुवात करावी आणि कामगारांना काही संचालकांची निवड करण्याचा हक्क द्यावा. किंवा ज्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण झालेले असेल तेथील संचालक मंडळाच्या काही सदस्यांची निवड करण्याचा अधिकार द्यावा.

अशा प्रकारच्या प्रस्तावास लागलीच आक्षेप घेतला जातो, तो असा की कामगार संघटना आणि मजुरांचे व्यवस्थापकीय प्रतिनिधी यांचा जो स्वतंत्र वा भिन्न भिन्नपणे विचार या प्रस्तावांतून केला जातो तो फार काळ टिकणारा नाही. या योजनेनुसार कामगारांचे हिताविषयी कामगारसंघटना व्यतिरिक्त परस्पर विचार करण्याचा अधिकार निवडलेल्या प्रतिनिधींना मिळेल अशा कुठल्याही योजनेची कामगार संघटनांच्याकडून गय केली जाणार नाही. आणि अशा योजना जर त्यांच्या मर्जीविरुद्ध सुरू केल्या–हे असंभवनीय आहे– तर स्वसंरक्षणासाठी आपण नियुक्त केलेले लोक निवडले जातील, अशी व्यवस्था करणे त्यांना भाग पडेल. असे घडल्यास कार्याची जी विभागणी वर दर्शविली आहे ती नष्ट होईल. आणि इच्छा नसतानाही कामगार संघटननां व्यवस्थापनाच्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील.

हा विरोध बाजूला ठेवला तरी 'कामगारांचे नियंत्रण' असावे, अशा अर्थाचे जे निरनिराळे प्रस्ताव मांडले जातात; त्यामुळे असा गैरसमज होतो की औद्योगिक लोकशाहीची गुरुकिल्ली म्हणजे मतदानाचा अधिकार. वास्तविक आपल्या देशात जी राजकीय लोकशाही आहे तीमध्ये सुद्धा सरकारचे कामकाज चालविणारे औद्योगिक क्षेत्रातील व्यवस्थापकांच्या दर्जाच्या व्यक्ती निवडणुकीद्वारा नेमलेल्या नसतात, सनदी नोकर वर्गातूनच ते घेतलेले असतात. आणि दीर्घ अनुभव व खास प्रशिक्षण यांच्या आधारावरच ते या पदास पोहोचतात. या लोकांची जर निवडणूक घ्यावयाची ठरविली तर, केवळ शासनाचा दर्जा खालावेल इतकेच नव्हे तर सर्व प्रकारच्या भानगडी आणि लाचलुचपत यांच्यासाठी द्वार खुले करण्याजोगेच होईल. औद्योगिक

क्षेत्रातील व्यवस्थापकांची निवडणूक घ्यायची झाल्यास नेमक्या याच कारणास्तव त्याला विरोध करावा लागेल. ज्याला मित्र करता येतात, लोकप्रियता मिळविता येते, तोच यशस्वी उमेदवार होऊ शकेल. शिस्त आणि नि:पक्षपातीपणा यांचा मते मिळविण्यासाठी व टिकविण्यासाठी बळी दिला जाईल.

राजकारणामध्ये जे सरकार बनवितात त्या मंत्र्यांची निवडसुद्धा मतदार करीत नाही. सत्ताधारी पक्षाचा नेता त्यांची नियुक्ती करतो. मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व हेच की व्यक्तिशः प्रत्येक मतदारास पर्यायी पक्षांमधून एकाची निवड करणे शक्य होते व त्यामुळे सर्व पक्षांनाच त्याच्या हिताची कदर करणे भाग पडते. मतदानाच्या अधिकारास औद्योगिक क्षेत्रातही असेच महत्त्व प्राप्त करून द्यावयाचे असेल तर त्या क्षेत्रातील शासकीय व्यवस्थेत पक्षीय पद्धतीचा अवलंब करावा लागेल. म्हणजे कामगारास एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या निरनिराळ्या कार्यक्रमांतून एकाची निवड करता येईल. आणि त्याची इच्छा असल्यास अस्तित्वात असलेल्या संचालनांची कार्यक्षमता त्याच्या अपेक्षेपेक्षा कमी असेल तर ते उखडून टाकता येईल. या मार्गाने उद्योगधंदे यशस्वीपणे कसे चालविले जातील हे कल्पनाशक्तीस कितीही ताणले तरी न सुटणारे कोडे आहे.

कुठल्याही रूढ अर्थाने राजकीय क्षेत्रातील व औद्योगिक क्षेत्रातील लोकशाहीची तुलनाच होऊ शकत नाही. अशी तुलना अधिक खोलवर केलेल्या विचारावर आधारित अशी होऊ शकेल. मानवी व्यवहाराच्या संचालनासाठी केलेल्या कुठल्याही एका विशिष्ट व्यवस्थेशीच लोकशाहीची कल्पना बांधली गेलेली नाही. लोकशाहीवाद्यांच्या दृष्टीने काळजी घ्यावयाची ती याची की अधिकाऱ्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग करण्यास प्रतिबंध करणे आणि आपल्याशी संबंधित असलेल्या विषयाबाबत निर्णय घेण्याच्या कामी प्रत्येकास सहभागी होण्यास संधी देणे; हे ध्येय साध्य करून घेण्यासाठी राजकीय क्षेत्रातही, जगाच्या निरनिराळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो. जगातील सर्व देशांना चालावी वा चालेल अशी आदर्श लोकशाही राज्यघटना काही अस्तित्वात नाही.

तसेच औद्योगिक लोकशाहीची वकिली करणाऱ्यांच्या मनात आहे ते असे की एखादी अशा प्रकारची व्यवस्था शोधून काढायची की ज्यामुळे संचालकांच्या सत्तेस आळा बसेल आणि नोकरदारांना त्यांच्या संबंधीच्या विषयात निर्णय घेण्यास सहभागी होता येईल. हे साधायचे म्हणजे राजकीय क्षेत्रातील पद्धतींचे अनुकरण करणे असे नव्हे. औद्योगिक क्षेत्रात रुजतील आणि शिवाय तशाच यशस्वी होतील अशा वेगळ्या पद्धतींचा शोध घेतला पाहिजे.

## सामूहिक सौद्याचे फलित

या समस्येचा आपण नव्यानेच विचार करीत आहोत असे नाही. यामागे

पिढ्यान् पिढ्यांचा अनुभव आहे. भांडवलदारी अर्थव्यवस्थेने जेव्हा प्रथम मूळ धरले तेव्हा मालक लोकांचे कामगारांवर कमालीचे वर्चस्व होते. आता तशी परिस्थिती नाही. कामगार संघटनांच्या अस्तित्वामुळे आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करणे त्यांना आता शक्य नाही. कामगार हे आता असहाय्य आणि एकाकी नाहीत. त्यांची खात्री असते की त्यांचे कामगार बंधू पाठिशी असल्यामुळे ते आपल्या तक्रारींचे निवारण करून घेण्यासाठी कामगार संघटनेचे साहाय्य घेऊ शकतात. कामगार संघटनांमुळे कामगारांची सामुहिक सौदा करण्याची शक्तीच केवळ वाढली असे नव्हे तर याहून काही अधिक सामर्थ्य त्यांच्यामध्ये निर्माण झाले आहे. कामगार संघटनामुळे औद्योगिक संबंधाच्या क्षेत्रात 'कायद्याच्या राज्या'ची सुरुवात झाली आहे.

कामगार व मालक यांच्यातील वाटाघाटीने जे सामुहिक करार केले जातात, त्यामुळे नौकरीबाबतचे व्यक्तींचे करार निर्णित होतात. या नियमामुळे मालकांच्या सामर्थ्याला मर्यादा पडतात. कारण निरनिराळ्या प्रकारचे पाठबळ असल्याने त्यांचे पालन होण्याची हमी निर्माण होते. यातील संपाचे सामर्थ्य फार महत्त्वाचे आहे. कराराचे पालन नीट न झाल्यास संपाला– म्हणजेच सर्व कामगारांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येला– मालकांना तोंड द्यावे लागते. या आपखुषीने केलेल्या करारांमुळे दोन्ही बाजूंच्या लोकांच्या हक्कांचे व कर्तव्यांचे स्वरूप, कायद्याने केले जाते तितक्याच प्रभावीपणे निश्चित केले जाते. शिवाय कायदेमंडळाने करावयाच्या कायद्यांच्या मानाने ही नियम करण्याची पद्धती अधिक नजिकची व लवचिक आहे हाही एक लाभ आहेच.

सामूहिक सौद्यामध्ये दोन्ही बाजूंच्या सामर्थ्याचा समतोल गृहीतच धरला आहे. परस्परांना मंजूर असलेल्या कराराच्या बाबतीतही मालक आणि नोकर यांचे तीव्र पण परस्परविरोधी हिताचे प्रश्न असतात. म्हणूनच एकापेक्षा दुसरी बाजू जास्त शक्तिमान असली तर सम्मत झालेला करार फार काळ समाधानकारक ठरणार नाही. संघटनेमुळे कामगारांना प्रथम त्यांचे सामर्थ्य प्राप्त झाले, हे खरे असले तरी जोपर्यंत मालक वर्ग नोकरांना बेकार जीवनाची धमकी देऊ शकतो, तोपर्यंत संघटित नोकरांना सुद्धा आपल्या हिताचा योग्य तो आदर केला जाईलच, अशी परिस्थिती निर्माण करता येत नाही. सर्वांना रोजगार मिळेल तेव्हाच दोन्ही बाजू एका पातळी-वरून चर्चा करू शकतील. आपण केलेल्या व्याख्येनुसार औद्योगिक लोकशाहीचे सच्चे साधन म्हणून सामूहिक सौदा तेव्हाच खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरेल.

सामूहिक सौद्याचे लोकशाहीच्या संदर्भातील फलित हे सध्या केवळ अंशमान आहे ही वस्तुस्थिती आहे. आजपर्यंत रोजगारी, कामाचे तास, आणि संबंधित विषयां-बाबत नियमन करण्यासाठीच सारे प्रयत्न केंद्रित करण्यात आले. नोकरीवरून काढून-

टाकणे वगैरे सारख्या नोकरीच्या करारपत्राच्या इतर अंगांचा विचार–निदान सरकारी नोकरीच्या बाहेरील क्षेत्रात तरी–सर्रास न होता क्वचितच अपवाद म्हणून होतो. पण ही बाब नोकरांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. तो अनावश्यक आहे हे किती सहजतेने जाहीर करता येणे शक्य आहे ? थोड्याच मुदतीचा इशारा देऊन कामावरून दूर केल्यास त्याला काही नुकसानभरपाई मिळावयास हवी का ? शिस्तीच्या संदर्भात नौकरीवरून दूर केल्यास त्याला वरच्या अधिकाऱ्याकडे दाद मागणे शक्य आहे का ? या आणि अशा कारणांसाठी कामगार संघटना कामगारांच्या तक्रारी हाती घेतील व दूर न झाल्यास कामगार संपावर जातील. पण येथे सुद्धा वास्तविक कायद्याच्या राज्याची आवश्यकता आहे. अशा सर्व प्रश्नांची सोडवणूक करारानेच व्हायला पाहिजे. नोकरीच्या करारनाम्याबाबतची कुठलीच गोष्ट सर्वस्वी संचालनाच्या अधिकार कक्षेतील बाब असता कामा नये.

या देशात सामूहिक सौद्याची सर्वांगाने प्रगती होऊ शकली नाही, याला कामगार संघटना जेवढ्या जबाबदार आहेत तेवढाच मालकवर्गही जबाबदार आहे. त्यांचे सारे लक्ष राष्ट्रीय व जिल्हा पातळींवर मजुरी व कामाच्या तासाबाबत सर्व औद्योगिक क्षेत्रात काय करारनामा होतो यावर केंद्रित झालेले आहे. पण नोकरीतील व्यक्तिगत सुरक्षिततेबाबतचे प्रश्न कर्मशाळेपुरत्या मर्यादित करारनाम्यामुळेच परिणामकारकपणे सुटतील. कारण प्रत्येक व्यवसायक्षेत्रातील परिस्थिती वेगळी असते. नेमक्या याच बाबतीत सामूहिक सौद्याची सुप्त शक्ती तोकडी असते.

औद्योगिक लोकशाहीचे भवितव्य सामूहिक सौद्याच्या सर्वांगीण प्रगतीवर अवलंबित आहे हे निःसंशय. पण ते केवळ त्यावरच अवलंबून आहे असे नव्हे. ' सामूहिक सौदा ' हे नोकर आणि मालक यांच्यातील कराराचे नियमन करण्याचे एक साधन आहे. नोकरीच्या करारनाम्याप्रमाणे या प्रश्नाला सुद्धा दोन बाजू आहेत. पण प्रत्येक व्यावसायिक संस्थेत सर्व निरनिराळ्या दर्जाचे नोकर एकमेकांशी अनेक प्रकारच्या संबंधांनी निगडित आहेत. एकाच छपराखाली त्यांना एकत्र काम करावयाचे असते. एकाच संचालनाच्या शिस्तीने ते सारे बांधलेले असतात. परिणामी मानवी आणि संघटनात्मक संबंधाने प्रत्येक समाज घट्ट बांधलेला असतो. अशाच स्वरूपाच्या गुंतागुंतीच्या संबंधात ते सापडतात. येथेसुद्धा सत्तेच्या दुरुपयोगास आळा घातला पाहिजे आणि स्वतःशी संबंधित असलेल्या निर्णयात सहभागी होण्याची प्रत्येकास संधी हवी. अशा समाजात लोकशाहीचे स्वरूप कसे असू शकते ?

## कर्मशाळेतील लोकशाही

कामगारांचे नियंत्रण नाकारल्यामुळे, कामगारापर्यंत लोकशाही पोहचविण्याचे एक साधन म्हणून बराचशा कामगार संघटनांनी संयुक्त सल्लामसलतीच्या पद्धतीस संमती दिली आहे. युद्धकाळात नि तेव्हापासून संयुक्त सल्लामसलतीच्या आवश्यकते-

बाबत बरेच बोलले जात आहे. पण राष्ट्रीयीकरण झालेले उद्योगधंदे आणि प्रामुख्याने काही मोठ्या खासगी व्यापारीसंस्था सोडल्यास इतरत्र या कल्पनेने विशेष चंचूप्रवेश केलेला आढळत नाही. एवढेच नव्हे तर जेथे वेगवेगळ्या सल्लासमित्यांची वर्गवारी अस्तित्वात आली आहे, तेथेही कामगारांच्या दर्जात काही विशेष बदल झाला आहे वा अशा ठिकाणी कामगारांनी त्याबाबत चांगला प्रतिसाद दिला आहे, असे दिसत नाही.

संयुक्त सल्लामसलतीचे महत्त्व जोखण्याच्या कामी ज्या अडचणी उत्पन्न होतात त्यातील एक अशी, की या कल्पनेच्या अर्थाभोवती अनिश्चिततेचे वलय आहे. सामूहिक सौद्याच्या अगदी विरुद्ध म्हणजे याचा अगदी वाटेल तो अर्थ होऊ शकतो. संचालनाचे प्रतिनिधी आणि कामगार एकत्र मसलत करतात, पण ते कशाबाबत मसलत करतात व अशा प्रकारच्या त्यांच्या परस्पर मसलतीचे फलित काय असते? परस्पर सल्लामसलतीमुळे होते काय तर देवाणघेवाणीसाठी मार्ग खुला होतो. हा मार्ग कदाचित फार निरुंद असेल व अतिमर्यादित वहातुकच येथून होऊ शकेल. अथवा यामुळे खूप माहिती मिळेल, मते मांडली जातील; पण या साऱ्याच संचालनानी प्रत्यक्षात घेतलेल्या निर्णयावर काही परिणाम होणार नाही.

संयुक्त सल्लामसलतीच्या साहाय्याने काय काय साध्य करायचे आहे हे समजले, म्हणजे त्याचा व्यवहारातला अर्थ ठरेल. पण हे उद्देशच मुळी स्पष्ट नाहीत. संयुक्त सल्लामसलतीच्या पाठीराख्यांच्या तऱ्हा खूप आहेत. कामगारांच्या नियंत्रणाचे उद्दिष्टच साध्य करून घेण्याचे एक साधन म्हणून त्याच्याकडे बघणाऱ्यापासून तो दुसऱ्या टोकाला या पद्धतीचा अवलंब केल्यास शेवटी कामगार संघटनाच अनावश्यक ठरतील असा विश्वास बाळगणारापर्यंत ते आढळतात. सरकार, मालकवर्ग आणि मजूर संघटना यांच्यामध्ये संयुक्त सल्लामसलत व्हावी या हेतूने महायुद्धानंतरच्या काळात प्रचार करण्यात आला, तो प्रामुख्याने याच कल्पनेवर आधारित होता की उत्पादनक्षमता वाढविण्यास संयुक्त सल्लामसलती कितपत उपयुक्त होऊ शकतात, यावरच त्यांचे यश अगर अपयश अवलंबून राहील.

हीच मूळ कल्पना थोड्याफार फरकाने अनेक प्रकारे मांडलेली आहे. कधी सल्लामसलत म्हणजे उत्पादन वाढीसाठी कामगारांच्या सूचना जाणून घेण्याची यंत्रणा—सूचना पेटीस एक गोंडस पर्याय—असेही मानले जाते. क्वचित व्यवस्थापनाच्या कार्यात कामगारांना विश्वासात घेऊन कारखान्याच्या भरभराटीच्या कामी त्यांनी अधिक उत्साहाने रस घ्यावा म्हणून वापरावयाचे साधन—नफ्यातील भागीदारी पद्धतीचा एक हलका पर्याय—असाही अर्थ लावलेला आढळतो. तांत्रिक क्षेत्रात नव्या नव्या क्लृप्त्या निघाल्याने निर्माण होणारा संघर्ष कमी करण्याचे संयुक्त सल्लामसलत हे एक साधन आहे, असे मानणारा एक शिष्ट संमत (सोफिस्टिकेटेड) दृष्टिकोणही आहे. उत्पादकतेच्या विचाराने भारावलेल्या यापैकी कुठल्याही संयुक्त मसलतीच्या

अर्थानुसार कामगारांनी निःशंकपणे औद्योगिक संस्थांची प्रचलित ध्येये मान्य करावीत व या ध्येयानुसार कामगारांच्या हितास कितीही कमी किंमत दिलेली असो, त्यांनी व्यवस्थापकांशी अशा ध्येयाच्या सिद्धीसाठी सहकार करावा, अशी अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत कामगारांना जेव्हा केवळ खुशामत करण्याचेच काम दिले जाते तेव्हा अशा सल्लामसलतींबाबत कामगार अधिक उत्साह दाखवित नाहीत, याचे आश्चर्य वाटण्यासारखे काही आहे का ?

अशा प्रकारच्या संयुक्त सल्लामसलतीचा आणि औद्योगिक लोकशाहीचा अर्थाअर्थी काही संबंध नाही, किंबहुना औद्योगिक एकाधिकारशाहीच्या पद्धतीतील बदल, असेच याचे वर्णन करता येईल. पूर्वी व्यवस्थापकांना आपल्या अधिकाराच्या वापरासाठी प्रामुख्याने भीती आणि विचारहीन आज्ञापालन यावरच भरंवसा ठेवावा लागे. वरपासून खालपर्यंत कनिष्ठांवर वरिष्ठ आपले वर्चस्व गाजवित आणि तेही कुणी का म्हणून विचारता कामा नये अशा प्रकारे. सदोदित एक प्रकारचे दडपण असे, ज्याचा अंतिम परिणाम म्हणजे नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी. सर्वांनाच कामकाज मिळण्याची सोय असल्यामुळे आता या जुन्या पद्धतीचा प्रभाव कमी झाला आहे. सम्मती इतक्या सहजतेने लादता येत नसल्यामुळे ती मन वळवून मिळवावी लागते. मग सारा भर शिक्षेऐवजी बक्षिसांवर दिला जातो. अथवा नवीन पद्धतीनुसार सांगायचे झाल्यास 'प्रोत्साहनावर' भर द्यावा लागतो. कामगारावर दडपण आणणे शक्य नसेल तर अन्य मार्गाने त्याला वळवावयास हवे. आपण करीत असलेल्या कामातून कामगारास कितपत आनंद मिळतो याचा अभ्यास केल्यास उत्पादन वाढविता येते, हे चतुर व्यवस्थापकांना आता पटायला लागले आहे. 'मानवी संबंधा' वरील क्रमिक पुस्तकांचे आवर्जून वाचन होत आहे. अमेरिकन कामगार संघटनांनी अशा प्रकारच्या अभ्यासाला मार्मिक नाव दिले आहे. "गाईचे समाजविज्ञान" किंवा गाईंना सुखासमाधानात वाढवून दुधाचा पुरवठा कसा वाढवायचा यासंबंधीचे तंत्र. कामगार हा माणूस हे खरेच. पण तो माणूस आहे या कारणास्तव त्याचा दुसऱ्याच्या सूक्ष्म प्रयोगाचे साधन म्हणून उपयोग करणे म्हणजे त्याच्या प्रतिष्ठेचा अपमान करणेच होय.

ज्या व्यवस्थापनाच्या पद्धतीत माणूस म्हणून कामगाराच्या प्रतिष्ठेचा पुरेपूर आदर होत नाही अशी पद्धती लोकशाही या नामकरणास योग्य नाही, हाच महत्त्वाचा कस आहे. प्रत्येक कामगार हा माणूस आहे, साधन नव्हे. ही साधी गृहीत गोष्ट एकदा मान्य केली की सल्लामसलत हा एक हक्क बनतो. सल्ला घेतला जावा ही नैतिक मागणी आहे. आणि ही मागणी आर्थिक परिणामापासून स्वतंत्र आहे. कामगारांचा सल्ला घेतल्यास तो अधिक उत्साहाने काम करील, असा विश्वास बाळगण्यास भरपूर आधार आहे; पण वाढीव उत्पादनक्षमता हा अपेक्षित परिणाम आहे, त्याचे हित ध्यानात घ्यावे यासाठी केलेले ते समर्थन नव्हे.

सल्लामसलत करणे हा हक्क खरा; पण कशा प्रकारची सल्लामसलत? कामगारांना त्याचे मतप्रदर्शन करावयास सांगणे व त्यातील योग्य वाटतील त्या सूचनांचा व्यवस्थापकांनी विचार करणे, एवढ्याने भागण्यासारखे नाही. यामुळे व्यवस्थापकांना कदाचित आपल्या धोरणास कामगारांचा पाठिंबा मिळविणे शक्य होईल पण कामगारांच्या दृष्टीने हे कामाचे नाही. केवळ आपला सल्ला घ्यावा, यात त्यांना विशेष रस नाही; आपल्या सल्ल्यानुसार निर्णय घेतले जावेत, या गोष्टीत त्यांना अधिक रस आहे. असे करण्यात त्यांना यश आले तरच परिणामांची जबाबदारी पत्करण्याची त्यांना आवश्यकता भासेल. क्रियाशून्य सम्मती नव्हे तर प्रत्यक्ष सहभागी होणे, हाच लोकशाहीचा गाभा आहे. सल्लामसलतीचा अधिकार याचा अर्थ निर्णायक सल्ला देण्याचा अधिकार असाच असला पाहिजे. यात काहीही कमी पडले तर त्यामुळे फायद्यापेक्षा नुकसानच अधिक आहे. खोट्या अपेक्षा वाढवून त्यांचा चक्काचूर करण्यामुळे व सहभागी करून घेण्याचा आभास निर्माण केल्यामुळे असंतोष अधिकच वाढतो.

सल्लामसलतीद्वारा जबाबदार सहकार्य कसे साधायचे? हा प्रवास तितका सोपा नाही; कारण औद्योगिक व्यवस्थापनासाठी अधिकार व्यवस्था अतिशय स्पष्ट व आखीव असणे आवश्यक आहे. कुठलाही व्यवसाय यशस्वीपणे चालवायचा असेल अथवा किमानपक्षी दीर्घकाळ जगवायचा असेल तर आदेश दिले पाहिजेत व त्यांची कार्यवाही व्हायला हवी. केवळ याचमुळे कर्मशाळेतील लोकशाहीस बहुमताने चालवावयाच्या शासनाचे स्वरुप देता येत नाही. यामुळे अनामिक बहुमताच्या पाठीशी लपून आपली जबाबदारी टाळणे व्यवस्थापकांना शक्य होईल. दुसऱ्या एका कारणासाठी व्यवस्थापकांनी आपली जबाबदारी पुरेपूरपणे सांभाळली पाहिजे. कारखान्यात काम करणारे आणि त्यांचा माल विकत घेणारे ग्राहक आणि आर्थिक नियोजनाच्या चौकटीच्या संदर्भात सर्व समाजाचे ते ऋणी आहेत.

तेव्हा जबाबदारी टाकून न देता भागीदारीत सांभाळायची हा मुख्य प्रश्न आहे. हे शक्य होईल वा नाही, हे तीन गोष्टींवर अवलंबून आहे. प्रथम असे की हे व्यवस्थापन अधिकाराच्या प्रत्यक्ष रचनेवर अवलंबित आहे. अधिकाराची लोकशाही रचना ही उंच नि अरुंद नसून रुंद नि पसरट आहे. अधिकाराच्या अरुंद शिडीवर अगदी वरच्या बाजूस सारे निर्णय होत नाहीत. तर त्यांचे विकेंद्रीकरण करून बाहेरील लोकांसही पुरेपूर प्रमाणात प्रातिनिधिक स्वरूपाचे अधिकार दिलेले असतात. अधिकाराचे क्षेत्र जितके पसरट तितके प्रत्येक पातळीवर ज्यांच्यावर अशा निर्णयांचा परिणाम होणार असतो अशांना निर्णय घेण्याच्या कामी सहभागी करून घेण्याची शक्यता अधिक. असे झाल्यास प्रत्येक व्यवस्थापकास तो जसा त्याच्या वरिष्ठांच्या भागीदारीत जबाबदारी स्वीकारतो, तसेच आपल्या कनिष्ठांच्या

भागीदारीत जबाबदारी स्वीकारणे शक्य होईल. या अर्थाने अधिकाराचे स्वरूप लोकशाही नसेल तर वरिष्ठांना कनिष्ठांवर वर्चस्व गाजविणे भाग पडेल. अशा साखळीतील प्रत्येक फासावरून आलेले व जे निर्णय घेण्याचे कामी त्यांना कुठलाही अधिकार नव्हता व नाही असे निर्णय, आपल्या खालील नोकरावर लादत असतो. अधिकारशाही स्वरूपाच्या शासनास आवश्यक असलेल्या सर्व गुणांची मग अशांच्या-कडून अपेक्षा केली जाते.

हे नक्कीच की सर्वच व्यवस्थापकीय निर्णय तावडतोब प्रत्येक कामगाराच्या आवाक्यात आणता येणे शक्य नाही. अगदी ते ज्या पातळीवर काम करतात त्या पातळीवर घेतलेल्या सर्व निर्णयांबाबतही त्यांना सहभागी करून घेणे शक्य नाही. मग वरच्या पातळीविषयी बोलणेच नको. यासाठी औपचारिक समित्यांची पद्धती आवश्यक आहे. जबाबदार सहभाग ज्यावर अवलंबित आहे अशी ही दुसरी अट. व्यवस्थापनाच्या रचनेत समांतर अशी एक प्रातिनिधिक समित्यांच्या रचनेची आवश्यकता आहे. म्हणजे किमानपक्षी विशिष्ट पातळीवरच्या अधिकार क्षेत्राखाली येणाऱ्या सर्वांना त्या पातळीवर घेण्यात येणाऱ्या निर्णयात सहभागी होता येईल.

तिसरी गोष्ट या समित्यांची घटना नि त्यांच्या कार्यक्रमासंबंधी आहे. कर्मचाऱ्यांची जमात ही अनेकांगी असते. संयुक्त सल्लामसलतीमध्ये असतात तसे येथे केवळ व्यवस्थापक व कामगार असे दोनच विभागांचे हितसंबंध जुळवून घ्यायचे नसतात. तंत्रज्ञ, मुकादम, कार्यालय, सेवक तसेच शारीरिक श्रम करणाऱ्या कामगारांचे नरनिराळे समूह, अशा कामगारांच्या निरनिराळ्या श्रेणींचे सांघिक हितसंबंधा यात गुंतलेले असतात. यातील प्रत्येक समूहास स्वतंत्रपणे निवडलेल्या प्रतिनिधींद्वार प्रतिनिधित्व दिले पाहिजे. म्हणजे अशा प्रातिनिधीस त्या समुहातील सदस्यांना जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या प्रश्नांना तोंड फोडता येईल.* शिवाय ज्यांना संघटनेचा पाठिंबा आहे अशाच प्रतिनिधींना पसंत केले जावे. कारण संघटनेचा पाठिंबा नसेल तर त्यांच्या मतांना पुरेसे महत्त्व दिले जाणार नाही.

अधिकाराच्या प्रत्येक पातळीवर प्रातिनिधिक समित्यांचा त्या पातळीवर घेतल्या जाणाऱ्या निर्णयांशी संबंध राहील, हे खरे असले तरी संयुक्त सल्लामसलतीने सोडवावयाचे प्रश्न वगळल्यास इतर कोठलेही प्रश्न एकतर्फीपणाने क्रमणिकेवरून

---

* उत्पादनाच्या किंवा सल्लागार समितीच्या द्विपक्षी पद्धतीचा एक परिचित परिणाम असा आहे की काही औद्योगिक संस्थात मुकादमांवर ( Foreman ) त्याचा विपरित परिणाम होतो, असे आढळून आले आहे. वरिष्ठ व्यवस्थापकीय अधिकारी आणि सुसंघटित मजूरांचा प्रतिकार या दोन पात्यांत ते भरडून निघतात आणि त्यांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष होते. इतकेच नव्हे तर त्यांचे स्थान नेहमीच डळमळीत राहते.

काढले जाऊ नयेत. काही विशिष्ट माहितीबाबत कामगारांच्या प्रतिनिधींवर विश्वास ठेवणे शक्य नाही अथवा काही विशिष्ट निर्णय हे केवळ संचालनाच्या कक्षेतच घेतले जावेत हे गृहीत धरताक्षणीच समानपातळीवरचा सहकार अशक्य होतो. दुय्यम दर्जाचे नागरिकत्व राजकीय क्षेत्रात जेवढे अपमानास्पद आहे तितकेच ते औद्योगिक क्षेत्रातही आहे. काही व्यावसायिक गुपिते सांभाळावयाची असतील तर ती व्यवस्था परस्पर संमतीने करता येणे शक्य आहे. संसदेच्या सम्मतीने संरक्षणात्मक गुपिते सांभाळली जातात ती ह्याच पद्धतीने.

या तीन गोष्टींतून औद्योगिक लोकशाहीसाठी संभाव्य संघटनात्मक चौकट सुचविली जाते. कामगारांना व्यवस्थापकीय निर्णयात सहभागी व्हायचे आहे, असे यात गृहीत धरले आहे. पण औद्योगिक लोकशाहीबाबत कुठलीही सूचना मांडली की ठराविक आक्षेप घेतला जातो–की, कामगारांनाच मुळी यात रस नाही. हे खरे की आपल्या उद्योगसंस्थेचे निर्यात धोरण काय असावे किंवा आपणास लागणारा कच्चा माल खरेदी करण्याबाबत काय व्यवस्था असावी, याबाबत आजच्या बहुतांशी नोकरदारांना खास आस्था असणार नाही. वास्तविक या दोहोंवर त्याची नोकरीतील सुरक्षितता अवलंबित आहे. तरी असे का ? जे केले जाते त्यावर त्यांना ताबा नाही, एवढेच नव्हे तर ज्याच्या आधारावर त्यांना काही मते बनविता येतील अशी माहिती-सुद्धा त्यांच्या कक्षेबाहेर असल्यामुळे कदाचित अशा गोष्टींत रस घेण्यात अर्थ नाही, अशी त्यांची भावना असेल. आपल्या कामाच्या स्वरूपाबाबत वा कार्यस्थळाच्या सभोवतालच्या परिस्थितीबाबत काही सांगावयाचे नाही असे फारच थोडे. नेमक्या वरील गोष्टींतच कामगारांना काही सांगावयाचे आहे, आणि त्यांना तसे सांगू दिले नाही तर ते दुसऱ्या कुठल्याही गोष्टीबाबत रस घेतील, अशी अपेक्षा करणे चूक होईल.

प्रत्येक कामगारास प्रत्येक निर्णयात सहभागी व्हायचे आहे, हा काही वास्तव-वादी दृष्टिकोण नव्हे. पण बऱ्याचजणांना ज्या निर्णयाचा आपल्यावर प्रत्यक्ष परिणाम होतो, अशा निर्णयात सहभागी होण्याची इच्छा आहे. असे निर्णय घेतल्याने जबाबदार सहकार वाढीस लागणार आहे. येथे सुद्धा प्रत्येक कामगार मिळालेल्या संधीचा उपयोग करील असे नाही. प्रत्येकजण समितीचा सदस्य असेलच वा कधी होईलच असे नाही. रोजचे काम करताना त्याला जी वागणूक मिळेल त्यावरूनच बरेचसेजण औद्योगिक लोकशाहीचे व्यावहारिक अर्थ लावतील. पण अधिकाराच्या उच्च पातळीवरील व्यवस्थापक व मुकादम यांच्यावर कामगारांचे प्रतिनिधी कशी छाप पाडतील यावरच त्यांना वास्तवात मिळणारी वागणूक अवलंबून राहील. औपचारिक संबंधाच्या स्वरूपातूनच अनौपचारिक स्वरूप घडविले जाईल. लोकशाही नेहमी अशीच चालते.

औद्योगिक लोकशाहीचे विरोधक आणखी एक आक्षेप घेतात. त्यांचे म्हणणे असे की, कामगार फक्त आपल्या हक्कावाबत जागरूक आहेत. पण आपल्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यास ते तितकेसे उत्सुक नाहीत. ही समस्या निश्चित खरी आहे. लोकशाहीच्या सर्वच प्रकारात ही समस्या अटळ आहे. हक्क आणि कर्तव्य यांचा जोडीनेच विचार झाला पाहिजे. कर्तव्याचा स्वीकार न झाल्यास हक्कावर गदा येते. उलटपक्षी हक्क नाकारल्यास कर्तव्याची जाणीवच नष्ट होईल. आणि यात काही नवल नाही. लोकशाहीवर ज्यांची श्रद्धा आहे ते हा धोका पत्करण्यास तयार आहेत. कारण "हक्क ही नाही व कर्तव्यही नाही" हा पर्याय सर्वस्वी अमान्य होण्यासारखा आहे, हे त्यांना माहीत आहे.

कुठल्याही स्वरूपाची सल्लामसलत ज्यांना अपुरी वाटते, अशा औद्योगिक लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनी एक वेगळीच अडचण उपस्थित केली आहे. अंतिम अधिकारांवर परिणामकारक नियंत्रण अवलंबून असते असे त्यांचे म्हणणे, राजकीय क्षेत्रात हा अधिकार मतदानाच्या हक्काद्वारा मिळतो. असमाधानकारक सरकारास मतांच्या जोरावर खुर्चीवरून खाली ओढता येते. औद्योगिक क्षेत्रात असा अधिकार कोठे आहे ? असे समजा की वाटेल ती औपचारिक व्यवस्था केलेली असली तरी व्यवस्थापक आपल्या मर्जीनुसार वागायला लागले तर त्यांना थोपवायचे कसे ? सल्लामसलतीनंतरही परस्पर संमतीने ठरविलेल्या गोष्टी त्यांनी जर झुगारून दिल्या तर नोकर त्यांचे काय करू शकतील ? प्रत्यक्षात कामगारांकडे एक अंतिम, निरुत्तर करणारा अधिकार आहे; तो– आपल्या पायांच्या साहाय्याने म्हणजेच काम सोडून निघून जाण्याने –मतप्रदर्शन करू शकतो. व्यक्तिशः अथवा सामुदायिकरित्या काम करण्यास नकार देऊन तो व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवू शकेल. सर्वांना रोजगार आणि बळकट कामगार संघटना या गोष्टी साध्य झाल्यास कामगारांना आपल्या हक्कांचे आग्रही प्रतिपादन करण्यास लागणारी शक्ती निश्चितच तोकडी पडणार नाही.

## नेतृत्व–कायदा नव्हे

जबाबदार वृत्तीने कामगारांनी औद्योगिक कामकाजात सहभागी व्हावे अशी व्यवस्था करायची असेल तर ती कायद्याने लादून जमणार नाही. कशाही प्रकारची व्यवस्था सुरू केली असली तरी लोकांनी तिचा फायदा घ्यावा, अशी सक्ती करता येणार नाही. मग योग्य त्या भावनेने अशा व्यवस्थेचा स्वीकार करणे हे दूरच राहिले. तेव्हा सर्व औद्योगिक क्षेत्रात काही झाले तरी कुठल्याही परिस्थितीत न्याय्य ठरेल, अशा प्रकारचा समाधानकारक कायदा करता येईल हे असंभवनीय. याचा अर्थ याबाबत कायद्याचा काहीच उपयोग नाही असे नव्हे. उदा० जेव्हा आधारभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले, त्यावेळेस अशा उद्योग संस्थांच्या संघटनात्मक

रचनेचा ढोबळ आराखडा कायद्यानेच ठरविण्यात आला. आणि संयुक्त सल्लामसलतीची व्यवस्था करणे हे बंधनकारक करण्यात आले. पण औद्योगिक संस्थेच्या अंतर्गत व्यवस्थेला व कामकाजाला आकार देणे हे कायद्याच्या आवाक्यातले नाही. कारखान्यात घडते ते सर्वस्वी प्रत्यक्षपणे संबंधित असलेल्यांच्या कृतीवरच अवलंबून असते.

मग जबाबदार वृत्तीने सहभागी होण्याची लोकशाही औद्योगिक क्षेत्रात कशी प्रस्थापित करता येईल ? आपण सध्या अनुसरत असलेली सामूहिक सौद्याची पद्धत ही सुद्धा कामगारांच्या अनेक कडव्या झगडयांची परिणती आहे. कर्मशाळेत लोकशाही रुजावी, यासाठी कामगार संघटनांना तितकीच महत्त्वाची कामगिरी बजावयाची आहे. अखेरीस या संघटना कामगार म्हणून उपजीविका करणाऱ्या असंख्य स्त्री-पुरुषांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनाच असतात. या संघटना जर आपली शक्ती केवळ रोजगार वाढवून घेण्यास व कामाचे तास कमी करून घेण्याचे कामी वापरण्यास समाधान मानू लागल्या आणि आपल्या सभासदांच्या कार्यकारी जीवनाच्या दर्जाकडे दुर्लक्ष करू लागल्या तर सध्या अस्तित्वात असलेल्या सामुहिक सौद्याच्या पद्धतींची उपयुक्तता पुरेशी आहे असे म्हणावे लागेल. यामुळे कामगार बऱ्यापैकी सौदा करण्यात यशस्वी होतील पण ते त्यांचा दर्जा सुधारू शकणार नाहीत. त्यांच्या संघटनांनी त्यांच्यासाठी उच्च दर्जाची मागणी केल्याशिवाय मालक त्यांना त्यांचा दर्जा केवळ भेट म्हणून सुधारून देतील हे शक्य दिसत नाही.

आज अशी परिस्थिती आहे की कामगाराचे हक्क व जबाबदाऱ्या वाढवून घेण्यासाठी जो लढा द्यायचा आहे त्यासाठी लागणारी सारी ताकद कामगार संघटनापाशी आहे. कमतरता असेल तर ती प्रयोजनाची आहे. या सर्व लोकशाही संघटना असल्यामुळे सभासदांना त्यांच्या उदासीनतेबद्दल दोष देणे नेतृत्वास सोपे जाते. पण ही सबब फार लंगडी आहे. नेतृवाने नेतृत्व करावे हेच त्यांचे कार्य. कनिष्ठ दर्जाचे म्हणून त्यांना मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीमुळे बरेचसे कामगार आज प्रक्षोभित झाले आहेत. पण नेतृत्वाच्या अभावामुळे– जे नेतृत्व केवळ त्यांच्या संघटनाच देऊ शकतील–हा प्रक्षोभ पारंपरिक पद्धतीने आणखी एखादी रोजगार वाढीची मागणी करून वा दिशाहीन बेकायदेशीर संप करून व्यक्त केला जातो.

कामगार संघटनांना या लढ्याचे नेतृत्व करावयाचे असेल तर त्यांनी आपले लक्ष प्रातिनिधिक ( संसदिय ) सभागृहावरून कारखान्यांवर केंद्रित करावयास हवे. खऱ्या स्पर्धा त्या क्षेत्रात व्हावयास हव्या. अशाने कार्यस्थळावरील कामगारांचे प्रतिनिधीच्या– मग त्याला कर्मशाळेतील उपस्थापक म्हणा वा अन्य काही नाव द्या– भूमिकेचे महत्त्व स्पष्ट होईल. औद्योगिक लोकशाहीच्या संदर्भात आम्ही म्हटलेले आहे की त्यासाठी व्यवस्थापकांच्या बाजूचा निर्णय घेण्याच्या कामी विकेंद्रीकरणाची आवश्यकता आहे. कामगार संघटना बाबतही तेच आवश्यक आहे.

या देशातील अनुभव असा आहे की कामगार संघटना आणि त्यांचे कर्मशाळेतील उपस्थापक यांच्यातील परस्पर संबंध नेहमीच समाधानकारक राहिलेले नाहीत. कर्मशाळेतील उपस्थापकांच्या अनधिकृत चळवळीला आणि कामगार संघटनांचे महत्त्व कमी करण्यासाठी कार्यकारी समित्यांचा उपयोग करण्याचे मालकांचे प्रयत्न यामुळे, भूतकाळात कामगार संघटना, कर्मशाळेतील कारभाऱ्यास विशेष वाव देण्यास राजी नसत. युद्धानंतरच्या काळात जी अनधिकृत संपाची लाट आली आहे त्यामुळे तर त्यांची चिंता कुठल्याही प्रकारे कमी झालेली नाही. पूर्णवेळ काम करणाऱ्या कामगार संघटनांच्या कार्यकर्त्यांवर जसे नियंत्रण ठेवता येईल तसे कार्यालयातील कारभाऱ्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणे कामगार संघटनांच्या दृष्टीने सोपे नाही. परंतु अशा कामातील अडचणींना अतिरंजित स्वरूप दिले जाणे शक्य आहे. संघटनेच्या धोरणाविरुद्ध गेल्यास, संघटनेतून हकालपट्टी करण्याचा एक निर्वाणीचा उपाय आहे. आणि आजच्या संदर्भात ही धमकी फार कडक आहे. पण सर्वसाधारणपणे संघटनाच जर प्रखर लढ्याचे नेतृत्व करणार असेल तर कर्मशाळेतील प्रतिनिधी कुठल्याही अनधिकृत लढ्यात सहभागी होतील हे संभवत नाही. बऱ्याच वेळा संघटनाच नेतृत्व करण्यास पुढे येत नाहीत अथवा हे प्रतिनिधी काय करतात याकडे पुरेसे लक्ष देत नाहीत आणि ते कर्मशाळेतील लोक दुसरीकडे कुठे आपल्या कृतीस पाठिंबा मिळतोय का याचा कानोसा घेऊ लागतात.

प्रत्येक समस्येबाबत निरनिराळ्या कर्मशाळात अनुसरण्याच्या धोरणाचा तपशीलवार आराखडा आखणे हे संघटनेस शक्य नसते. पण बऱ्याचशा गोष्टींबाबत ते तात्त्विक भूमिका घेऊ शकतात. आणि तपशीलासाठी कर्मशाळेतील प्रतिनिधींशी निकटचा संपर्क ठेवणे यावरच त्यांनी भर दिला पाहिजे. हा प्रश्न काही अंशी संघटनात्मक स्वरूपाचा आहे. पण बऱ्याचशा अंशी शैक्षणिकही आहे. हक्काच्या प्रतिपादनासाठी कामगार बंधूंनी सुरू केलेल्या लढ्याचे नेतृत्व करण्यास नव्हे तर तत्संबंधीत कर्तव्येसुद्धा ज्याला मान्य आहेत अशा नव्या प्रकारच्या लढाऊ कामगारांची आवश्यकता आहे. कारण कर्मशाळेतील प्रतिनिधी सुद्धा शेवटी कामगार संघटनेचेच प्रतिनिधी असतात व त्यांना लाभलेली शक्ती सुद्धा संघटनेमुळेच असते. तेव्हा या नव्या नि अनेक प्रकारे अवघड भूमिका झेपण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी संघटनेने स्वीकारावयास हवी.

कामगार संघटनांच्या नेतृत्वाखाली आणखी खूपच गोष्टी साध्य होण्यासारख्या असल्या तरी सर्वच गोष्टी त्यामुळे साधतील असे नाही. व्यवस्थापकीय अधिकाराचे स्वरूप बदलणे अथवा व्यवस्थापनाचे स्वरूप लोकशाही असावे या हेतूने व्यवस्थापकांची निवड करणे व तद्नुसार त्यांना शिक्षण देणे या गोष्टी कामगार संघटनेच्या आवाक्यातील नाहीत. याबाबतीत संचालनानेच पुढाकार घेतला पाहिजे.

वास्तविक खासगी उद्योगक्षेत्रात नवे आदर्श पुढे ठेवण्याचे आद्यकार्य जर संचालनाने करावयाचे ठरविले तर कसलेही अडथळे होणार नाहीत. रॉबर्ट ओवेनच्या नंतर अधून मधून असे घडलेही आहे. औद्योगिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी अस्सल प्रयोग करण्यात राष्ट्रीयीकरण झालेल्या औद्योगिक संस्थांच्याही निश्चितपणे पुढे असलेल्या अशा आज एक दोन खासगी उद्योगसंस्था आढळतात. भागधारकांच्या नफ्याचा हिस्सा द्यावा लागतो, एवढ्यामुळेच एकतंत्री संचालन व्हावे हे बरोबर वाटत नाही. खासगी उद्योगसंस्थांतूनही नफ्याच्या हेतूस कमी महत्त्व दिले जाऊ लागल्यामुळे येथील व्यवस्थापनात नवे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खासगी उद्योगसंस्थेत वैयक्तिक पातळीवर प्रयोग करणे शक्य होते व अशा प्रयोगांना नंतर सार्वत्रिक पाठिंबा मिळण्याची शक्यता निर्माण होते; हा एक खासगी उद्योगसंस्थांच्या समर्थनार्थ मांडण्याजोगा मुद्दा आहे.

तरीसुद्धा सर्वसाधारणपणे खासगी उद्योगसंस्था स्वतः पुढाकार घेऊन या बाबतीत नवीन प्रयोग सुरू करतील अशी आशा बाळगता येणार नाही. उद्योग-संस्थांतील व्यवस्थापकांना फक्त भागधारकच जाब विचारू शकतात. पण नफ्याचा हिस्सा सुरक्षित असल्यास भागधारकांना विशेषतः संस्थेच्या अंतर्गत व्यवस्थेबद्दल खास आस्था नसते. सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांची गोष्ट वेगळी आहे. तेथे सरकारच पुढाकार घेऊन काही करू शकेल. सर्वोच्च व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करणे वा बडतर्फी करणे हे सरकार ठरवू शकते, ते व्यवस्थापनाची पद्धती बदलू शकते. कामगारांशी पूर्ण सल्लामसलत व्हावी असा आग्रह धरू शकते. हळू हळू निवड व प्रशिक्षण यावर भर देऊन ज्याला दुसऱ्यांचा सहभाग हवा असतो व तो मिळवावा कसा हे सुद्धा माहित असते, असा नव्या प्रकारचा व्यवस्थापक सरकारला तयार करता येईल आणि सार्वजनिक उद्योगांचे संचालन संसदेला जबाबदार असल्या-मुळे खरोखरीच नवे आदर्श प्रस्थापित केले जाताहेत वा नाही हे तपासून पाहणे संसदेस शक्य होते. लोकोद्योगांचे वा सार्वजनिक उद्योगसंस्थांचे हे प्रमुख कार्य आहे असे मानले पाहिजे.

सार्वजनिक उद्योग व खासगी उद्योग या दोहोंच्या संदर्भात आणखी एक तिसरी शक्यता आहे. व्यावसायिक संघटनांच्या वाढीतून कदाचित संचालकांना आपला दर्जा सुधारणे शक्य होईल. इतर काही व्यवसाय क्षेत्रात असे झाले आहे. यापैकी प्रत्येक क्षेत्रात काही काळानंतर "व्यावसायिक नीती" या कल्पनेचे बीज चांगलेच रुजलेले आढळते. तथापि अद्यापही संचालकाची अशी काही खास नीती नाही. अथवा वर्तणुकीविषयी कुठलीही सुस्पष्ट व आखीव प्रमाणे नाहीत. वास्तवात व्यवस्थापन हा एक व्यवसाय आहे यावरसुद्धा एकमत आढळत नाही. तथापि लक्षावधी लोकांच्या जीवनावर—सुखासमाधानावर व्यवस्थापकांचा जो पगडा आहे

तो तुलनेने डॉक्टर वा वकील लोकांच्या सारखाच आहे. या क्षेत्रात शिरणाऱ्या-जवळ केवळ तांत्रिक क्षमतेपेक्षा अधिक काही हवे. म्हणून आपल्या व्यावसायिक प्रतिष्ठेचा सांभाळ करणे व स्वत:ची काही नवी व्यावसायिक प्रमाणे निर्माण करणे ही जबाबदारी व्यवस्थापकांवर पडते.

उद्योगसंस्थांचे लोकशाहीकरण करण्याच्या या तीन शक्यता केवळ शक्यताच आहेत. कामगार संघटनांच्या काय अपेक्षा आहेत, समाजाच्या काय अपेक्षा आहेत व संचालनाच्या स्वत:कडून काय अपेक्षा आहेत हे सारे कुठली मूल्ये प्रत्येकजण उराशी बाळगतात यावर अवलंबून राहील. आज तरी कामगार संघटनांना मान्य असलेली मूल्ये व इतर सर्व समाजास मान्य असलेली प्रचलित मूल्ये यात फार मोठा फरक नाही. कमाई करणे ही ज्यांची ख्याती आहे अशी संचालने सुद्धा समाजाच्या चालीशी आपली चाल जुळवून घेण्यास तयार आहेत. मानवी मूल्यांचे श्रेष्ठत्व अमान्य केले जाते आहे असे नव्हे; पण ही मूल्ये उद्योगसंस्थांच्या संदर्भात असंबद्ध आहेत वा साध्य होण्याजोगी नाहीत अशी भावना आहे.

औद्योगिक लोकशाहीच्या दिशेने प्रगती कशी करायची, या प्रश्नाच्या मुळाशी असलेल्या पेचप्रसंगात आपण येऊन पोहोचतो. जबाबदारीच्या जाणिवेने सहभागी होऊन कामगारांनी आपली छाप निर्णयावर पाडल्याखेरीज, उद्योगसंस्थांचे ध्येय आणि त्यांचे कामगारांसमवेतचे संबंध बदलणे कदापिही शक्य नाही. याउलट जोपर्यंत उद्योगसंस्थांची उद्दिष्टे बदलत नाहीत तोपर्यंत अशी उद्दिष्टे सफल करण्यासाठी कामगारांनी का म्हणून जबाबदार सहकार करावा? त्यांच्याकडून अशी अपेक्षा करणे म्हणजे गुलामराष्ट्रांनी साम्राज्यवाद यशस्वी होण्यासाठी हातभार लावावा अशी अपेक्षा करण्यासारखेच आहे. तेव्हा आपण कार्यकरणाच्या दुष्ट चक्रात सापडल्यासारखे दिसतो आहोत. यामुळे काही फलनिष्पत्ती होत नाही म्हणून दोन्ही बाजू निराशावादी होतात. कामगारांना जबाबदारी स्वीकारावयास नको म्हणून संचालने त्यांच्यावर ठपका ठेवू शकतात आणि हक्क न देता केवळ जबाबदारीच लादण्याचा लटका प्रयत्न करतात म्हणून कामगार संचालनांवर ठपका ठेवू शकतात.

पण दुष्ट चक्राचा छेद करणे शक्य आहे. निराशाजनक दृष्टिकोन स्वीकारून कुठलाही बदल करण्यास विरोध करणे, या विचाराशी जे थोडे लोक असंमत असतात व जे स्वत:च्या वर्तनाने बाह्यत: ह्या अशक्य वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात कशा शक्य आहेत हे सिद्ध करतात, तेच या दुष्ट चक्राचा छेद करतात. नेतृत्वाचे हेच सार आहे. सरकारकडून सार्वजनिक उद्योगसंस्थांमध्ये संचालने व विशेषत: कामगार संघटनांकडून आज औद्योगिक क्षेत्रात अशा प्रकारच्या नेतृत्वाची अपेक्षा आहे. अशा नेतृत्वाच्या विरोधासाठी परंपरा, आळस, सर्व तुच्छतावाद, यांची भिंत उभी आहे.

भाग तिसरा

# समाजवादी अर्थव्यवस्था

## ११. सर्व प्रश्नांचे मूळ

आपण चर्चेत घेतलेले सर्व उपाय, मग ते आर्थिक सुरक्षिततेच्या, न्याय्य हिस्से देण्याच्या, विकसनशील अर्थव्यवस्थेच्या अथवा औद्योगिक लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करण्याबाबतचे असोत, आर्थिक सत्ता सामाजिक नियंत्रणाखाली कशी आणावी या मूलभूत समस्येशी संबंधित आहेत. समाजवादी विचाराच्या मूळाशी हाच प्रश्न आहे, हे नेहमीच मान्य झालेले आहे.

आर्थिक सत्ता म्हणजे काय ? प्रत्येक अर्थव्यवस्थेत– मग ती अर्थव्यवस्था कुठल्याही प्रकारची असो–अनेक प्रकारची आर्थिक अथवा मर्यादित साधनसामुग्री असते आणि तिच्यावर सर्वजण आपल्या उपजीविकेसाठी अवलंबून असतात. यात केवळ आपणास परिचित असलेल्या जमीन, श्रमशक्ती आणि भांडवल या तिन्ही उत्पादन-घटकांचाच समावेश आहे असे नव्हे, तर निरनिराळ्या प्रकारच्या औद्योगिक संघटना आणि सर्व अर्थ व्यवस्थेस एकत्र विणणारी बाजाराची यंत्रणासुद्धा समाविष्ट आहे. ज्यांचा या आर्थिक साधनांवर ताबा आहे त्यांच्या हाती आर्थिक सत्ता असते; कारण त्यांच्या साहाय्याने ते इतरांना त्यापासून दूर ठेवू शकतात. जमीनदार जेव्हा त्यांच्या मागणीनुसार भाडे दिल्याखेरीज आपल्या जमिनीचा दुसऱ्यास उपयोग होऊ देत नाहीत, तेव्हा त्याच्या शक्तीचे स्वरूप स्पष्ट होते. तसेच बँका जेव्हा कर्ज देण्याचे नाकारतात वा मालक जेव्हा नोकरांना बडतर्फ करतो अथवा कामगार संघटना जेव्हा संप घडवून आणतात आणि मजुरांना कामावरुन दूर राहण्यास सांगतात, तेव्हा त्यांच्या शक्तीचे स्वरूप स्पष्ट होते.

प्रत्येक अर्थव्यवस्थेत कोणाची तरी या आर्थिक साधनांवर अधिसत्ता असते. आणि जे कोणी आर्थिक व्यवहार करीत असतात त्यांच्यात ती सत्ता विभागलेली असते. ही सत्ता विकेंद्रित झालेली असेल अथवा केंद्रित झालेली असेल; ती खाजगी ताब्यात असेल अथवा सरकारी. ती सापेक्षतेने मुक्त अथवा दडपण विरहित असेल अथवा तीवर अनेक प्रकारची बंधने असतील; पण अर्थव्यवस्थेचे स्वरूप कसेही असो, काही लोक साधनांच्या बाबतचे निर्णय घेत असतात आणि त्यांच्या हाती आर्थिक सत्ता असते. या साधनावर कोणताच ताबा नसता तर कदाचित गोंधळच माजला असता. तेव्हा अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वातच हे अनुस्युत आहे की आर्थिक सत्तेवर नियंत्रण आहे व ते सुद्धा वेडेवाकडे नाही तर काही निश्चित तत्त्वांच्या आधारे घातलेले नियंत्रण आहे. अन्यथा अशा व्यवस्थेला अर्थव्यवस्थाच म्हणता येणार नाही. समाजवाद्यांना अभिप्रेत असलेली पद्धती– अर्थ व्यवस्थेचे संघटन– अशा तत्त्वांवर आधारित हवे की त्यामुळे आर्थिक सत्तेचा वापर सामाजिक उद्दिष्टांच्या सिद्धीसाठी होईल.

# १२. मालकी आणि सत्ता

एकोणिसाव्या शतकात ब्रिटनमध्ये ज्या भांडवलवादी अर्थव्यवस्थेची भरभराट झाली तिच्यामध्ये आर्थिक सत्ता भांडवलदारांच्या हाती केंद्रित झाली. परिचित शब्दात सांगायचे झाल्यास ज्यांच्या हाती उत्पादन वितरण व्यवस्था आणि विनिमयाची साधने होती त्यांच्या हाती सत्ता गेली. त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी या सत्तेचा उपयोग केला आणि त्यांच्या कृतीवर कायद्याचे अथवा सामाजिक असे कुठलेच बंधन घातले गेले नाही.

अदृश्य असे एकच परिणामकारक बंधन त्यांच्यावर होते आणि ते म्हणजे बाजारातील परिस्थितीचे अदृश्य बंधन. त्यांना स्पर्धा करावी लागे आणि या स्पर्धेचा दुहेरी परिणाम झाला. त्यांना किमती खाली ठेवाव्या लागल्या आणि शिवाय अधिक कार्यक्षम होणे भाग पडले.

या व्यवस्थेचे तिच्या निर्भेळ स्वरूपानुसार मार्गदर्शनात्मक तत्त्व असे की बाजारपेठा मुक्त वा परिपूर्ण ठेवणे. खाजगी मालमत्तेचे संरक्षण करणे आणि मालक व नोकर या दोघांनाही संघटित होऊ न देता बाजारपेठ स्वतंत्र म्हणजे स्पर्धायुक्त ठेवणे; या दोन गोष्टी सोडल्यास राज्यसंस्थेस दुसरे कुठलेही उचित कार्य नव्हते. नव्यानेच पुढे आलेले अर्थशास्त्र हे उद्वेगजनक शास्त्र भांडवलशहा काही चुक करू शकणार नाहीत हे सिद्ध करण्यास उपलब्ध होतेच. बाजारपेठांचे अदृश्य नियंत्रण त्याना नेहमीच रास्त मार्गाचे मार्गदर्शन करील. अर्थात राष्ट्राची संपत्ती वाढविणे याहून अधिक रास्त न्याय्य गोष्ट काही नाही हे गृहीत धरले पाहिजे.

समाजवाद्यांनी या व्यवस्थेस दोन निरनिराळ्या प्रकारे आव्हान दिले. त्यानी या व्यवस्थेची साधने व साध्य या दोहोंबद्दलही शंका प्रकट केली. भांडवलवादी अर्थव्यवस्थेमुळे जो अन्याय नि संघर्ष निर्माण केला तो सहनशीलतेच्या पलिकडचा झाल्यामुळे, समाजवाद्यांच्या मते केवळ भौतिक प्रगती हे एकच ध्येय अर्थव्यवस्थेने डोळ्यासमोर ठेवावे हे पुरेसे नव्हते. शिवाय जी व्यवस्था केवळ जाणीवपूर्वक बंधन वा नियंत्रण न ठेवल्यामुळे वरचेवर आर्थिक अरिष्टात सापडते व उधळखोर स्पर्धेला बळी पडते, अशी व्यवस्था निव्वळ प्रगतीचे भौतिक ध्येय गाठण्यास तरी सर्वाधिक उपयुक्त ठरेल का अशीही शंका त्यांनी व्यक्त केली.

## सार्वजनिक मालकी–एक उपाय

समाजवाद्यांना अभिप्रेत असलेल्या अर्थव्यवस्थेची उद्दिष्टे फारच वेगळी आहेत. त्यांच्यापुढे ध्येय आहे ते सार्वजनिक कल्याण हेच होय. भौतिक प्रगती हा या ध्येयाचा एक घटक आहे. सार्वजनिक कल्याण साधायचे म्हणजे आर्थिक सत्ता

भांडवलवाद्यांच्या हातून काढून घेऊन ती सुस्पष्ट सामाजिक नियंत्रणाखाली आणणे अगत्याचे आहे. ही सत्ता अदृश्य बाजारपेठी नियंत्रणाखाली असता कामा नये. हे करण्याचा सोपा मार्ग म्हणजे सर्व मालमत्तेच्या खाजगी मालकीऐवजी खास प्रकारची सार्वजनिक मालकी प्रस्थापित करावयाची; म्हणजे अरिष्टे आणि उधळपट्टी या दोहोंचेही उच्चाटन होईल, अधिकतम भौतिक प्रगती साध्य होईल व त्याचा फायदा सर्वांमध्ये सारखाच वाटला जाईल.

पण सार्वजनिक मालकी म्हणजे काय व अशा प्रकारचा बदल कसा घडवून आणता येईल ? याच प्रश्नावर कडाक्याचे मतभेद होऊन समाजवाद्यांची निरनिराळ्या विचार प्रवाहामध्ये विभागणी झाली. भांडवलवाद्यांच्या हातून सत्ता काढून घेणे आवश्यक आहे, यावर त्यांचे एकमत होते. पण नेमक्या कोठल्या पद्धतीने या सत्तेवर नियंत्रण ठेवावे यावर मात्र त्यांचे एकमत झाले नाही.

काहींच्या मते सार्वजनिक मालकी म्हणजे राज्याची मालकी असा अर्थ होता. तर इतरांच्या मनात अशी भीती होती की भांडवलदारांची जागा राज्यसंस्थेने घतली तर 'राज्यसंस्थेच्या भांडवलदारी' व्यवस्थेखाली कामगारांची पिळवणुक चालूच राहील, म्हणून सामाजिक मालकीचे पर्यायी प्रकार सुचविले गेले. सहकारी पद्धतीने आपल्या उत्पादनाचे व वाटपाचे धोरण ठरविण्याऱ्या उत्पादक व ग्राहक यांच्या संघटना हळूहळू खाजगी उद्योगसंस्थांच्या जागा घेतील, असा आशावाद सहकारी व्यवस्थेच्या प्रवक्त्यानी मांडला. सिण्डिकॅलिस्टांची श्रद्धा होती की एखाद्याच मोठ्या संघटनेने वा औद्योगिक कामगारांच्या संघटनांनी भांडवलदारांच्या कडून उद्योगधंदे ताब्यात घ्यायला हवेत आणि मग त्यांनी हे उद्योगधंदे कामगारांचे हितरक्षण होईल अशा पद्धतीने चालवावयास हवेत. 'गिल्ड सोशालिस्टानी' 'स्टेट सोशालिस्ट' व 'सिण्डिकॅलिस्ट' या दोहोंच्या मधला मार्ग स्विकारला आणि राज्यसंस्था आणि कामगार संघटना यांच्यात ही सत्ता विभागावी व त्याचे रूपांतर राष्ट्रीय गिल्डमध्ये (परस्पर साहाय्यक संघटना) करावे असे मत मांडले.

सत्तांतर उत्तम रीतीने कसे साधता येईल या प्रश्नावर, आपल्या विचारानुसार स्टेट सोशालिस्टामध्ये दोन विरोधी गट पडले. क्रान्तिकारक समाजवाद्यांनी एका सर्व समावेशक क्रान्तीचा पाठपुरावा केला की ज्यामुळे राज्यसंस्थेची राजकीय सत्ता व भांडवलदारांची आर्थिक सत्ता हिरावून घेऊन 'कामगार हुकमत' द्वारा तिचे नियंत्रण केले जाईल. याउलट लोकशाहीवादी समाजवाद्यांनी नेहमीच अशी श्रद्धा बाळगली की– ब्रिटीश मजूर पक्ष हा नेहमीच एक प्रखर लोकशाहीवादी पक्ष म्हणून ओळखला गेला आहे– खाजगी मालकीचे सार्वजनिक मालकीत रूपांतर करावयाचे ते लोकशाही मार्गाने म्हणजे योग्य ती नुकसान भरपाई देऊन व बहुमताच्या समतीनेच व्हावयास हवे.

या साऱ्या मतवैचित्र्याच्या संदर्भातसुद्धा समाजवादी अर्थव्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी उत्पादन, वितरण व्यवस्था, आणि विनिमय यांची साधने यावर सार्वजनिक मालकी आवश्यक नि पुरेशी आहे; ही कल्पना खूप काळपर्यंत सर्वांना मान्य होती. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास समाजवादी परंपरेने प्रामुख्याने भर दिला तो आर्थिक सत्तांतावर. पण या सत्तेचे नियंत्रण कसे करावे, याचा पुरेसा विचार झाला नाही. नियंत्रणाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले असे नव्हे, पण असे गृहीत धरले की सहकारी संस्था, औद्योगिक कामगार संघटना, राष्ट्रीय गिल्डस्, क्रांतिकारक अथवा लोकशाही राज्यसंस्था यांच्या सारख्याच्या योग्य हाती सत्ता गेल्यास नियंत्रणाचा प्रश्न समाधानकारक रीतीने आपोआपच सुटेल.

केवळ श्रद्धेतून ही गोष्ट गृहीत धरली गेली नाही; त्या वेळी प्रचलित असलेल्या आशावादी सिद्धान्तांनी या श्रद्धेला पाठिंबा दिला. क्रांतिकारी समाजवाद्यांनी मार्क्सवादावर सारा भरवंसा ठेवला. या मार्क्सवादी सिद्धांतांनी त्यांना धीर दिला की एकदा का भांडवलदारांची मालमत्ता काढून घेतली की वर्गव्यवस्था नष्ट होईल व आर्थिक क्षेत्रातील वरिष्ट वर्गाच्या हातचे साधन ठरलेली राज्यसंस्था हळूहळू नाहीशी होईल. कामगार हुकमतीचे रूपांतर शेवटी शासनरहित साम्यवादी समाजरचनेत होईल. अशा समाजात दुरुपयोग करता येईल असा दुसऱ्यावर अधिकार असणार नाही. याउलट आर्थिक शक्तीचे मतदानाच्या साहाय्याने परिणामकारक ' नियंत्रण करता येईल, असा आग्रह धरणाऱ्या लोकशाही सिद्धांताची कास लोकशाही समाजवाद्यांनी धरली. मालकी अधिकार राज्यसंस्थेस अथवा संघटनेस अथवा दोहोंस अथवा दुसऱ्या कुठल्याही उत्पादकांच्या किंवा ग्राहकांच्या प्रातिनिधिक संघटनेस दिला तरी त्या अधिकाराच्या दुरुपयोगास प्रतिबंध करणे, हे जे अधिकाराचा वापर करतात किंवा किमानपक्षी सत्ताधीश ज्यांना जबाबदार आहेत अशा अधिकाऱ्यांची निवड करता आली, तरच शक्य होईल.

हे सर्व आशावादी सिद्धांत आता कोसळले आहेत. प्रत्येक ठिकाणी समाजवाद्यांना त्यांच्या परिणामांना तोंड द्यावे लागत आहे. सोव्हिएट युनिअन आणि इतर साम्यवादी देशात मार्क्सवाद अगदी अखेरपर्यंत तर्कशुद्धरित्या पाळण्यात आला आहे. सर्व आर्थिक सत्ता राज्यसंस्थेच्या हाती देण्यात आली आहे. त्यातून मार्क्सचा विश्वास होता त्याप्रमाणे 'स्वातंत्र्य आणि समता' यावर आधारलेला समाज निर्माण न होता सर्वंकष झोटिंगशाहीच निर्माण झाली आहे. राज्यसंस्थेच्या हाती सर्व राजकीय सत्ता ही आहेच आणि तिच्यावर परिणामकारक अशी कोठलीच बंधने नाहीत. खाजगी भांडवलदारांच्या जुलुमाला बळी पडण्यापेक्षा राज्यसंस्थेच्या जुलुमाखाली असणे हे कामगारांचे मोठेच दुर्दैव म्हणावे लागेल. कारण भांडवलदार सर्वगामी नसतो तर राज्यसंस्था सर्वगामी असते. भांडवलशाही म्हणजे जर

अनिर्बंध समूहवाद असेच म्हणावे लागेल. रोगाच्या तुलनेने हा उपाय चांगला आहे असे नव्हे.

लोकशाही समाजामध्ये– विशेषतः युद्धोत्तर काळातील मजूर सरकारच्या राजवटीच्या वेळी– सार्वजनिक मालकीच्या दिशेने जी पावले टाकण्यात आली, त्यामुळे राजकीय लोकशाहीच्या सर्वसाधारण पद्धतींचा सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यावर नियंत्रण ठेवण्यास कितपत उपयोग होऊ शकेल, या बाबतही शंका प्रदर्शित केल्या जात आहेत. उद्योगसंस्था समाजवादी पद्धतीने चालविल्या जातील; याची हमी केवळ त्यांच्या मालकीमध्ये बदल केला असता देता येईल, असा आता कोणासच विश्वास वाटत नाही. राष्ट्रीयीकरण केलेले उद्योग लोककल्याणार्थच चालवावेत असे संसद जाहीर करील आणि लोककल्याणाचा अर्थही स्पष्ट करील. पण संसदेला स्वतःच निर्माण केलेल्या प्रचंड औद्योगिक संघटनांच्या अंतर्गत व्यवस्थेवर परिणामकारक नियंत्रण ठेवता येत नाही; शिवाय संसदेने प्रत्यक्षात तसे नियंत्रण करू नये असेही म्हटले जाते. राष्ट्रीयीकरण झालेल्या सर्व उद्योग संस्थांतून बलवान कामगार संघटनांचा पाठिंबा असूनही, आपल्याला आपल्या कार्यकारी जीवनातील परिस्थितीवर खरा ताबा ठेवता येत नाही, हीच भावना व्यक्तिशः प्रत्येक कामगाराच्या मनात आहे. एक नागरिक आणि कामगार संघटनेचा सदस्य म्हणून त्याच्या मतास किंमत आहे. पण एकेकाळी अपेक्षित असलेले परिणाम मात्र या मताच्या साहाय्याने साधत नाहीत. सध्याच्या स्वरूपात सार्वजनिक मालकीच्या उद्योगांचे क्षेत्र वाढविण्यास तितकासा उत्साह दाखविला जात नाही, यातच हा असंतोष व्यक्त होतो.

संपूर्ण सार्वजनिक मालकी म्हणजे ध्येयसिद्धीचा निश्चित मार्ग, ज्या क्रांतिकारी वा लोकशाही सिद्धांतांनी ठासून सांगितले होते, त्यावर आता कोणाचाच विश्वास राहिलेला नाही. समाजवाद म्हणजे केवळ सार्वजनिक मालकी असा समज असल्यामुळे, सार्वजनिक मालकी म्हणजे रामबाण उपाय नव्हे या भावनेचा समाजवादावरचाच विश्वास ढळला आहे; असा अनेक वेळा अर्थ लावला जातो. समाजवाद्यांच्या अंगी धैर्य असेल तर या पेचातूनही सुटका करून घेण्याचा मार्ग आहे. मालकी हक्काची समस्या आणि यामुळे मिळणाऱ्या सत्तेवर सामाजिक नियंत्रण कसे ठेवता येईल, याचा नव्यानेच विचार करावयास हवा.

## मालकी संबंधीचे बदलते हक्क

संपूर्ण सार्वजनिक मालकीबाबतचा युक्तिवाद हा अनेक गैरसमजांवर आधारलेला होता. यापैकी पहिला गैरसमज असा की भांडवलाची खाजगी मालकी मुळातच वाईट आहे. खाजगी मालकीच्या नाण्याची एक बाजू म्हणजे

सत्ता हे निर्विवाद आणि या सत्तचा दुरूपयोग होऊ शकतो; तरी देखील या नाण्याची दुसरी बाजू पाहिल्यास खाजगी मालकी ही स्वातंत्र्याची गरज आहे, असेही चित्र दिसेल. व्यक्तिगत स्वायत्त धनाच्या संदर्भात समाजवाद्यांनी हे नेहमीच मान्य केलेले आहे. काही लहरी वा चमत्कारिक लोकांनीच खाजगी धनाचा संपूर्ण निकाल लावावा, असे सुचविले आहे. स्वतःच्या मालकीचे असे काहीही नाही अशी परिस्थिती असेल तर आपल्या किरकोळ व्यक्तिगत बाबीमध्ये देखील कृतीचे स्वातंत्र्य व्यक्तीला असत नाही.

औद्योगिक मालमत्तेची मालकी ही व्यक्तिगत मालमत्तेपेक्षा निश्चितच निराळ्या प्रकारात मोडणारी मालकी आहे. पण येथेही स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण होतो. सर्व भांडवली साधनावर एकदा राज्यसंस्थेची मालकी प्रस्थापित झाली की मग या बाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार केवळ राज्यसंस्थेच्या हाती येतात. प्रत्येक व्यावसायिक हालचाली सरकारच्या मर्जीनुसार व्हाव्या लागतात. सरकारी अनुमती नसलेल्या कुठल्याही प्रयोगात्मक स्वरूपात सुद्धा अंमलात आणता येत नाहीत. जो कोणी धोका पत्करण्यास वा धैर्य करण्यास तयार असतो तो नालायक वा त्याहूनही काही तरी वाईट ठरतो. खाजगी भांडवलाचे संपूर्ण उच्चाटन करण म्हणजे सर्वंकष हुकूमशाही पाचारण करणे होय.

मालकी हक्क हा केवळ खाजगी स्वरूपातच घातक आहे, ही श्रद्धा हा दुसरा गैरसमज. मालकी हक्क एकदा का सार्वजनिक झाला की त्या मालकी हक्कामुळे जी सत्ता निर्माण झालेली असते, ती तुलनेने निरूपद्रवी बनेल. कारण या सत्तेचे सामाजिक ध्येयांनुसार नियंत्रण केले जाईल. अनुभवाने असे सिद्ध झाले आहे की मालकी हक्काने येणारी सत्ता मग ती समाजाच्या हाती असली तरी घातकच ठरते. या सत्तेचा दुरूपयोग होऊ शकतो आणि व्यक्तिगत पातळीवर प्रत्येकास या सत्तेच्या संदर्भात स्वतःच्या हक्काचे ठाम प्रतिपादन करण्यासाठी झगडावे लागते. मालकी हक्कामुळे येणाऱ्या सत्तेचे नियंत्रण करण्याचे मार्ग शोधावयास हवेत. मग ती सत्ता खाजगी मालकांकडे असो वा सार्वजनिक मालकीच्या स्वरूपात असो.

तिसरा आणि सर्वात गंभीर स्वरूपाचा गैरसमज म्हणजे मालकी हक्क हा अविभाज्य आहे आणि एकतर तो संपूर्णपणे खाजगी हाती असावयास हवा अथवा पूर्णपणे सार्वजनिक नियंत्रणाखाली असला पाहिजे. वास्तविक मालकी म्हणजे अनेक हक्कांचे एक बोचके आहे. हे हक्क काही पवित्र असे नाहीत. फक्त समाजाने व राज्यसंस्थेने त्यांना संरक्षण दिले आहे. ते काही अभंग वा अपरिवर्तनीय नाहीत. राज्यसंस्था व समाज स्वेच्छेनुसार त्यात हवा असेल तितका बदल घडवून आणू शकतात आणि प्रत्यक्षात त्यात सारखा बदल होत असतो आणि ते अविभाज्यही नाहीत. प्रत्येक हक्काचे स्वतंत्रपणे निरनिराळ्या प्रकारे

नियंत्रण करणे शक्य आहे. काही हक्क खाजगी स्वरूपात ठेवता येतील तर काही सार्वजनिक.

औद्योगिक संस्थांच्या मालकीशी निगडीत असलेलेच उदाहरणादाखल घ्या. कशाचे उत्पादन करावे याबाबतचा हक्क, व्यक्तिगत उपयोगासाठी नफ्याचा हिस्सा ठेवून घेण्याचा हक्क, भांडवली साधने निकालात काढण्याचा हक्क, नेमणुकी करणे वा काढून टाकण्याचा हक्क इत्यादी यापैकी कुठलाही हक्क आता अनिर्बंध वा अमर्याद नाही. प्रत्येकावर या ना त्या प्रकारची मर्यादा आहे. ज्याचे उत्पादन केले जाते ते कदाचित प्रत्येक सरकारी निर्देशानुसार होत असेल अथवा विशिष्ट उद्योगक्षेत्रात साधन सामुग्रीवर ज्या प्रकारचे नियंत्रण असेल त्यानुसार होत असेल. कराच्या साहाय्याने नफ्याच्या वाटणीवर मर्यादा आणता येतील अथवा कायद्याच्या साहाय्याने नफ्याच्या प्रमाणावर बंधन घालता येईल. भांडवली व्यवहारावर नियंत्रण ठेवता येईल. कामगार संघटनांशी झालेल्या करारानुसार कामगारांना नोकरीवर ठेवणे वा काढून टाकणे हे ठरविले जाईल. मालकीच्या प्रत्येक हक्काभोवती अशा बंधनाचे जाळे विणले जाईल अथवा हे हक्क दुसऱ्यांस दिले जातील. प्रत्यक्षात मालकी हक्कावर इतके आक्रमण करता येणे शक्य आहे की मालकीमुळे सत्ता प्राप्त होते असे म्हणता येऊ नये. शिल्लक राहतो म्हणजे केवळ मालमत्ता विकण्याचा नाममात्र हक्क.

कायदे करणे, कामगारांचे संघटन आणि सर्वांना कामधंदा मिळवून देणे, या गोष्टींच्याद्वारा हलके हलके मालकांचे, मजुरासंबंधीचे अमर्याद हक्क कसे मोडून काढले हे विसाव्या शतकाने पाहिले आहे. परिणामी मालकी हक्क हे अद्यापही खाजगी असले तरी आज भांडवलदार व मजूर यांचे परस्पर सत्तासंबंध सर्वथा बदललेले दिसतात. वास्तविक, केवळ कामगारांच्या संबंधातच नव्हे तर प्रत्येक बाबतीत मालकीहक्क कसे मर्यादित केले गेले आहेत हे आपण पाहिलेच आहे. उत्पादन, वाटप, नफा, किंमती, भांडवली व्यवहार या संबंधातले बरेचसे अधिकार राज्यसंस्था स्वतःकडे घेऊ शकते व त्यांचा उपयोग आपणास योग्य वाटेल त्या पद्धतीने करू शकते. राज्यसंस्था प्रत्यक्षात याहून पुढे गेली आहे. मुलभूत उद्योगावर मालकी प्रस्थापित करून राज्यसंस्था एक खरीददार आणि विक्रेता म्हणून बाजारात शिरली आहे. म्हणजे खाजगी आर्थिक सत्तेस शह देण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिकशक्ती राज्यसंस्थेस आता उपलब्ध आहे. आणखी दुसऱ्या प्रकारचे सत्तेचे केंद्रीकरण ठोक व्यवहार करणाऱ्यांचे हाती वा किरकोळ विक्री करणारे अथवा स्वतः ग्राहकांचे हाती झाले आहे आणि त्यामुळे औद्योगिक संस्थांच्या मालकी हक्कांवर आणखी मर्यादा पडल्या आहेत. या साऱ्या बंधनाच्या जाळ्यात सापडलेला उद्योगपती 'माझा धंदा हा आता माझा आहे असे मी

म्हणणार नाही,' अशी तक्रार करताना दिसला तर त्यात अनपेक्षित असे काही नाही. मालकीमुळे त्याला आता आपल्या मालकींच्या गोष्टींचे मन मानेल ते करण्याचा हक्क प्राप्त होत नाही.

अशा प्रकारे जरी ब्रिटिश उद्योगधंदे अद्यापही बहुतांशी खाजगी मालकीखाली असले, तरी मागच्या पिढीमध्ये आपल्याकडे जी अर्थव्यवस्था होती त्याहून वेगळ्या प्रकारची अर्थव्यवस्था आहे, असे दिसेल. आज जे साध्य केले आहे ते खाजगी मालकी नष्ट केल्यामुळे नव्हे, तर ज्या निरनिराळ्या बंधनाखाली मालकी हळूहळू जखडली गेली आहे त्यामुळे होय. या वाढत्या बंधनामुळे आर्थिक व्यवस्थेकडून जे हेतू सिद्धीस जाण्याची अपेक्षा आहे त्यातही काही प्रमाणात बदल झालेला आढळेल. वाटेल तितकी सामाजिक किंमत देऊन केवळ भौतिक समृद्धी प्राप्त करणे, या एकाच हेतूवर आता समाज संतुष्ट राहणार नाही. भौतिक प्रगतीच्या फायद्यांची समाजातील सर्व विभागातील लोकात समप्रमाणात वाटणी व्हावयास हवी आणि आर्थिक सत्तेचा उपयोग अधिक व्यापक सामाजिक हितासाठी व्हावयास हवा, असा आग्रह समाज धरू लागला आहे.

## बाजार आणि व्यवस्थापकीय सत्ता

हे सारे बदल झाले असले तरी आर्थिक सत्तेचे अंतिम मूळ अद्यापही 'मालकी हक्का'मध्येच सापडते. मालकीमुळे अंतिम अर्थाने लोकांना मर्यादित साधनांवर हक्क चालविता येतो. परिणामी इतर लोकांना त्यात ढवळाढवळ करण्यापासून परावृत्त करता येते.* तर मग मालकीहक्क इतक्या मोठ्या प्रमाणात मर्यादित केले असूनही, आर्थिक सत्ता कुठल्याही प्रकारे कमी झालेली दिसत नाही हे कसे? उलटपक्षी खाजगी वा सार्वजनिक आर्थिक सत्तेच्या केन्द्रीकरणाची आज आपल्याला पूर्वी कधीही नव्हती इतकी जाणीव होते आहे. अशा केन्द्रीकरणामुळे उत्पादक, ग्राहक यांच्या आणि सर्वसाधारणपणे समाजाच्या जीवनावर वर्चस्व गाजविता येते.

याचे कारण हे की अर्थव्यवस्थेत संघटनेची वाढ होते आहे. औद्योगिक-संस्थांच्या आकारातच वाढ झाली आहे असे नव्हे, तर त्याच बरोबर सर्व प्रकारच्या आर्थिक संघटनांचा आकार आणि त्याचे वजन यातही वाढ होते आहे. आर्थिक सत्तेच्या विभागणीवर दोन प्रकारे परिणाम झाला आहे. प्रथम असे की सत्तेची वाढ झाली आहे व तिचे केंद्रीकरण झाले आहे. आपल्या उत्पादन साधनांच्या

---

* अशा साधनांपैकी 'मजूरा'बाबत खास सांगण्यासारखे आहे. व्यक्तिशः प्रत्येक मजुरास जर आपल्या श्रमशक्तीबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेता आला, तर तो स्वतःच त्याच्या मजुरीचा मालक आहे, असे म्हणता येईल.

बाबतच्या मालकी हक्कांचे निरनिराळ्या स्वतंत्र मालकांनी एकत्रीकरण केले आहे. आणि त्यामुळे निर्माण होणारी सत्ता घटकांच्या बेरजेपेक्षा अधिक आहे. उदा० कामगार संघटनांची सौदा करण्याची ताकद ही कामगारांच्या व्यक्तिश: ताकदीची गोळाबेरीज होईल त्यापेक्षा खूपच आहे. जॉइंट-स्टॉक कंपन्यांबाबत अथवा इतर कुठल्याही मोठ्या व्यापारी संस्थेबाबतही तेच म्हणता येईल. आणि दुसरे असे की या साधनांच्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आता मालकांच्या हातून व्यवस्थापक वा तत्सम अधिकाऱ्यांच्या हाती गेला आहे. औद्योगिक संघटनात अधिकार वापरणारे आणि त्यांच्या वतीने निर्णय घेणारे संचालक आणि व्यवस्थापक हेच आजकालचे खरे सत्तारूढ लोक होत. आर्थिक सत्ता ही अद्यापही जरी मालकीहक्काद्वाराच साध्य होत असली, तरी मालकांच्या हस्ते या सत्तेचा वापर होणे हे कमीकमीच होत चालले आहे.

आजकाल सत्तेचे जेव्हा मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण होते, तेव्हा ते दोन प्रकारे होते. बाजारातील प्रभुत्व हा पहिला प्रकार. बाजारातील प्रभुत्वामुळे निर-निराळ्या बाजारात जेथे खरेदी-विक्री, देणे-घेणे वा नोकरीत ठेवणे- काढून टाकणे, चालते तेथे माल किंवा सेवा यांच्या मागणी पुरवठ्यावर नियंत्रण ठेवता येते, याला बाजारातील प्रभुत्व असे म्हणता येईल. ज्यांच्या हाती हे प्रभुत्व असते ते ज्या साधनावर ताबा ठेवतात, त्या साधनांचे क्वचितच मालक असतात. ते मोठमोठ्या व्यापारी संस्थांचे व्यवस्थापक असतात आणि ते व्यवसाय-संस्थेच्या बाजारातील हालचालींचे मार्गदर्शन करतात. त्या बँका असतात. त्यांचा चलनाच्या पुरवठ्यावर आणि बँक-क्रेडिटवर ताबा असतो. वास्तविक ज्या निधींचा ते वापर करतात तो त्यांच्या स्वत:च्या मालकीचा नसतो; पण त्या विमा कंपन्या आणि गृहरचना संस्था असतात. लक्षावधी मालकांनी साठवलेला पैसा त्यांच्या मालकीचा नसतो; पण त्या साठवलेल्या पैशावर त्यांचा ताबा असतो. यापैकी बऱ्याचशा लोकांना पूर्वी बचतीसाठी काही उरतच नसे. कच्च्या मालापासून ते पक्क्या मालाच्या पुरवठ्यापर्यंत सर्वांवर ताबा ठेवणाऱ्या त्या व्यापारी संघटना असतात वा बाजार समित्या (मार्केट बोर्ड) असतात. कामगारांनीसुद्धा आपली स्वत:ची अशी खूपच बाजारी शक्ती संपादन केली आहे. मजुरांच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या त्यांच्या मजूर संघटना आहेत; आपल्या लक्षावधी सभासदांच्या खरेदी शक्तीवर नियंत्रण ठेवणाऱ्या सहकारी संस्था आहेत; आणि शेवटी प्रत्येक बाजारात जिच्या नियंत्रणाचा संचार आहे आणि सर्व प्रकारच्या साधनांच्या मागणी- पुरवठ्यावर ताबा आहे अशी राज्यसंस्था आहेच.

दुसऱ्या प्रकारची आर्थिक सत्ता ही औद्योगिक संस्थेच्या हाती असते. औद्योगिक संस्था आकाराने मोठ्या व कार्यपद्धतीच्या दृष्टीने अधिक गुंतागुंतीच्या

झाल्या आहेत. त्यांनी जमविलेला प्रचंड भांडवलनिधी अनेक भागधारकांच्याकडून मिळविलेला असतो. आणि अशा भांडवलाच्या उपयोगाबाबत मालकांना सारा भरवसा तज्ज्ञ व्यवस्थापकावर टाकणे आवश्यक होते. धंदा खाजगी असो वा सरकारी असो, ही माणसे प्रत्येक स्वतंत्र धंद्याच्या अंतर्गत संघटनेच्या चौकटीत व्यवस्थापकीय अधिकाराचा वापर करतात. त्यांना मालकांचा प्रतिनिधी म्हणता येईल; पण त्यांची सत्ता वा अधिकार ही केवळ संस्थेची मत्ता म्हणून समजल्या जाणाऱ्या इमारती नि यंत्रसामुग्री एवढ्यापुरत्या मर्यादित नसतात. प्रत्येक उद्योगसंस्था ही अधिकार व्यवस्था, साठविलेला अनुभव आणि ख्यातिमूल्य (Goodwill) यांच्या साहाय्याने बनलेली संघटना असते. या संघटनेमुळेच व्यवस्थापकाचे सामर्थ्य अस्तित्वात असते. एखाद्या उद्योगसंस्थेचे खाजगी स्वरूप बदलून सार्वजनिक होईल आणि त्यामुळे मालकीबाबत क्रान्तीकारक बदल होईल; पण या संघटनेवर कदाचित काहीच परिणाम होणार नाही. तीच माणसे काहीही बदल न होता व्यवस्थापकीय अधिकार वापरत राहतील, हे देखील शक्य आहे.

बाजारातील सामर्थ्य आणि व्यवस्थापकीय सामर्थ्य हे दोन्ही प्रकारचे सामर्थ्य जरी मालकीतून निर्माण झालेले असले, तरी संघटनेमुळे त्यात वाढ होते. दोन्ही बाबतीत स्वतंत्रपणे निरनिराळे मालक नव्हेत तर या संघटनेच्या अग्रस्थानी असणारेच सत्तेचा वापर करीत असतात. सत्ता कुठल्या स्थानावरून गाजविली जाते याबाबत या दोन प्रकारातला फरक साठविलेला आहे. बाजारातील सामर्थ्य बाजारात म्हणजे मालाच्या श्रमशक्तीच्या वा पैशाच्या देवघेवीत वापरले जाते. व्यवस्थापकीय सामर्थ्य हे धंद्याच्या अंतर्गत संघटनेच्या संदर्भात वापरले जाते. वास्तविक औद्योगिक व्यवस्थेत हे दोन्ही प्रकार आढळतात. त्यांचे बाजारात आणि त्याच वेळी अंतर्गत संघटनेवरही वर्चस्व असते. 'व्यवस्थापकीय क्रांती'चे हे थोडक्यात म्हणजे सार आहे. परिणामी त्यामुळे मालकी आणि आर्थिक सत्ता ही अलग झाली आहेत. आणि सामाजिक नियंत्रणाच्या प्रश्नाचे स्वरूप पालटले आहे. बाजारी आणि व्यवस्थापकीय सामर्थ्यावरील भेदाचे खरे महत्त्व, हे दोन प्रकार वेगळे आहेत यात नसून वेगवेगळ्या प्रकाराने या सामर्थ्यावर नियंत्रण ठेवता येते, हे आहे.

# १३. सत्तेचे नियंत्रण

## शह आणि समतोल यांच्या साहाय्याने नियंत्रण

आर्थिक सत्तेचे नियंत्रण करण्याचा एक मार्ग म्हणजे प्रति आर्थिक सत्ता निर्माण करणे. प्रत्येक बाजारपेठेत हे घडत असल्याचे आपणांस आढळते. सौदा जमविण्यासाठी दोन बाजूचे लोक भिडतात. त्यांच्या हितरक्षणाच्या कल्पना परस्परविरोधी असतात. प्रत्येक विक्रेता आपल्या मालास अधिकात अधिक किंमत मिळावी, यासाठी आपली शक्ती पणास लावतो आणि प्रत्येक खरीददार किंमत कमी करण्यासाठी शक्ती वापरतो. पैसे उसने देणारास भरपूर दराने व्याज हवे असते आणि कर्जाऊ पैसे घेणारास व्याजाचा दर कमी हवा असतो. आपल्या कामाची भरपूर दराने मजुरी मिळावी अशी कामगाराची मागणी असते तर मालक मंडळी स्वस्त श्रमशक्ती कशी विकत मिळेल याचाच विचार करतात. प्रत्येकजण साहजिक स्वतःच्या फायद्याची गाडी पुढे ढकलण्याच्या प्रयत्नात असतो. सगळ्या गोष्टी कुणाच्याच मनासारख्या घडत नाहीत; पण ज्याचे बल अधिक त्याची खास बाजू असल्यामुळे त्याला सौदा अधिक फायदेशीर ठरतो.

समाजवाद्यांच्या मते कोणतीही बाजू खास का असावी याला काहीच कारणे संभवत नाहीत. बाजारपेठेत जेव्हा खाजगी हित साधणाऱ्यांच्यामध्ये संघर्ष होतो, तेव्हा खास कोणा एकाजवळ संघर्ष करण्याची आवश्यकता नाही; दुसऱ्यावर आपली इच्छा लादता येईल इतके बल त्यापैकी कोणाजवळही असण्याची आवश्यकता नाही. तरीसुद्धा प्रत्येकास समप्रमाणात सत्ता वाटून देणे शक्य नसते. अराज्यकवाद्यांनी आपल्या आदर्श व्यवस्थेत मानल्याप्रमाणे हे शक्य झाले, तरी या बलाची समवाटणी होताक्षणीच जे अधिक उत्साही, काटकसरी आणि चतुर आहेत, ते दुसऱ्यांच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन आपले प्रभुत्व वाढविण्यास सुरुवात करतील. आजच्या बाजारपेठांच्या संदर्भात प्रत्येकास वाटणी देण्याची कल्पना ही सर्वस्वी अवास्तव आहे. कारण या बाजारपेठांवर व्यक्तीचे वर्चस्व नसून विशिष्ट विभागीय हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मोठमोठ्या संघटनांचे वर्चस्व असते.

तेव्हा एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या शक्तीमध्ये सत्तेचा समतोल निर्माण करणे, हेच ध्येय नजरेसमोर ठेवणे शक्य आहे. विशिष्ट बाजारपेठेत विक्रेत्यांच्या आणि ग्राहकांच्या (खरीददार) शक्ती, कर्ज देणाऱ्यांची नि कर्ज घेणाऱ्यांची शक्ती, तसेच मालकांची आणि कामगार संघटनांची शक्ती सर्वसाधारणपणे समतोल असावी. संघर्ष झाला की प्रत्येक बाजूच्या शक्तीस दुसऱ्या बाजूच्या

शक्तीचा शह बसेल. कुठल्याच एका बाजूस कायमचे वर्चस्व गाजविता येणार नाही. परस्परांशी करार करावयाचा झाल्यास, प्रत्येकास दुसऱ्या बाजूच्या म्हणण्याचा आदर करावा लागेल. ज्या समाजवादी तत्त्वांनुसार कुठल्याही बाजारातील व्यवहारात दोन्ही पक्षामध्ये आर्थिक सत्तेची विभागणी करावयाची असेल, तर त्याचा निर्देश सत्तेच्या समतोलपणाचे तत्त्व असा करता येईल.

हा समतोल कसा साधायचा? आपल्याहून बलशाली गटाला बळी पडलेल्यांची साहजिकच स्वसंरक्षणार्थ शक्य ते सर्व करण्याची प्रवृत्ती असते. भांडवलशाही समाजरचनेत हे घडताना आपण पाहिलेले आहे. भांडवलशाही ऐन भरभराटीच्या काळात आर्थिक सत्ता ही जवळजवळ सर्वस्वी मालदार वर्गाकडे होती. आपापसातील स्पर्धेमुळे त्यांच्या सत्तेवर काही प्रमाणात मर्यादा पडल्या, तरी ज्यांच्याकडे काहीच मालमत्ता नव्हती अशांच्या बाबतीत तिचा दुरुपयोग थांबविण्याची कुठलीच यंत्रणा नव्हती. या परिस्थितीने कामगारांना लढ्यासाठी उद्युक्त केले. त्यांनी आपली शक्ती वाढविण्यासाठी कामगार संघटना आणि सहकारी संस्था स्थापन केल्या आणि शेवटी भांडवलदारांच्या अमर्याद सत्तेला आळा घालण्यात यश मिळविले.

जेव्हा एका बाजूचे वर्चस्व असते आणि दुसरी बाजू स्वसंरक्षणासाठी मुक्त असते, तेव्हा लवकरच तसे करण्याचा प्रयत्न होतो. ही बाजारपेठेतील नेहमीची प्रक्रिया आहे. असा उत्स्फूर्त लढा सरकारी कृतीपेक्षा नेहमीच अधिक चांगला असतो. लोकांनी स्वतःच स्वतःचे हितरक्षण करावे; इतर कोणावर त्यासाठी अवलंबून राहू नये, हे जास्त चांगले. सामुदायिक सौद्याचे महत्त्व यातच साठविलेले आहे. नोकरीचे नियम व मंजूरी यावर सरकारी नियंत्रण असण्याऐवजी, सामुदायिक सौद्याने या गोष्टीचे नियंत्रण करणेच उचित. सरकारने किंमती ठरवून देण्याऐवजी ग्राहकांच्या सहकारी संस्थानीच हे करणे श्रेयस्कर. पण अशा उत्स्फूर्त कृतीने, मग ती कितीही निश्चयाने केलेली असली तरी, नेहमीच कार्यभाग साधेल असे नाही. सत्तेची न्याय्य विभागणी होईल असा भरवसा देणारी, स्वहित रक्षणाच्या भूमिकेतून निर्माण झालेली, कुठलीच अंतर्गत यंत्रणा आजच्या अर्थव्यवस्थेत दिसत नाही. कामगार संघटना अस्तित्वात आल्यानंतर सुद्धा, कामगारांची बाजू दुर्बळ राहिली. अधिक मदतीसाठी त्यांना राजकारणाकडे वळणे भाग पडले. आणि राज्यसंस्थेकडून आवश्यक ती मदत मिळाली.

सर्व आर्थिक सत्तेस कायद्याचे संरक्षण असल्यामुळे परस्परांशी स्पर्धा करणाऱ्या हितसंबंधितामध्ये सत्तेचा समतोल प्रस्थापित करण्यासाठी, सरकारी हस्तक्षेपाची सर्वसाधारणपणे आवश्यकता आहे. या सत्तेच्या विभागणीत बदल करण्यासाठी— उत्स्फूर्त कृतीस— शेवटी कायद्याच्या पाठिंब्याची गरज आहे. उदा.

मालदार माणसाच्या मालमत्तेस चोरी वा अतिक्रमणापासून कायद्याचे संरक्षण असते म्हणून मालदारांच्या हाती सत्ता असू शकते. कायदा बदलून त्याच्या सत्तेस मर्यादा घालता येतात अथवा ती सत्ता दुसऱ्याच्या हाती जाईल अशी व्यवस्था करता येते. कामगार संघटनेच्या शक्तीलाही कायद्याचा आधार आहे. आपले पैसे स्वेच्छेनुसार वापरण्याचा, संप करण्याचा व सौदा करण्याचा हक्क कायद्याने दिला नसता तर कामगार संघटनाची सत्ता अस्तित्वात राहूच शकली नसती. प्रत्येक प्रकारच्या आर्थिक सामर्थ्यास कायद्याचे संरक्षण आहे. म्हणून या सामर्थ्याच्या पुर्नविभागणीसाठी सरकारी कृतीची गरज आहे.

परस्परांशी स्पर्धात्मक संघर्ष करत असलेल्या खाजगी हितसंबंधितामध्ये समतोल निर्माण करण्याच्या हेतूने आर्थिक शक्तीची पुर्नविभागणी करणे हेच सरकारी कृतीचे स्वरूप असावयास हवे. स्वतंत्र समाजात ( Free Society ) सामर्थ्याची विभागणी एकदाच पण कायम स्वरूपाची अशी करता येणार नाही. जसजशी नवी उत्पादन साधने आणि नव्या प्रकारच्या संघटना निर्माण होतील तसतसे सारखे बदल होत असतात. प्रत्येक नव्या परिस्थितीत नव्या प्रकारच्या सरकारी कृतीची आवश्यकता भासते. फक्त स्थितिशील ( Stagnant ) अर्थ-व्यवस्थेतच कायम स्वरूपाच्या सत्ता विभागणीची पद्धत अंतिम अर्थाने ठरविता येईल.

## मोक्याच्या सहयोगाने नियंत्रण

कुठल्याही परिस्थितीत चालेल असा सत्तेचा समतोल प्रस्थापित केला तरी त्यामुळे प्रत्यक्षात एखाद्या व्यवहारात कुठल्याच पक्षास सत्तेचा दुरुपयोग करता येणार नाही, एवढीच सोय होईल. तथापि हे झाले नकारात्मक नियंत्रण. ज्या अर्थव्यवस्थेपुढे काही भावरूप साध्ये आहेत तिला याहून काहीतरी अधिक हवे.

आर्थिक सामर्थ्य मुद्दाम सामाजिक ध्येयसिद्धीच्या दिशेने वापरले पाहिजे. आर्थिक व्यवस्थेतून व्यापक स्वरूपाचे एकूण मार्गदर्शन झाले पाहिजे. हे करणे फक्त राज्यसंस्थेसच शक्य आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास केवळ विशिष्ट आर्थिक सामर्थ्याला शह देणारे आर्थिक सामर्थ्य निर्माण करून भागणार नाही; त्याचबरोबर राजकीय नियंत्रणही असले पाहिजे.

बाजारपेठेतील सामर्थ्यांच्या वापरावर राजकीय नियंत्रण ठेवणे, यालाच सर्वसामान्यतः आर्थिक नियोजन म्हणतात. अर्थातच नियोजनाच्या कल्पनेचा आणि समाजवादी विचाराचा असा खास संबंध नाही. नियोजन हे भांडवलशाही, झोटिंगशाही (फासिस्ट) किंवा साम्यवादी स्वरूपाचेही होऊ शकते. सध्या प्रत्येकजण नियोजनाचा पुरस्कर्ता आहे. अनियमित बाजारपेठेच्या भरंवशावर

नि:शंकपणे विसंबणारे असे आज तरी एकही सरकार वा देश दिसत नाही. पण नियोजन केले जाते ही वस्तुस्थिती समजल्याने, आपल्या ज्ञानात विशेष भर पडत नाही. प्रत्येक सरकारचा असा दावा असतो की, ते करीत असलेले नियोजन हे एक 'लोकांच्या कल्याणार्थ' असते वा 'सार्वजनिक हितार्थ' असते. पण कुठल्याही भांड्यावर चिकटवता येण्यासारख्या या चिठ्ठ्या आहेत. महत्त्व आहे ते त्या भांडवलातील पदार्थाला. प्रा. टॉनीच्या शब्दात सांगायचे झाल्यास "संसद आणि लोकशिक्षण यांच्याप्रमाणेच नियोजन ही सुद्धा सुलभ कल्पना नाही. नियोजनामुळे ज्या ध्येयांची सिद्धी प्राप्त करून घ्यावयाची आहे, त्या ध्येयांच्या सिद्धीसाठी उपयोगात आणलेली साधने आणि ज्या भूमिकेतून या दोहोंची निवड केली जाते त्यावर त्यांचे परिणाम अवलंबून असतात.*

समाजवादी नियोजनाचे असे खास वेगळ्या प्रकारचे व निश्चित स्वरूपाचे उद्दिष्ट आहे. संधी उपलब्ध करून देणारी यंत्रणा निर्माण करणे हे या नियोजनाचे ध्येय असते, आणि या संधी शक्य तितक्या अबाधित, समप्रमाणात आणि जास्तीत जास्त मिळाव्यात की जेणेकरून प्रत्येक व्यक्तीस या यंत्रणेच्या साहाय्याने आपल्या जीवनास आकार देता येईल. अधिक स्पष्ट शब्दात सांगावयाचे झाल्यास आर्थिक सुरक्षा, न्याय वाटणी आणि विकसनशील अर्थव्यवस्था ही समाजवादी नियोजनाची उद्दिष्टे आहेत. संधी उपलब्ध करून देण्याच्या या यंत्रणेच्या मर्यादा बाहेर हस्तक्षेप करून सरकार या संधीचा कसा उपयोग करावा हे ठरविण्यास ज्यावेळी सुरुवात करील, त्यावेळी व्यक्तिगत स्वातंत्र्यावर दडपण येईल आणि ज्या मूलभूत श्रद्धांवर ( Values ) समाजवाद स्थिरावला आहे, त्यांचा सरकारकडून भंग होईल. जोपर्यंत मिळालेल्या संधीचा उपयोग दुसऱ्यास इजा करण्यासाठी होत नाही, तोपर्यंत या संधीचा उपयोग कसाही केला तरी ती त्या व्यक्तीची खाजगी बाब आहे. योग्य ठिकाणी नोकरी करण्याची संधी त्यास हवी असते. पण कोठल्याही एखाद्या व्यवसायात आपल्याला सक्तीने दाखल केले जावे, हे त्याला नको असते. सर्वसाधारणपणे सुखात व सुरक्षित जीवन जगण्याची त्याला संधी हवी असते. पण त्याने कोठे रहावे व स्वत:ची कमाई कशी खर्च करावी, यावर त्याला कोणाचेही नियंत्रण नको असते. भिन्न प्रकारच्या अनेक सोयींचा उपभोग त्याला घ्यावासा वाटतो. पण आपल्या फावल्या वेळात आपण काय करावे याचा निर्णय दुसऱ्याने करावा, हे त्याला पसंत नसते.

याचा अर्थ असा की समाजवादी अर्थव्यवस्था म्हणजे केवळ नियोजित अर्थव्यवस्था नव्हे, तर बाजारपेठेवर आधारलेली अर्थव्यवस्था होय. लोक बाजारपेठांद्वारा

---

* ( R. H. Tawney–दि अटॅक; १९५३ पा. ९५ )

आपल्या निवड स्वातंत्र्याचा वापर करतात. या मालकाची नोकरी करावी का दुसऱ्याची करावी हे ठरविण्याचे कामगारांना स्वातंत्र्य द्यायचे असेल आणि कुठल्या मजुरांना नोकरी द्यायची हे ठरविण्याचे मालकांना स्वातंत्र्य असेल, तर श्रमशक्तीच्या बाजाराचीही आवश्यकता आहे. आपला पैसा खर्च करावा का व खर्च करणे झाल्यास कोणत्या कारणास्तव करावा हे जर ग्राहकांनी ठरवावयाचे असेल, तर त्यांना तशी निवड करणे शक्य व्हावे यासाठी विविध वस्तूंचे बाजार हवेत.

नियोजनाच्या पद्धतीबाबत काय ? स्वीकारण्याजोगे दोन निराळे मार्ग आहेत. पहिला असा की आर्थिकसत्ता खाजगी मालकांच्या हाती सोपवावयाची आणि कायदे व प्रकाशकिय नियंत्रण यांच्या साहाय्याने सत्ताधिशांच्या निर्णयाचे नियमन करावयाचे. याला बाह्य नियंत्रण म्हणतात. दुसऱ्या पद्धतीनुसार सरकारनेच अर्थ व्यवहारात शिरकाव करावयाचा व आर्थिक सत्ता संपादन करायची. अशाप्रकारे स्वतःच अर्थ व्यवहारात सहभागी झाल्यामुळे सरकारास आत राहून नियंत्रण करता येते.

सर्व प्रकारच्या लोकशाही नियोजनात काही प्रमाणात बाह्य नियंत्रण हे अनुस्यूत आहे. ज्या अर्थव्यवस्थेत आर्थिक सत्ता सर्वस्वी सार्वजनिक हाती नसते, त्या ठिकाणी सरकारास अशा प्रकारचे नियंत्रण करणे भागच असते. पण त्याचे तोटेसुद्धा सर्वांना परिचित आहेत. प्रवाहशाली अर्थव्यवस्थेच्या संदर्भात नियंत्रणासाठी कायदे करण्याची पद्धती ताठर नि अवजड वाटते. या पद्धतीने केवळ ढोबळ नि कायम स्वरूपाचे प्रश्न सोडविता येतात. यासाठी विशिष्ट प्रकारची आणि हंगामी स्वरूपाची बंधने घालणारे शासकीय नियंत्रणच पसंत केले जाते. पण यातही काही धोके आहेत. दडपेगिरी आणि लाचलुचपत या गोष्टी टाळल्या तरी यामुळे जबाबदारी विभागली जाते आणि परिणामी कार्यक्षमता नष्ट होते व वैफल्याची भावना निर्माण होते. एका शब्दात सांगायचे झाल्यास शासकीय नियंत्रणामुळे नोकरशाहीच्या सर्व समस्या निर्माण होतात. शिवाय शासकीय पद्धतीने फक्त बंधने घालता येतात; नवा पायंडा पडत नाही. स्वातंत्र्यप्रिय लोकांच्या मनात आर्थिक नियोजनाबद्दल अनादराची भावना आहे. कारण आर्थिक नियोजनाची 'बाह्य नियंत्रणा 'च्या पद्धतीशी फारच जवळीक झालेली दिसते.

समाजवादी आर्थिक नियोजनाची स्थापना प्रामुख्याने 'अंतर्गत नियंत्रणा 'च्या पर्यायावर व्हावयास हवी. या पद्धतीनुसार सरकार स्वतःची आर्थिक सत्ता संपादन करण्यासाठी कायदा करते आणि अशाप्रकारे या सत्तेच्या उपयोगाबाबतचे निर्णय राजकीय नियंत्रणाच्या क्षेत्रात आणले जातात. या प्रकारे सरकारला भावरूप कामगिरी करता येते. आपल्या ध्येयांचा पाठपुरावा करता येतो. केवळ आपल्या ध्येयविरोधी वर्तनास प्रतिबंध करण्यातच समाधान मानावे लागत नाही. हे साधण्यासाठी सर-

कारने संपूर्ण अर्थव्यवस्थेवर आक्रमण करावे अथवा संपूर्ण आर्थिकसत्ता आपल्या हाती घ्यावी, याची आवश्यकता नाही. फक्त या मोक्याच्या जागा ताब्यात घेतल्या म्हणजे पुरे. बरीचशी सत्ता स्वतंत्र (खाजगी) नियंत्रणाखाली राहिली तरी सरकारला या मोक्याच्या स्थानांवरून सर्व अर्थव्यवस्था व्यापता येईल व तिचे मार्गदर्शनही करता येईल.

ज्या मोक्याच्या जागावरून सरकार आर्थिक साधनांच्या वापरावर अंतर्गत नियंत्रण ठेवू शकते त्याला अंदाजपत्रक (Budget) म्हणतात. अंदाजपत्रकाद्वारे सरकार महसूल जमा करते व त्याचा विनियोग कसा करावयाचा हे ठरविते. आर्थिक सुरक्षा हे ध्येय असेल, तर सरकारला, मालाला मागणी कायम राहील व सर्वांना कामकाज मिळेल अशी परिस्थिती कायम ठेवण्यासाठी पुरेसा होईल आणि चलनवाढ टाळता येईल, अशा प्रकारे एकूण पैशाच्या ओघाचे नियमन करावे लागेल. न्याय्य वाटणी हे जर ध्येय असेल तर करांच्या मदतीने आणि निरनिराळ्या सामाजिक उत्पन्नाची सोय करून, सरकारास पुर्नविभागणी करता येईल. विकसनशील अर्थव्यवस्था हे जर ध्येय असेल तर राष्ट्राच्या एकूण उत्पन्नाची आपल्या ध्येयाच्या संदर्भात, ग्रहण, गुंतवणुक आणि सामाजिक व्यवसायासाठी कशी विभागणी करावी हे सरकारास ठरविता येईल. अशाप्रकारे ज्या देशात लोक आपापले कर भरतात तेथील नियोजनाच्या सर्व साधनांपैकी अंदाजपत्रक हे 'सर्वाधिक महत्त्वाचे, सर्वात शक्तिमान आणि सर्वात व्यापक'* साधन होय असे म्हणता येईल.

तरीसुद्धा ज्या ठिकाणी आर्थिक सत्ता ही पैशावर नव्हे तर भौतिक साधनसामुग्रीवर अवलंबून असते त्या ठिकाणी अंदाजपत्रकाची परिणामकारकता नष्ट होते. आणखी कशाची तरी जोड आवश्यक ठरते. उदा. आर्थिक सुरक्षिततेसाठी नियोजन करावयाचे म्हणजे एकसारखा मागणी व पुरवठा यांचा मेळ घालणे आले. वस्तुस्थिती अशी असते की मागणी होणाऱ्या नेहमीच्या बदलाचे नियंत्रण अंदाजपत्रक करू शकते; पण पुरवठ्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणे हे अंदाजपत्रकाच्या साहाय्याने जमत नाही. शिवाय जेंव्हा मागणीमध्ये भराभर नि मोठ्या प्रमाणात बदल होतात तेव्हा पुरवठा मागणीशी आपोआपच जमवून घेतो, हे सुद्धा शक्य नसते. तेव्हा काही प्रमाणात उत्पादनाचे नियोजनसुद्धा आवश्यक आहे. सरकारास स्वतःच गुंतवणुक करून आर्थिकक्षेत्रात उडी घ्यावी लागेल. तसेच न्याय्य वाटणीचे नियोजन करण्याच्या कामी अंदाजपत्रकाच्या उपयुक्ततेस काही मर्यादा पडतात. कर आकारणीमुळे उत्पन्नातील तफावती कमी होतील पण विषमतेच्या प्रश्नाचा मुळापासून विचार व्हावयास हवा; आणि मोठमोठ्या मालमत्ता

* (डब्ल्यू आर्थर लेव्हिस : दि प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनामिक प्लॅनिंग--१९४९: पा. २७)

सरकारने आपल्या ताब्यात घ्यावयास हव्यात. तसेच विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी नियोजन करताना राष्ट्राने केलेली बचत पुरेशी आहे, याची अंदाजपत्रकात खात्री देता येईल; पण मक्तेदारी व अतिरेकी स्पर्धा या दोहोंचा उत्पादनावर जो वाईट परिणाम होईल, त्याला आळा घालणे हे मात्र अंदाजपत्रकाच्या साहाय्याने शक्य होणार नाही. यासाठी मोक्याच्या ठिकाणी सरकारी उद्योगांची आवश्यकता आहे.

यापूर्वी अंदाजपत्रकाच्या उपयुक्ततेचे समाजवाद्यांनी विशेष महत्त्व मानले नाही. प्रत्येक सरकार अंदाजपत्रकाचा उपयोग महसूल वाढविण्यासाठी करीत असल्यामुळे नियोजनाचे साधन म्हणून अंदाजपत्रकाची संभाव्य उपयुक्तता तितकीशी महत्त्वाची वाटली नाही. पण आता नवीनच धोका निर्माण झाला आहे. तो असा की अंदाजपत्रकाच्या साहाय्याने राज्यसंस्था वित्तीय साधनांवर नियंत्रण ठेवू शकेल; पण भौतिक साधनांच्याबाबत ते जमणार नाही. समाजवादी नियोजनासाठी या दोहोंचीही आवश्यकता आहे. तेव्हा अंदाजपत्रकाच्या कौशल्यपूर्ण उपयोगाबरोबरच सार्वजनिक मालमत्तेचा सुद्धा कौशल्यपूर्ण उपयोग करणे आवश्यक आहे.

ज्या तत्त्वानुसार आर्थिक सामर्थ्याचा समाजवादी ध्येयांच्या सिद्धीसाठी उपयोग केला जातो त्याचेच वर्णन, मोक्याच्या सहयोगाने नियोजन करण्याचे तत्त्व असे करता येईल. अंदाजपत्रक, प्रमुख औद्योगिक संस्था, मोठ्या प्रमाणावर मालमत्ता संपादन करणे, वगैरे अर्थव्यवस्थेच्या मोक्याच्या ठिकाणी आर्थिक-सत्ता हाती घेऊन यांच्या आधारावर राज्यसंस्था नितिजन करते. सरकार आपली नियोजनशक्ती कशी वापरते आणि कशा प्रकारचे नियोजन करते याची नेहमीच सार्वजनिक छाननी होईल. कारण लोकशाहीमध्ये राज्यसंस्थेवर नेहमीच संसदेचे व सर्वसाधारण राजकीय प्रक्रियांचे नियंत्रण असते.*

पण केवळ राजकीय प्रक्रियांमुळे संपूर्ण संरक्षण लाभते असे होणार नाही. रोजच्या आर्थिक घडामोडींशी त्यांची तितकी जवळीक नसते आणि तपशीलवार कार्यवाहीसाठी त्या नेहमीच तितक्याच परिणामकारकही ठरत नाहीत. अर्थव्यवहारात अंशतः भाग घेण्यापलिकडे सरकारास काही अधिक न करू देण्याचे हे कारण आहे. जोपर्यंत अर्थव्यवहारात असा 'स्वतंत्र' विभाग असेल तोपर्यंत

* लोकशाहीमध्ये कोणतेही सरकार अलिप्तपणे नियोजन करू शकते व नंतर आपली इच्छा लोकांवर लादू शकते, अशा गैरसमजांपासून मात्र आपण सावध राहिले पाहिजे. केवळ संसदेतीलच नव्हे तर इतर अनेक संबंधितांचा विचार घ्यावा लागतो व कुठल्याही योजनेच्या यशस्वी कार्यवाहींची शक्यता निर्माण होण्यापूर्वी त्या सर्वांचा सहकार मिळवावा लागतो आणि योजनेच्या कार्यवाहीसाठी विकेंद्रीकरण हे अतिशय महत्त्वाचे आहे.

राज्यसरकारच्या हालचालीवर अविरतपणे आणि प्रभावी मर्यादा घालण्याचे काम तो करू शकतो. खाजगी मालकवर्ग आणि स्वतंत्र कामगार संघटना या चालूच ठेवल्या आणि त्यांच्यातील सौद्यामुळे चांगले निष्कर्ष निघाले तर सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रातही तशीच परिस्थिती हवी असा कामगार संघटनानी आग्रह धरल्यास त्यापासून पळता येणार नाही. सरकारी उद्योगसंस्थांची कार्यक्षमता खाजगी उद्योग संस्थेपेक्षा कमी असेल आणि त्यांची सेवा ग्राहकांच्या दृष्टीने कमी समाधानकारक असेल तर ही तुलना सर्वजण करतील आणि फार कालपर्यंत जनमताचा पाठींबा टिकणार नाही. खाजगी गुंतवणुकीनेच जर देशाच्या गरजा भागणार असतील तर सार्वजनिक गुंतवणुकीसाठी आवाहन केले जाणार नाही. प्रत्येकवेळी राज्यसंस्थेच्या हालचालीचे स्वरूप व संभाव्य उपयुक्ततेबद्दल सरळ सरळ प्रश्न विचारले जातील.

## सामाजिक जबाबदारीद्वारा नियंत्रण

सत्तेचा समतोल आणि मोक्याच्या वेळी सहभागी होणे या दोन्ही तत्त्वांचा बाजारपेठेतील प्रभुत्वावर नियंत्रण ठेवण्याशी संबंध आहे. यापैकी कुठलेच वा दोन्ही तत्त्वे व्यवस्थापकीय सत्तेचे केंद्रीकरण झाल्याने ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या सोडविण्यास पुरेशा उपयोगी नाहीत. व्यवस्थापकीय सत्तेवर या प्रत्येकाचे वजन पडेल पण यातील एकही तत्त्व त्या सत्तेचा वापर समाजवादी ध्येयसिद्धीसाठी म्हणून प्रभावी मार्गदर्शन करू शकणार नाही. बाजारातील स्पर्धकांच्या नियंत्रणामुळे कदाचित व्यवस्थापकीय कार्यक्षमतेस चालना मिळेल. पण स्पर्धेने होणारे नियंत्रण हे नेहमीच अपूर्ण असते. अकार्यक्षम संस्था सुद्धा केवळ आश्चर्यकारक चिकाटीमुळे तग धरू शकतात. कामगार संघटनांच्या प्रतिरोधात्मक सामर्थ्यामुळे व्यवस्थापकांना वाढीव वा उच्च वेतन देणे, नोकरीचे नियम सुधारणे आणि कामाच्या पद्धती बदलणे हे सुद्धा भाग पडेल. पण ही झाली बाह्य दडपणे, यामुळे व्यवस्थापनांची रचना व स्वरूप बदलणे अथवा औद्योगिक संस्थांना नव्या ध्येयांचा स्वीकार करण्यास भाग पाडणे हे शक्य होणार नाही.

राजकीय नियंत्रणालाही अशाच मर्यादा आहेत. सरकार एखाद्या औद्योगिक संस्थेचा ताबा घेऊ शकेल, स्वतःचे नवे व्यवस्थापक नेमून त्यांना आदेश देईल, पण हजारो औद्योगिक संस्थांमध्ये प्रत्येक ठिकाणी काय चालते आहे ते पाहणे, त्यांच्या अन्तर्गत शासनावर देखरेख करणे आणि तिथे घडत असलेल्या प्रत्येक गोष्टीची जबाबदारी स्विकारणे हे कुठल्याही सरकारास शक्य नाही. प्रत्येकास कशी वागणूक द्यावी वा त्यांची वागणुक कशी असावी हे काही कायद्याने सरकार ठरवू शकनार नाही आणि व्यवस्थापनाला अंमलात न येणाऱ्या कागदी नियमांनी

जखडून काहीच उपयोग नाही. तथापि हे सारे शक्य होईल असे मानले तरी जे उद्योग सार्वजनिक मालकीचे नाहीत त्यांचे काय ? सरकारी उद्योग संस्थांनी उत्तम उदाहरण घालून दिल्यामुळे होईल ते वगळल्यास दुसरे कसले नियंत्रण या खाजगी उद्योगसंस्थांतील व्यवस्थापकांच्या सत्तेवर येऊ शकणार आहे ?

आर्थिक सत्तेच्या नियंत्रणाची तिसरी एक पद्धत आहे. ती म्हणजे समाजाचेच नियंत्रण. (सामाजिक नियंत्रण) समाज म्हणजे या संदर्भात केवळ अस्पष्ट व ढोबळ लोकमत नव्हे तर व्यवस्थापकीय सत्तेचा ज्यांच्यावर सर्वांत अधिक आघात होतो व ही सत्ता कशा तऱ्हेने वापरली जाते यांची ज्यांना माहिती असते आणि जे आपल्या सामर्थ्याची जाणीव करून देऊ शकतात असे समाजातील समुह हे होत. अशा प्रकारचे विशिष्ट सामाजिक नियंत्रण ही एक प्रभावी शक्ती आहे. लोकमताच्या महत्त्वाच्या घटकांची राजकारणातील सत्ता ही निर्विवाद असते. मग ही सत्ता सरकार उलथून पाडण्याच्या कामीच वापरली पाहिजे असे नव्हे. समाज अथवा समाजातील प्रतिष्ठित समूह (प्रभावी समूह) विशिष्ट सरकारी कृती सहन करण्यास तयार होणार नाहीत. हीच गोष्ट मुळी राजकारणी लोकांच्या महत्त्वाकांक्षेला मर्यादा घालते. आणि काही गोष्टी झाल्याच पाहिजेत असा आग्रह समाज धरतो तेव्हा आज ना उद्या त्या समाजाच्या इच्छेनुसार होतातच.

सामाजिक नियंत्रण संघटनात्मक पोकळीमध्ये चालू शकत नाही. केवळ नैतिक मूल्याचे धडे देऊन आणि हृदय परिवर्तन करून सुधारणा घडवून आणता येतील असा विश्वास बाळगणाऱ्यांबद्दल समाजवाद्यांनी शंका प्रदर्शित केल्या ते योग्यच आहे. त्यांनी नेहमीच असा आग्रह धरला आहे की आर्थिक संघटनेत बदल करणे अगत्याचे आहे. सामाजिक नियंत्रणाचे संघटनात्मक स्वरूप म्हणजे समाजाला जबाबदार राहणे. हे नियंत्रण प्रत्यक्षात यशस्वी होण्यासाठी तीन गोष्टी करावयास हव्यात. पहिली गोष्ट अशी की जे सत्तेचा वापर करतात त्यांना ही सत्ता कशाप्रकारे वापरली जावी याच्याशी संबंधीत असलेल्यांना जबाबदार रहावयास लावणे. दुसरे असे की समाजनियंत्रणास शासनाचा पाठिंबा हवा. जे आपली जबाबदारी उचलण्यास कमी पडतात त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी काहीतरी अंतिम स्वरूपाचे साधन हवे. तिसरी गोष्ट अशी की ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत याची त्यांना माहिती हवी. त्यांच्या वागणुकीसाठी स्वच्छ नि स्पष्ट प्रमाणाचा निर्देश केला पाहिजे. अशी प्रमाणे मांडली नाहीत तर त्यांचा आदर केला जावा असा आग्रह धरता येणार नाही.

जबाबदारीचे पालन व्हावे यासाठी जी यंत्रणा करायची ती निरनिराळ्या प्रकारे करता येईल. सरकारी संस्थांमध्ये व्यवस्थापक सभासदांना सरळ जबाबदार असतात. लोकशाही व्यवस्थेचे हे प्रमुख लक्षण आहे. सरकारी उद्योगसंस्थांमध्ये

व्यवस्थापक हे अंतिम अर्थाने संसदेस जबाबदार असतात. पण संसद तर रोजच्या व्यवहारापासून दूर असते. आणि खाजगी उद्योगसंस्थांतील व्यवस्थापकांच्या वर्तनावर तर संसदेस काहीच नियंत्रण ठेवता येत नाही. सरकारी व खाजगी उद्योगसंस्थांतून विशिष्ट जबाबदारीचे पालन व्हावे यासाठी काही करण्याची आवश्यकता आहे. ग्राहकांच्या बाजूने विचार केल्यास ग्राहकमंडळापासून ते फसवणूक करणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंध करण्यापर्यंत अनेक साधने आहेत. उत्पादकांच्या बाजूने विचार केल्यास औद्योगिक लोकशाहीच्या यंत्रणेद्वारा कामगारांना जबाबदार राहण्याची व्यवस्था आहे. प्रत्येक बाबतीत प्रभावी उपाययोजना करता येते. ग्राहक खरेदी करण्याचे व कामगार काम करण्याचे नाकारू शकतो. आणि सरकार जसे ग्राहकांच्या मदतीला जाऊ शकते तसेच कामगारांना त्यांच्या संघटनांचा पाठिंबा असतो.

पण तिसऱ्या नि महत्त्वाच्या अटीचे म्हणजे व्यवस्थापकांच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी स्पष्ट प्रमाणे ठरवून देण्याचे काय ? पूर्वीची प्रमाणे साधी व सरळ होती. वर्षाच्या शेवटी नफया तोटयाचा हिशेब कसा सादर केला जातो यावर व्यवस्थापकाचे नोकरीवर राहणे व बडतर्फ होणे अवलंबून असे. धंदा ठीक असे तोपर्यंत व्यवस्थापक आपल्या अधिकाराचा वापर कसा करतो ही गोष्ट विशेष महत्त्वाची मानली जात नसे. हा साधा आदर्श आता डळमळायला लागलाय– बदनाम झालाय. खाजगी उद्योग संस्थांमध्ये सुद्धा फायदा म्हणजे उत्तम व्यवस्थापन असे समीकरण मांडले जात नाही. उलटपक्षी जुन्या आदर्शाच्या जागी नवे आदर्श ठेवले जात आहेत. फायद्याच्या जागी उत्पादनक्षमतेला महत्त्व दिले जात आहे. समन्वय, कार्यक्षमता, मक्तेदारीचे नियंत्रण, सुधारित औद्योगिक संबंध ही सारी उत्पादन वाढविण्याची साधने आहेत या भूमिकेतूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. सहकारी उद्योगांची सुद्धा बाजू याच भूमिकेतून मांडली जाते. सहकारी उद्योगांमुळे समाजवादी ध्येये प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळेल आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेबद्दलचा आदरभाव प्रत्यक्ष उद्योग संस्थेच्या कामकाजातून अंमलात आणता येईल, असे सूचित करणे म्हणजे निरुपयोगी अवास्तव आदर्शवादी म्हणून बडतर्फीसच पाचारण करण्यासारखे आहे. व्यापारी संस्थेचे अस्तित्व हे वस्तू नि सोई यांच्या उत्पादनासाठी असते. आणि म्हणूनच आपल्या अस्तित्वाचे समर्थन प्रत्येक संस्थेने बाजारातील यशापयशाच्या आधारावर केले पाहिजे, त्या संस्थेत काम करणाऱ्या लोकांवर त्याचा काय परिणाम होतो हा मुद्दा गैरलागू आहे, असे म्हटले जाते.

तरीसुद्धा ज्या प्रमाणांचा समाजवादी आता स्वीकार करतील आणि जेथे जेथे व्यवस्थापक आपल्या मार्गदर्शनाचा अहवाल सादर करताना ही प्रमाणे

लागू करतील त्यांचा अर्थ इतकाच की उद्योगसंस्था समाजवादी ध्येयांच्या संदर्भात चालवाव्यात आणि व्यक्तींचा ग्राहक व उत्पादक या दोन्ही भूमिकेतून विचार व्हावा. आर्थिक घडामोडींचा माणसाच्या जीवनावर जो दुहेरी परिणाम होतो त्याची व्यवस्थापकीय सत्तेला योग्य ती दखल घ्यावी लागते. कार्यक्षमतेची आवश्यकता निश्चितच आहे पण माणसाचे उत्पादक म्हणून जे हक्क आहेत त्याकडे पुरेसे लक्ष पुरवू नये असे नाही. तेव्हा व्यवस्थापकीय अधिकाराचा वापर कसा होतो आहे याचे मूल्यमापन करताना समाजाने हा निकषसुद्धा लावला पाहिजे.

आर्थिक सत्तेच्या नियंत्रणासाठी मार्गदर्शनपर तीन तत्त्वे म्हणून सत्तेच्या समतोलाचे तत्त्व मोक्याच्या सहयोगातून नियोजन करण्याचे तत्त्व आणि समाजास जबाबदार राहण्याचे तत्त्व या तत्त्वांचा एक पूर्ण संच बनतो. आमच्या आजच्या विचारांचे धागे या तत्त्वांनी एकत्र आणले आहेत. त्यामुळे साध्यांचे धागे व साधनांची वीण यांच्या साहाय्याने समाजवादी आर्थिक व्यवस्था वीणता येईल. या अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक दोन्ही विभाग असतील. पण आर्थिक सत्ता– मग तिचे स्वरूप कसेही असो अथवा ती कोणाच्याही हाती असो– ही परिणाम-कारक नियंत्रणाखाली असेल. हे नियंत्रण आर्थिक, राजकीय वा सामाजिक असेल. यापैकी प्रत्येक प्रकारचे नियंत्रण स्वतंत्रपणे व एकत्रितपणे सुरू करता येईल.

निर्दोष आणि अपरिवर्तनशील अशा आर्थिक संस्थांचे गैरमार्गदर्शन करणारे चित्र आम्हाला एकदम अमान्य असल्याचे आम्ही सुरुवातीसच सांगितले. त्याचा आणि वरील कल्पनेचा आणि चित्राचा काही संबंध नाही. समाजवादी ध्येयांची अभिव्यक्ती संस्थात्मक स्वप्नरंजनाच्या माध्यमाने कधीही करता येणार नाही. कारण संस्था या कधीच परिपूर्ण नसतात. नव्या परिस्थितीशी त्या सतत जुळवून घ्याव्या लागतात. संस्थांची निवड करताना ज्या संघटनात्मक तत्त्वांचा विचार व्हावा अशा तत्त्वांची आम्ही केवळ मांडणी केली आहे. ज्या पद्धतीने या तत्त्वांचा प्रत्यक्षात अर्थ लावला जाईल, त्या संघटनात्मक चौकटीची वास्तवात निवड केली जाईल त्याचे अगणित प्रकार असतील पण याचे कोणी आश्चर्य बाळगण्याचे कारण नाही. कारण ज्या परिस्थितीशी सामना करावयाचा आहे, त्यात अनंत प्रकारे बदल होऊ शकतो.

## निष्कर्ष

# १४. भविष्याकडे नजर

कुठलाही राजकीय विचार तगायचा असेल तर त्यातून स्फूर्ती तर मिळालीच पाहिजे पण मार्गदर्शनही झाले पाहिजे. समाजवादही याला अपवाद नाही. जुन्या निष्ठा किंवा भूतकाळातील पराक्रमाच्या आधारावर त्याला तग धरता येणार नाही. चालू पिढीची निष्ठा त्याने जागृत केली पाहिजे. आणि चालू काळानुसार समाजवादी विचाराच्या संदर्भात कशी कृती केली पाहिजे हे दाखविले पाहिजे. या विचारातून सतत प्रकाश नि स्फूर्ती न मिळाल्यास–हृदयात आग आणि मनात प्रकाश–याची आकर्षकता नष्ट होईल आणि ती इतिहास जमा होऊन नाहीशी होईल.

चळवळीमध्ये तसेच लोकांमध्ये प्रगल्भता आल्याने काही धोके संभवतात, याकडे दुर्लक्ष करणे तरुणास परवडण्यासारखे आहे. आचरणाचा प्रयत्न न झालेली ध्येये भडक अपेक्षा निर्माण करतात. मग ती चमक अंधुक बनते. आणि त्या ध्येयांच्या सिद्धीच्या मार्गातील अडथळ्यांचे आकलन होऊ लागते. त्याचबरोबर रक्तवाहीन्या थकल्यानंतर ज्याप्रमाणे सभोवताली नव्या उत्साहाने पाहण्याची उत्सुकता नसते, तसेच बदललेल्या परिस्थितीशी वास्तवाच्या संदर्भात जमवून घेण्याकडे मनाचा कल होत नाही. कालबाद झालेल्या मार्गाचा धिक्कार करण्यास सदैव तयार असलेल्या वृत्तीचे रूपांतर त्याच त्या मार्गांना चिटकून बसण्याच्या प्रवृत्तीस होते. कालचा पाखंडी आजचा पुराणमतवादी होतो. ध्येयासक्ती कमी होणारा आदर्शवाद आणि साधनांबद्दल वाढता हेकटपणा हे दोन वाढत्या वयाचे धोके आहेत.

समाजवादाबद्दल नव्याने विचार व्हावा ही जी मागणी अलिकडील काळात वाढली ती या धोक्यांची जाणीवच सूचित करते आहे. ब्रिटिश कामगार चळवळीने मात्र केव्हाच विचारांचे दास्य स्वीकारले नाही. ही चळवळ आपल्या पारंपारिक धोरणात योग्य ते बदल आणण्याच्या कामी विशेष तत्परता दाखवित नसेल; पण एखादी भूमिका पटल्यानंतर तिने नक्कीच बदल घडवून आणले आहेत, हा विश्वास वाढत आहे. कल्याणकारी राज्यांचे अद्याप अप्रत्यक्ष हल्ल्यापासून संरक्षण करावे लागते. पण समाजवाद्यांना हे समजले आहे की बचावात्मक लढ्याने भागण्यासारखे नाही. ते नव्या ध्येयांच्या आणि नव्या मार्गांच्या शोधात आहेत. आमच्या म्हणण्याचे सार इतकेच आहे की आपल्या आदर्शाविषयीचा ध्येयवाद पुन्हा चेतविल्याखेरीज नवे हेतू दृष्टीपथात येणार नाहीत. आणि

साधनांच्या निवडीबाबत वास्तववादी दृष्टिकोण बाळगल्याखेरीज पुढे टाकावयाची व्यवहार्य पावलेही दिसणार नाहीत.

## समता आणि त्या पलिकडे

समतेची कल्पना ही नेहमीच समाजवादी आदर्शवादाचा गाभा मानली गेली आहे. वर्ग पद्धतीचे उच्चाटन, जीवनावश्यक वस्तूंच्या विभागणीत वाटयाची मागणी, खास अधिकाराच्या भितीमुळे न विभागलेल्या आणि लोकांमध्ये एकमेकां-बद्दल मानवतेची भावना जिवंत असलेल्या समाजाचे आकर्षण, या समाजवादी राजकीय चळवळीच्या खास वैशिष्टयांचा उदय याच समतेच्या मूळ कल्पनेतून झाला आहे.

समतेचा मर्यादित अर्थ लावून केवळ उत्पन्न, मालमत्ता, शिक्षणावरील खर्च वा इतर सामाजिक सोयींवरील खर्च या साऱ्या भौतिक वस्तूंच्या वाटणीपुरताच तो लागू करता येईल. समाजवाद्यांनी समतेच्या या अर्थात रस घेतला याची कारणे समजू शकतात. गरीब व श्रीमंत अशा दोन राष्ट्रांमध्ये समाजाची विभागणी करणाऱ्या असह्य विषमतेचे उच्चाटन करणे हे त्यांचे पहिले कर्तव्य होते.

पण समाजवाद्यांना जर सतत भौतिक दृष्टिकोणातूनच विचार करायचा असेल तर त्यांच्या विचाराचे आकर्षण मर्यादित राहील. त्यांचे त्यांच्या विरोधकां-पासून निराळेपण, उत्पादनाची वाटणी कशी करावी एवढयापुरतेच मर्यादित राहील. पण हा फरकसुद्धा दुर्लक्ष करण्याजोगा वा कमी महत्त्वाचा नाही. कारण उत्पन्न आणि मालमत्तेची विषमता सामाजिक निषेध जागविण्यास पुरेशी आहे. पण ज्या पिढीस हव्या त्या नोकऱ्या उपलब्ध आहेत आणि ज्यांच्या खिशात वाडवडिलांना आठवडे अन् आठवडे जेवढ्या पैशावर जीवनधारणेसाठी अवलंबून रहावे लागत असे, त्याहून अधिक पैसे चैनीसाठी खर्च करण्यासाठी असतात. अशा पिढीस आकर्षित करण्यासाठी केवळ भौतिक समतेचे ध्येय पुरेसे नाही. गतकाळाप्रमाणे निष्ठापूर्ण आदर्शवाद जागृत करण्याची या कार्याची ताकद नाही.

समतेच्या आदर्शाची आता अधिक अर्थपूर्ण अभिव्यक्ती व्हावयास हवी. समान संधीबाबत समाजवादी नेहमीच बोलतात. पण यातूनच पुढचा प्रश्न उपस्थित होतो– कशाची संधी ? ज्या प्रकारच्या संधी दिल्या जातात त्याबद्दल आपल्याला बेफिकीर राहता येणार नाही. आपल्याला हव्या असेल त्या मार्गाने आपल्याला व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठी की केवळ इतरांची बरोबरी करण्यासाठी, आपल्या शेजाऱ्यास मदत करण्यासाठी की त्याच्यावर मात करण्यासाठी, हवी ती नोकरी मिळविण्यासाठी की मिळेल ती नोकरी स्वीकारण्यासाठी संधी हवी, याकडे नीट लक्षपूर्वक पाहिले पाहिजे. कुठल्यातरी आदर्शाप्रत पोहोचण्याची समाजात जिद्द

पाहिजे. आणि त्या आदर्शाच्याच संदर्भातच दिलेल्या संधीचे मूल्यमापन केले पाहिजे. ज्या संधीमुळे लोकांना स्वतंत्र वातावरण नि बंधुत्वाच्या भावनेने राहता येते, ज्यामुळे जीवन समृद्ध होते आणि समतेमध्ये दर्जेदारपणा मिळविला जातो अशा संधीचे समाजवाद्यांना महत्त्व वाटते. अशा आदर्शाकडे डोळेझाक करणे, आणि या आदर्शापासून अलग काढून समतेचा विचार करणे म्हणजे समाजवाद्यांना व्यक्तित्व आणि उमदे जीवन यांची विशेष पर्वा नाही; ते केवळ आहे त्याची तांत्रिक वाटणी कशी करावी एवढ्याचीच काळजी घेतात, असा आरोप स्वतःवर ओढवून घेण्यासारखेच आहे.

याउलट वरील आदर्श मान्य केल्याने आपण समतेच्या पुष्कळच पलीकडे पोहोचतो. संधींचे – अगदी उदात्त वा उमदे बनवणाऱ्या संधींचे देखिल– केवळ समान वाटप करणे पुरेसे नाही. अशा संधींची वाढ केली पाहिजे. अभिव्यक्ती आणि सेवा यांचे मार्ग सतत वाढत्या प्रमाणात खुले होत गेले पाहिजेत. न भोगलेले स्वातंत्र्य आणि न पेललेल्या या जबाबदाऱ्या यांची ही नवी क्षितिजे कदाचित उगवत्या पिढीच्या मनोवृत्ती थरारून सोडतील. आणि केवळ भौतिक प्रगतीच्या आमिषाने जे साधले नाही ते साधून जाईल. समाजवादी आदर्शवाद जर केवळ भौतिक सुखाच्या जाळ्यात अडकून पडला तर सद्याच्या परिस्थितीत तो सुरुवातीपासूनच पंगू झाला असे म्हणावे लागेल.

या भौतिक भूमिकेच्या चौकटीत आर्थिक जीवनातील दोन प्रश्न उद्भवतात– "उत्पादन किती आहे ?" आणि "त्याची विभागणी कशी केली आहे ?" वास्तविक याच प्रश्नावर समाजवाद्यांनी सारे लक्ष केंद्रित केले आहे. पण या चौकटीच्या बाहेर पडल्यानंतर आणखी दोन तातडीच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी आपल्यावर पडते. ते– असे ' कशाचे उत्पादन केले आहे ? आणि ' ते कशाप्रकारे केले आहे ?' आपल्या काळात या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले आहे. उत्पादनाच्या क्षेत्रातील अग्रक्रमाबद्दल जो उलटेसुलटपणा चाललाय आणि ज्यामुळे धुलाईयंत्रे आणि शीतपेटी यांना राहावयाच्या घरांपेक्षा, रस्त्यांच्या अगोदर मोटारी, शाळांच्या अगोदर व्यावसायिक दूरध्वनी, या गोष्टींना प्राधान्य दिले जाते. त्यातूनच ही बेफिकीरी व्यक्त झाली आहे. औद्योगिक क्षेत्रातील दूषित संबंध, कामगारांना कामात रस न वाटणे, त्यांची बेफिकिरी आणि त्यांचा माणूसघाणेपणा या साऱ्यांचे वर निर्देशिलेले कारण हे स्पष्टीकरण आहे.

'काय' आणि 'कसे' या प्रश्नाबद्दलची अनास्था म्हणजे या प्रश्नांमागे जी मूल्ये दडली आहेत त्यांचा इन्कार आणि माणूस केवळ अन्नावरच जगू शकतो अशी श्रद्धा असा अर्थ करणे चूक आहे. इन्कार असेल तर ते या भूमिकेतून की या प्रश्नांचा आर्थिक जीवनाशी संबंध नाही. रविवारच्या सुट्टीसाठी स्वातंत्र्य

नि बंधुभाव हे विषय चर्चेला छान वाटतात. पण आठवडाभर करावयाच्या नोकरीतल्या कामाशी या विषयाचा काय संबंध आहे? अमूर्त स्वरूपातील आदर्शाबाबत कोणीच शंका प्रदर्शित करीत नाही. 'जे आहे ते तसेच राहणार', 'माणसाचा स्वभाव आहे तसाच आहे', यातील विध्वंसक तर्कामुळे आर्थिक क्षेत्रात हे आदर्श गाठणे किती अवघड आहे हे सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न आणि आर्थिक क्षेत्र हे आमच्या सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग वा घटक आहे.

तरीसुद्धा 'कशाचे उत्पादन' आणि कशाप्रकारे हे उत्पादन केले आहे' हे प्रश्न समाजवादी परंपरेस परके नाहीत. हे प्रश्न उपस्थित केले गेले होते– आग्रही स्वरात विचारले गेले होते. पण त्यावेळी समाजवादी दारिद्र्य आणि बेकारी या समस्या सोडविण्याच्या ओझ्याखाली दबले गेले नव्हते. आता या प्रश्नांना पुन्हा पाचारण करणे शक्य आहे व अगत्याचेही आहे. कारण समाजवादी दृष्टीचे व्यापक स्वरुप त्यात पूर्णत्वाने प्रकट झाले आहे.

## खाजगी उद्योगक्षेत्र

आर्थिक व्यवस्थेतील बदल हा समाजवादी वास्तववादातील नेहमीच केंद्रबिंदू मानला गेला आहे. तो आवश्यक आहे. पण हा बदल संपूर्णपणे सार्वजनिक मालकी प्रस्थापित करून घडवून आणायचा, ही कल्पना मात्र त्याज्य मानली पाहिजे; कारण त्यामुळे सर्वंकष हुकुमशाहीचा उदय होतो. आजच्या वास्तववादातील पहिली गोष्ट म्हणजे या वस्तुस्थितीची दखल घेणे आणि त्याचे परिणाम मान्य करणे ही होय. समाजवादी अर्थव्यवस्था ही मिश्रअर्थव्यवस्था आहे. अंशतः खाजगी आणि अंशतः सार्वजनिक अशा या व्यवस्थेचे अंग मिश्र आहे, पण यात खाजगी खर्च, खाजगी मालमत्ता तसेच सार्वजनिक मत्ता, खाजगी उद्योग तसेच सार्वजनिक उद्योग या साऱ्यांचा समावेश आहे.

ब्रिटिश मजूर चळवळीने हे सारे यापूर्वीच व्यवहारात मान्य केले आहे. पण संपूर्णपणे सार्वजनिक मालकीच्या विचाराने समाजवादी विचारात गोंधळ निर्माण केला आहे. समाजवाद्यांच्या बोलण्यात नि वागण्यात संगती दिसत नाही. भंगलेल्या व्यक्तिमत्वामुळे ते बेचैन झाले आहेत, त्याचे मित्रगण कोंडघात पडले आहेत व ते आपल्या शत्रूंच्या हाती कोलीत देत आहेत. यामुळे समाजवाद म्हणजे साम्यवादाच्या मार्गावरील एक टप्पा आहे, असे वर्णन करण्यास समाजवादाच्या सदसत्‌विवेकरहित शत्रूंना शक्य झाले आहे. समाजवाद आणि सर्वशक्तीमान राज्यसंस्था, वर्चस्व गाजविणारी नोकरशाही (Bureaucracy) सक्ती, नियंत्रण आणि इतर असमाधानकारक गोष्टी यांची सांगड घातली गेली आहे.

समाजवादी अर्थव्यवस्थेतील खाजगी उद्योग विभाग हा केवळ याचना करून जगत नाही. एक राजकीय गरज म्हणून या विभागाचे अस्तित्व सहन केले जाते. आणि डेमॉक्लेसची तलवार यांच्या डोक्यावर सदैव असते असेही नाही. उलटपक्षी या विभागास अस्सल नि आवश्यक अशी जबाबदारी उचलावी लागते. समतेच्या चौकटीत लोकांना मर्जीनुसार खर्च करण्याची, मालकी प्रस्थापित करण्याची, प्रयोग करण्याची व आपले आर्थिक फायदे वाढविण्यासाठी एकत्र येण्याची, अशा विविध संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. या सर्व क्षेत्रात राज्य-संस्थेच्या परवानगीची वाट पाहत न बसता हालचाल करण्याची संधी हवी.

खाजगी विभागाचे हे महत्त्वाचे कार्य असेल तर कायद्याच्या आणि शासकीय बंधनाच्या जाळ्यात त्याला कोंडता येणार नाही, त्यामुळे मूळ हेतूच निष्फळ होईल. खाजगी विभागाच्या हालचालींवर नियंत्रणे ठेवायची ती बाजारात सत्तेचा समतोल सांभाळून ठेवावी. कारण त्यामुळे संघर्ष प्रवृत्त हितसंबंधांना सारखेच महत्त्व दिले जाते. निर्णय घेण्याच्या आणि जबाबदारी स्वीकारण्याच्या हक्कावर गदा आणण्यासाठी सरकारी हस्तक्षेप नको. सत्तेचा समतोल कायम राहील अशी तिची विभागणी व्हावी आणि कोणत्याही खाजगी हितसंबंधाला खास अधिकार प्राप्त होऊ नयेत, यासाठी अशा हस्तक्षेपाची जरूरी आहे.

खाजगी औद्योगिक क्षेत्राचे कार्य नि त्यांचे स्थायित्व यांच्या अनिश्चिततेमुळे समाजवाद्यांनी या क्षेत्राशी संबंध कशा प्रकारे ठेवावेत याचा तितकासा विचार केलेला नाही. हे खरे की श्रमशक्तीच्या देवघेवीत परस्परांना विरोध करणाऱ्या मोठमोठ्या हितसंबंधीतांमध्ये सत्तेच्या समतोलाची नितांत गरज होती– त्या ठिकाणी तो प्रस्थापित झाला आहे. संपूर्ण बेकारी निवारण आणि बळकट कामगार संघटना यामुळे कामगार आता बरोबरीच्या नात्याने मालक वर्गाशी बोलणी करू शकतात. पण सुसंघटीत कामगार आणि मालक एका बाजूस उत्पादनाची व व्यापाराची मक्तेदारी यांच्या कचाट्यात भावी ग्राहक, छोटा उत्पादक अथवा व्यापारी यांची काय अवस्था होते ? सत्तेचा तराजू नेहमीच त्यांच्या विरुद्ध बाजूस झुकतो. 'घ्या अथवा सोडा' एवढ्यापुरतेच ग्राहकाचे निवड स्वातंत्र्य मर्यादित बनते. आणि जो स्वतंत्र राहून आपल्या इच्छेनुसार काही करू इच्छितो त्याला काहीच संरक्षण नसते. एकजूट झालेल्या औद्योगिक संघटनांच्या प्रचंड साधनांनी त्याचा कोंडमारा होतो आणि त्याला तर अशांशीच स्पर्धा करायची असते.

इथेसुद्धा समतोल असावा अशी व्यवस्था करणे हा सुद्धा समाजवादाच्या कार्याचाच एक भाग आहे. ग्राहक आणि छोटा माणूस यांना न्याय्य संरक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक सरकारी हस्तक्षेप होणे अगत्याचे आहे. निर्बंधक व्यवहाराचे

नियंत्रण करणे वा सरकारनेच ठोक व्यवहार करण्यास आरंभ करणे, यापासून ग्राहकांना सल्ला देणे किंवा छोटा उत्पादक व व्यापारी यांना सुलभ रीतीने कर्ज मिळवून देण्याची व्यवस्था करणे, यासारख्या छोट्या मोठ्या गोष्टींच्या साहाय्याने असा हस्तक्षेप करता येईल. समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी उद्योगांची आवश्यकता असण्याचे कारण हेच की समाजवादी व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान देतात. तेव्हा असे स्वातंत्र्य प्रत्यक्षात आहे याची खबरदारी घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे. बाजारातील मक्तेदारी स्थापन करू पहाणाऱ्या लोकांच्या कारस्थानास ते बळी पडता कामा नयेत.

## सार्वजनिक औद्योगिक केंद्र

सार्वजनिक औद्योगिकक्षेत्राचे कार्य सर्वस्वी वेगळ्या प्रकारचे आहे. खाजगी विभागात खाजगी हितसंबंध नजरेसमोर ठेवून सर्व निर्णय घेतले जातात. त्यातून काही समाजहिताचे घडले तर तो योगायोग असतो. सर्वांचे हित साधेल अशी आपोआप जमवणूक करणारी यंत्रणा बाजारात असते, ही कल्पना एकदा अग्राह्य ठरली की सार्वजनिक औद्योगिकक्षेत्राची योग्य पायावर प्रस्थापना झाली असे म्हणावयास हरकत नाही. मनोधैर्य वा सामर्थ्याच्या अभावी ज्या क्षेत्रात व्यक्ती वा खाजगी संघटना तग धरू शकणार नाहीत याची खात्री आहे, अशा क्षेत्रात सरकारने प्रवेश केला पाहिजे. ध्येयसिद्धीच्या बाबत निश्चितीची परिस्थिती निर्माण करावयाची असेल तर राष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या उत्पादनांच्या साधनांचे सर्वसाधारण नियोजन करणे अगत्याचे आहे. बाह्य नियंत्रणाच्या साहाय्याने नियोजन करणे हे जरी काही वेळा आवश्यक असले तरी ते धोकादायक तसेच परिणामशून्य ठरण्याची शक्यता असते. अर्थव्यवस्थेत मोक्याच्या ठिकाणी सरकारने प्रत्यक्ष भाग घेऊन नियोजन करणे ही समाजवादी नियोजनाची पद्धती आहे. वेगळ्या शब्दात नियोजन माध्यम म्हणून सार्वजनिक औद्योगिक क्षेत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक क्षेत्राचा विचार जेव्हा सर्वस्वी राष्ट्रीयीकरण केलेल्या उद्योगांपुरताच केला जातो, तेव्हा या विचारात वास्तवाचा भाग कमी आहे असे म्हणावे लागते. ज्या काळात साऱ्या आर्थिक सामर्थ्याची उत्पादन साधनांच्या मालकीशी सांगड घातली जात असे, त्याकाळापासूनच हा चुकीचा विचार चालत आला आहे. पण आर्थिक सामर्थ्याचे अनेक प्रकार आहेत, हे आपल्याला आता परिचित झाले आहेत. आणि सार्वजनिक क्षेत्राचा विचार करताना राज्यसंस्थेच्या नियंत्रणाखाली असलेले सर्वप्रकारचे आर्थिक सामर्थ्य ध्यानात घ्यावे लागते. अंदाजपत्रक हाच मुळी सार्वजनिकक्षेत्राचा महत्त्वाचा भाग आहे. समाजोपयोगी कार्यासाठी वापरता येईल अशा प्रचंड महसूल खर्चावर सरकारी नियंत्रण ठेवण्यास अंदाज-

पत्रकामुळे संधी मिळते. निरनिराळया स्वरूपाच्या सार्वजनिक मत्तेचा व उद्योग-संस्थांचा सार्वजनिक क्षेत्रात समावेश होतो. केवळ उद्योग संस्थांवरच सार्वजनिक मालकी असेल असे नव्हे तर जमीन, इमारती, व्यापारी पेढीतील शेअर्स व सर्व प्रकारच्या मालमत्तेवर सार्वजनिक मालकी प्रस्थापित करता येईल. औद्योगिक संघटनेत देखील प्रमुख मूलोद्योग धंद्याच्या पलिकडील कितीतरी गोष्टी समाविष्ट आहेत. त्यात एखाद्या नव्या शहराचा किंवा नगरपालिकेच्या उपहारगृहाचासुद्धा अंतर्भाव सहजतेने होऊ शकेल.

समाजवादी साध्यांचा विचार करू लागताच प्रचलित सार्वजनिक क्षेत्राच्या मर्यादा स्पष्ट होतात. सार्वजनिक क्षेत्रात अधिक खर्च करणे, अधिक व्यापक मालकी आणि अधिक सार्वजनिक उद्योगसंस्था यांची आवश्यकता आहे. वरील प्रत्येक गोष्टीत काही खास स्वारस्य आहे असे नव्हे तर त्यांच्या साहाय्याने जे साध्य करून घ्यावयाचे आहे त्याला महत्त्व आहे. खाजगी खर्चामुळे ज्या सामाजिक गरजा कधीच पुरविल्या जाणार नाहीत अशांसाठी सार्वजनिक खर्च होणार नसेल तर अधिक सार्वजनिक खर्चास काहीच अर्थ राहणार नाही. मोठ्या माल-मत्तेवर सार्वजनिक मालकी प्रस्थापित करून न्याय्य वाटणीच्या दिशेने प्रगती करण्याचा विचार नसेल तर सार्वजनिक मालकीत काहीत तथ्य नाही. सार्वजनिक उद्योगसंस्था एक उद्योगसंस्था म्हणून महत्त्वाची नाही तर अशी संस्था सार्वजनिक मालकीची असणे हे जेव्हा आर्थिक सुरक्षा आणि विकसनशील अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियोजन करावयाचे असते; तेव्हा सरकारला आवश्यक भासते म्हणून तिचे महत्त्व आहे. केवळ अशा प्रकारच्या गोष्टी अधिकाधिक व्हावयास हव्यात असा हव्यास नाही तर त्याचा सुस्पष्ट व निश्चित ध्येयसिद्धी-साठी अधिकाधिक उपयोग केला जावा हे अपेक्षित आहे. तेव्हा पहिला प्रश्न हा किती ?' असा नसून कशासाठी ? हा आहे.

तरीसुद्धा 'किती ?' हा प्रश्न सारखा उपस्थित केला जातो. जणू काही समाजवाद अवतरण्यापूर्वीच अर्थव्यवस्थेचा कितवा हिस्सा सार्वजनिक मालकीचा असावा याचे उत्तर काटेकोरपणे व गणितीपद्धतीने आगाऊच देता येणे शक्य आहे. रोगी संपूर्ण बरा होण्यापूर्वी त्याला नेमके किती चमचे औषध प्यावे लागेल हे डॉक्टर लागलीच सांगू शकेल काय ? किंवा सुशिक्षित होण्यासाठी आपल्या विद्यार्थ्याला नेमकी किती पुस्तके वाचावी लागतील, हे शिक्षक आगाऊ सांगू शकेल काय ? असा प्रश्न उपस्थित करणे म्हणजे टांग्यापुढे घोडा जोडण्याऐवजी घोड्यापुढे टांगा जोडण्यासारखे आहे. समाजवाद्यांनी जर मूळ मुद्दा धरून ठेवण्याचे ठरविले तर 'कशासाठी ?' आणि 'किती ?' हे प्रश्न सुटतील.

## कायद्याच्या मर्यादा

कायद्याच्या साहाय्याने काय काय करता येईल याच्या मर्यादा जाणून घेणे हा वास्तववादी दृष्टिकोणाचा आणखी एक भाग आहे. प्रभावी कायदे करण्याच्या कार्यक्रमावर समाजवाद्यांनी जादा भर दिला आहे. पण उद्योगसंस्थांच्या अंतर्गत व्यवस्थेच्या संदर्भात जे काही लाभते त्याबाबत कायद्याचे हात फारच आखूड आहेत. व्यवस्थापकांना जर त्यांच्या अधिकाराच्या वापरासाठी सामाजिक जबाबदारी स्वीकारण्यास भाग पाडले तरच त्यांच्या सत्तेवर योग्य नियंत्रण ठेवता येईल आणि नेमक्या याच ठिकाणी समाजवादी कृती प्रकर्षाने कमी पडली आहे. काही फुटकळ प्रयत्न सोडल्यास व्यवस्थापकांना आपल्या कृतीचा कामगारांना जाब द्यावा लागावा ही कल्पनाच मुळी अद्यापही कुणाच्या ध्यानीमनी नाही आणि अशा कल्पनेची प्रत्यक्षात कार्यवाही कशी करावी यावरही कुणाचे एकमत होणार नाही. अद्याप ग्राहकाला कसे संरक्षण द्यावे या विषयीच्या मार्गाच्या शोधात धडपडत आहोत. सरकारी उद्योगसंस्थाचे उदाहरण घेतल्यास असे दिसते की या संस्था संसदेस चांगल्या रीतीने जबाबदार राहतील अशी व्यवस्था करणे अद्याप आपल्याला जमलेले नाही. वास्तविक असे काहीतरी करावे असे आपणास निश्चितपणे वाटत आहे, याचीच पक्की खात्री देता येत नाही.

सामाजिक जबाबदारीची यंत्रणा घडविणे हे सोपे नाही; पण केवळ अशी यंत्रणा निर्माण करण्याने फार लांबचा पल्ला गाठता येणार नाही. उद्योगसंस्थेने घालून दिलेल्या आदर्शावरच या यंत्रणेचा उपयोग कसा केला जाईल. हे अवलंबून राहील. त्यात काही बदल व्हावयाचा असेल तर तो उत्तम नेतृत्वाच्या साहाय्यानेच करता येईल आणि याबाबत व्यवस्थापक आणि तंत्रज्ञ यांना फार महत्त्वाची कामगिरी बजावायची आहे. व्यवस्थापक हे अक्षम्य गुन्हेगार आहेत ही भावना मनात बाळगून समाजवाद्यांनी जर या व्यवस्थापकांशी संबंध ठेवण्याचे नाकारले तर ज्या पद्धतीने उद्योगसंस्थांचे शासन चालते त्यात बदल घडवून आणण्यास त्यांना फारसे यश येणार नाही.

पण कामगार संघटनांना याहून अधिक महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे. याचे कारण असे की उत्पादक म्हणून व्यक्तीचे जे हक्क आहेत त्यांना अद्याप योग्य ती मान्यता मिळालेली दिसत नाही. कामगार संघटनांनी हा बदल घडवून आणण्यात पुढाकार घेतल्याखेरीज ही मान्यता मिळणार नाही. या संघटनेच्या सभासदांवरच या गोष्टीचा सर्वात अधिक परिणाम होतो आहे. आपल्या मागण्या मान्य झाल्या पाहिजेत असा आग्रह धरण्याची ताकद प्रत्यक्ष त्यांचेच ठायी आहे. परिणामी समाजवादी अर्थव्यवस्थेच्या दिशेने करावयाच्या वाटचालीत सर्वात महत्त्वाचो

जबाबदारी राजकीय पुढारी व स्थानिक पक्ष यांच्या शिरावर पडत नाही तर कामगार पुढारी व कमशाळा समित्या यांनी ही जबाबदारी झेलणे अगत्याचे आहे.

समाजवादी आंदोलनातील औद्योगिक विभाग साहाय्यभूत नसून एक अडथळा आहे. (अर्थात त्यामुळे पैसा मिळतो हा भाग सोडून) आणि या शाखेच्या मदतीविनाज समाजवादी स्वप्न लौकरच साकार होईल ही भावनाच सर्वस्वी अवास्तव आहे. दोन गैरसमजुती हिच्या मुळाशी आहेत. उत्पादक म्हणून माणसाच्या जीवनाशी समाजवादाचा संबंध नाही आणि केवळ कायद्याच्या साहाय्याने समाजवाद प्रत्यक्षात आणता येईल. वस्तुस्थिती अशी आहे की आपण आज जिथपर्यंत पोहचलो ते केवळ राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रातील चळवळींच्या एकत्रित कृतीमुळेच आणि आपल्याला अपेक्षित ठिकाणी पोहोचायचे असेल तर पुनश्च अशाच एकजुटीची आवश्यकता आहे.

## बदल घडवून आणण्याची इच्छा

समाजवादाचा पुर्नविचार होणे ही प्राथमिक गरज आहे. पण केवळ विचार करून समाज परिवर्तन घडून येणार नाही. त्यासाठी इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. कुठे पोहोचायचे ते स्पष्ट असेल, तेथपर्यंत पोहोचविणारा मार्ग सुनिश्चित झाला असेल पण लोकांच्या मनात हा प्रवास करण्याचा विचार असेल का ? याबाबत आपल्याला असे आढळते की आयुष्यभर समाजवादी असलेले लोकसुद्धा आज पराभूत भावनेने ग्रासलेले आहेत. समाजवादी निर्धार अद्याप कायम आहे वा नाही, किंवा भौतिक सुखाच्या आधुनिक युगात हा निर्धार नव्याने निर्माण करता येईल वा कसे याबद्दल ते शंका प्रदर्शित करतात. किंबहुना बहुतांशी लोक सध्या जे त्यांना प्राप्त झाले आहे, त्यावरच समाधानी आहेत, किंवा जरी समाधानी नाहीत असे मानले तरी स्वतःच्या राहणीमानाचा दर्जा कसा वाढवावा याखेरीज दुसऱ्या कशात त्यांना रस नाही. करांचा बोजा वाढण्याची वा नव्या जबाबदाऱ्या शिरावर येण्याची किंवा प्रचलित पद्धतीतून बाहेर पडण्यासाठी काही प्रमाणात तरी त्याग करावा लागण्याची शक्यता ज्यात आहे, असे नवे काही सामाजिक प्रयोग करावेत अशा प्रकारची ईर्षा तर नाहीच नाही. सध्याच्या कल्याणकारी राज्याहून काही तरी खूप निराळे करावयाचे झाल्यास लोकांकडून पुरेसा सहकार मिळेल असा विश्वास बाळगणे म्हणजे भ्रमात राहण्यासारखे आहे काय ? कदाचित विजयासारखा पराभव कशातच नसतो या राजकीय विरोधाभासाच्या खडकावर समाजवादाचे तारू आपटले आहे.

या निराशावादी शंकांशी आम्ही सहमत होऊ शकत नाही. आमचा असा विश्वास आहे की माणसाला केवळ आर्थिक सुरक्षिततेपेक्षा किंवा अगदी वाढत्या

उत्पन्नामुळे मिळणाऱ्या नव्या चैनीपेक्षा अधिक कशाची तरी ओढ आहे. पण आपापल्या काळात मान्यता पाकलेल्या मूल्यांचे सारे लोक बंदीवान असतात आणि बहुतेक सर्व प्रचलित संस्था त्याच मूल्यांना बळकटी आणण्याचे कार्य करीत असतात. माणसाने निसर्गावर मात करून दळणवळणाची जी साधने वाढवली आहेत त्याचमुळे अशा संस्थाचे महत्त्व वाढत जाते. जे आहे ते चांगले आहे आणि आहे तेच आधिक मिळाले तर जास्त चांगले, अशा भ्रमालाच बहुतेक सर्व खतपाणी घालतात. अशाप्रकारे मान्य मूल्यांमध्ये बदल घडवून आणण्याच लढा राजकारण आणि अर्थकारणाच्या सीमा ओलांडून पलीकडे जातो. आणि समाजाची सारी संस्कृतीच सामावून घेण्याइतपत हा व्यापक होतो. या गोलिॲथवर हल्ला करू इच्छिणाऱ्या समाजवादी डेव्हिडच्या भात्यात एकच बाण आहे, तो म्हणज सध्याच्या अनुभवापेक्षा कितीतरी पटीने सुंदर जीवन जगण्यास मानव समर्थ नि लायक आहे हा निर्धार.

एकाकी डेव्हिड ही लढाई जिंकू शकणार नाही. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याच्यासारख्या लढवय्यांची सेना उभी करणे अगत्याचे आहे. ज्याला आपल्या भविष्यातील जबाबदारीची जाण आहे तोच कामगार संघटनेचा जागृत सदस्य समजावा, ज्याला पगाराखेरीज अधिकाची ओढ आहे तोच खरा कामगार संघटक. ज्याला नफ्याच्या हिश्याखेरीज अधिक हवे आहे तोच खरा सहकारी नेता, जो उद्योगक्षेत्रात नवी ऊर्मी आणण्यासाठी जुने प्रघात मोडतो तोच खरा व्यवस्थापक वा विक्रेत्यांचा नेता. शिक्षणाचा नवा अर्थ गवसलेला तो शिक्षक आहे. दुर्दैवी लोकांचे दुःख हलके केल्याखेरीज झुंज न थांबविणारा तो सामाजिक कार्यकर्ता आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे मानव कुठल्या उंचीपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे याची आपल्याला प्रकर्षाने जाणीव करून देणारा तो कलावंत आहे, शिल्पकार आहे, लेखक आहे, कवी आहे. ज्याची प्रामाणिक श्रद्धा ज्याला कधीही नियमांचा गुलाम बनू देणार नाही असा तो चिरंतन बंडखोर आहे.

नव्या समाजाचे हे निरनिराळ्या प्रकारचे निशाणदार आहेत. कितीही बदल घडून आले असले तरी केर हार्डीने ( Keir Hardie ) पन्नास वर्षांपूर्वी जे विधान केले होते ते आजही अप्रस्तुत झालेले नाही. ' या विश्वांत जर काही करायचे असेल तर ज्यांना भविष्यातले दिसते आणि भविष्य दिसते म्हणून जे भविष्य घडवितात अशा स्वप्नाळू लोकांनीच ते करावे. '

# पारिभाषिक व कठिण शब्दांची सूची (Glossary)

१

capitalism – भांडवलशाही
unearned wealth – अनार्जित संपत्ती
free market – खुली बाजारपेठ
regulated economy – नियंत्रित अर्थव्यवस्था
orthodox economics – पुरातन अर्थशास्त्र
free competition – खुली स्पर्धा
dynamic laws – गतिशील नियम
private enterprise – वैयक्तिक साहस
laissez faire capitalism – मुक्त भांडवलशाही
public enterprise – सार्वजनिक साहस
static system – स्थिर किंवा स्थिति·शील व्यवस्था
planned economy – नियोजित अर्थव्यवस्था

२

familiar terms of reference – परिचित संदर्भ संज्ञा
consumer – उपभोक्ता

३

equality – समता
ladder principle – शिडीचे तत्त्व
classless society – वर्गविरहित समाज
equality among consumers – उपभोक्त्यांमधील समता
goods and services – वस्तू व सेवा
a living wage – जीवनावश्यक मजूरी
the just wage – न्याय्य वेतन
equality among producers - उत्पादकांमधील समता

४

freedom through plenty – वैपुल्या-तून स्वातंत्र्याकडे
community centres – सामूहिक केंद्रे
mass manipulation – सामुदायिक चलाखी
self expression – आत्मप्रगटन
sense of values – मूल्य दृष्टी

५

fellowship – सहभाव
dilemma – शृंगापत्ति
unstable equilibrium – अस्थिर समतोल

६

utopia – कल्पितादर्श
reassesment – पुर्नंनिधारण
do_ma – आग्रही मत

७

economic security – आर्थिक सुरक्षितता
inflation – चलनवाढ
the problem of creeping inflation – हळूच शिरकाव करणारी चलनवाढीची समस्या
under consumption – मालाचा अपुरा वापर
over production – अत्याधिक उत्पादन
statistical forecast – सांख्यिकी पुर्वानुमान
planning of investment – भांडवल गुंतवणुकीचे नियोजन
financial controls – वित्तिय नियंत्रण
wage-price spiral – वेतन– किमती यांची मळसूत्री वाढ
bargaining power – सौदाशक्ती
collective bargaining – सामुहिक किंवा सामुदायिक सौदापद्धती
mobility – चलनशीलता

८

market economy – पणनाधिष्ठित किंवा 'बाजारी' अर्थव्यवस !
sleeping partner – निष्क्रिय भागीदार
capital gains – भांडवलमूल्य वृद्धी
death duty – मृत्यू शल्क
capital levy – भांडवली कर
public enterprise – सार्वजनिक उद्योग
public saving – सार्वजनिक बचत
price ring – बाजारभावाचे कोंडाळे

९

expanding economy – विकसनशील किंवा विस्तारी अथवा विकासशील अर्थव्यवस्था
spurs to efficiency – कार्यक्षमतेला प्रोत्साहन
countervailing power – प्रतिदबाव शक्ती
public accountability – सार्वजनिक जबाबदारी
unqualified – बिनशर्त

१०

Industrial democracy – औद्योगिक लोकशाही
living tool – सजीव साधन
workshop – कर्मशाळा
productivity – उत्पादनक्षमता
joint consultation – संयुक्त सल्लामसलत
vicious circle – दुष्ट चक्र
cynicism – सर्वतुच्छतावाद

११

factors of production – उत्पादन घटक

organisation of the economy – अर्थव्यवस्थेचे संघटन

१२

dictatorship of the proletariat – कामगार हुकमत

totalitarianism – सर्वंकष हुकूमशाही

managerial power – व्यवस्थापकीय सत्ता

good will – ख्यातिमूल्य

१३

checks and balance – शह आणि समतोल

anarchist – अराज्यवादी

control from without – बाह्य नियंत्रण

control from within – अंतर्गत नियंत्रण

physical resources – भौतिक साधन सामुग्री

the principle of balance of power – सत्तेच्या समतोलाचे तत्त्व

the principle of planning through strategic participation – मोक्याच्या सहयोगातून नियोजन करण्याचे तत्त्व

regulation of restrictive practices – निर्बंधक व्यवहाराचे नियंत्रण

१४

Bureaucracy – नोकरशाही

conflicting interests – संघर्ष प्रवृत्त हितसंबंध

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य

स्टुडिओ आंगण ७८